# माणूस

' अँटनी ! माझ्या प्रियकरा '....

आणि राणीचा लुसलुशीत हात त्या काळसर्पाच्या करंडीत सरकला..



मार्च

१९६४

वर्ष तिसरे : अंक दहावा

*

मार्च १९६४

*

: संपादक :

श्री. ग. माजगावकर




## स्वरूपदर्शन




'माणूस'मधून येणाऱ्या पुस्तक-परिचयांचे वाचकांनी नेहमीच स्वागत केले आहे. परंतु आजवर हे परिचय महत्त्वाच्या इंग्रजी पुस्तकांचेच होते. यावेळी 'माणूस' श्री. नानकसिंह या हिंदी लेखकाच्या एका प्रसिद्ध कादंबरीचे श्री. रासने यांनी केलेले स्वैर रूपान्तर वाचकांना सादर करीत आहे.

या महिन्यात श्री. हरिभाऊ आपटे यांच्या जन्मशताब्दीचा सोहळा सर्वत्र साजरा होत आहे. त्यानिमित्त कादंबरी—वाङ्मयाचा शक्यतो अधिक परिचय वाचकांना व्हावा या विचाराने वरील कादंबरी देत आहोत. पुढच्याही अंकात एक कादंबरी येत आहे, ती मात्र श्री. हरिभाऊंच्या जीवनावर. यासंबंधीचे अधिक प्रकटन याच अंकांत इतरत्र पाहण्यास मिळेल. दोन्ही कादंबऱ्यांचे वाचक स्वागत करतील असा विश्वास आहे.

याच अंकाचे आणखी एक आकर्षण म्हणजे 'क्लिओपात्रा' या चित्रपटाचा परिचय-लेख. 'ट्वेंटिएथ सेंचरी फॉक्स' च्या या आगामी चित्रपटाची ही अत्यंत सुरस आणि सचित्र कथा आहे. इंग्रजी भाषेचा सराव नसल्याने कित्येकांना अशा चित्रपटांचे रसग्रहण करता येत नाही, यासाठी केवळ गोषवारा न देता मूळ चित्रपटकथेवरून हा लेख तयार केला आहे.

मुखपृष्ठ :

एलिझाबेथ टेलर – 'क्लिओपात्रा' चित्रपटात

किंमत एक रुपया : वार्षिक वर्गणी आठ रुपये

या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतातच असे नाही.

सर्व हक्क सुरक्षित

# ' माणूस ', ब्लिट्झ् ' आणि एक तज्ञ–

' रुधिरी स्वप्न बुडाले ' ह्या अध्यक्ष केनेडी यांच्या मृत्युदिनाचे चित्र रंगविणारा जानेवारी ६४ च्या अंकातील लेख वाचकांच्या अद्याप स्मरणात असेलच. या लेखात पृष्ठ १३ वर एक परिच्छेद असा आहे—

' बंदुकीवर ओस्वाल्डच्या तळहाताचे ठसे सापडले. तळहाताचे ठसे अनेकांचे एकसारखे असू शकतात. फक्त बोटांचे ठसे वेगळे असतात. बंदुकीवर किंवा डिपॉझिटरीत ओस्वाल्डच्या बोटांचे ठसे सापडले नाहीत. '......

अहमदाबादच्या फिंगर प्रिंट ब्यूरोचे डायरेक्टर श्री. धोलाकिया यांनी पत्र पाठवून हे विधान अशास्त्रीय असल्याचे निदर्शनास आणून दिले आहे. पत्र असे—

Sir,

I have read with interest the article ' रुधिरी स्वप्न बुडाले '. I draw your attention to the last column, para 1, page 13 of the issue and point out the bold mis-statement regarding the identification of palm prints. The physiological function of the friction skin appearing on the palms, fingers and foot-prints of persons is the same. They are covered with minute lines which are in the form of elevations and depressions. These elevations are called ridges in the finger print science. The top of the ridges is covered with minute pores through which there is a continuous flow of perspiration. The skin carries a sense of touch. These ridges and their characteristics persist throughout the whole period of human life and are destroyed after the skin is decomposed. Any patch taken from any part of the skin with sufficient characteristics is impossible to be duplicated. In other words, it is difficult to find the same type of patch either on finger, palm or foot on any two individuals. This has been proved by the scientists and supported by Finger Print Organisations. The science of identification is, therefore, based equally on finger-prints, palm-prints and foot-prints.

It has been stated in the article that palm prints of different persons may be found identical. This is a wrong statement indeed. In view of what has been explained by me in para 1 above, this mis-statement calls for immediate correction, I, therefore, request you to investigate the source of your information and issue a correction slip in the interest of the science.

Yours faithfully
( G. C. Dholakia )
Director
Finger Print Bureau, Ahmedabad

' माणूस 'ने हे विधान ' ब्लिट्झ् ' या इंग्रजी साप्ताहिकाच्या पुढील वाक्याधारे केले होते—

"The third allegation concerns the "**Palm prints**" found either on the window from which allegedly Kennedy was killed or on the captured rifle. Till to day, criminal investigation has never seriously considered "**Palm prints**" as opposed to "**finger prints**". (Blitz : December 7, 1963, page 17, columns 1 & 2 : black type original )

' माणूस 'च्या भाषांतरात अतिव्याप्तीचा दोष काही प्रमाणात आहे हे खरे आहे; पण ' ब्लिट्झ '-मधील मूळ विधानातून ' तळहाताचे ठसे तितकेसे विश्वासार्ह नाहीत ' असाच अर्थ निघतो.

' माणूस 'ची चूक निदर्शनास आणून दिल्याबद्दल श्री. धोलाकिया यांचे मन:पूर्वक आभार.

—संपादक



## आम्ही तीन काका आहोत...तूं खुशाल विलायतेला जा...


सदाशिवचें वडील वारले तेव्हां तो ३ वर्षाचा होता नि त्याच्या पाठची बहिण १। वर्षाची! मुलांचे वडील वारल्याचें दुःख आईला झाले, पण तिला दिरांचा केवढा आधार होता! काकांनी आपल्या मुलाइतक्याच हौशीनं सदाशिवची मुंज केली व लहान बहिणीचं लग्नहि धुमधड्याक्यानें साजरं केलं. सदाशिवनें डॉक्टरची शेवटच्या वर्षाची परीक्षाहि दिली.

त्याच्या मनांत होतं विलायतेला जायचं. एवढ्या खर्चाची गोष्ट, कशी काढावी असं त्याला वाटत होतं. पण त्याचा हा विलायतेला जाण्याचा विचार त्याच्या काकांच्या कानावर गेल्यावर ते म्हणाले, 'तुझ्या वडिलांनी पाठविलंच असतं ना तुला? तूं तयारी कर. खर्चाची काळजी करूं नकोस; अन् आईची तर मुळीच नको...आम्ही तीन काका असतांना तुला काय कमी आहे?'

तो काळच तसा होता. एकत्र कुटुंब असल्यानें कुटुंबांतील कुणाचें बरें वाईट झाले तरी काळजी घ्यायला कोणीतरी असे. त्यावेळीं विम्याचें काम एकत्र कुटुंबसंस्था करीत होती. पण आजच्या बदलत्या परिस्थितींत, विभक्त कुटुंबपद्धतीत ज्याची त्यानंच आपल्या कुटुंबाच्या आर्थिक सुरक्षिततेची तरतूद करावयास हवी. आजच तुमच्या विमा एजंटाचा सल्ला घ्या.

**आयुर्विम्याला पर्याय नाहीं**

Pratibha 642



सीझरची शांती ढळली नाही, पण ढळणार आहे

निवेदक
राम कोकजे

# क्लि ओ

: १ :

"ग्रंथालयाला आग लावलीत ! तुम्ही जंगली माणसांनी विचार, कल्पना हे शब्द तरी कधी ऐकले आहेत का ? अत्याचार, जाळपोळ यांखेरीज अन्य गोष्टींशी कधी तुमचा संबंधच आलेला नाही ! या गोष्टी सत्तेच्या जोरावर तुम्ही करणारच आहात—परंतु जगातील मानवी विचारधनाचा एक अंशही नष्ट करण्याचा तुम्हांला अधिकार नाही...... "

रागाने लाल झालेल्या इजिप्तच्या स्वरूपसुंदर सम्राज्ञीचे—क्लिओपात्रेचे हे बोलणे ऐकूनही सीझरची शांती ढळली नाही. त्याची मुद्रा पुतळ्यासारखी थंडच होती—

"मला वाटतं, आपण एकमेकांना आता पुरते ओळखण्याची वेळ आलेली आहे. मी सीझर आहे. तू आहेस—कुणीही अस—मला त्याच्याशी काही कर्तव्य नाही. आम्ही जंगली! पोरी, स्वतः कुणी देवता असल्याच्या भ्रमात राहू नकोस ! माझ्या व्यवहारात मला कुणाची ढवळाढवळ नको आहे— "

क्लिओपात्रेच्या संबंधात आल्यावर आत्मविश्वासाने केलेले सीझरचे हे पहिले आणि अखेरचेच भाषण ठरणार होते याची त्याला कल्पना नव्हती. क्लिओपात्रेने त्याला ओळखले होते. पहिल्या दृष्टिक्षेपातच त्याच्यावर कसे पाश टाकायचे याचा वेध तिने घेतला होता. जर कुणी कुणाला ओळखले नसेल तर ते सीझरनेच इजिप्तच्या राणीला अजून ओळखले नव्हते.

रोमचा सर्वाधिकारी सीझर दोन उद्देशांसाठी इजिप्तमध्ये शिरला होता. आपला प्रतिस्पर्धी पॉम्पे याचा त्याने नुकताच पराभव केला होता व पॉम्पे आश्रयासाठी ईजिप्तची राजधानी अलेक्झांड्रियाकडे पळाला होता. त्याचा पाठलाग करीत सीझर इजिप्तमध्ये आला. शिवाय ईजिप्तच्या राजघराण्यांतील तंटा संपविण्याचे कामही त्याला उरकायचे होतेच.

इजिप्तच्या दिवंगत राजाने आपला पुत्र पोलेमी व कन्या क्लिओपात्रा या दोघांनाही राज्याचे संयुक्त वारस नेमले होते व रोमच्या सत्ताधाऱ्यांकडे त्या दोघांची जबाबदारी सोपवली होती. परंतु पोलेमीने आपल्या सल्लागारांच्या बदसल्ल्यानुसार आपल्या बहिणीला—क्लिओपात्राला – शहराबाहेर हुसकून तिच्या पाठीराख्यांचाही बीमोड केला.

सीझर येतो आहे हे कळताच पोलेमी व त्याच्या मंत्रिमंडळाने सीझरच्या शाही स्वागताची तयारी केली. सीझरची खुशामत करण्यासाठी त्यांनी आश्रयासाठी आलेल्या पॉम्पेचे शिर धडावेगळे करून ते रक्तबंबाळ स्थितीत सीझरला नजर केले.

पण पोलेमीचा अंदाज चुकला. सीझरला ही गोष्ट आवडली नाही. तो जातीचा योद्धा होता. शत्रूला रणात मारण्यात शौर्य होते. शरणार्थीला मारणे म्हणजे नीचपणा होता. पोलेमी उघडा पडला.

सीझरने आपला सरसेनापती रुफियो याला

ईजिप्तची राणी क्लिओपात्रा म्हणजे प्रबळ अभिलाषा आणि प्रदीर्घ विवेक या गुणांचे एक अजब मिश्रणच होते. तिच्या सम्राज्ञीपदाच्या जबरदस्त महत्त्वाकांक्षेत असफल प्रीतीची व्याकुळता होती, तर सीझर-अँटनीवरील तिच्या मुक्त प्रेमातही राजकारणाचा एक सूक्ष्म हिशोब होता.

रोमचे साम्राज्य जेव्हा पूर्वेकडे विस्तारत होते त्या कालखंडात (ख्रिस्तपूर्व ४८ ते ३०) होऊन गेलेल्या या राणीच्या रहस्यमय चरित्राने शेक्सपीयर-शॉसारख्या नाटककारांनाही आकर्षून घेतलेले आहे. निर्माते वॉल्टर वँगर आणि दिग्दर्शक मँकिविझ यांनाही आज तिचे चरित्र नव्याने रुपेरी पडद्यावर आणावे अशी स्फूर्ती झालेली आहे. रोमन साम्राज्याच्या वैभवसंपन्न काळाला साजेल अशाच दिमाखात निर्माता-दिग्दर्शक यांनी 'क्लिओपात्रा' चित्रपट तयार केला आहे. मार्च महिन्यात भारतात हा चित्रपट सर्वत्र प्रसिद्ध होत आहे. असंख्य मराठी प्रेक्षक हा चित्रपट पाहतील. त्याचे परिपूर्ण रसग्रहण करता यावे म्हणून 'माणूस'ने ही चित्रपटकथा या अंकात सादर केली आहे.

'ट्वेंटिएथ सेंचरी'ने मराठीत चित्रपटाची परिचयकथा सर्वप्रथम अधिकृतपणे फक्त 'माणूस'ला दिली याबद्दल कंपनीचे आम्ही आभारी आहोत.

—संपादक

निर्माते : ट्वेंटिएथ सेंचरी फॉक्स
निर्माता : वॉल्टर वँगर
दिग्दर्शक : जोसेफ एल्. मँकिविझ
प्रमुख भूमिका :
क्लिओपात्रा – एलिझाबेथ टेलर
मार्क अँटनी – रिचर्ड बर्टन
ज्युलिअस सीझर – रेक्स हॅरिसन

# पा त्रा

पॉम्पेचे धड शोधून काढून त्याचे शाही अंत्यसंस्कार करण्याचा हुकुम केला. पोलेमी किंवा त्याच्या मंत्र्यांशी एक शब्दही न बोलता सीझर तडक आपल्या निवासाकडे गेला. आपण एक मोठा शत्रू निर्माण केला याची यामुळे पोलेमी व त्याच्या मंत्र्यांना मात्र चांगलीच जाणीव झाली. त्यांच्या अपेक्षा धुळीला मिळाल्या.

सीझर सावध होता. डिवचलेला पोलेमी आपला घात करील ही शंका त्याला होतीच. आपला सरसेनापती व सरनौबत यांना त्याने गुप्त हुकुम दिले. आपल्याजवळ मनुष्यबळ कमी आहे आणि म्हणूनच पोलेमी सरळसरळ हल्ला करील म्हणून त्याने आपल्या निवासाभोवती कडक पहारा बसवला.

क्लिओपात्राला वारे कुठल्या दिशेने वाहात आहे याचा सुगावा लागला. सीझर हा पोलेमीच्या आहारी जात नाही हे पाहताच तिची महत्त्वाकांक्षा पुन: प्रज्वलित झाली. पोलेमीचा सूड आणि इजिप्तचे सिंहासन हस्तगत करण्यासाठी तिने पहिला डाव टाकला. अप्पोलोडरस या आपल्या प्रेमपात्राला तिने हाताशी धरले. हा सिरिअन होता. तिच्यासाठी साहस करण्यात त्याला धन्य वाटत होते !

रात्री तिने अप्पोलोडरसला आपल्या देहाचे गाठोडे एका घोंगडीत गुंडाळून सीझरच्या महालात घेऊन जाण्यास सांगितले. तिच्या सांगण्याप्रमाणे ते बोचके घेऊन अलेक्झांड्रिया शहराची चौकी ओलांडून तो आत शिरला.

"माझ्या राणीच्या आज्ञेनुसार ही भेट मला प्रत्यक्ष सीझरला नजर करायची आहे" असा त्याने चौकीदारांना खुलासा केला व ते गाठोडे सीझरपुढे ठेवले.

सीझरने आज्ञा करताच अप्पोलोडरसने घोंगडीची गाठ सोडली. सीझर आश्चर्याने पाहू लागला. काहीशी गंभीर वाटणारी एक लावण्यवती काहीशा अस्ताव्यस्त स्वरूपात त्याच्यापुढे उभी होती.

अप्पोलोडरसने ओळख सांगितली—

"इजिप्तची राणी क्लिओपात्रा—हिचा विजय असो !"

सीझरला हसू फुटले. अडमडत उभे राहण्याचा प्रयत्न करणाऱ्या या लावण्यवतीचे वय पुरते सतरा देखील नव्हते.

विस्फारलेल्या नजरेने क्लिओपात्रा समोर उभ्या असलेल्या विख्यात रणयोद्ध्याकडे पाहू लागली.

"मला क्षमा असावी. माझ्या या धाडसाबद्दल तुम्ही रागावणार नाहीत अशी खात्री आहे. कारण तुम्ही माझ्यापेक्षा कितीतरी वडील आहात. अशा विचित्र रीतीने आपली पहिली भेट झाली ही काही चांगली गोष्ट नाही. मी तुमच्या सौजन्याचा फार फायदा घेत आहे—"

"मुली, तुम्हा दोघा बहीण-भावंडांतील भांडण मिटविण्यासाठीच तर मी येथे आलो आहे." सीझर म्हणाला.

"माझा भाऊ आणि त्याचे बदमाष सल्लागार तुम्ही पाहिले आहेत. आपण मला एकटीलाच इजिप्तच्या सिंहासनावर बसवलं

पाहिजे." क्लिओपात्रेने विनंती केली आणि पुढे आश्वासन दिले—" इजिप्तकडून रोमची धनधान्याची अपेक्षा आहे ना ? ती पूर्ण होईल असे मी आश्वासन देते."

"तू आश्वासन देतेस ! राहण्यापुरती एक घोगडी व काही गुलाम येवढयाचीच आज तू धनी आहेस !!" सीझरने तिची गंमत केली. तिच्या चेहऱ्यावरील भाव त्याने न्याहाळले आणि मग थट्टा संपवीत तो म्हणाला—

"ते असो. आम्ही तुझं तुझ्या शत्रूपासून संरक्षण करू. तू काळजी करू नकोस. गुड नाईट्...!"

सीझर रहात होता त्याच इमारतीत क्लिओपात्रासाठी एक महाल सजविण्यात आला. सीझरचे शिपायी तिच्या दरवाज्यावर रक्षक म्हणून उभे राहिले. सीझरच्या शिपायांनी आपल्या दरवाज्यावर पहारा द्यावा ही गोष्ट त्या मानी राणीला पसंत नव्हती परंतु तिचा इलाज नव्हता.

महालाच्या बाहेर सैनिक असले तरी आत ती मुक्त होती. तिने आपल्या महालातून सीझरच्या अन्त पुरातील हालचालीवर नजर ठेवण्याची युक्ती शोधून काढली. दरवाज्याच्या छिद्रातून तिला सीझरची हालचाल दिसू शकत होती. या प्रयत्नात तिला काय दिसले ? सीझरचा आजार. या शूर योद्धयाला छळणारा मूर्च्छेचा आजार.

सीझर पाहता पाहता महालात घेरी येऊन पडला. त्याच्या नोकराने धावत जाऊन त्या खोलीतीलच एका पेटीतून हस्तिदंताची एक कांडी आणली व ती सीझरच्या तोडात दाबून धरली. सीझरच्या तोंडाला फेस आला होता. रणात अपराजित, बलाढय कर्तृत्वाचा हा रोमचा सर्वाधिकारी पुरुष अखेर रोगाधीन होता तर ! त्याचा हा आजार बाहेर कुणालाच ठाऊक नव्हता. रात्रभर क्लिओपात्रा सीझरच्या या विचित्र आजाराचाच विचार करत होती.

पोलेमीचा सेनापती आर्चिलास याचेकडे असे वृत्त आले की सीझर व क्लिओपात्राच्या तैनातीत फक्त दोन तुकडया सैन्य आहे. सीझर आता चागलाच कात्रीत सापडला आहे हे पाहून त्याने रातोरात आपल्या नौदलाला सज्ज राहण्याचा आदेश दिला. सीझरचा परतीचा मार्ग रोखण्यासाठी नौदलाला रवाना करून तो स्वतः सैन्यासह सीझरच्या निवासस्थानाला गराडा घालण्यासाठी निघाला.

सकाळ झाली. जगज्जेत्या अलेक्झाडरच्या कबरीच्या दर्शनासाठी सीझर गेला व त्या कबरीपुढे बसून सीझरने अश्रू ढाळले असे वृत्त क्लिओपात्रेच्या दासीनी तिला कळवले. सीझर परतण्यास आता बराच वेळ लागेल या समजुतीने क्लिओपात्राने स्नानास सुरुवात केली, अत्तराने सुवासित केलेल्या पाण्याने क्लिओपात्राच्या दासी तिला स्नान घालू लागल्या...

परंतु स्नान अर्धेमुर्धे होते न होते तोच अचानक सीझर तेथे डोकावला. सीझरला पाहताच त्याचा गुप्त आजार, त्याचे अलेक्झांडरच्या कबरीसमोरचा अश्रुपात या गोष्टी क्लिओपात्राला आठवल्या. परंतु तावडतोब जी गोष्ट विचारणे भाग होते ती निराळीच होती.

काळजीच्या सुरात तिने विचारले—

"आर्चिलास आपली बलाढय फौज घेऊन अलेक्झाड्रिआकडे येत आहे. रात्रीपर्यंत तो येथे पोहोचेल. आपल्या तीसपट सेना त्याचेजवळ आहे. त्याला सोयिस्कर अशा वेळी तो हल्ला करील. याबाबतीत तुम्ही काय ठरवलं आहे ?"

क्लिओपात्राला कल्पना नव्हती की रुफिओकरवी सीझरने प्रतिहल्ल्याची जय्यत तयारी केली आहे. म्हणूनच तिला संभ्रमात ठेवून सीझर म्हणाला—"जमेल ते करू." हे म्हणताना त्याला हसू आवरले नाही. सीझर निघून गेला. क्लिओपात्रा विचार करू लागली की पुढे वाढून येणाऱ्या संकटाचा इशारा मिळूनही इतका निष्काळजी राहणारा हा पुरुष आहे तरी कसा ?

अंधार पडून रात्र होण्याच्या सुमारास क्लिओपात्राला याचा उलगडा होऊ लागला. रात्र दाटण्यापूर्वीच सीझरच्या नौदलाने शत्रूचे सुसज्ज आरमार पेटवून दिले होते. आगीच्या ज्वाला किनाऱ्यावर सर्वत्र पसरल्या. आर्चिलासचा व्यूह ढासळू लागला होता.

यावेळी क्लिओपात्रा आपल्या विश्वासू सल्लागाराजवळ सीझरच्या आजाराची चर्चा करीत होती. एपिलेप्सी या रोगाने त्याला घेरले आहे ही गोष्ट तिला आता कळली. एवढयात त्या ठिकाणी अप्पोलोडरस आला आणि त्याने बातमी दिली—" अलेक्झाड्रियाचे ग्रंथालय आगीच्या भक्ष्यस्थानी पडत आहे—"

क्लिओपात्रा संतापाने थरथरू लागली. तीरासारखी ती सीझरच्या महालाकडे धावत गेली. द्वाररक्षकानी तिला अडवताच तिने आरडाओरडा सुरू केला. अखेर सीझरला बैठक मोडून बाहेर यावे लागले. तो बाहेर येताच क्षणभर तिच्याकडे पहातच राहिला, मग न्याहाळणे पुरे करत तो म्हणाला—

" व्यवस्थित पोषाखात अशी आजच तुला प्रथम पाहतो आहे. फार सुंदर दिसतेस तू आज !"

क्लिओपात्राला राग आला. 'म्हणे आज सुदर दिसतेस. काल नव्हते दिसत ? परवा नव्हते दिसत ? का रोज वाढते सौंदर्य !!' ती फणकाऱ्याने म्हणाली—

"आज तुमच्या डोक्यावरचे टक्कल पण थोडे वाढलेले दिसते आहे—"

"वाढणारच...रोज काम वाढते आहे ना ! माफ कर, मी कामात आहे. आता मला वेळ नाही—"

सीझर आत वळणार होता तेवढयात सुरवातीला दिलेली चकमक झडली. अखेर सीझरने तिला निक्षून सागितले—" माझ्या व्यवहारात तुझी ढवळाढवळ मला नको आहे—"

आर्चिलासच्या जबरदस्त सैन्याने हल्ला केला. शहर पेटत होते. काळया आकाशात इजिप्तचे अग्निगोल उडत होते. परतु सीझरच्या शिस्तबद्ध लष्कराने दाद दिली नाही. आणि उजाडताच सीझरचे राखीव सैन्य लोढयाप्रमाणे शहरात घुसले. इजिप्शिअन्सना पळता भुई थोडी झाली. सैन्याचा हा लोंढा आला कोठून ? सीझरने मिथ्रिडेटस्च्या आधिपत्याखाली असलेले वाळवटातले सैन्य रात्री गुप्तपणे संदेश पाठवून मागवले होते.

पराभूत झालेला पोलेमी सूडाच्या भावनेने निघाला. अलेक्झांड्रिआत सीझरचा जयजयकार चालला होता. पोलेमीने अखेरचा प्रयोग म्हणून क्लिओपात्रावर विषप्रयोग करण्यासाठी गुलामकन्या पाठविली. तिने दारूच्या पेल्यात विष मिसळले. क्लिओपात्रा सावध होती. तिने तो प्याला प्रथम त्या गुलामकन्येलाच प्यायला लावला. त्या गुलामकन्येचा मात्र नाहक बळी पडला !

अप्पोलोडरसनं या विषप्रयोगाची हकीकत सीझरला सांगितली. त्या मृत गुलामकन्येचे शवच त्याने सीझरच्या पुढयात आणून टाकले.

सीझरला न्यायाची कदर होती. रोमचा

# रोममधील एका चौकात

सीझरच्या मुलाला – सिझॅरिऑनला – घेऊन क्लिओपात्रा रोममध्ये प्रवेश करते ह्या दृश्याचे चित्रीकरण म्हणजे भव्यतेचा एक उच्चांकच आहे. या प्रसंगी क्लिओपात्राने परिधान केलेल्या गाउनसाठीच साडे सहा हजार डॉलर्स (सुमारे तीस हजार रुपये) खर्च झाले आहेत. रोममधील प्रमुख चौकाच्या उभारणीसाठी १२ एकर जमीन लागलेली आहे व तींत एकूण ३० इमारती उभ्या आहेत. क्लिओपात्राच्या मिरवणुकीसाठी किती जनता होती? सहा हजार एक्स्ट्रॉज्; गुलाम, नर्तकी इ. इ. या गर्दीची क्लिओपात्राला–एलिझाबेथ टेलरला–फारच भीती वाटली. कारण याच सुमारास तिचे व रिचर्ड बर्टनचे प्रेमप्रकरण वर्तमानपत्रांत तुफान गाजत होते. तिला भीती पडली, उत्साहाच्या भरात हे जमलेले लोक तिच्या अंगावर काही दगडधोंडे वगैरे तर टाकणार नाहीत ना ? पण लोक खुषीत होते. त्यांनी टेलरचे आरडाओरड करून भलतेच स्वागत केले. शेवटी दिग्दर्शक मॅंकिव्हिज त्यांनी एक कर्णा टेलरला दिला व त्यातून तिने लोकाचे मोठ्याने आभार मानले, व ती एवढेच म्हणाली, " Thank you very much. " कारण इटालियन भाषेचे तिचे ज्ञान या चार शब्दांपुरतेच होते. दिग्दर्शकही भलतेच खूष झाले. दृश्याचे चित्रीकरण या प्रसंगामुळे अगदी स्वाभाविक झाले. मिरवणुकीतील उत्साह कृत्रिम राहिला नाही.

न्याय कसा असतो याचे अलेक्झांड्रियात प्रदर्शन करण्याची आलेली संधी त्याने वाया घालवली नाही.

सीझरने क्लिओपात्रा व पोलेमी आणि त्याचे मंत्री यांना आपल्यासमोर बोलावले. ज्या मंत्र्याने विषप्रयोगाचा प्रत्यक्ष सल्ला दिला त्याला देहान्त शासनाची शिक्षा त्याने फर्मावली. अप्पोलोडरसने लागलीच ती अंमलात आणली. पोलेमी आणि त्याचे बदमाश मंत्री यांना त्याने शहरातून हद्दपार केले व आर्चिलासकडे जाण्याचा हुकूम सोडला.

सीझरने आपल्या मत्रिमडळाला लगेच बैठकीतून जाण्यास सागितले. कारण पुन: आपल्याला मूर्च्छा येणार अशी लक्षणे त्याला दिसू लागली. मानसिक ताणाचा हा परिणाम होता. परंतु कुणाहीसमोर आपली गलितगात्र अवस्था उघडी पडू नये यासाठी तो झपाट्याने सर्वांना निरोप देऊ लागला.

" राणीसाहेब–मी फार दमलो आहे ! आपण आता गेलात ......"

" येणारा सैन्याचा हल्ला कसा परतवायचा याची सगळी योजना तुम्ही केली होतीत, मग मला विश्वासात घेऊन का सागितले नाही –? "

क्लिओपात्रा काय विचारते आहे याकडे सीझरचे लक्ष नव्हते. ओठावर ओठ मोठ्या कष्टाने दाबून धरीत तो वेदनेनेच पुटपुटला,

" आता एक क्षणभरदेखील थाबू नका. "

क्लिओपात्रा आपल्याच नादात म्हणाली–

" माझ्यावर विश्वास नव्हता तरी गेल्या काही क्षणातच तुम्ही मला इजिप्तचे राज्ञीपद निरकुशपणे बहाल केलेत ! का केलेत हे सगळे ? "

" कारण तेच रोमला योग्य वाटत होते. क्लिओपात्रा जा तू आता—जा...! "

आता वेदना असह्य झाली. झोकांड्या खात सीझर जवळच असलेल्या कोचाकडे गेला आणि त्यावर लाकडाच्या ओडक्यासारखा कोसळला.

क्लिओपात्राने हा प्रकार पूर्वी पाहिला होता. ती गडबडली नाही. तिने शेजारच्या पेटीतून हस्तीदती कुपी आणली. त्याच्या शेजारी बसून तिने त्याचे हात आपल्या छातीशी उबेसाठी धरले–

" काय करते आहेस इथे ? काय हवंय तुला? " सीझर काहीसा शुद्धीवर येत म्हणाला.

" मला काही नको. तुमची सेवा घडावी यासाठी थाबले. " तिने सीझरच्या मानेखाली गिरदी सरकवली. आणि आपल्या बाहुपाशात त्याचे शरीर तिने घट्ट धरून ठेवले.

सीझरला हे सर्व सहन होईना. तो निश्वास टाकीत म्हणाला, " कुणी कुणाला मदत करू शकत नाही. एक दिवस हे सर्व लोकांच्या समोर घडेल व सर्व जग पाहील. सीझर पडला. तोंडोला फेस आला..."

क्लिओपात्रा त्याच्या तोंडाजवळ तोंड नेत कुजबुजली " नाही ! नाही ! मी असे होऊ देणार नाही—"

तिच्या जिव्हाळ्याने आणि मायेने अखेर सीझर विरघळला. तिचा आधार अखेर त्याच्या गलित शरीराने स्वीकारला.

## : २ :

सीझरच्या हुकुमानुसार क्लिओपात्राला इजिप्तच्या राज्ञीपदी अभिषेक करण्यात आला. हा समारंभ अलेक्झाड्रियात झाला व त्याला आफ्रिका व आशियामायनरमधील निवडक राजे उपस्थित होते.

सीझर व क्लिओपात्राने सबंध इजिप्त देशाची जोडीने पहाणी केली. जे धनधान्य रोमला पाठवावयाचे होते ते सीझरने स्वत च नजरेखालून घातले.

क्लिओपात्राच्या मऊ मऊ सुवासिक बिछान्यात सीझर तिच्याशेजारी लोळत होता. तिचे ऊबदार शरीर त्याच्या मिठीत असताना तो आपला पुढचा विचार तिला सागत होता : " मी आता दूर जास्त दिवस राहू शकत नाही. मी परतण्यासाठी रोमहून मार्क अॅंटनीकडून सारखे निरोप येत आहेत. युद्ध केव्हा भडकेल याचाही नेम नाही. "

" या मार्क अॅंटनीवर आपला विश्वास आहे ?– " त्याला बिलगत क्लिओपात्राने विचारले.

" जर जगात माझा कुणावर विश्वास असलाच तर तो फक्त मार्क अॅंटनीवरच आहे. "

" त्याच्याकडून रोममधील साचलेली जळमटे झाडता येणार नाहीत का ? मग तुम्हालाच कशाला जायला हवं ? हा ब्रूटस तुमच्यावर कठोर टीका करतो. लोक म्हणतात तो तुमचाच मुलगा आहे म्हणून तुम्ही त्याच्याकडे दुर्लक्ष करता ! "

" मला मुलगा नाही ! " सीझरच्या सागण्यात काहीसा विषाद होता.

" कल्पुर्निया आपली पत्नी आहे. तिला मूल झाले नाही ?" क्लिओपात्राने कुजबुजत विचारले.

" नाही; ही गोष्ट सर्वांना ठाऊक आहे की कल्पुर्निया वाझ आहे ! "

सीझरवर अखेरचा पाश फेकण्याचा हा क्षण आहे हे क्लिओपात्राने ओळखले. ती त्याच्या मिठीत शिरत म्हणाली, " मी अनेक मुलाना जन्म देऊ शकेन ! इसिसने मला सागितले आहे. सीझर, मला जवळ घ्या...! "

क्लिओपात्राच्या पाशात गुरफटलेल्या सीझरला त्याचे निष्ठावंत अधिकारीही रोमला लौकर परत नेऊ शकले नाहीत. अनेक दिवसांनंतर तो रोमला परतण्याची तयारी करू लागला. निरोपाची शाही मेजवानी झाली. त्याच रात्री क्लिओपात्राने सीझरची भेट घेतली.

" सीझर, आपण का जाता ? मी असे काय केले ? "

सीझर कौतुकाने म्हणाला, " तुझा धाकटा भाऊ तुला चेटकीण म्हणतो ते काही खोटे नाही. पाच महिन्यापूर्वी तुझ्या डोक्यावर मी मुगुट ठेवला आणि तेव्हापासून तू मला तुझ्याजवळ जणू जखडून टाकले आहेस. "

" सीझर, आपण येथेच रहा ना ? मी खरोखरच चेटकीण असेन तर या विस्मरणात गेलेली तुमची स्वप्ने मी खरी करून दाखवीन; मग आपल्याला माझी गरज भासेल. आपल्याला माझी गरज भासेल असे काहीतरी मी केले पाहिजे. "

ती ओक्साबोक्शी रडू लागली. असहाय लावण्यवतीचे ते अश्रू सीझरला आता अडवू शकले नाहीत तरी त्यानी जे साधवायचे ते साधलेच.

" सीझरला कोणाचीही फार काळ गरज भासत नाही. तसे झाले तर सीझर सीझर उरणार नाही ! " सीझरचा ढासळणारा आत्मविश्वास आतून धडपड करीत होता.

जाण्यापूर्वी दोघांनी मिळून अॅलेक्झांडरच्या कबरीचे दर्शन घेण्याची क्लिओपात्राची विनंती मात्र सीझरने मान्य केली. दुसरे दिवशी दोघानी जोडीने कबरीचे दर्शन घेतले.

" पहिल्या वेळी आपण येथे आला तेव्हा आपल्या डोळ्यांतून अश्रू वाहत होते ! ते का ? " तिने विचारले.

आपण अश्रू ढाळले हे क्लिओपात्राला कसे कळले हा विचारही या वेळी त्याच्या मनाला शिवला नाही. त्याने कारण उघड केले. दुःखाने तो म्हणाला, " त्यानेबत्तीसाव्या वर्षी जग जिंकले ! माझे वय आज बावन्न आहे. मला ते शक्य नाही. कदाचित जगच राहील. "

" जे स्वप्न त्याने पाहिले तेच तुम्ही पहा ! जिंकलेले भू-भाग एकत्र आणून तुम्ही एक जग निर्माण करा ! ! "

तिच्याकडे आर्ततेने पहात सीझर म्हणाला, " आणि या जगाचा मध्यबिंदू अलेक्झांड्रिया--असेच ना ? पण मी रोमन आहे-! "

" म्हणून काय झाले ! आपण हे सत्यात आणू. रोम आणि इजिप्त याचे एकीकरण करू म्हणजे झाले ! "

क्लिओपात्राचा उत्साह पाहून सीझर काहीसा दिङ्मूढ झाला. त्याने कबुली दिली—

" ज्या गोष्टी माझ्या कल्पनेतही ठरू शकत नाहीत त्यांचा तू उच्चार करते आहेस ! माझे भवितव्य मला ठरवू दे ना ? "

क्लिओपात्राचे डोळे एकदम चमकले. तिने सागितले—

" तुमचे भवितव्य हे आता केवळ तुमचेच भवितव्य उरलेले नाही. त्यात माझाहि आता वाटा आहे. आता लवकरच तुमचे नाव आणि तलवार पेलणारा जीव जन्माला येईल. मुलगा—आपलाच मुलगा ! "

सीझरने तिच्या हाताचे तळवे आपल्या हातात दाबून धरले. त्याला बिलगत क्लिओपात्राने पुन्हा विनवणी केली—

" सीझर, ती वेळ येईपर्यंत तुम्ही इथे माझ्याजवळ नाही का राहू शकणार ? "

सीझरने इजिप्तच्या सम्राज्ञीशी विवाह केल्याचे वृत्त येताच रोममध्ये खळबळ उडाली. निष्ठावत मार्क अँटनीने कल्पुर्नियाचे सांत्वन करण्याचा प्रयत्न केला. परंतु क्लिओपात्राला मूल होणार असल्याचे साऱ्या रोमला कळले.

क्लिओपात्राच्या पोटात दुखू लागले. तिने आपल्या दासीला सक्त बजावले, " मूल जन्मले की ते सीझरकडे ने आणि रोमन पदाधिकाऱ्याच्या देखत ते सीझरच्या पायावर ठेव समजलं ? "

राजपुत्र जन्मला. शिंग फुकून गादीला वारस जन्मल्याचे जाहीर करण्यात आले. राणीच्या महालापासून नवजात बालकाची मिरवणूक निघाली. सर्वांत पुढे हातात बालक घेऊन दासी व तिच्यामागून अधिकारीवर्ग अशी ती मिरवणूक सीझरच्या महालात आली व दासीने आदेशाप्रमाणे ते मूल सीझरच्या पायावर ठेवले.

" मुलगा की मुलगी ? " सीझर सुंदर कपड्यात गुंडाळलेल्या त्या बालकाला पाहण्यासाठी उत्सुकतेने पुढे गेला.

बाजूला उभ्या असलेल्या रुफियोने इशारा दिला, " रोमन कायदा ध्यानात आणा आणि मग त्या बालकाला हात लावा. आपण सर्वांसमक्ष ते उचललेत तर आपले असल्याचे आपण मान्य केले असे होईल. मग त्याला रोमन् नागरिकत्वाचे हक्क प्राप्त होतील व आपला वारसा त्याच्याकडे जाईल. "

रुफियोच्या बोलण्याकडे लक्ष देण्याइतका सीझर आता भानावर नव्हता. आपल्या नवजात अर्भकाला पाहताच सीझरचा चेहरा अभिमानाने फुलला. " माझा मुलगा ! मला मुलगा झाला ! " तो आनदाने बेहोष होऊन उद्गारला.

सीझरशी निष्ठा बाळगणाऱ्या इजिप्तमधील सैन्याच्या जल्लोषाला रोममध्ये मात्र प्रतिसाद मिळाला नाही. सीझरचा पुतण्या ऑक्टेव्हियन हा आता वारस समजला जात असे. त्याने जाहीर नापसती व्यक्त केली. अनेकजण म्हणू लागले, की रोमन प्रजासत्ताकावरच हा घाला आहे. सीझर इजिप्तचा राजा झाला होता. त्याने आपल्या मुलाला रोमचा वारस ठरवले तर काय ? आणि तो असे करणार असल्याचे काही सागूही लागले.

" रोममध्ये गादीच नाही व सीझरला ती निर्माणही करावयाची नाही. " ब्रूटसने आपले मत दिले.

सिसेरोचा आवाज निराळा निघाला. " रोमसाठी का सीझर इजिप्तमध्ये राहात

[ पृष्ठ ३९ वर पहा ]



: १ :

"काय होतंय तुम्हांला ?" नवऱ्याच्या उदास चेहऱ्याकडे पाहून मायाने विचारले.

"कुठे काय ?... काही नाही...!" मायाच्या प्रश्नाला तुटक उत्तर देऊन पन्नालाल आत निघून गेला. पण मायाने ओळखले. या 'काही नाही' मध्येच 'पुष्कळ काही' सामावले होते. मांडीवरचा लहानगा कुमार तिने वीणाच्या हवाली केला व ती देखील पन्नालालचे पाठोपाठ आत निघून गेली.

# आ हु ती

स्वच्छंदपणे आकाशात विहार करणारा एखादा पक्षी अचानक घायाळ होऊन खाली पडावा, तडफडू लागावा अशी अवस्था पन्नालालची झाली होती. त्याने आपल्या आयुष्यात सोन्याचे दिवस पाहिले होते; पण आज मात्र लक्ष्मी त्याच्यावर रुसली होती. एके काळी ज्याच्या दुकानात पन्नास–पन्नास साठ–साठ रुपयांवर नोकर व मुनीम रात्रंदिवस खपत होते, त्याच पन्नालालला आज दुसऱ्याच्या दुकानात अवघ्या पस्तीस रुपयांवर नौकरी पत्करावी लागली होती. पण एका दृष्टीने पन्नालालचे नशीब बलवत्तर होते, असेच म्हणावे लागेल. कारण ज्यावेळी त्याच्या धंद्याला उतरती कळा लागत गेली, त्यावेळी त्याला आपले राहते घर स्वतःच्या पत्नीच्या नावावर करण्याची सुबुद्धी झाली म्हणूनच तो आज आपल्या जीवनातले उरलेले खडतर दिवस हक्काच्या घरात राहून मोजीत होता !!

लेखक : नानकसिंह

: स्वैर रूपांतर

अरविंद रासने

पन्नालालचे एक वेळचे दृष्ट लावणारे शरीर आज पिळून निघाले होते. खल्लेले अन्नही धड त्याच्या अंगी लागत नव्हते. पन्नालालला लागलेली चिंता त्याच्या रक्ताचा थेंबन् थेंब शोषून घेत होती.

चैत्राचा महिना. संध्याकाळची वेळ. अशा प्रसन्न वेळी ती पति-पत्नी समाधिस्थ बनून एकमेकांच्या चेहऱ्याकडे मग नुसतीच पाहात बसली.

पन्नालालपेक्षा माया पाचसात वर्षांनी लहान असेल. पण त्या पति-पत्नीकडे पाहून दोघात दुप्पट तिप्पट अंतर असल्याचा भास होई. आज मायाचे पूर्वीचे शरीर राहिलेले नव्हते तरीही मायाला काळजीने दुःखाने पछाडले असेल असे काही तिच्याकडे पाहून वाटत नव्हते. तिच्या रूपामध्ये, रंगामध्ये अद्यापही एक प्रकारची लालिमा होती ! मायाला चार मुले होती आणि तरीही चार स्त्रियामध्ये उठून दिसेल असेच तिचे सौंदर्य होते. तिची मोठी मुलगी वीणा, आज पंधरा वर्षांची होती. विद्याला नुकतेच बारावे लागले होते. विद्याच्या पाठी-वर आणखी दोन भावंडे होती.

पन्नालालपुढे फक्त स्वत:च्या कुटुंबाचाच प्रश्न असता तर त्याने इतकी हाय खाल्ली नसती. पण दोन गोष्टीमुळे तो जेरीस आला होता. त्याला त्याच्या धंद्यात बसलेला फटका साध्या स्वरूपाचा नव्हता चांगल्या पाच-पचवीस हजारावर पाणी सोडावे लागले होते त्याला ! या गोष्टीचा मायाच्या मनावर आघात होईल म्हणून त्याने ही कर्जाची भानगड तिच्यापासून लपवून ठेवली होती. इकडे कर्ज मात्र दिवसेदिवस डोईजड होत होते.

दुसरी काळजी होती, ती म्हणजे मुलींची लग्ने ! त्यातल्या त्यात वीणाचे लग्न अगदी तोंडाशी येऊन ठेपले होते. वीणाचे भाग्य तसे मोठे होते; ती चांगल्या मोठ्या घरची भाग्यलक्ष्मी बनणार होती. पण जसजशी लग्नसराई जवळ येत चालली तसतसा पन्नालालचा धीर खचत चालला होता.

वीणाच्या सौंदर्याची वाखाणणी करावी तेवढी थोडीच होती ! तिची पाठमोरी आकृती पाहणाराला इतकी सुडौल वाटे की त्यामुळे तिचा गोडस चेहरा निदान एकदा पाहण्यास मिळावा अशी तीव्र इच्छा तिला पाहणाराचे मनात प्रज्वलित होई ! गोऱ्यापान मानेभोवती काळ्याभोर केसांची लांबसडक वेणी, कंबरेपासून गुडघ्यापर्यंत असलेले घट्ट ' कमीज ', आणि हिरवी सलवार. तिच्या हाताच्या पातळ आणि लांबसडक बोटाच्या अग्रभागी गुलाबी रंगाची नखे अधिकच शोभून दिसत. तिच्या डोळ्याच्या पापण्या काळ्याभोर असून ओठ डाळिंबा-प्रमाणे लालबुंद होते !

आत येऊन मायाने पन्नालालकडे पाहिले. तो घाबरलेल्या अवस्थेत अंथरुणावर पडून होता. ती त्याच्या शेजारी जाऊन बसली. " काय झालय तुम्हाला ? तुम्ही......?" वादळ होण्यापूर्वी आसमंत एका भीषण शांततेने धुंद-सुंद होऊन जावे त्याप्रमाणे ती खोली शांततेने गुदमरून गेली होती. भयशंकित नजरेने माया त्याच्या चेहऱ्याकडे टक लावून पहात होती.

काही वेळानंतर पन्नालालने स्वत:च त्या वादळी शांततेचा भंग केला.

" पत्र आलं आहे ! " विमनस्कपणे खिशातून एक पत्र काढून त्यावर नजर फिरवीत पन्नालाल म्हणाला–

पत्र कोणाचे होते ते मायाने ओळखले. पण तरीही तिने विचारले– " पत्र– ? कोणाचं ? "

" वीणाच्या सासरचं ..."

" समजलं ! हे मला आधीच ठाऊक होतं. कित्येक दिवस स्वप्नंही वाईट वाईट पडत होती मला ! काय लिहिलंय ? सोयरीक पसंत नाही, हेच ना ?"

पन्नालालने 'हो' म्हणून फक्त मान हलविली.

" मसणात गेली असली माणसं ! " मायाच्या तोंडातून नकळत शब्द तर निघून गेले. पण तिच्या मनावर जबरदस्त आघात झाला होता. तिला वाटले आपणच दूर निघून जावे; आणि या शरीराचे काहीतरी बरेवाईट करून टाकावे, म्हणजे तरी आपणावर असले अपमानास्पद बोलणे ऐकून घेण्याची वेळ येणार नाही. याच भावनेच्या आवेशात ती झटकन उभी राहिली. जणु काही ती आता आपल्या शरीराचे बरेवाईट करून घेण्यासाठीच निघाली होती. पण पुन्हा ती हळूहळू खाटेवर बसली. आणि म्हणाली, " जाऊ द्या. एक दार बंद झालं तर झालं. शभर घरं आहे. जिथे तिचा योग असेल, तिथे ती जाईल. कोणाच्या मुली बिनलग्नाच्या थोड्याच राहतात !"

मायाचा आवाज खणखणतच राहिला. " मुलाना काय तोटा गेलाय ? श्रीमंताच्या जागी गरीब मिळेल एवढंच ना ? काय लिहिलं आहे, वाचून तरी दाखवा ! "

त्याने पत्र वाचले नाही की तोंडाने उत्तरही दिले नाही. कारण त्याच्या मनावर होणारे प्रहार सहन करण्याची शक्ती आता त्याचे ठिकाणी उरली नव्हती त्याच्या थरथरणाऱ्या बोटाच्या कात्रीत ते पत्र थरथर कापत होते ! मायाची सर्व दृष्टी त्या एवढ्याशा पत्रावर एकवटली होती !

आणि नेमकी त्याच वेळेस वीणा भावाला कडेवर घेऊन आत आली. " आई, वसंताला काही सांग ना ग ! केव्हाचा छळतो आहे. दौतीत बुडवलेली शाईची बोट पुन्हा पुन्हा माझ्या तोंडाला लावतो ! "

खोलीत येऊन तिने आईपाशी तक्रार केली खरी, पण आपल्याला पाहताच त्यानी बोलणे बंद केले, हे तिच्या लागलीच लक्षात आले. ती हतबुद्ध होऊन उभी राहिली. वडिलांच्या हातातील कार्ड पहाताच तिने ओळखले, पत्र काही आनंदाचे दिसत नाही आणि स्वत:च्या येण्याचे कारण ती पार विसरून गेली. वडिलाजवळ जाऊन तिने विचारले, " बाबा, कुणाचं पत्र आहे ? "

मायाने तिच्याकडे प्रेमाने पाहिले आणि म्हटले, " तुझं नाही ! जा भय्याला खेळव ! "

'तुझं नाही ! ' या आईच्या उत्तरावर विचार करीत वीणा माघारी फिरली. जी गोष्ट आपली नाही असे आई म्हणते, ती आपलीच असणार ! पुन्हा एकदा त्या पत्राविषयी आपण आईला विचारावे असे तिला वाटले. पण कौमार्याच्या सहजसुलभ भावनेने तिला तसे करू दिले नाही. ती विचार करू लागली–काही झाले तरी ते पत्र आपण वाचायचेच. आणि जसजशी ती विचारात वाहवत गेली तसतशी पत्र पाहण्याविषयीची तिची उत्सुकता अधिक दृढ होत गेली. पण ती बाहेर येताच मायाने आतून दरवाजा लोटून घेतला. त्यामुळे तर ते पत्र आपल्याविषयीच आहे यात तिला तिळमात्र शंका उरली नव्हती. तिने ओळखले होते की ते पत्र नक्की आपल्या सासरच्या मंडळींनीच पाठवलेले असणार !

ती बाहेर आली. अंगणात ज्या ठिकाणी विद्या व वसंत खेळत

# ' पवित्र पापी ' च्या लेखकाविषयी. . .

झेहलम जिल्ह्यातील ' चकहमीद ' हा गाव. हल्ली पाकिस्तानात गेला आहे. या गावात ' बहादूरचंद खत्री ' या घराण्यात ४ जुलै १८९७ रोजी श्री. नानकसिंह यांचा जन्म झाला.

त्यांच्या वडिलांचे पेशावरला धान्याचे मोठे दुकान होते. पण नानकसिंह बारा वर्षांचे असतानाच ते कालवश झाले. योगायोग असा की, ज्या रात्री वडील देवाघरी जाण्यास निघाले त्याच रात्री त्यांच्या आईने आपल्या चौथ्या मुलाला जन्म दिला. एका खोलीत पित्याचा पार्थिव देह पडलेला, दुसऱ्या खोलीत आईने अर्भकाला जन्म दिलेला आणि तिसरीकडे आप्तेष्ट दुकानाची विल्हेवाट कशी लावावी याच्या मनसुब्यात दंग. एका रात्रीत त्यांच्या घराचा नकाशा पार बदलून गेलेला होता.

आईची आणि धाकट्या बहीण–भावंडांची जबाबदारी नानकसिंहावर येऊन पडली. कारण तेच सर्व भावंडांत मोठे होते. कोवळ्या वयातच त्यांच्या आयुष्याला अवकळा प्राप्त झाली होती. आईने मोलमजुरी करण्यास सुरुवात केली. नानकसिंह स्वतः कधी हलवायाच्या दुकानावर तर कधी वाण्याकडे नौकरी करून आईला मदत करू लागले.


अशा अवस्थेत कसली शाळा अन् कसले शिक्षण ? पण तशाही स्थितीत, काम सांभाळून पंजाबी, उर्दू, हिन्दी आणि जेमतेम इंग्रजीचे ज्ञान अवगत करण्यापर्यंत त्यांनी यश संपादन केले. कशी–बशी पाचवीपर्यंत त्यांनी मजल गाठली.

वयाच्या तेराव्या वर्षी संगीत आणि काव्य यांकडे नानकसिंह वळले. तब्बल बारा वर्षांनी म्हणजे वयाच्या पंचवीसाव्या वर्षी ते पंजाबमधील एक मान्यवर कवी आणि संगीतकार म्हणून ओळखले जाऊ लागले !

सन १९२५ मध्ये त्यांनी जेलयात्रा केली. जेलमध्ये मित्राकडून प्रेमचंद यांच्या साहित्याची ओळख झाली. वास्तविक पंजाबी भाषेतील अनेक कथा, कादंबऱ्या व ललित–साहित्य त्यांनी वाचले होते. पण प्रेमचंदाच्या साहित्याची गोडी, चव काही निराळीच. प्रेमचंदांच्या साहित्याने त्यांच्या जीवनात खरी क्रांती घडवून आणली. त्यातूनच त्यांचा साहित्यिक म्हणून जन्म झाला ! ते प्रेमचंदांना साहित्यक्षेत्रातील गुरू मानतात. पण शिष्याला गुरूचे दर्शनसुख मात्र लाभू शकले नाही !

सन १९२५ पासून ते गद्य लिहू लागले पंजाबी भाषेत त्यांच्या अनेक कथा प्रसिद्ध झाल्या आहेत. पंजाबी भाषेत ४२ कादंबऱ्या, ७ कथासंग्रह, १३ काव्यसंग्रह, आणि संगीताची ४ पुस्तके, इतका त्यांचा साहित्याचा संसार आहे. गेल्या तीन-चार वर्षांपासून आपले साहित्य हिंदीमध्ये रूपांतरित करण्यास त्यांनी सुरुवात केली. आजवर हिंदी भाषेत त्यांच्या पुढील कादंबऱ्या प्रकाशित झाल्या आहेत.

**' गीला बारुद ', ' अंधेरा उजाला ', ' पुजारी ', ' गरीब की दुनिया ', ' मृगतुषार ', ' पुनर्मीलन ', ' आदम खोर ', ' एक म्यान दो तलवारें ', ' प्रतिशोध ', ' पवित्र पापी ', ' जीवनसंग्राम ', ' कटी पतंग ', ' पाषाण पंख ', ' रक्तपात ', ' दूर किनारा ', ' सौतेली माँ ', ' संगम ', ' मंजधार ', ' विशैला अमृत '** आणि **' दानावल '.**



**नानकसिंह**

त्यांच्या ' लव्ह मॅरेज ' या कादंबरीस पंजाब युनिव्हर्सिटीने पहिले पारितोषिक दिले आहे. ' मंजधार ' या कादंबरीस पंजाब भाषा-विभागाने पहिले बक्षीस देऊन त्यांचा गौरव केला. ' एक म्यान दो तलवारें ' या कादंबरीने भारतीय साहित्य अॅकॅडमीकडून १९६१ मध्ये प्रथम पारितोषिक मिळविले.

**' पवित्र पापी '** या कादंबरीवर ' किरण प्रॉडक्शन, मुंबई ' ही संस्था लवकरच चित्रपट काढणार असून त्याप्रमाणे तिने लेखकाशी करारही केला आहे. शूटिंग लवकरच सुरू होणार आहे.

याच कादंबरीचे काहीसे मुक्त रूपांतर आम्ही वाचकांपुढे ठेवीत आहोत. **– संपादक**

होती तिकडे ती गेली नाही.

बाहेर दरवाज्यासमोर शिसवीच्या एका झाडाखाली एक खाट उभी केली होती. वीणाने खाट आडवी केली. कडेवरच्या भावाला खाटेवर बसविले. त्याला खेळात गुंतवावे असा तिने विचार केला व झाडाच्या दोन डहाळ्या तोडून त्याच्यासमोर टाकल्या. तिला चंद्राची आठवण झाली. चंद्रा त्याच गावची म्हणजे गुजरखानची राहणारी होती. तिच्या आईने मध्यस्थी करूनच ही सोयरीक जमविली होती. वीणाची सासुरवाडी व चंद्राचे घर एकमेकांना लागून होते, एवढेच नाही तर त्या दोन्ही घरांमध्ये नात्याचेही संबंध होते. वीणाच्या भावी नवऱ्याला चंद्रा नुसती ओळखीत नव्हती तर त्यांचे दूरचे बहीणभावांचे नातेही लागत होते.

चंद्रा आणि वीणा एकत्र आल्या की त्यांच्या या एकाच विषयावर

गप्पा चालत. वीणाच्या भावी नवऱ्याविषयी चंद्राला जी काही माहिती होती, ती पुन्हा पुन्हा पण दर वेळेस निरनिराळ्या प्रकारे चद्रा खुलवून सागे. तिच्या बोलण्याचा नेहमीचा रोख अशा प्रकारचा असे – 'तो सुदर आहे...श्रीमत आहे ! ... तीन चार विहिरी...दोन माड्या...पाच सहा दुकान.'

वीणाला चद्राने सागितलेल्या त्याच त्या गोष्टी आठवू लागल्या जी काल्पनिक आकृती, जिला चद्राने शब्दाच्या सहाय्याने हृदयावर कोरली होती, ती तिच्यापुढे घुटमळत होती. पुन्हा ती विचाराच्या आधीन झाली. ' जर ते पत्र त्याचंच असेल तर त्यात त्यांनी एवढं काय बरं लिहिलं असेल की ज्यामुळे आईबाबांना एवढं दु ख झाल ! कदाचित् लग्न लवकर उरकून घेण्यासाठीच त्यानी लिहिलं असेल ! पण ही तर आनंदाची गोष्ट आहे ! लग्नाच्या गोष्टी का कुठे दु खी करणाऱ्या असतात ? '

वीणाच्या विचारसाम्राज्यात लग्न म्हणजे फक्त आनंद होता. लग्नाचा अर्थ आनंदाखेरीज आणखी काही होऊ शकतो ही गोष्ट तिला कळणारी नव्हती. कारण आजपर्यंत तिने जेवढे विवाह पाहिले होते ते सर्व आनंदाच्या स्वरूपातच ! नाच-गाणे, बाजे-वाजंत्री, दारूकाम, हुंडा, आमत्रण-निमत्रण, चहापाटर्या आणि असलेच सर्व !

शेवटी तिने ठरवले. काहीही असो, आज रात्री बाबा जेव्हा कोट खुटीला अडकवतील, तेव्हा त्याचा डोळा चुकवून ते पत्र आपण वाचावयाचे !

वीणा अशा तऱ्हेने विचारांच्या वावटळीत फसली असतानाच आईचा आवाज कानावर आला. " वीणा ! चागली जवळ बसून त्याला खेळवते आहेस ! तो तोंडात पाला कोंबतो आहे. पाला घशात अडकला तर ? " माया तरातरा आली. तिने कुमारने तोडात कोंबलेला पाला बोटांनी बाहेर काढला व त्याला उचलून आत घेऊन गेली. वीणाला चोरट्यासारखे झाले !

## : २ :

सारी रात्र पन्नालाल अथरुणातच अर्धवट जागा होता. त्या पत्रातले प्रत्येक वाक्य त्याला मुद्दाम घाडलेले आमंत्रण वाटत होते. कूस बदलून पत्रातल्या त्याच त्या ओळी तो आठवू लागला. ' जर तुम्हाला लग्नाची घाई झाली असेल तर तुमच्या मुलीसाठी दुसरे स्थळ पहाण्यास तुम्ही मोकळे आहात–'

मुलगा इतक्यात लग्न करण्यास तयार नव्हता तर आमची काहीच हरकत नव्हती. कारण आमची मुलगी तरी कुठे इतक्यात म्हातारी होणार होती ? आम्ही स्वखुशीने एक दोन वर्षे थांबण्यास तयार आहोत. पण त्यांचे अशा प्रकारचे लिहिणे–' तुम्हाला जर घाई असेल तर—' कारण मी आज त्याच्या बरोबरीचा राहिलो नाही. आज जर माझी पूर्वीची परिस्थिती असती तर त्यांनी असे लिहिण्याचे धाडस दाखविले असते का ? आपली सोयरीक फिसकटल्याचे लोकाना समजले तर बाहेर तोंड कसे दाखवावयाचे ? तिकडे कर्जाचे ओझे दिवसेदिवस वाढत होते. आपण अडीच हजार रुपयाचे कर्जदार असल्याचे मायाला कळले तर ? केव्हातरी ते कळणारच ! शिवाय दुसरी मुलगी पण लग्नाला आली आहे. एक दोन वर्षांत तिलाही उजवावी लागेल. शेवटी यातून काय निष्पन्न होणार आहे ?

रावळपिंडीच्या राजा बाजारात सरदार अतरसिंहाचे घड्याळाचे मोठे दुकान आहे. दिवसा दुकान आणि रात्री घर याव्यतिरिक्त तिसरी दुनिया त्याला ठाऊक नाही. आतरसिंहाला गुरुद्वाराकडे गेलेला कोणी कधी पाहिला नाही. त्याला दुकानाच्या कामातून एवढीशी सवड मिळत नव्हती. आणि दुसरे म्हणजे त्याचे शरीर इतके बोजड होते की, साधे दुकानातून घरी जाणे त्याला असह्य होई. पूर्वी त्याचे घर दुकानापासून बरेच दूर होते. त्यावेळी घरापर्यंत चालत जाणे त्याच्या जिवावर येई. शिवाय त्याची ती अगडबंब अशी देहयष्टी पाहून कोणीही टांगेवाला सहजासहजी त्याला टांग्यात घेण्यास तयार होत नसे. यदाकदाचित एखादा टांगेवाला तयार झालाच तर त्याच्याकडून तो पूर्ण ' स्वारी ' चे पैसे वसूल करी. हा सौदा आतरसिंहाला परवडणारा नव्हता. कारण दररोज येताना आठ आणे व जाताना आठ आणे ! जाण्यायेण्यात रुपया कोण खर्च करणार ? असे केले तर महिना तीस आणि वर्षाचे तीनशे पासष्ट रुपये–छे ! त्याने दुकानाच्या वरच्या माळ्यावरच आपला ससार आणून ठेवला.

सरदार आतरसिंहाला ओळखणारे त्याला म्हणत, एखादा शानदार बंगला बाधा. पाच दहा हजारात सहज होईल बाघून. ह्यावर अतरसिंह हसून त्यांना म्हणे, ' नसत्या मानगडीत पडायला मी काही तुमच्यासारखा मूर्ख नाही. दहा हजारावर किती व्याज येईल याचा जरा विचार करा. शभर रुपये महिना– वर्षाला एक हजार ! दहा वीस वर्षात ही रक्कम कुठल्या कुठे जाईल– करा हिशेब !

ह्याच सरदारजीच्या दुकानावर पन्नालाल नोकरीला आहे ! हिशेब-ठिशेब करण्यासाठी जरी मालकाने त्याला नेमले असले तरी त्याशिवाय त्याला इतरही गोष्टी कराव्या लागतात. कारकुनी, बाजारहाट आणि अशीच इतर सटर फटर कामे. या सर्वांचा मिळून त्याला पस्तीस रुपये मेहनताना मिळत होता. आज पाच वर्षांपासून तो या दुकानावर काम करतो आहे. सुरवातीस त्याला चाळीस रुपये वेतन मिळे. पण व्यापारातील मागील मंदी जमेस दाखवून मालकाने चालू वर्षापासून त्याच्या पगारात पाच रुपयाची कपात केली होती. याचा अर्थ असा नव्हता, की मालकाला आपल्या नोकराविषयी अजिबात सहानुभूती वाटतच नव्हती. तसे असते तर त्याने पन्नालालच्या मागे घड्याळदुरुस्तीचे काम शिकण्याविषयीचे टुमणे लावलेच नसते. घड्याळदुरुस्ती करण्याचे त्याने बरेच वेळा प्रयत्न केला; पण प्रत्येक वेळेस त्याला त्याचे अधू डोळे दगा देत गेले. पन्नालालला घड्याळाचे काम शीक म्हणण्यात अतरसिंहाचा काहीच गैर उद्देश नव्हता. त्याला वाटे, पन्नालाल हे काम शिकला तर, त्याच्या पगाराइतकी किंवा त्याहून अधिक रक्कम निघू शकली असती. जेव्हा सरते शेवटी त्याला पन्नालालकडून या कामाविषयी काही आशा दिसेनाशी झाली, तेव्हा अतरसिंह दुसऱ्या माणसाच्या शोधात लागला. फक्त कारकुनी कामासाठी महिना पस्तीस रुपये देणे त्याला दिवसेदिवस डोईजड होऊ लागले.

तसेच पन्नालालला कामावरून काढून आपले चालण्यासारखे नाही, हे अतरसिंह चागल्या प्रकारे जाणत होता. कारण तो स्वत. शिकलेला नव्हता. धंद्याच्या पत्रव्यवहारातली त्याला तितकीशी माहिती नव्हती. अशाच परिस्थितीत दिवस जात होते. त्याच्या मनाप्रमाणे दुसरा माणूस मिळत नव्हता.

सकाळ झाली. परंतु खाटेवरून उठण्याची शक्ती पन्नालालच्या ठिकाणी उरली नव्हती. त्याच्याकरता सर्व जग अंधकारमय झाले होते. डोळे मिटावेत तरी अंधार, उघडावेत तरी अंधारच! त्याने आपल्या सभोवती पाहिले. घराच्या चारी भिंती आपल्यावर कोसळत आहेत, असा त्याला भास होत होता. आणि अकस्मात त्याच्या डोक्यात विचार चमकून गेला, 'आपणच घरदार सोडून कुठे निघून गेलो तर–?' पण मग चार मुलांच्या निष्पाप जीवनाचे काय? त्याला स्वत:चाच तिटकारा वाटू लागला. एवढ्यासाठीच का आपण त्यांना जन्म दिला? नाही–नाही. हा अत्याचार आहे. पाप आहे...मग... मग...?

त्याच वेळेस वीणा केसावरून कंगवा फिरवीत समोर येऊन उभी राहिली. तिचा चेहरा ओशाळा दिसत होता. वडील अजून उठलेले नसतील याची तिला कल्पना नव्हती.

तिच्याकडे एकदा न्याहाळून घेत पन्नालाल विचार करू लागला, *'आज आपल्याला जागच आली नसती तर–?'* आणि झटकन् उठून तो बाहेर आला.

पन्नालाल बाहेर जाताच वीणाला त्या पत्राची आठवण झाली. आपली कावरीबावरी नजर तिने एकदा सबंध खोलीवरून फिरविली, आणि चटकन् तिचा थरथरणारा गोरापान हात खुंटीला टांगलेल्या कोटापर्यंत जाऊन भिडला. खिशात हात घालण्यापूर्वी तिने पुन्हा दाराकडे वाकून पाहिले, आणि खात्री करून घेतली. तिने ते पत्र बाहेर काढले, आणि आधाशाप्रमाणे ती त्या पत्रावरून नजर फिरवू लागली. वाचता वाचता तिचा रंग फिका होत गेला–तिचे चमकणारे पाणीदार टपोरे डोळे लांबसडक पापण्याच्या सावलीत एकदोन वेळा फडफडले आणि पुन्हा जागचे जागी विसावले. झट्‌दिशी तिने ते पत्र कोटाच्या खिशात टाकले आणि ती बाहेर सटकली.

कपडे घालून कामावर निघालेल्या पन्नालालला माया म्हणत होती, "मग काय ठरवलंत?"

काही तरी बोलण्यासाठी त्याने तोंड उघडले. पण त्याच्या तोंडून शब्द बाहेर पडू शकला नाही. त्या प्रश्नाचे उत्तर त्याच्याजवळ नव्हतेच!

"मला वाटतं–" मायाने सर्व बळ एकवटले, "माझ्या अंगावर जे काही दहा–पाच तोळे आहेत ते आपण गहाण टाकूया. त्याचे चार पाचशे सहज येतील. आणि दोन चारशासाठी सरदारजींना विचारू. थोडी तरी ते आपल्याला मदत करतील. दरमहा पगारातले पंधरा रुपये कापीत जा म्हणाव! म्हणजे तरी त्याचा राग शांत होईल."

हीच माया रात्री म्हणत होती की, 'मुलांना कुठे दुष्काळ पडला आहे...? एक दार बंद असलं तर शंभर उघडी आहेत...'

मायाची ही कल्पना पन्नालालला काही अशी पटली. नैराश्य पसरलेल्या जीवनात मिणमिणता आशादीप त्याला दिसू लागला. तो म्हणाला, "आणि याउप्परही ते नाकबूल झाले तर–?"

"न कबूल व्हायला काय झालं? मी स्वत: जाऊन त्याची खात्री करीन. तुम्ही थोडे हात-पाय हालवायला सुरुवात करा."

"आणि सरदारजीकडूनही उत्तर मिळालं नाही तर?" पन्नालालने पुन्हा आपले ढळते मन सावरून धरीत प्रश्न केला.

"मी म्हटलं ना तुम्ही प्रयत्नाला लागा म्हणून!–" आता माया थोडी रागानेच म्हणाली. "दर वेळेस तोच नन्नाचा पाढा कसा निघतो तुमच्या तोंडातून! नकार का म्हणून देतील? पाच वर्षं नोकरी करतो आहोत आपण त्याची; एका पैशाची तरी नुकसान झाली आहे का आपल्या हातून? जरा गोडीगुलाबीनं घ्या. ह्यात काय गैर आहे? तुमचं म्हणणं ऐकलं नाही तर मग मी स्वत: जाईन–"

पन्नालालच्या जिवात जीव आला. त्याच्या चालण्यात आपोआप गती आली. सबंध रस्ता तो अशा प्रकारच्या विचारतरंगात हेलकावे खात चालत होता. मध्येच त्याला वाटे–'सरदारजींना आपली परिस्थिती समजावून सांगितली तर नाही म्हणणार नाहीत! ते देखील आपल्यासारखेच मुलाबाळांचे धनी आहेत. आपले दु:ख ते जाणू शकतील.' अशा तऱ्हेने फिरणारी विचारचक्रे मध्येच दुसरीकडे वळत. '–ज्याचा पै–पैशात जीव अडकून बसतो, ज्याच्याकडे दहा–दहा, बारा–बारा तास खपूनही पस्तीस रुपये पगार द्यायला जड जातं, तो आपल्याला इतकी शेकडो रुपयांची मदत करायला कसा तयार होईल?'

दुकान आले. सरदारजी तक्क्याला टेकून बसला होता. त्याच्यापासून काही अंतरावर शो–केसपाशी, एक कृश शरिराचा पण दिसायला तरतरीत–वीस एक वर्षांचा तरुण गुडघे पोटाशी कवटाळून बसलेला त्याला दिसला. त्याचे कपडे साधे होते. आणि शरीर अत्यंत शिणलेले दिसत होते.

सरदारजीला 'सत्–श्री–अकाल' करून तो गडबडीने आपल्या बसण्याच्या जागेकडे जाऊ लागला. पहिली डाक चुकू नये म्हणून त्याची ही गडबड होती. पण मध्येच सरदारजीने त्याला हाक मारली.

"पन्नालाल..."

पन्नालालला जवळ येताच आतरसिंह म्हणाला, "मला हवा तसा माणूस अखेर मिळतोय!......"

मालकाचे वाक्य ऐकताच पन्नालाल कावराबावरा झाला. पन्नालाल पुढे काही विचारणार तोच सरदारजी पुढे म्हणाला,–"मी यापूर्वी तुम्हाला अनेकवेळा बजावलं असेल, तुम्ही घड्याळ दुरुस्त करायला शिका म्हणून. ते काम शिकला असतात तर आज मला दुसरा माणूस का शोधावा लागला असता?"

पन्नालालने एकदा त्या तरुणाकडे वळून पाहिले. दोघांची नजरानजर झाली. आणि लागलीच दोघांच्या नजरा परस्परविरुद्ध दिशेला वळल्या. त्याच्याकडे हनुवटी उचलीत आतरसिंह म्हणाला—

"किती शिकला आहे ठाऊक आहे? बी. ए. पास आहे!"

पन्नालालच्या पायाखालची वाळू सरकत होती. काहीतरी बोलायचे म्हणून तो म्हणाला, "हो पण पगारदेखील जास्ती घेणार तो!"

"फक्त चाळीस रुपये!" दाढीवरून हात फिरवीत सरदारजीने उत्तर दिले. "आता तुम्हीच माझ्या दृष्टीनं विचार करा. हा व्यापार आहे–बिझिनेस आहे! मला माझं पाहिलं पाहिजे!"

"पण सरदारजी–"

सरदारजीने एकवेळ त्या तरुणाकडे पाहिले आणि तो पन्नालालला म्हणाला, "ह्याला तुमच्या कामाची कल्पना द्या. आणि लागलीच हिशेबही करून टाका तुमचा!"

हे सर्व ऐकून पन्नालालला सगळे दुकान भोवती फिरते आहे, असे वाटले. पुन्हा एकदा त्याने त्या नवागतुकाकडे पाहिले आणि नंतर मालकाकडे! त्याचा घसा कोरडा पडत चालला होता. जिभेतले त्राण

नाहीसे होत होते. त्याने उठून उभे राहण्याचा एकदा प्रयत्न केला. पण पुन्हा खाली बसला.

शेजारी बसलेला मुलगा पन्नालालची प्रत्येक हालचाल अगदी टक लावून पहात होता. शेवटी दोघेही टेबलावर येऊन एकमेकासमोर बसले. रजिस्टरमध्ये लिहिलेल्या अक्षरातली शाई पसरत असल्याचा त्याला भास होऊ लागला. वाचताना एक वाक्य दुसऱ्या वाक्यात जाऊन अडकत होते. आणि दोन्ही वाक्ये जागचे जागीच विरून जात होती. टेबलावरून जितक्या लवकर उठता येईल तितके बरे, असे त्याला वाटले, तर मध्येच जागेवरून उठण्याची त्याला भीतीही वाटत होती. कारण जागचे उठण्यापूर्वी हृदयातले ठोके बद पडले तर–! डोळयावर येणारी अधारी झटकून टाकण्याचा तो प्रयत्न करीत होता. आणि एवढे करूनही त्याला अक्षरे अंधुक दिसायची ती दिसतच होती. जे हिशेब चुकलेले होते, ते नव्या कारकुनाला समजावून देताना दोनदोनदा, तीनतीनदा दुरुस्त करावे लागत होते.

अखेर निघायला हवेच होते. तासाभरात पन्नालाल पगार घेऊन दुकानाच्या पायऱ्या उतरला. काट–छाट करून अवघे सव्वीस रुपये त्याच्या हातात पडले. रित्या मनाने त्याने ते गुपचुप खिशात कोंबले आणि ज्या दिशेने आला त्या दिशेकडे वळला. जसजसा तो घराजवळ येऊ लागला तसतशी एक अज्ञात शक्ती त्याला मागे खेचीत होती. तो जागचे जागी एकाएकी थांबला. उलट वळला.

—काही वेळाने त्याला शहराच्या बाहेर जाणाऱ्या रस्त्याने रखडत चाललेल्या काही लोकांनी पाहिला.

## : ३ :

चौदा वर्षांचा शिक्षणक्रम संपला तेव्हा केदार पोरका झाला होता. ह्या जगात आपले म्हणण्यास त्याला कोणीही उरले नव्हते. त्याच्या वडिलानी घड्याळाच्या दुकानावर काम करून मिळणाऱ्या मिळकतीवर केदारला शिकविले होते. केदारने एफ्. वाय्. च्या वर्गात प्रवेश केला तोच क्रूर काळाने त्याच्या वडिलांवर झडप घातली व वडिलाचे छत्र हिरावून घेतले. त्यानंतर आईजवळ जी काही थोडी थोडकी पुजी राहिलेली होती त्या पुजीवर तिने केदारला बी. ए. च्या उंबरठ्यावर नेऊन सोडले. आपला मुलगा बी. ए. व्हावा एवढी एकच तिची मनीषा होती. पण आपल्या मुलाचे यश अनुभवण्याचे सौभाग्य त्या माउलीला पण लाभले नाही. तापाच्या तडाख्यात सापडून तिने देखील केदारचा नेहमीकरता निरोप घेतला !

आईविना घर त्याला खायला उठले. तो घराबाहेर पडला.

विद्यार्थीदशेपासूनच केदारच्या मनात घरच्या गरीबीचे विचार होते. आपण शिकावे, माता–पित्याचे पाग फेडावेत. आशीर्वाद मिळवावेत. पण दुसरीकडे त्याचे भाग्य मूक स्वरात त्याची क्रूर चेष्टा करीत हिणवीत होते.

—आणि वाऱ्याच्या तडाख्यात सापडलेल्या ढगाप्रमाणे केदार रावळपिंडीत येऊन दाखल झाला. त्याच्या पोटात भुकेचा डोंब उसळला होता. मोठ्या अधीरतेने तो नौकरीची विचारणा करीत होता. पण नौकरी मिळणे काही सोपी गोष्ट नव्हती. सबंध दिवस तो दुकानापुढे फिरला. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. कारण त्याने स्वतःची अवस्थाच अशी करून घेतली होती की, पहाणाराला तो भिकारी किंवा मणंग असल्याचा भास होत होता. एक दोन ठिकाणी तर आपण बी. ए. असल्याचेही त्याने सांगितले होते. पण लोकानी तर त्याला वेडा म्हणून हुसकावून लावले.

त्या दिवसात रात्रीच्या वेळी झोपण्यासाठी भिकारी ज्या ठिकाणी एकत्र जमत, त्या ठिकाणी जमिनीवर पडल्या पडल्या विचार करीत असताना त्याला एकदम आठवले–लहानपणी आपणही आपल्या वडिलांकडून घड्याळदुरुस्तीचे थोडेफार काम शिकलो होतो. दिवस उजाडताच घड्याळाच्या दुकानाचा शोध करीत तो शेवटी राजा बाजारातील अतरसिंहाच्या दुकानासमोर येऊन थांबला. अतरसिंह तोंडावर मार देऊन पेंगलेल्या स्थितीत हाताच्या बोटानी काही तरी मोजीत होता. रामप्रहरी दुकानासमोर येऊन थडकलेल्या भिकाऱ्याला पाहून तो त्याच्यावर खेकसून म्हणाला, ' चल बे चल ! काम बघ– दिवस उजाडतो न उजाडतो तर लेकाचे बाहेर पडतात !"

" सरदारजी, मी भिकारी नाही. " केदार विनयाने म्हणाला.

अतरसिंहाने रागाने लाल झालेले डोळे त्याच्यावर रोखले.

उत्तरादाखल केदारच्या तोंडातून बी. ए. पास झाल्याचे तेच शब्द बाहेर पडणार होते. पण त्याने स्वत ला सावरून धरले. कारण ह्या मूर्खपणाचे फळ तो पूर्वीच भोगून चुकला होता. तो म्हणाला, " मालक, मी घड्याळ दुरुस्त करणारा आहे."

" घड्याळ आणि तू दुरुस्त करणार ?" सरदारजीच्या तोंडातून करडे हास्य बाहेर पडले.

" सरदारजी, माफ करा." केदार पुन्हा विनयाचा सूर लावीत म्हणाला. " एखाद्याच्या चेहऱ्यावरून त्याच्या बुद्धीचं—ज्ञानाचं मोजमाप करण्याची जगाच्या डोळ्यांना सवय झाली आहे. मी पुष्कळ काही असेन ! पण या घटकेला मी कशातच जमा होऊ शकत नाही. मी आपणाकडे काम मागायला आलो आहे, भीक नव्हे. एखादं घड्याळ नीट करायला देऊन तरी पहा—"

केदारचे हे बोलणे ऐकून अतरसिंह अधिकच विचारात पडला. एखाद्या भिकाऱ्याचे बोलणे इतके स्वाभाविक आणि मार्मिक असू शकेल ?

त्याने केदारला दुकानाच्या फळीवर बसण्यास सांगितले. एक जुने घड्याळ पक्कड, आणि स्क्रू-चावी त्याच्या पुढ्यात टाकीत अतरसिंह म्हणाला, " हं, हे घे. हे घड्याळ खोलून पुन्हा फिट करून दे."

सोपवलेले काम हातावेगळे करण्यास केदारला अवघी वीस मिनिटे लागली असतील. पण ते पाहून अतरसिंह मात्र आश्चर्यचकित झाला. त्याने विचारले, " काही लिहिता वाचता येतं का तुला ?"

" होय, मी बी. ए. पास आहे !"

" तू बी. ए. पास आहेस ?" अतरसिंहाला खदखदून हसू लोटले.

" त्याची पण आपण परीक्षा घेऊ शकता !" एवढे बोलून केदार त्याच्याकडे आशाळभूत नजरेने पाहू लागला. " हं, हे वाच–" आजच्या डाकेला आलेले, गादीखाली ठेवलेले पत्र काढून त्याच्यापुढे करीत अतरसिंह म्हणाला. केदारने पाकिटातील इंग्रजी पत्र वाचून लगेच त्याचे भाषातरहि करून दाखविले.

हे पाहून सरदार अतरसिंहाच्या बेढब चेहऱ्यावर प्रसन्नतेची लाट उसळून गेली. तो पुन्हा विचारात गुरफटला. 'हाताचा प्रामाणिक असेल तर माणूस कामाचा दिसतोय्.' त्यानतर त्याने केदारला अनेक

प्रश्न विचारले. त्या प्रत्येक प्रश्नाचे केदारकडून समाधानकारक उत्तर मिळत गेले. त्यानंतर अतरसिंह म्हणाला, "आज तरी मला माणसाची जरूर नाही. पण तुझी ही दशा पाहून वाईट वाटतं. जर तुला घड्याळ-दुरुस्तीचं काम दिलं तर तू किती रुपये घेशील ?"

"सरदारजी, आज मला फक्त अन्न आणि वस्त्र यांची गरज आहे. आपण स्वखुशीनं जे द्याल ते मी हसतमुखानं घेईन. माझ्या मागे माझा थोडाच परिवार रडतो आहे ? एकटा जीव आहे—"

"ठीक आहे. तुला चाळीस रुपये देईन. पण काम कसं मन लावून आणि चोख केलं पाहिजेस."

"फार उपकार होतील ! खरं म्हणजे एवढ्याचीही आज गरज नव्हती मला. माझी इमानदारी आणि मेहनत याबद्दल मी कशाला बोलू ? वेळीच तुमची खात्री होईल."

अतरसिंहाला वाटले, आपण फार घाई केली. त्याला पश्चात्ताप झाला. चाळीसऐवजी पंधरा-वीस रुपयांवरही तो सहज राजी झाला असता. पण आता काय उपयोग? शब्द देऊन माघार घेणे बरे नव्हे. तो केदारला म्हणाला, "एवढ्यात माझा माणूस येईल. तो तुला काम समजावून देईल. घड्याळदुरुस्तीसाठी जे जे सामान लागणार असेल, त्याची एक यादी तयार करून ठेव."

मालकाचे आभार मानून केदार म्हणाला, "मालक, मला काही पैसे द्याल तर मी खाणावळीत जाऊन पटकन् काही तरी खाऊन येईन."

"हो-हो. का नाही !" असे म्हणून अतरसिंहाने खिशात हात घातला. तोच समोरून पन्नालाल येताना त्याला दिसला. त्याने खिशातून मोकळा हात बाहेर काढीत म्हटले. "तो पहा आलाच माझा माणूस. काम समजावून घ्यायला फार वेळ लागणार नाही. तासाभरात होईल सर्व. ते झालं की आज तुला सुटी देईन. मग जेवण कर. बाजारातून साबण आण. कपडे धू. घाणेरड्या कपड्यांनी दुकानांत येऊन चालणार नाही."

त्यानंतर केदारने पन्नालालकडून सगळे काम समजावून घेतले. पन्नालाल पगार घेऊन निघून गेला. वास्तविक पन्नालाल समोर असतांनाच केदारची भूक, तहान हळूहळू नाहीशी होऊ लागली होती. पन्नालालच्या चेहऱ्यावर त्याने जे भाव पाहिले, किंवा तो येताक्षणी गोष्टींचा उलगडा झाला होता—दुःखी माणसाला दुःखी मनाचीच ओळख पटते ! मनात त्याने स्वतःला दोष देण्यास सुरुवात केली. एखाद्या गरीबाच्या तोंडचे आपण अन्न काढले, हे चांगले केले नाही. काम समाजावून घेताना त्याच्या मनात कित्येकदा त्याच्या मनात असा विचार येऊन गेला की आपण पन्नालालच्या मार्गातून बाजूला व्हावे. पण त्याला जे वाटत होते ते तो करू शकला नाही.

जाताना पन्नालालने केदारकडे अशा काही नजरेने पाहिले की त्या एकाच दृष्टिक्षेपात केदारच्या हृदयाच्या चिंधड्या झाल्या. वाटू लागले, जाता जाता पन्नालालचे डोळे त्याला भयंकर शाप देऊन गेले आहेत. त्यामुळे त्याला नौकरी मिळाल्याचा आनंद कोठल्या कोठे पळून गेला होता……

: ४ :

आंघोळ, जेवण वगैरे कामे संपवून केदार दुकानावर परतला. अतरसिंहाने काही जुनी घड्याळे, लागणारी साधने त्याच्या हवाली केली.



परागंदा पन्नालाल

अतरसिंहाला दुपारी तास दीड तास झोप घेण्याची सवय होती. नेहमीच्या सवयीप्रमाणे तो झोपण्यासाठी आडवा झाला.

हातात घेतलेले पहिलेच घड्याळ पुरते उघडून होते न होते तोच एक मध्यम वयाचा मुसलमान गृहस्थ केदारकडे आला आणि म्हणाला, "हे पत्र पन्नालालनी आपणाला देण्यास सांगितलं आहे."

"मला ?" पत्र आणणाऱ्याकडे आश्चर्याने पहात केदार म्हणाला, "कोण पन्नालाल ?"

"ह्याच दुकानावर काम करतात ते–" असे म्हणून तो निघून गेला. केदारने हातातले घड्याळ बाजूला ठेवले. ते पत्र उघडले व तो वाचू लागला. वाचता वाचता त्याचे हात कापू लागले. मध्येच तो उठून उभा राहिला; आणि अशा तऱ्हेने इकडे तिकडे पाहू लागला की तो आता कोणाला तरी पकडण्यासाठीच धावणार होता. एकदा त्याने जे काही वाचले त्यावर त्याचा विश्वास बसेना. तो पुन्हा वाचू लागला. पत्रातला मजकूर असा होता–

"प्रिय महाशय ! ह्या दुःखी जीवनातून मला मुक्त करण्यासाठी आपण आलात ते चांगले केलेत. जीवनातल्या माझ्या सर्व आशा-आकांक्षा एकापाठोपाठ एक निराशेच्या खोल पाण्यात केव्हाच वाहून गेल्या आहेत. त्यांच्यापैकी शेवटची अशी एकच इच्छा शिल्लक होती. पण त्याही इच्छेचा आता चुराडा झाला आहे. जे दोन घास मी माझ्या मुलांच्या तोंडात भरवीत होतो तेही तुम्ही माझ्यापासून हिरावून घेतलेत. ज्याच्या आधारावर मी जिवंत राहीन असे कोणतेच ठिकाण माझ्याकरता राहिलेले नाही. माझे सर्वस्व उध्वस्त झाले असताना मृत्यूला कवटाळण्यात मला कशाची भीती वाटणार आहे ? मी आता

त्याच्याच आश्रयाला निघालो आहे. तेथे पोहोचल्यावर तरी मी सर्व दु खातून कष्टातून मुक्त होईन.

"तुम्हाला नोकरी मिळाल्याबद्दल मी आपले अभीष्ट चिंतितो.–पन्नालाल"

पत्र वाचून केदार सुन्न झाला. अतरसिंहाला आता जाग आली होती. दुकान वद होण्यापूर्वी त्याने हिशेबाचे काम संपविले. आता केदारच्या राहण्याचा प्रश्न केदारपुढे उपस्थित झाला. त्याने म्हटले, "केदार, आज काही नाही पण उद्या एखाद लहान मोठं घर पाहून देईन. आजची रात्र तू इथेच बाहेर झोपून काढ, खाट आणि अंथरूण मी पाठवून देतो." इतके बोलून त्याने केदारला पाच रुपये दिले. दुकान वद केले. आणि तो वर निघून गेला. वर जाण्याचा जिना आतल्या बाजूनेच होता.

खाटेवर झोपलेला केदार पडल्या पडल्या कसल्या तरी विचारात गुरफटला होता. पाठीत कोणी तरी सुरा खुपसत असल्याचा त्याला भास होत होता, तर मध्येच कसल्या तरी भयकर पकडीत त्याचे शरीर आवळले जावे, असे वाटत होते. त्याची भूक व तहान केव्हाच नाहीशी झाली होती.

बाजारांत लोकाची गर्दी उसळली होती. ते पाहून केदारला वाटले, हे सर्व जण मोठ्या कोर्टात आपल्याविरुद्ध फिर्याद करण्यास निघाले आहेत. डोळचाला दिसणाऱ्या प्रत्येक वस्तूची त्याला भीती वाटत होती. रस्त्याने धावणाऱ्या प्रत्येक टांग्याखाली आणि मोटारीखाली पन्नालालचे शरीर तुडविले जाऊन छिन्नविच्छिन्न होत असल्याचे दिसत होते एका मजुराच्या डोक्यावरची लाकडांची मोळी पाहून कोणा मृताच्या देहाला अग्नी देण्यासाठीच ती स्मशानभूमीकडे चालविली आहे, असे त्याला वाटले. काही वेळ असाच गेला आणि मग चौदा पंधरा वर्षांची एक मुलगी, एका सात–आठ वर्षांच्या मुलाचा हात हातात धरून त्याच्याकडे येत असल्याची त्याला दिसली. ती दोघे दुकानासमोर येऊन थावली. मुलीने मागे वळून खाटेवर झोपलेल्या केदाराकडे पाहिले. आणि नंतर दुकानाच्या पाटीकडे पाहून मुलाच्या कानात ती काही तरी कुजबुजली. त्याला घेऊन पुढे निघून गेली. केदारची दृष्टी त्यांचा पिच्छा करीत होती. दोन तीन दुकाने पुढे जाऊन ती मुलगी पुन्हा थावली. पुढे जाणाऱ्या मुलाला इशारा करून तिने मागे फिरण्यास सांगितले. ती दोघे पुन्हा परत आली. आणि त्याच दुकानापुढे उभी राहिली, केदारने पाहिले, मुलगी मुलाच्या कानात काही तरी सागत आहे व त्याला पुढे ढकलते आहे. तर मुलगा मागे सरकून त्या मुलीला पुढे ढकलतो आहे.

"अऽ–तुम्ही माझ्या वडिलाना पाहिलत का?" मुलीने काहीशा लाजऱ्या आणि भेदरलेल्या आवाजात विचारले.

"तुझे वडील?" केदार उठून बसला. "काय नाव आहे तुझ्या वडिलाचं?"

"पन्नालाल." मुलीच्या तोंडातून शब्द बाहेर पडण्यापूर्वीच तिचे मागे उभा असलेला मुलगा झटकन उत्तरला.

केदारला आणखी प्रश्न विचारण्याची जरुरी नव्हती. मुलगी म्हणाली, "आई सकाळपासून जेवली नाही. ती काळजीत आहे."

केदारला असंख्य इगळचा डसू लागल्या. बराच वेळ त्याला उत्तर सुचले नाही. आणि जेव्हा मुलीने पुन्हा विचारले, "तुम्हांला ठाऊक नाहीत माझे बाबा? ह्याच दुकानावर तर ते काम करीत असतात." आता कुठे केदार ताळचावर आला. हृदयात होणारी कालवाकालव मोठ्या मेटाकुटीने थांबविण्याचा प्रयत्न करीत तो म्हणाला, "हो, ठाऊक आहेत!"

"ठाऊक आहेत तुम्हाला माझे बाबा?" ह्या वेळेस तिने आवाजात आणि डोळयात प्राण आणून विचारले, "कुठे आहेत ते?"

"संध्याकाळच्या गाडीनं ते मुंबईला गेले आहेत." ह्या खोटचापेक्षा उत्तम खोटे बोलणे केदारला सुचले नाही.

"मुंबईला?" दोघा भावडांच्या तोंडून हा एकच प्रश्न एकाच वेळी, एकाच आवाजात बाहेर पडला.

"हो मुंबईला. सरदारजीना एका कंपनीचे जुने व्यवहार पूर्ण करायचे होते. त्याकरता त्यानी तुमच्या वडिलाना मुंबईला पाठविल आहे."

"पण–पण घरी न सागताच ते कसे निघून गेले?" हा प्रश्न विचारताना मुलीचे भोळे डोळे भय आणि आश्चर्य यांच्या संमिश्रणाने अधिक सुंदर दिसू लागले. उत्तरादाखल जे काही बोलायचे होते ते देखील केदारच्या कंठात रुतून बसले होते. तरीही अडखळत अडखळत तो म्हणाला, "गाडी.........गाडीची वेळ........ होऊन गेली होती. ..म्हणून...जाताना त्यांनी मला तुमच्या घरी निरोप पोहोचविण्यास सांगितलं होतं. पण मला तुमच्या घरचा पत्ता सापडला नाही."

"अऽऽ आम्ही भाबडिया गल्लीत चौधरी भोलानाथ याच्याच घरात राहतो." यावेळेस मुलीने काहीशा उत्साहित स्वरात उत्तर दिले.

"असं होय? मग मी सकाळी घरी येईन. आणि तुमच्या आईला सर्व समजावून सांगेन."

"आताच चला ना तुम्ही. नाही तर आई जेवणार नाही." मुलीच्या डोळयात अश्रूंनी गर्दी केली होती.

केदार पुन्हा काळजीत पडला. तो म्हणाला, "मी म्हटलं ना, सकाळी येईन म्हणजे नक्की येईन. आईला साग काळजी करण्यासारखं काही नाही!"

पण मुलीचे समाधान झाले नाही. आणि हे तिचा चेहरा सांगत होता. ती आर्जवी सुरात म्हणाली, "तुम्ही माझ्यावरोबर चला. मी माझ्या भावाला इथे बसायला सागते."

यावेळेस केदार आणखीच विचाराच्या कात्रीत सापडला. काही विचार करून तो म्हणाला, "सकाळी अगदी नक्की येईन; सागितल ना एकदा—"

ती जायला निघाली. तोच केदारने पुन्हा विचारले, 'गल्लीच नाव काय सागितलस तू मुली?"

"भावडीया गल्ली!"

"ठीक आहे.मी सकाळी नक्की येईन.तुझं नाव नाही सागितलस?"

"वीणा!"

बहीणभावडे निघून गेली. आणि इकडे केदारच्या कानात वीणाने उच्चारला तो शेवटचा 'वीणा' शब्द खरोखरीच वीणेचा सूर झाला.

## : ५ :

वाट पाहता पाहता तीन वाजले. चार झाले. माया उपाशीच होती. तिचे मन अद्याप म्हणत होते 'आता येतील – मग येतील.' पन्नालाल उशीरा येण्याची ही काही पहिली वेळ नव्हती. यापूर्वीही तो

अनेक वेळा उशीरा घरी आला होता. तेव्हा मायालाही आज तसेच तसेच वाटत होते. दोन तीन दिवसापूर्वीच मायाशी बोलताना तो म्हणाला होता, 'अलीकडे दोन माणसांचं काम मला एकटयाला कराव लागत.'

हळूहळू संध्याकाळ झाली. रात्रही पडली. पण पन्नालाल येण्याची अजूनही काही चिन्हे दिसेनात. जेवणाची वेळ टळून गेली होती. एक एक क्षण माया मोठया प्रयासाने ढकलीत होती. पण ती अशी किती वेळ बसून राहणार होती ? तिने वीणाला व वसंताला दुकानावर पाठवून दिले होते.

पन्नालाल मुंबईला गेला असल्याची बातमी कळल्यानंतर मायाच्या जिवात जीव आला. पण निरुत्साही देखील झाली. 'न सांगता न कळवता इतक्या दूरचा प्रवास !' ती मनातल्या मनात धागे जोडू लागली. 'ज्यानं सांगितलं तो कोण असावा बरं ?' आपल्या नवऱ्याशिवाय दुकानावर कोणी नाही, हे तिला ठाऊक होते. पण त्याबरोबरच सरदारजीच्या दुकानात कमिशनवर एक-दोन एजंटही नेमले असल्याची कुणकुण तिच्या कानावर आली होती. ते एजंट्स् गावोगाव हिंडून मालाची ऑर्डर नोंदवीत असत.

तिने विचारले, "वीणा, कोण होता ग तो माणूस ?"

"कोणी नवीनच दिसत होता बाई !"

"कसा दिसत होता ?"

"असाच – सडपातळ – गोरा, उंचाडचा !"

यानंतर माया आणखी काही विचारण्याच्या फंदात पडली नाही. रात्र तिने जवळजवळ जागून काढली. वीणाने सांगितल्याप्रमाणे तो अनोळखी माणूस सकाळी येऊन पन्नालालविषयी अधिक माहिती सांगणार होता.

दिवस उजाडला. माया नेहमीपेक्षा आज लवकरच उठली होती. उठून तिने घरातली साफसफाई पूर्ण केली. मुलांना न्हाऊ माखू घातले. जणू ही सर्व त्या अनोळखी इसमाच्या स्वागताचीच तयारी होती !

साडेसातच्या सुमारास बाहेर कोणी तरी वीणाला हाक मारली. त्यावेळेस माया खाटेवरच पडलेली होती. वीणा स्वैपाकघरात चुलीवर पोतेरे ओढीत होती. बाहेरून आलेली हाक तिच्या कानावर पडताच वीणाने हातातले पोतेरे लांब भिरकावून दिले. आणि झट्दिशी हात धुऊन काहीशी धावतच ती बाहेर आली. केदार दारात उभा होता. तिने त्याला आईपाशी आणले. केदारचा आवाज ऐकून माया मधल्या दारात आली होती. उघडे डोके – अंगात पेटीकोट अशा कपडयात वीणाला पाहताच माया तिच्यावर ओरडली, "वीणा, तू आपल्या कामाला जा पाहू !"

वीणा निघून गेली. मायाने दुपट्टयाचा पदर पुढे ओढीत नमस्कार करण्यासाठी हात जोडले. नंतर आतमध्ये बोलावून त्याला बसण्यास खुर्ची दिली. आणि आपण तिथेच एका बाजूला जमिनीवर टेकली.

तिकडे वीणाने पोतेरे ओढण्याचे काम आवरते घेतले. अंगावरचे कपडे ठाकठीक करून ती पुन्हा खोलीत येऊन आईजवळ बसली.

इथे येताच आपल्याला कोणते प्रश्न विचारले जातील आणि त्या प्रश्नांना कशी उत्तरे द्यावी लागतील ह्याची केदारला पूर्ण कल्पना होती. तेव्हा केदारनेच विषयाला हात घालीत म्हटले, 'तुमच्या मुलीजवळ मी रात्री सांगितलं होतं की तिचे वडील अचानक मुंबईला निघून गेले आहेत. नौकरी म्हणजे काय चीज असते हे मी नव्यान सांगण्याची आवश्यकता नाही. मग ती नोकरी राजाची का असेना, शेवटी नोकरीच. कालच मी मुंबईहून आलो एका कंपनीशी झालेला झगडा मिटवायचा होता. लाहोरचा एक व्यापारी आहे तो त्या कंपनीची एजन्सी घेण्याच्या प्रयत्नात आहे. तेव्हा सरदारजींना प्रश्न पडला. त्यांनीच पन्नालालना इतक्या घाईनं मुंबईला धाडलं.'

केदारची मधुर वाणी, नम्रता आणि सुंदर चेहरा बघता बघता मायाचे अर्धे दुःख नाहीसे झाले. ती म्हणाली, "ते असेना का, मालकाचा हुकूम मानणं आमचं कर्तव्य आहे. जवळ काही कपडे नाहीत – अंथरा-पांघरायला चादर नाही, – निदान घरी तरी येऊन जायचं की नाही ?"

केदार मध्येच म्हणाला, 'त्याची काळजी नको. सर्व काही दिलं आहे मी त्यांच्याबरोबर. माझी एक सतरंजी होती, पांघरूण होतं तेच दिलं."

"आमच्यामुळे आपल्याला फारच त्रास झाला, नाही ?" मायाच्या डोळयांत अनोळखी केदारविषयी गाढ श्रद्धा जमा झाली. "स्वतःचे कपडे देऊन तुम्ही उगीचच गैरसोय करून घेतलीत."

"त्यात गैरसोय ती कसली ?"

"पण किती दिवस त्यांना मुंबईत काढावे लागतील ?"

"कदाचित् एखादा आठवडाहि लागेल."

"आणि आपण केव्हा आला म्हणालात ?"

"काल. आणि जोपर्यंत पन्नालाल परत येणार नाहीत तोपर्यंत मलाच त्यांच्या जागी काम करावं लागेल."

"पण रात्री तुम्ही दुकानाच्या फळीवरच झोपलात ?"

"हो. अजून जागा मिळाली नाही, उद्यापर्यंत मिळेल कुठे ना कुठे –"

"इकडे यायचं मग ! फळीवर झोप कशी लागणार – ?"

"त्यात काय झालं ? कशी शान्त झोप लागली होती !"

"किती भाडयापर्यंत घर पाहिजे ?"

"चार-पाच रुपयापर्यंत –"

"मग आमच्याशेजारीच आहे की. पाच रुपये म्हणतात. पाहू चार-पर्यंत दिलं तर –"

"माझ्यासाठी इतकी तसदी घ्यावी."

"तसदी कसली त्यात ? आत्ता विचारते, घराची मालकीण तशी स्वभावानं चांगली आहे. पाहू या कदाचित् भरेल तुमच्या मनात –"

केदारने खिशातून पाचाची नोट – जी एकच होती – ती बाहेर काढली. मायाला म्हणाला, "हे पाच रुपये. एका महिन्याचं आगाऊ भाडं घ्या !"

"आगाऊ भाडयाची काहीच जरूर नाही. ठेवून द्या ते पैसे." असे म्हणून तिने केदारला ती नोट खिशात ठेवण्यास सांगितले

"मला वाटतं, तुम्ही एकदा घर पाहून घ्यावं, म्हणजे बरं" असे म्हणून तिने वीणाकडे पाहिले. "वीणा, मावशीकडून तेवढी खोलीची किल्ली घेऊन ये, आणि यांना खोली दाखव... .."

वीणाच्या पाठोपाठ केदार निघालाच –

: ६ :

सरदार आतरसिंहाकडे नौकरीला लागून केदारला आता एक महिना झाला आहे. एका महिन्यातच मालक त्याच्यावर इतका खूष झाला आहे की त्याने दुकानाचा सर्व कारभार केदारच्या हवाली केला आहे.

केदारचा प्रामाणिकपणा आणि पडतील ते कष्ट करण्याची वृत्ती, ह्यावर तो मोहित होऊन गेला आहे. दुकानाच्या सर्व चाव्याही त्याच्या हवाली केल्या आहेत. घड्याळदुरुस्तीचे दिवसाकाठी जे चार पाच रुपये येत होते ते सर्व रात्री दुकान बंद करते वेळेस जसेच्या तसे तो मालकाच्या स्वाधीन करी.

केदार पन्नालालच्या घरात हां हा म्हणता इतका मिळून मिसळून गेला आहे की पाहणाराला केदार हा त्याच्या कुटुंबापैकीच एक आहे असे वाटते. काही दिवसांनतर केदारने पन्नालालचे पत्र आल्याचे मायाला सांगितले. तेव्हा 'पत्र पाहू' म्हणून वीणाने त्याच्यापाशी आग्रह धरला. पण पत्र गडबडीत कुठे तरी हरवल्याचे सांगून खुशालीचा मजकूर मनोमन जमवून सांगितला. वीणाची परीक्षा जवळ आली होती. गणितात ती कच्ची होती. तेव्हा शिकवणीची तिला अत्यंत जरूर होती. पण पैशाच्या अभावी ही गोष्ट होऊ शकली नव्हती. म्हणून केदारने ते काम स्वत:कडे घेतले. दररोज वीणाला तो सकाळ सध्याकाळ शिकवू लागला.

आजही तो नेहमीप्रमाणे वीणाला शिकवीत असता तिने तिच्या वडिलाची गोष्ट काढली. ती म्हणाली, "सर ! तुम्ही म्हणाला होता ना, माझे वडील येईपर्यंत तुम्ही इथे रहाणार म्हणून ? पण बाबा आल्यावर मीच त्यांना सांगणार आहे की तुम्हाला सोडू नका म्हणून; मग काय करणार ? की बाबाचंही ऐकणार नाही ?"

वीणा जसजशी वडिलाच्या आठवणी खुलवून सांगू लागली तसतसे केदारचे डोळे अधिकच भरून येऊ लागले. आणि जेव्हा तिने केदारकडे पाहिले, तो काय, त्याच्या डोळ्यांतून दोन आसवे ठिबकली. तिने भरभर पुस्तके गोळा केली आणि ती परत गेली.

वीणाला केदारकडे बोलावण्यासाठी पाठवून माया विचार करीत होती, 'केदार रडतोय् ? कदाचित घरची आठवण झाली असेल वय तरी किती आहे त्याचं ? आपल्याप्रमाणेच तोही घरच्या दुःखामुळ किंवा अशाच काही कारणामुळ दु खी झाला असेल !–" अशा प्रकारे विचार करणे चालू होते तोच वीणा आणि तिच्या पाठोपाठ केदार आला.

"आई, तुम्ही हाक मारलीत मला ?"

"हो. मीच बोलावल होतं."

"बोला, काय आज्ञा आहे ?"

"थोड खाली तरी बसा–" असे म्हणून वीणा धावत गेली आणि एक पाट घेऊन आली.

"बसायची का वेळ आहे ही ? दुकानावर जायला हवं......"

"काही भिऊ नका." अधिकारपूर्ण स्वरात माया म्हणाली, "फार वेळ नाही घेणार मी तुमचा."

केदारला बसणे भाग पडले.

"हं– बोला !"

कसे विचारावे आणि काय विचारावे अशा अवस्थेतच तिने त्याला प्रश्न केला, "आज वीणाला थोडाच वेळ शिकविलत ? लागलीच ती घरी परतली ?

"तुम्हीच विचारा तिला ! मी पुष्कळ सांगितलं. पण ती न ऐकताच पळन सुटली.

"पळू नको तर काय करू ?" संधी साधून वीणाने म्हटले.

ज्या आपत्तीतून सुटण्याची केदार धडपड करीत होता, नेमके तेच संकट त्याच्यासमोर येऊन उभे राहिले. क्षणभर तो बुचकळ्यात पडला. माया विचारीत होती, "काय झालं ते आम्हाला सांगा ! उगाच कस डोळ्यात पाणी येईल ?"

"काही नाही–सहज."

'सहज का कोणी रडतं ?"

"कधी कधी मला माझ्या आईची आठवण येते–"

केदारच्या आईच्या मृत्यूची हकीकत मायाने ऐकली होती. त्याच्या दु:खात सहभागी होत आणि दीर्घ उसासा सोडीत ती म्हणाली, "खरं आहे, आई-वडिलासारखी प्रेमळ वस्तु साऱ्या दुनियेत हुडकून सापडणार नाही."

मग नेहमीप्रमाणे ती स्वत:चीच कर्मकहाणी त्याला सांगत सुटली. पतिवियोगामुळे तिच्या तोंडातून बाहेर पडणारा प्रत्येक शब्द केदारच्या आत्म्याचा धिक्कार करीत होता. जणू काही त्या प्रत्येक शब्दावाटे कोणी अदृश्य आत्मा केदारला शेकडो शिव्याशाप देत होता. नवऱ्याच्या येण्याच्या वाटेकडे डोळे लावून बसलेल्या मायाला ठाऊक नसले तरी केदार जाणून होता, की हिचा पती आता दुसऱ्या जगाचा निवासी झाला आहे ! केदारचा आत्मा हजारो मणाच्या वजनाखाली सापडून कासावीस होत होता. राहून राहून त्याच्या मनात ह्या प्रश्नाचे द्वंद्व चालले होते–'आपण या कुटुंबास किती काळ अंधारात ठेवणार ? ह्याच्या घराला लागलेली आग आपण खरोखरच विझविण्याचा प्रयत्न करीत आहोत का ? पण याप्रमाणे कोंबडा झाकून ठेवून काय उपयोग ? उजाडणारा दिवस उजाडणारच ! आणि त्यावेळेस या कुटुंबावर त्या भयंकर दु खामुळे किती दारुण प्रसंग ओढवेल ? नाहीपेक्षा या रहस्याचा स्फोट आताच करून टाकला तर ? अरेरे ! या अजाण मुलाना अनाथ बनविण्यास मीच कारणीभूत नाही का ? अपराधी आणि शिवाय दगलबाज ! त्याच्या शापाच्या तापाने माझी राख होईल. ओ हो ! हे परमेश्वरा, कोणत्या प्रायश्चित्तानं मी माझं हे महाभयंकर पाप धुऊन काढू ?'

केदारने वर पाहिले, मायाच्याही पापण्या ओल्या झाल्या होत्या. केदारचे जवळ जाऊन त्याच्या पाठीवरून हात फिरवीत माया म्हणाली, "केदार, एखाद्याचे आईवडील थोडेच एखाद्याच्या जन्माला पुरतात ?"

केदारचे हे दु:ख सामान्य मृत्यूचे नव्हते. परंतु ते मायाला कळणे शक्य नव्हते, तिला वाटत होते, खरोखरच आईच्या आठवणीने केदार फार दु:खी आहे.

पन्नालालला जाऊन तीन महिने उलटले पण तो मात्र परतला नाही. स्वत ची सुटका करून घेण्यासाठी केदार मनात येतील त्या थापा मारून वेळ मारून नेत होता. पण अशाप्रकारे खोट्या आविर्भावावर त्याला किती दिवस जगता येणार होते ?

अशाप्रकारे पन्नालालच्या काळजीत गोवले गेलेले केदारचे मन दिवसेदिवस खिळखिळे बनत चालले होते. ज्याअर्थी अजूनही पन्नालाल परतला नव्हता त्या अर्थी त्याने आपल्या जिवाचे बरेवाईट करून घेतले असले पाहिजे, याविषयी त्याची खात्री झाली. मायाच्या आणि तिच्या मुलांच्या प्रेमात तो एकजीव झाला होता.

माया दर चार पाच दिवसानी वीणाकडून मलेमोठे पत्र लिहून घेई, आणि केदारच्या हवाली करी. ती सर्व पत्रे पोस्टातल्या पेटीत जाऊन पडण्याऐवजी केदारच्या पेटीत जाऊन पडत. केदार आपल्या पगारातून

काही पैसे स्वखर्चासाठी काढून घेई आणि बाकीचे सर्व पैसे पन्नालालचा पगार म्हणून मायाच्या हवाली करी. असे असताना वीणाच्या सोयरिकीसंबंधी उत्पन्न झालेल्या परिस्थितीमुळे माया दर खेपेला काळजीने झुरत चालली होती. मनातून घाबरून जात होती.

केदार स्वतःच्या घरात राही; पण जेवण मात्र पन्नालालच्या घरी घेई. काही दिवसांपूर्वी केदारला अपचनामुळे त्रास झाला होता, त्याचे कारण खाणावळीतले जेवणच असले पाहिजे, असे सांगून मायाने त्याला घरीच जेवण्यासाठी आग्रहाने ठेवून घेतले. त्या दिवशीच्या त्या रडण्याच्या घटनेपासून त्या घरातले त्याचे जाणे-येणे अधिकच वाढत गेले. मुंबईला जाण्यापूर्वी आपल्या नवऱ्याने सरदारजींजवळ कर्जाविषयी गोष्ट काढली होती किंवा नाही, हे केदारला विचारावे असे अनेक वेळा मायाला वाटले. पण ते धारिष्टच अद्याप तिच्याने करविले नव्हते. अखेर एक दिवस गप्पा मारताना गोष्टींचा रोख त्या बाजूला वाहात गेला आणि मायाच्या तोंडातून नकळत त्या रहस्याचा स्फोट होऊन बसला.

एके दिवशी केदार संध्याकाळी दुकानावरून परत आला आणि थेट मायाच्या खोलीत जाऊन बसला. माया मुलांना झोपवून नुकतीच मोकळी झाली होती. वीणा अद्याप स्वैपाकघरातच घुटमळत होती.

मायाने एक सौम्य नजर केदारवर टाकीत म्हटले, " केदार ! एक गोष्ट विचारू का ?"

" विचारा की—"

" पण खरं सांगणार असलास तर विचारीन. "

" पण मी तुमच्याशी कधी खोटं बोललो आहे ?"

माया आता आपल्याला काय विचारणार आहे, हा प्रश्न मनात उद्भवताच त्याचे मन आतल्या आत कंप पावू लागले.

आपल्या मनातल्या असंख्य वेदना केदारपुढे प्रगट करीत माया म्हणाली, "सात पिढ्यांपासून आमचं घराणं प्रतिष्ठित घराण्यांत मोडत होतं, लोक आमचं नाव श्रद्धेनं घेत असत. पण भाग्याचे फासे असे काही पडत गेले की त्यामुळं सर्वस्वाचा होम झाला. ज्या दिवशी वीणाच्या सासरहून पत्र आलं, त्यावेळेस वीणाचे वडील हाय खाऊन बसले. त्यांना धीर देत त्यांची समजूत काढीत मी त्यांना मार्ग दाखविला. म्हटलं, सरदारजींकडे मदत मागितली तर आपली अब्रू वाचू शकेल. पण त्याच दिवशी हे मुंबईला निघून गेले आणि ही गोष्ट तशीच राहून गेली. वीणाला सासरकडील कोणी येईल असं वाटत नव्हतं. पण मला वाटतं एक दिवस स्वतःच जावं. सासरच्या माणसांची समजूत घालावी..."

केदारचे रक्त गोठत चालले होते. मायाच्या चेहऱ्यावर निराशा आणि काळजीची दाट छाया पाहून केदार म्हणाला, " आई, मग तुम्ही का गेला नाहीत ? पडली असती एखादी चक्कर. पण काम तरी झालं असतं !"

मायाचा इतका चिंताक्रांत चेहरा असताना त्यावर एक हलकीशी हास्यरेखा उमटून गेली, " तू किनई केदार, एखाद्या कुक्कुल्या बाळासारखाच आहेस; तूंच सांग कोणतं तोंड मी घेऊन त्यांच्याकडे जाऊ ?"

" हुंडा कमी मिळणार म्हणूनच ते मोडता घालताहेत असंच ना ?"

" उघडच आहे ते !"

" बरं, तुम्ही हुंडा द्यायला कबूल झालात समजा, तर तुमच्या म्हणण्याला होकार देतील ते ?"



परित्यक्ता – माया

" हाच विचार करून मी वीणाच्या वडिलांना पाठविलं होतं सरदारजींकडे ! पण त्यानंतर संधीच मिळाली नाही. पत्रातून एकदोनदा ओझरता उल्लेख केला होता. पण त्यांनी काहीच लिहिलं नाही. "

वीणाच्या हस्ताक्षरांनी नटलेली, आणि ती आणून देत असलेल्या पत्रांची केदार मनातल्या मनात उजळणी करीत होता. त्यापैकी एक दोन पत्रातल्या काही ओळी त्याला आठवल्या–' सरदारजींकडून काय उत्तर मिळाले ? तुम्ही त्या कामाचा काही बंदोबस्त केला किंवा नाही ?–" केदारने आता ओळखले, ह्या गोष्टींचा वीणाला पत्ता लागू नये म्हणून मायाने पत्रातून स्पष्ट उल्लेख केला नव्हता.

केदार म्हणाला, " आई ! आता मला एक गोष्ट अशी सांगा की या कामाला किती रुपये लागतील ?"

पुन्हा दीर्घ उसासा टाकीत माया म्हणाली, " कोणी सांगावं ? आजकालच्या मुलांच्या आई-वडिलांना मुलीच्या घरच्या लोकांनी सर्व काही देऊन टाकावं असं वाटतं. पण आपल्या घरात सव्वा मण तेल असेल तर राधा नाचेल ना ? तसं पाहिलं तर जितके मिळतील तितके थोडेच आहेत. पण निदान हजार-बाराशे लागतीलच लागतील. म्हणून तर मी वीणाच्या वडिलांना म्हणत होते, की माझ्याजवळचे डाग विकून सरदारजींकडून पाच-सातशेची मदत मिळवून हे लग्न उरकून टाकू. " मायाने पुन्हा उसासा टाकला.

" मग आई–" केदारचा आवाज चढत्या सुरात होता, "तुम्ही एकदा गुजरखानला जाऊन याच. तुम्ही म्हणता तेवढ्या रुपयांची सहज व्यवस्था होऊ शकेल. माझ्यावर विश्वास ठेवा. "

केदारचे हे वाक्य ऐकताच मायाला हलके हलके वाटू लागले. तिने डोळे वर करून केदारकडे पाहिले. काही तरी बोलावे म्हणून तिला तोंड उघडावेसे वाटले. पण कृतज्ञतेने भारावून गेलेली तिची जीभ अडखळली. तिच्या तोंडून शब्द फुटेना.

: ५ :

माया गुजरखानला गेल्यानंतरची गोष्ट! वीणा ठरल्याप्रमाणे केदारच्या खोलीत आली. दररोज ती तासभर केदारकडे शिकण्यासाठी येत असे; आणि त्यावेळेस केदार स्वत ची सर्व कामे आटोपून बसलेला असे. पण आज मात्र वीणाने त्याला पांघरूण ओढून झोपलेला पाहिला

"हे काय?" वीणाचा आवाज ऐकताच केदार खडबडून उठून बसला. त्याचा चिंताग्रस्त आणि झोप न आल्यामुळे तारवटलेला चेहरा पाहून वीणाला प्रथम भीती वाटली· "आज अजून झोपच!"

केदारने एक दोन जांभया दिल्या. आणि पुन्हा पहिल्याप्रमाणे चादर ओढून घेऊन झोपला.

"आई गेली का?" पांघरुणातूनच त्याने विचारले.

"हो एवढ्यातच." पलंगावर टेकत वीणा म्हणाली. "पण मी तुम्हांला काय विचारते— लक्ष आहे का?"

"विशेष काही नाही. थोडं डोकं दुखत आहे. आई आज सध्याकाळीच परत येणार असेल— ?"

"ते मी कशी सांगू?"

"का? तुला ठाऊक नाही?"

"अं हं!

"मग काय मला ठाऊक आहे?"

"असेलही!"

"छान! काम करायला गेली आहे तुझं आणि मला विचारतेस?"

वीणा थोडीशी लाजली, ओशाळली आणि तिने जमिनीकडे पाहिले. आणि केदारला कपाळाच्या शिरा झणाणून गेल्याचा भास झाला.

"बर—शिकविता ना मला?" दप्तर उघडीत वीणा म्हणाली. "शाळेची वेळ होत आली. विद्या तर दुपारपर्यंत उठायचंनाव ही घेत नाही. मी आपली सकाळीच उठले झाडलोट केली. वरची अंथरुणं खाली आणली. खायला केलं. छोटयाला न्हाऊं घातलं. आणि आता कुठे मोकळी होते आहे. तरी अजून वेणी व्हायचीच आहे माझी. बर—काल राहिलेली जॉमेट्रीची गणितं पूर्ण करूं या! अरे, पण विसरलेच! काल केलेलं ट्रान्सलेशन तुम्हांला दाखवायचं तसच राहून गेल!" असे म्हणत तिने विसकटलेल्या केसांवरून हात फिरविला.

केदारने गणित सांगण्यास सुरुवात केली होती. पण ते सागण्याकडे त्याचे लक्ष नव्हते. त्याने दीर्घ उसासा टाकला. आळस देऊन अंग पुन्हा एकदा मोकळे केले. वीणा त्याच्याकडे पहात होती. पाहता पाहता तिने केदारच्या शून्य दृष्टीशी आपली दृष्टी मिळविली आणि म्हटले, "खरंच, बरं वाटत नाही का? पण सागत का नाही तुम्ही?"

"कुठ काय—काहीसुद्धा नाही." केदारने स्वत.ला सावरून घेत म्हटले.

"नका सागू! आणि मला तरी काय करायचय् म्हणा विचारून?" वीणाच्या आवाजात अधिकाराचा सूर जाणवत होता. केदारला गप्प पाहून ती अधिकच बुचकळ्यात पडली. तिने पुन्हा आपल्या प्रश्नाला हात घातला. आणि एवढे करूनही केदारच्या तोंडातून शब्द निघत नाही, हे पाहून हातातली पुस्तके जमिनीवर आदळली. "सांगायचं नाही का?" वीणाचा कठ दाटून आला होता!

केदारने हातातले गणिताचे पुस्तक बाजूला ठेवून दिले. "वीणा, तू अद्याप मला परकाच समजतेस ना?"

"मी?" वीणा दचकली. "अ··· अ·· म्हणजे तुम्ही काय विचारता हे?"

"होय!—"

"अशानं मी नाही बोलणार कधी तुमच्याशी—" असे म्हणून वीणा उठून उभी राहिली. खाली वाकून जमिनीवर पडलेली पुस्तके ती उचलू लागली. "वीणा, तू नक्कीच मला परका समजतेस. कारण मी विचारलेल्या साध्या गोष्टीचही तू उत्तर देत नाहीस."

"कशाच उत्तर हव आहे तुम्हाला?" फिरून वीणा स्वत.च्या जागेवर बसत म्हणाली.

"मी विचारीत होतो, आई केव्हा येणार आहे?"

"म्हणत होती उद्या सकाळी साडे दहाच्या गाडीनं येईन. रात्रीची गाडी दहा वाजता येते. त्यावेळी अंधार असतो."

तिने क्षणभर उसंत घेतली. आणि त्याच्याकडे पहात विचारले, "झालं समाधान? आता तरी नाही ना रागावणार?"

"हे तर मलाही ठाऊक होतं! रात्रीची गाडी वेळी अवेळी पोहोचते; यात तू नवीन काय सागितलंस?"

"मग?—" पुन्हा ती बुचकळ्यात पडली. "तुम्हांला काय हवं आहे, नीट सागा ना!"

"ती गुजरखानला कशाला गेली?" याही खेपेस त्याला पहिल्याप्रमाणेच डोक्यातल्या शिरातून हालचाल झाल्याप्रमाणे वाटले. वीणाची मान पुन्हा जमिनीकडे झुकली होती. ते पाहून केदारने पुन्हा तिला छेडले, "म्हणून तर मी म्हणत होतो की तू मला परका समजतेस!"

"चला, काहीसुद्धा कळत नाही तुम्हाला! सगळं माहीत असून तुम्ही उलट मला विचारता? माझी परीक्षा का घ्यायची आहे तुम्हांला?"

दोन तीन मिनिटे खोलीत शांतता पसरली. दोघाची नजर एकमेकांवर खिळून राहिली होती.

काहीसे घाबरून, काहीसे बुचकळ्यात पडून, काहीसे केविलवाणे बनून वीणाने केदारचा हात पकडला. "आज तोंडातून असं कां मलतं सलतं काढता आहात? आपले डोळे असे का दिसताहेत?"

"असे म्हणजे कसे?"

"कोण जाणे—मला भीती वाटते!"

केदारने स्वत लाच विचारण्यास सुरुवात केली 'खरंच का आपल्या डोळ्यामुळे वीणाला असा भास झाला असेल?' आणि तो झटकन् उठून उभा राहिला. खोलीतल्या खोलीत फऱ्या मारीत वीणाला म्हणू लागला, "वीणा, डोक अस काही ठणकत आहे की विचारू नको!— आपण शिकवणी संध्याकाळी घ्यायची का?" एवढे विचारून तो थांबला.

वीणा उठलीच. "तुम्ही आंघोळ करून घ्या. मी विद्याच्या हाती चहा पाठवून देते. चहा घेतला म्हणजे हुषारी वाटेल. आणि खरंच, आज प्रकृती ठीक नसेल तर आजच्या दिवस कामावर नाही गेल तर? वसतावरोबर दुकानावर निरोप पाठविला म्हणजे झालं?"

"नको. घरी राहण्याइतकं काही झाल नाही मला. पण न विसरता तेवढा चहा पाठवून दे." असे म्हणून तो आंघोळीला गेला. वीणाने

पुस्तके गोळा केली, आणि बाहेर पडली.

आघोळ करून आल्यावर केदारने आपला चेहरा आरशात पाहिला मात्र. त्याची त्यालाज भीती वाटली. "आपण कोणा मृताचा चेहरा तर पहात नाही ना ?" झट्दिशी तो आरशापासून बाजूला झाला. आणि झटपट अंगात कपडे घालून बाहेर पडला.

दुकानावर पोहोचल्यावर त्याने विचार केला, की स्वत ला कामात रमवून घेतले तर मनाला तेवढा विसावा मिळेल. पण जसजसा वेळ जाऊ लागला तसतशी त्याच्या मनाची व्यग्रता वाढत गेली.

केदारने घड्याळ दुरुस्त करायला घेतले. एक घड्याळ उघडून त्याची साफसूफ केली. पण त्याचे भाग पूर्ववत बसविण्यापूर्वीच त्याच्या मनाचे पैलू विखरण्यास सुरुवात झाली. एका दृष्टीने त्याने स्वतःची परीक्षाच घेण्यास सुरुवात केली होती. 'मी पापी नाही का ?...... पापी आणि शिवाय विश्वासघातकी......स्वार्थी आणि विश्वासघातकी......? ज्या स्त्रीला मी मातेसमान मानले तिची मुलगी माझ्या बहिणीशिवाय आणखी कोण होऊ शकेल ? ह्या घरात मी चोर बनून तर शिरलो नाही ?– डाका घालण्यासाठी ? लुटण्यासाठी ? एखाद्याचे जीवनाची राखरांगोळी करण्यासाठी ? एखाद्याचा अधिकार हिरावून घेण्यासाठी......?

'वीणा'– इतक्या जलदीने ती माझ्या जीवनात का सामावू लागली आहे ? मी तिचा अभिलाषी आहे ?......माझे तिच्यावर प्रेम आहे ?......पण......पण ते प्रेम माझ्या जीवनावर कसला आघात करते आहे ? प्रेमात आग पण असते का ? जर नसेल तर वीणाची आठवण माझ्या रोमरोमात कसलीशी आग..... कसलासा भडका..... कसलेसे वेडेपण..... हे का ? हा प्रेमाचा का परिणाम असेल ? मग तर प्रेम माणसाला झटकन गिळून टाकीत असले पाहिजे. ओफ् ! कोणी तरी सोडवा मला ह्या वावटळीतून...... ह्यालाच जर सर्वजण प्रेम म्हणत असतील तर ते मला मट्कन् गिळून टाकील. पण काहीजण म्हणतात की प्रेम परमात्मा आहे. मग परमेश्वर का कोणाला स्वाहा करतो ? पण परमेश्वर जिवंत आहे का ? जिथे परमेश्वर असेल त्या ठिकाणी भाजल्याप्रमाणे काळे चट्टे पडत असतील का ? नाही .....नाही. हे कसे शक्य आहे ? एक तर प्रेम परमेश्वरी नसावे. आणि खरोखरीच प्रेम जर परमेश्वराचा अवतार असेल, तर मी ज्याला परमेश्वर म्हणतो आहे ते वास्तविक प्रेम नसून आणखीन् काही निराळी वस्तू असावी...' अशा प्रकारचे विचार करणे चालू असता नकळत केदारच्या अंतःकरणात वाऱ्याच्या छोट्या छोट्या लहरीप्रमाणे एका निराळ्याच प्रकारचे भाव निर्माण होत होते, जे डोळ्याच्या पापण्यांपर्यंत धाव घेऊन भयानक वादळाच्या स्वरूपात परावर्तित होत होते; ज्याच्या प्रभावाने केदारच्या मनातले वरील विचार छिन्नभिन्न होऊन आकाशात इतस्ततः उधळल्याप्रमाणे दिसत होते; आणि तो एका अपरिचित शक्तीकडे ओढला जाऊन कोठच्या कोठे दूर फेकला जात होता.

हळूहळू स्वतःला विसरून केदार अशा ठिकाणी येऊन पोहोचला, जेथे त्याला स्वतःच्या अस्तित्वाचा मागमूस लागत नव्हता. स्वत ला तो सावरून घेत होता. पण भीती त्याला भेडसावीत होती. एखाद्या पिसाळलेल्या कुत्र्याप्रमाणे त्याची अवस्था झाली होती. त्याने कित्येक वेळा स्वत.ला सावरून घेण्याचा प्रयत्न केला. पण ते होऊ शकले नाही. कारण तो अशा ठिकाणी पोहोचला होता, तेथून त्याला परतणे अशक्य होऊन बसले होते.. कित्येक तास त्याने ह्याच दशेत काढले. त्याने घड्याळाचे सर्व सुटे भाग एकत्र केले आणि प्रकृती ठीक नसल्याचा मालकाजवळ बहाणा करून तो घरी परतला. त्याची प्रकृती खरोखरच बिघडली आहे का, हे विचारण्याची मालकाला आवश्यकता वाटली नाही. कारण केदारचा चेहरा आणि एकदर अवस्थाच त्या गोष्टीचा पुरावा देत होती.

गल्लीजवळ येऊन घराच्या वळणावर वळताना त्याने पुन्हा एकदा स्वत ला पडताळून पाहिले. डोक्यापासून पायापर्यंत त्याच्या शरिराचा भडका उडालेला होता ! चालताना जमिनीच्या ज्या भागावर तो पाय ठेवीत होता, तो भाग त्याच्या पायाच्या उष्णतेने धुमसत जात होता आणि 'वीणा आज घरात एकटीच आहे' या शिवाय अन्य विचार, तर्क आणि भावना त्याच्या डोक्यात–मनात नव्हती.

तो आता घराच्या दरवाज्यासमोर उभा होता. सकाळी जाते वेळी खोलीचे दार उघडे सोडून गेला होता, ते आता बंद दिसत होते. आणि त्याच क्षणी त्याची पावले पुढच्या दाराकडे वळली. वीणाच्या दारासमोर तो थबला !

दारासमोर झाडाखाली विद्या आपल्या मैत्रिणीना गोळा करून खेळात रमली होती. केदारला पाहताच ती खेळ सोडून त्याच्याकडे धावत गेली, आणि म्हणाली, "भय्या, सकाळी चहा न घेताच निघून गेलात आणि तेही दार उघडं टाकूनच–?"

पण केदारने तिच्या बोलण्याकडे लक्ष दिले नाही क्षीण झालेल्या आवाजात तो तिला विचारीत होता–

"वीणा कुठ आहे ?"

"असेल स्वैपाकघरात."

"काय करते आहे ?"

"भाडी घाशीत असेल. चला जेवायला."

"नको–मला भूक नाही."

विद्या पुन्हा खेळायला निघून गेली.

–आणि इकडे पुन्हा केदारच्या डोक्यात विचाराच्या तारा छेडण्यास सुरुवात झाली. '–मी इकडे कुठे निघालो आहे ?' हा विचार मनात येताच त्याच्या मनात केव्हाचे दबा धरून बसलेले तर्क आणि वितर्क याचा टणत्कार पुन्हा जोराने घुमला; आणि गुंजन करीत राहिला. '–मी कोणाकडे बरे निघालो आहे– कशासाठी निघालो आहे– कोणत्या कामासाठी निघालो आहे–?' आणि लागलीच त्याच्या पावलानी माघार घेतली.

पुन्हा तो आपल्या दरवाजापाशी आला. आत प्रवेश करण्यापूर्वीच आपण तोल जाऊन पडणार या भीतीने त्याने झटकन् दरवाजा उघडला. या वेळेस त्याच्या डोक्याची भिंगरी बनली होती आणि डोळ्यापुढे कभिन्न अंधार पसरला होता !

टेबलावर एक चहादाणी आणी एक फुलपात्र पडलेले होते. त्याने चहादाणीतला थडगार चहा फुलपात्रात ओतला आणि गट्कन् पिऊन टाकला. एवढे झाल्यावर त्याने शरीर खाटेवर झोकून दिले. पायातले बूट काढण्याचेही त्याला भान राहिले नव्हते.

खाटेवर पडताच तो अचेतन झाला. बेशुद्धी किंवा अशाच प्रकारच्या अवस्थेने त्याला झपाटले. आणि काही वेळ तो स्वत.ला,

स्वत:च्या अवस्थेला विसरून गेला. पण त्याची ती दशा फार काळ टिकली नाही. कारण थोड्याच वेळाने त्याला समजून आले, की मन आणि मस्तक आपापल्या जागेवरून ढळले आहेत !

पाप आणि पुण्य, धर्म आणि अधर्म, शांती आणि अशांती याचा ज्या ठिकाणी संगम होतो, त्या तीर्थक्षेत्रावर केदार आता येऊन पोहोचला होता. दोन्ही किनाऱ्यांवर पाय रोवून उभा असताना हवेची हलकीशी झुळुक त्याला डोलकाठीप्रमाणे कधी इकडे तर कधी तिकडे हेलकावे देत होती !

सत्य आणि असत्य, दोघांचे मार्ग एकमेकांपासून भिन्न असतात. दोन्ही मार्गांवर चालणारे वाटसरू आपापल्या मताप्रमाणे अखंड चालत असतात. त्याचे जेव्हा एक पाऊल सत्याकडे आणि दुसरे असत्याकडे ओढले जात असते, त्यावेळेस स्वत:ला चांगला किंवा वाईट संबोधणाऱ्या माणसाची काय अवस्था होत असेल —?

जेव्हा जेव्हा वीणाचा चेहरा केदारसमोर दिसू लागे, जेव्हा जेव्हा वीणाविषयीचे विचार त्याच्या डोक्यात घुमत आणि जेव्हा वीणाचा आवाज त्याच्या कानात गुंजारव करू लागे, त्या त्या वेळेस तो तितक्याच वेळा कधी अमृतकुंभात डुबत असे तर कधी विषकुंडात !

ज्यास आपण वेडेपणाही म्हणणार नाही अशा प्रकारच्या विचारांनी केदारच्या शरिराचा ताबा घेण्यास सुरुवात केली. केव्हा केव्हा तर तो त्यांच्या मादक रंगात इतका रमून जाई की त्याच्या अणूरेणूमध्ये विद्युल्लता संचार करू लागे. आणि कधी कधी तर तो आपल्याला अध:पतनाची–आपल्या भ्याडपणाची मूर्ती मानी. आणि त्याचे मन आक्रोश करून उठे, 'वीणाशिवाय मी जिवंत राहू शकणार नाही. तिची प्राप्तीच मला वाचवू शकेल !' या विचाराच्या भरीला आणखी एक विचारांची शृंखला येऊन भिडत होती; 'वीणाची आई ज्या कामासाठी गुजरखानला गेली आहे, त्यात तिला यश न येवो !' आणि तेथे येताच त्याच्या आघळ्या विचाराचा प्रवाह अचानक दुसऱ्या बाजूला वळे आणि विपरीत होई; 'पण वीणा आपल्याला भाऊ समजते' या विचाराने त्याच्या मनात विकलता उत्पन्न होई. आणि हे सर्व समोर येताच केदार संपूर्ण बदलून जाई. त्याच्या डोळ्यांत निराळेच भाव चमकू लागत. पुन्हा आपल्या कुकर्मी मनाच्या धिटाईपुढे केदार फिका पडून तळमळू लागे.

आपले वागणे वीणाच्या दृष्टीस पडताच ती आपल्याला क्षमा करील का ? हा एकच प्रश्न त्याच्या मनात तांडव माजवून धुडगुस घालीत होता. वीणाला हे समजले तर ती आपला धिक्कार करील का ?

केदारची ही अवस्था एखाद्या वेड्याच्या अवस्थेहून निराळी नव्हती. बाहेर कोणीतरी दार वाजवीत होते. वीज कडाडावी त्याप्रमाणे केदार ओरडला, "कोण आहे ?"

"मी......वीणा !"

ह्या आवाजाने केदारच्या हृदयात भयानक स्फोट झाला. तो ताड्कन उठला.

थांबून थांबून दोन तीन वेळा आवाज आला. केदार उठून दाराजवळ पोहोचला. सबंध खोली पेटून तिला एखाद्या भट्टीचे स्वरूप प्राप्त झाले होते. तो डोक्यापासून पायापर्यंत मूर्तिमंत वेडा बनला होता, जणू काही तो सगळ्या जगाला पायाखाली ठेचून चेंदामेंदा करू पाहात होता !

"उघडा ना दार !"

पाण्यात बुडालेल्या माणसाचा श्वास अडकून त्याची जगण्याचीही आशा नष्ट व्हावी, पण त्याला मृत्यू मात्र येऊ नये, अशी केदारची मन:स्थिती झाली होती. त्याने दिवसातले मिनिट आणि सेकंद ह्याच दशेत घालविले. पुन्हा दरवाजा वाजला. आणि पाठोपाठ हाक आली. "दार उघडा !" पण केदार गुपचूप पडून राहिला. वसंतचा आवाज त्याने ओळखला होता ! ती वीणा नव्हतीच !!

: ८ :

दिवस मावळला. आणि रात्रीने आपल्या काळ्या बुरख्याखाली सारे जग झाकून टाकले. जसजशी रात्र वाढू लागली तसतशी केदारच्या हृदयातली तळमळ वाढत होती. बाहेरच्या काळोखाप्रमाणे त्याचे मन विचारांच्या भोवऱ्यात गिरक्या घेऊ लागले. झंझावाती प्रवाहामध्ये तो वाहवत होता. शेवटी अशा ठिकाणी येऊन पोहोचला, जेथे बुद्धी आणि विचारांची मजल जाऊ शकत नाही. जेथे आंधळा वेग मनुष्याच्या हृदयात विकसणाऱ्या आशाआकांक्षांचा गळा घोटून बेहोश किंवा अर्धमेला करून टाकतो. त्या ठिकाणी मनुष्यत्व-पशुत्वाच्या सीमा एकमेकांना भिडतात, आपलेपणा-परकेपणा किंवा सत्य-असत्याचे ज्ञान त्या ठिकाणी अंतर्धान पावते––

अर्धी रात्र त्याने याच अवस्थेत घालविली. अखेर एकाएकी कसल्याशा विचाराने तो अंथरुणातून उठला. बाहेर आला, थोड्याच वेळात जिना चढून गच्चीवर येऊन पोहोचला. का आणि कशासाठी ? ह्या प्रश्नाचे उत्तर त्याला ठाऊक असूनही तो वेड पांघरीत होता. मध्यरात्रीच्या काळ्याकुट्ट अंधारात तो एकटाच फिरत होता. समोरच्या खिडकीवाटे बाहेर येणारा पातळसा प्रकाशकिरण त्या अंधारात अस्पष्ट रेखा ओढीत होता. फिरता फिरता त्याची नजर पन्नालालच्या घराकडे वळली, आणि स्थिरावली. आता गच्चीवर झोपलेल्या वीणाचे रेखाचित्र तो कल्पनेच्या सहाय्याने रेखाटू लागला. त्याचे शरीर कापत होते. छातीत भरलेल्या धडकीचे घणाच्या ठोक्यामध्ये रूपांतर झाले. त्याचे डोळे आग पाखडत होते. आणि 'वीणाची आई आज घरात नाही' याची जाणीव होताच तो ठेचाळला–पन्नालालच्या घराकडे वळला.

पन्नालालचे घर आणि केदार रहात असलेले घर एकमेकांना लागूनच होते. दोघांच्यामध्ये एक भिंत होती. केदारने उडी मारून ती भिंत ओलांडली. आता तो पन्नालालच्या गच्चीवर येऊन पोहोचला होता. त्याचे अंग-प्रत्यंग कापत होते.

समोरच त्याला दोन खाटा दिसल्या. एकीवर वीणा झोपलेली होती आणि दुसरीवर तिची दोन भावंडे. काही वेळ तो तिथेच खिळून उभा राहिला. प्रयत्न करूनही तो पुढे सरकू शकला नाही. त्याच्या मनाच्या गाभाऱ्यातून कोणी तरी ओरडून म्हणत होते, 'केदार ! हे तू काय चालविले आहेस ! इकडे कोणीकडे निघाला आहेस तू ?' तो लागलीच मागे सरकला. पण पुन्हा थबकला. विरोधात्मक शक्तीने त्याला खेचीत म्हटले, 'मूर्खा ! इतक्या जवळ येऊन माघार घेतोस ? वासनेचा असा विनाकारण बळी घेतोस ? हो पुढे !'

पुन्हा तो पुढे सरकला. गल्लीत कुत्रे भुंकल्याचा आवाज झाला. आपल्यामागे कोणी तरी उभे असून तो आपली हालचाल पाहतो

आहे, हलक्या पावलांनी आपला पाठलाग होतो आहे, असे त्याला वाटते.

भीतीने त्याने मागे वळून पाहिले. पण तेथे त्याला कोणीच आढळली नाही. ती त्याच्याच पायांची चाहूल होती. तो त्याच्याच श्वासोच्छ्वासाचा स्वर होता. आता उंच शिखरावरून गडगडत जाऊन खोल दरीत पडत असल्याप्रमाणे त्याला वाटू लागले. त्याने गप्पकन् डोळे मिटून घेतले. पण लागलीच हृदयात उमडणाऱ्या प्रेरणेने त्याला पुढे खेचला आणि एका दमात तो वीणाच्या खाटेकडे सरकला.

हलकी पावले टाकीत तो वीणाच्या उशाशेजारी येऊन उभा राहिला. केदार आता सर्वस्वी आगीच्या स्वाधीन झाला होता. शांतपणे झोपलेल्या वीणाच्या चेहऱ्यावर त्याची नजर स्थिरावली. तिचा एक हात छातीवर व दुसरा हात डोक्याजवळ होता. खाटेखाली लोंबणारी तिची वेणी फरशीवर लोळण घेत होती. शरिराभोवती अर्धवट गुंडाळली गेलेली 'मुंगिया' रंगाची साडी अंधारात काळसर दिसत होती. आणि त्या काळ्या आवरणात वीणाचा गोरापान चेहरा असा काही झगमग करीत होता, की जणू ढगांत गुरफटलेला चंद्रमाच !

नकळत आणि अजाणतेपणे केदार ज्या ठिकाणी वीणाच्या उशाशी उभा होता–तिथेच बसला ! आता त्याचा हात तिच्या केसांवरून फिरण्यास सुरुवात झाली होती–

पुन्हा त्याच्या अंतःकरणाच्या दुसऱ्या दालनातून आवाज निघाला –'केदार ! हे तू काय करतो आहेस ?' हा आवाज ऐकूनही तो जागचा हलला नाही–एखाद्या मुखस्तंभासारखा स्तब्ध राहिला.

–उलट तो हळू हळू पुढे सरकू लागला. आणि खाटेच्या दांडीच्या किनारीवर येऊन बसला. त्याची नजर वीणाच्या रेखीव चेहऱ्याचे पान करण्यास आतुर झाली होती. पुष्कळ वेळ तो त्याच अवस्थेत–श्वास रोखून वीणाकडे पहात होता. तेवढ्यात तिच्या चेहऱ्याची हालचाल झाली. एक छोटीशी पलट घेऊन तिने कूस बदलली. आता केदारकडे तिची पाठ होती–

पुन्हा तो उठला, आणि दुसऱ्या बाजूच्या खाटेच्या कडेवर येऊन बसला. त्याच्या साहसाने आता बरीच मजल मारली होती. तो वीणाला बिलगून बसला. पण एवढ्यानेही त्याचे समाधान झाले नाही, तेव्हा त्याने आपला थरथरणारा हात वीणाच्या खांद्यावर टेकला. आणि विजेचा झटका बसावा त्याप्रमाणे त्याने तो काढून घेतला. वीणाला समजले तर नसेल ? तिचा खांदा कंप पावत असल्याचा त्याला भास झाला. पण तो देखील त्याचा भ्रमच ठरला. कारण वीणाचा खांदा थरथरत नव्हता तर त्याच्याच हाताला कापरे सुटले होते–

वीणा फिरून एकदा हलली ! ह्या वेळेस तिचा हात–जो बगलेत होता–तो केदारच्या गुडघ्यावर येऊन पडला. त्यामुळे केदारचा तोल सुटला ! त्याच्या नसानसातल्या रक्ताच्या आगीचे लोळ मस्तकापर्यंत जाऊन भिडले होते !–

आणि नंतर त्याने हळू हळू आपला हात वीणाच्या हातावर ठेवून त्याने तिचा हात आपल्या हातात घेतला. दाबण्यास सुरुवात केली.

–वीणाच्या पापण्या फडफडल्या ! आणि तिने लागलीच डोळे उघडले– एक दोन वेळा उघड झापझाली. तोच केदार तिचा समोर बसलेला दिसला–!

ती ताड्कन् उद्गारली "तुम्ही !! "



वीणा – तारा जुळल्याच नाहीत !

## : ९ :

सकाळी केदारकडे जाऊन वीणाने जेव्हा त्याला कधी नव्हे अशा विपरीत अवस्थेत चादर ओढून झोपलेला पाहिला तेव्हा तिला वाटले, केदारची ही डोके दुखण्याची नेहमीचीच तक्रार आहे; त्याप्रमाणे आजही त्याचे डोके दुखत असावे. पण केदारचे ते बोलणे, शिकविण्यातला निरुत्साह आणि चेहऱ्यावरील चढउतार ह्यावरून तिला दाट संशय आला, की त्याच्या शरिराबरोबरच आज केदारच्या मनाला कसल्या तरी वेदना सतावीत असाव्यात. तिला वाटले, केदारने आपले मनोगत आपल्यापुढे उघडे करून दाखवावे; कोणतीही गोष्ट त्याने आपल्यापासून लपवून ठेवू नये. पण केदारने तिला ह्याच आशयाचे प्रश्न विचारण्यास सुरुवात केली, ज्यांचा रोख वीणाच्या वैवाहिक जीवनाकडे होता. त्यामुळे ती काहीशी लाजली. आणि तरीही ती हे ओळखू शकली नाही, की केदारने हे असले प्रश्न आपल्याला का विचारावेत ? बरे विचारता विचारता तो मध्येच का थांबावा ? ह्याचे तिला उत्तर हवे असूनही ती त्याला विचारू शकली नाही.

सकाळपासून दुपारपर्यंत वीणाचे मन केवळ दोन गोष्टींत गुंतून राहिले होते. एक केदारच्या आणि दुसरे सासुरवाडीच्या. तिची आई गुजरखानला ज्या कामासाठी गेली होती, ते तिला नुसते परिचितच नव्हते तर तिचे भावी जीवनाचे सुंदर स्वप्नही त्यामागे तिला भासमान होत होते !

'ते नकार तर देणार नाहीत ?' हा प्रश्न तिच्या मनात जसजसा उठे तसतसे तिचे मन डळमळू लागे. पण–'त्यांनी नकार देण्याचे कारण नाही, कारण त्यांची मागणी पुरी करण्याचे काम केदारने

स्वत:वर घेतले आहे. आणि नवीन उत्साहाच्या आवेगात ती तरंगू लागे. चंद्राने उपस्थित केलेली कल्पित चित्रे तिच्या डोळ्यासमोर फिरू लागत.

'केदार इतके रुपये कोठून आणील?' ह्या प्रश्नाने मात्र तिला कोड्यात टाकले. 'पण ज्या अर्थी त्याने विश्वास दिला आहे, त्या अर्थी तो काही ना काही व्यवस्था करील.' असा विचार करून ती स्वत:ला शांत करून घेई. ह्याबरोबरच आपल्या उपकारकर्त्याच्या दयेत तिचे मन डुबून जाई.

दुपारच्या जेवणाची वेळ टळून गेली होती. पण केदार परतला नाही. तेव्हा मात्र वीणाच्या मनातला संशय बळावत गेला. 'त्याची प्रकृती तर अधिक बिघडली नसेल ना?' भावंडांना जेवायला घालून, उष्टी-खरकटी काढून ती खाटेवर जाऊन पडली. पण तिचे अधीर मन तिला गप्प पडू देईना. दोघा भावंडाना पाठवून तिने चौकशी केली. पण दर वेळेस दरवाजा बंद असल्याची वर्दी तिला मिळत गेली. अखेर ती स्वत: उठली, वसताला तिने बरोबर घेतले आणि ती केदारकडे गेली. दरवाजा आतून बंद असलेला पाहून तिने दारावर थाप मारली. नतर वसतानं हाका मारल्या. पण आतून उत्तर आले नाही. केदार तिच्याशी इतके अपमानास्पद वागेल असेल असे तिला स्वप्नातहि वाटले नव्हते.

दु:ख देणाऱ्या गोष्टीत सर्वांत अधिक असह्य होणारी गोष्ट कोणती कोणती असेल तर ती अपमान ही होय. आणि ते देखील जे हृदय प्रेमसागरात डुबत असेल त्या हृदयाचा अपमान!

सध्याकाळ झाली. नतर रात्र. वीणाने गच्चीवर जाऊन दोन खाटांवर दोन अंथरुणे टाकली. एकीवर भावडाना झोपविले आणि एकीवर स्वत: झोपली. पूर्वी अथरुणाला अग लागताच तिला झोप येत असे. पण आज झोपेने तिच्या पापण्याना देखील स्पर्श केला नव्हता. उन्हाळ्याचे दिवस होते. आणि आसमंत हवेवाचून कुंद झाले होते. तशा स्थितीत विचारानी तिच्या मनात आपले तळ बसविले नसते तरच नवल-'अशा उकाड्यात तो खोलीत कसा झोपला असेल? कदाचित्...कदाचित् असे तर झाले नसेल...?' असा अघोरी विचार येताच ती ताडकन् खाटेवरून उठे. तिचे पाय जिन्याकडे वळत. ती तशाही स्थितीत दोन चार पायऱ्या उतरून खाली येई; पण पुन्हा तोच विचार तिला माघारी खेचून आणी-'आपल्याला पाहून लोक काय म्हणतील-'रात्रीच्या ह्या काळ्याकुट्ट अधारात...!' आणि ती पुन्हा खाटेवर येऊन पडे. आकाशात लुकलुकणाऱ्या तारकावर दृष्टी रोखून वीणा पडली होती. तारकांच्या अस्पष्ट आणि खडबडीत मार्गावर ज्या दृष्टीचे शेवटचे टोक दूर जाऊन शेवटी तारकाच्या मेळाव्यात लुप्त होत होते; त्यावर ती विचार करू लागे, 'हे अगणित तारे कशा प्रकारे आकाशात एकत्र जमले आहेत? आणि ही लावरुंद सडक कोणत्या दिशेला निघाली आहे...?' त्याच वेळेस तिला आगगाडीची शिटी ऐकू आली. त्या आवाजाने तिच्या विचाराचा रोख बदलला. ह्यावेळेस आई कुठे असेल? कदाचित् त्याचेच घरी. पण छे! हे कसे शक्य आहे? अजून कशातच काही नाही. ती नक्कीच दुसऱ्या कोणाकडे तरी झोपली असणार. आपल्या आत्याची मुलेदेखील त्याच गावात राहतात, त्याचेकडे तर ती गेली नसेल? पण ती त्याचेकडे का गेली? दयेची भीक मागायला? तिच्या मुलीला त्यानी पदरात घ्यावी म्हणून विनंती करायला? हंऽ! पण काय जरूर लागून गेलीय् आपल्याला? इतका अपमान होऊन, प्रतिष्ठा गमावून, त्याना राजी केले तर त्यात एवढी बढाई ती कसली? काय लिहिले होते बरे त्यानी पत्रात-'आमचा मुलगा आताच लग्न करू इच्छित नाही?' ह्या बाबतीत आईने मला विचारायला पाहिजे होते. म्हणजे मग सांगितले असते तिला, असल्या अहकारी माणसाची मला पर्वा नाही. वाटल्यास मी आयुष्यभर कुमारी राहीन, पण...!

मध्येच तिचे डोळे फडफडले. तारकाची ती सडक आता पहिल्यापेक्षा बरीच मोकळी झाली होती. डोळे फडफडताच वीणाचे डोळ्यापुढून जणू काही काल्पनिक दुनिया नाहीशी झाली. तिने हातावरून आणि दडावरून अशी काही नजर फिरविली की जणू त्यावर तिला आता काही तरी कोरल्याचे दिसत होते. तिने स्वत:च्या डावी-उजवीकडे दृष्टी फिरविली. त्या अंधारातही केदारची खोली तिच्यापुढे मूर्तिमत साकार झाली.-खाटेवर चादरीत गुंडाळून पडलेला केदार!-त्याचे घामाने ओलेचिंब झालेले शरीर! विसरलेल्या गोष्टीची तिला एकदम आठवण झाली. '-अरे! तो अजून आतच आहे-अशा भयंकर उकाड्यात?' आणि ती उठून बसली. पण खाटेखाली उतरण्यापूर्वीच ती पुन्हा खाटेवर आडवी झाली. दूर कुठल्याशा घड्याळात बाराचे ठोके पडले. हृदयात पीळ पडावा त्याप्रमाणे तिला वाटू लागले. सकाळपासून आतापर्यंतचे सारे दृश्य पुन्हा एकदा तिच्यासमोरून सरकून गेले. तिने पुन्हा आकाशाकडे नजर फिरविली, पण तिची दृष्टी ह्यावेळेस तारकानी गजबजलेल्या आकाशात स्थिर होऊ शकली नाही; किंवा तारकांच्या त्या लावरुंद रस्त्यावरही केंद्रित होऊ शकली नाही. तारकाचे ते लुकलुकणे तिला भयप्रद वाटू लागले तिने दृष्टी फिरविली आणि हळू हळू तिच्या पापण्या जड होऊ लागल्या—

ज्या ठिकाणी जीवनाच्या साऱ्या आशाआकांक्षा सजीव रूप धारण करून एका नव-तारुण्याच्या स्वरूपात प्रगट होतात, त्या ठिकाणी आता वीणाचा आत्मा येऊन पोहोचला होता. कौमार्याच्या सीमेवर वर्तमान होणारी दुनिया ती हीच असावी! जिला 'पहिली रात्र' ह्या नावाने ओळखले जाते! वीणाच्या हातात हस्तीदंती चुडा चमकत होता नाकात शिकारपुरी नथ होती. आणि हातावर आणि हाताच्या तळव्यावर मेंदीचा गडद रग रंगलेला होता. तिच्यासमोर निरनिराळ्या मिठायाची आणि पक्वान्नाची परात भरलेली होती. त्यातले आवडणारे पदार्थ ती मिटक्या मारून खात होती. आणि स्वत:बरोबरच शेजारी बसलेल्या कोणाला तरी खाऊ घालीत होती. नतर वीणाने स्वत:ला फळानी लगडलेल्या बागेत पाहिले. त्या ठिकाणी एक विहीर पण होती. तिचे चांदीप्रमाणे चमचम चमकणारे फेसाळत वाहणारे पाणी फुलाच्या झाडाची तृप्ती करीत होते. झाडाखाली वीणा कोणा एका व्यक्तीबरोबर झोपाळ्यावर बसली होती. जसजसे झोके उच जात, तसतसा तिचा जोडीदार फांदीवरून पिकलेली फळे तोडतोडून तिच्या पुढ्यात टाकीत होता. आणि वीणा मोठ्या आनंदाने त्यांचा आस्वाद घेत होती.

वीणाचा जोडीदार तिला खेटून बसला होता. तिच्या तोंडावर आलेला पदर मागे हटवीत तिच्या डोळ्यांना डोळे भिडवीत म्हणत होता. 'हा चद्र असाच ढगामध्ये लपून राहणार का?' ह्या प्रश्नाने वीणा लाजेने गोरीमोरी होऊन म्हणत होती. "इश्श! सोडा मला!

घरी आई वाट पहात असेल. अद्याप तिने काही खाल्ल नसेल. मलाही भूक लागली आहे–'

'जोपर्यंत तू हा पदर काढणार नाहीस तोपर्यंत मी जाऊ देणार नाही तुला–' असे म्हणत त्या जोडीदाराने वीणाचा हात पकडला. आणि त्या ओढाताणीतच वीणाचे डोळे उघडले. एवढा वेळ तिने जे पाहिले, जे अनुभविले, त्यातले आता काहीच उरले नव्हते. पण एवढे खरे की तिचा हात कोणाच्या तरी हातात होता. तिने शेजारी बसलेल्या व्यक्तीकडे पाहिले, विजेचा धक्का बसावा त्याप्रमाणे तिला विस्मयाचा धक्का बसला. कारण तो केदार होता !

ती ओरडली—"तुम्ही !"

तापलेल्या शरीरावर थडगार पाणी कोणी तरी शिंपडावे त्याप्रमाणे केदारला वाटले. त्याची धिटाई त्याच्या लक्षात आली. वीणा डोळे मोठे करून त्याच्याकडे पहात होती. केदार मात्र स्वत:ला लपविण्याचा प्रयत्न करीत उठून उभा राहिला. येथून निघून जावे का ? पण वीणाला काय वाटेल ?–तो तेथेच थावला.

आता वीणा उठून उभी राहिली. ती घाबरली होती. तिने विचारले, "काय झालं, तुमची प्रकृती ठीक आहे ना ? पण तुम्ही इथं कसे ?"

"मला भोवळ येत आहे, वीणा !" दोन्ही हातानी मस्तक दाबून धरीत काहीशा घाबरलेल्या आवाजात केदार पुटपुटला. त्याची नजर जमिनीकडे लागलेली होती.

"भोवळ ?" त्याच्याहीपेक्षा वीणा अधिक घाबरली. म्हणाली, "चला मी तुम्हाला तुमच्या खोलीत नेऊन सोडते." तिने केदारच्या कमरेभोवती हात घातला आणि दोघेही एकमेकाचा आधार घेत पायऱ्या उतरू लागले.

"हं. झोपा पाहू !" खोलीत आल्यावर त्याला खाटेवर बसवीत वीणा म्हणाली. तिने बटन दाबून दिवा लावला.

"अं-हऽ–" पूर्वीप्रमाणेच त्याने डोके दाबून धरले होते. वीणाने आपल्या खाद्याचा आधार देऊन त्याला झोपविले आणि त्याच्याजवळ बसून ती त्याचे पाय दाबू लागली. केदारला घाम सुटत असलेला पाहून ती घाबरली. खाटेवरून उठून एखाद्या भ्रमिष्टासारखी खोलीतल्या खोलीत फेऱ्या मारू लागली. तिला काय हवे होते–ती काय हुडकीत होती–? ?

वीणा फीरफीर फिरली. आणि पुन्हा केदारच्या उशाजवळ येऊन बसली. तिने भीतभीतच केदारकडे पाहिले. केदारचा श्वासोच्छ्वास जोरात चालला होता. त्याची छाती भात्याप्रमाणे वरखाली होत होती. त्याचे डोळे बद होते आणि ओठ काहीसे उघडे. एका हाताने पंख्याचा वारा घालीत त्याला आराम देण्याचा ती प्रयत्न करीत होती. आणि तिचा दुसरा हात त्याच्या अगावरून मस्तकावरून फिरत होता.

"कस वाटत आहे ?" ? पुन्हापुन्हा वीणा त्याला विचारीत होती. पण केदारच्या तोडातून चकार शब्द निघत नव्हता. त्यामुळे तर ती अधिकच घाबरली. ती त्याच्या तोंडावरून, डोक्यावरून, अगावरून हात फिरवीत घाम पुसून काढीत होती.

काही वेळ असाच निघून गेला. नंतर केदारने डोळे उघडले. वीणा त्याचे हात, पाय, खादे आणि कबर पुन्हा पुन्हा दाबीत होती.

वीणाने त्याचे दोन्ही खांदे हलवीत म्हटले, "तुम्ही असे का पाहाताय–बोलत कसे नाहीत तुम्ही ?"

"काय बोलू, वीणा !".. त्याच्या ओठातून काहीसे असेच शब्द बाहेर पडले. आणि तिचा हात हातात घेऊन स्वत:च्या कपाळावर दाबून धरला.

वीणाने काहीसे दचकून विचारले, "काय म्हणजे काय ?"

केदारला गप्प पाहून आणि त्याला बोलण्यास भाग पाडल्यामुळे तो इतकेच बोलला, "वीणा, देवाशपथ काही सुद्धा विचारू नकोस यावेळेस मला."

"काही विचारू नको ? तुम्ही काय बडबडताय हे ? माझ्यावर तुमचा काहीच का अधिकार नाही ?"

"नाही !"

"का ?"

"मी पापी आहे म्हणून !"

"पापी ?"

"वीणा, तुला खोटं वाटेल पण खरंच ग मी पापी आहे !"

"जा, अशान मी नाही बोलणार –"

"पापी आणि विश्वासघातकी !"

"आता तुम्ही गप्प बसायला काय घेणार ?"

"तूच तर गप्प बसू देत नाहीस !"

"असलं काही बोलायच असेल तर अजिबात बोलू नका, तुम्हाला एकदम फीट आल्यासारखं झाल.

"वीणा, मला फीटबीट काही आली नव्हती."

"फीट आली नव्हती ?"

"नव्हती–"

"मग–मघाशी ऽ तुम्ही–?"

"ढोंग केल मी वीणा !"

"का ?"

"अ ऽ–"

"बोला ना –"

केदार एकदम गप्प झाला.

"सागायचं नसेल तर राहिल."

"वीणा, नको–"

"मग तर मी विचारणारच."

केदारवर पुन्हा आकाश कोसळले ! त्याचे हातपाय थड पडत चालले होते. "सागू तर नका, माझ्या गळयाची शपथ आहे तुम्हाला !"

"वीणा, हवे तर हात जोडतो पण—"

"तुम्ही असं बोलून मला अधिकच घाबरवता–"

"मग तू विचारणारच ?"

"हो–"

"ऐकशील तर माझी घृणा करू लागशील."

ह्या वाक्याने मात्र वीणा विचारात पडली. 'त्यानी सागितल्याने मी त्याची घृणा करू लागेन अशी कोणती गोष्ट त्यांच्यापाशी आहे ? आपल काही चुकलं तर नाही ? पण...पण...हे तरी कस शक्य आहे ?' आणि ती दृढतेने म्हणाली, "हा विचारच प्रथम काढून टाका पाहू मनातून !"

" वीणा ! " केदारने मन घट्ट केले. " ह्या गोष्टीचा संबंध केवळ माझ्याशीच असता तर ती गोष्ट मी अगदी नि.सकोचपणे सांगितली असती. "

" तर मग तिचा आणखी कोणाशी संबंध आहे ? "

" हो. "

" कोणाशी ? "

" तुझ्याशी ! " असे म्हणताच केदारचे डोळे पुन्हा जमिनीकडे झुकले. थंड पडलेल्या केदारच्या शरिरात उष्णता यावी याकरिता त्याचे पाय दाबणारे वीणाचे हात एकाएकी थांबले. पण क्षणभरच. ती म्हणाली, " काही हरकत नाही. तुम्ही सांगाच ! " पण असे म्हणताना वीणाची जीभ काहीशी थरथरली.

" वीणा ! मला ठाऊक नव्हतं की तू इतक्या लवकर माझ्या आयुष्याचा ताबा घेशील ! आणि माझ्या शांतीचा शेवट करशील. वीणा मला तू हवीस......"

वीणाचे डोळे निश्चल झाले होते. तिची नजर केदारच्या चेहऱ्यावर केंद्रित झाली होती. तिचे जे हात केदारचे पाय दाबीत होते ते त्याच्या शरिरापासून आपोआप बाजूला झाले.

" काय म्हणालात तुम्ही ? " वीणाने उच्चारलेले हे छोटेसे वाक्य ऐकताच भीतीने केदार कापू लागला. आत ओढल्या जाणाऱ्या जिभेची काहीशी हालचाल करीत केदारच्या तोंडून शब्द बाहेर पडले, "वीणा ! म्हणूनच मी तुला म्हणत होतो, की तू विचारू नकोस. पण तू आग्रहच धरलास. माझा नाइलाज झाला. पण आज वीणा, मला तुझ्या प्रेमानं अशा ठिकाणी नेऊन सोडलं आहे, की त्या ठिकाणापासून मला दोन गोष्टी सोडवून आणू शकतात. "

" काय......कोणत्या...?" वीणाच्या तोंडून अगदी नकळत शब्द बाहेर पडले.

" एक तर मृत्यू......"

" नाही तर–? " वीणा घाबरली.

"—नाही तर तू ! "

" मी ऽऽ ! " ती झटकन दूर झाली.

" वीणा ! " तिचा हात धरीत केदार म्हणाला, " तू मनात आणलंस तर अजूनही मला वाचवू शकतेस. "

वीणाचे हृदय धडकू लागले. केदारने तिला पुनः बसण्यास सांगितले. ती खाटेवर अंग चोरून बसली. तिला वाटले, आपल्यासाठी क्षणाक्षणाला केदारचा कायापालट होतो आहे. आपल्या घरात एक परका माणूस बसलेला आहे, या विचाराने तिच्या मनात अनेक शंका-कुशंकाचे जाळे पसरले होते.

" बोल, वीणा ! " हेच वाक्य केदारने चार वेळा उच्चारले असेल. पण वीणा बोलली नाही. बोलावेसे वाटत असूनही ती बोलली नाही. त्याच्या बोलण्यावर तिचा विश्वास बसत नव्हता. अनेक प्रकारे केदारने तिची मनधरणी केल्यानंतर ती म्हणाली, " तुम्ही हे काय म्हणता, मला अजिबात समजत नाही......वहीण–भाऊ का कधी......! " आणि ती पुढे बोलू शकली नाही. पुन्हा ती उठून उभी राहिली.

अखेर केदार उठून चालू लागला. तो दरवाजापर्यंतही गेला नव्हता तोच वीणाने मागून जाऊन त्याच्या शर्टची बाही पकडली. केदारने वळून पाहिले. वीणाच्या डोळ्यांतून अश्रूंची सरिता वाहत होती.

वीणाच्या मनात जे तुच्छ भाव निर्माण झाले होते, त्याने सहानुभूतीने पुन्हा आपला अधिकार जमविला. ती नखापासून डोक्यापर्यंत सहानुभूतीने भारून गेली. अखेर ती म्हणाली, " तुम्हाला काय हवं आहे ?"

" अजून तुला समजलं नाही, वीणा ! "

" नाही—"

" वीणा ! माझ्याकडे पहा. माझ्या आईकडून मला पोटभर प्रेम मिळू शकलं नाही. तुझ्या आईनं त्या प्रेमाची पूर्ती केली. पण वीणा, तू जे प्रेम मला दिलस, त्या प्रेमानं माझ्या जीवनाची रूपरेखा अजिबात बदलून टाकली आहे ! माझ्या मनाशी मी एकच खूणगाठ बांधली होती. एक दिवस मी तुझ्या आईजवळ तुझी मागणी करणार होतो. माझी खात्री होती, की त्या माझी मागणी डावलणार नाहीत. पण तू आधीच दुसऱ्याची होऊन बसली आहेस, हे समजल्यावर मात्र मला ते धाडस करविल नाही. प्रयत्न करूनही मी माझं मन ताब्यात ठेवू शकलो नाही. वीणा, काय सांगू, कस सांगू तुला ? कालचा दिवस प्रलयाचा दिवस होता. काल मी माझ्या आत्म्यावरोवर द्वंद्व केल. तुला मनातून काढून टाकण्यासाठी अनेक प्रयत्नांची शिकस्त केली पण परिणाम व्हायचा तोच झाला—

" या रात्रीच्या वेळी मला तुझ्याजवळ कोणी खेचून आणलं, त्या ठिकाणी मी कसा आलो, मला माहीत नाही. पण एवढ नक्की–माझ्या नकळत मला तिथे कोणी तरी ओढून आणल. तू त्यावेळेस दुसऱ्याची अमानत आहेस, हे देखील मला ठाऊक आहे. आणि अस असूनही मी तुझ्यावर जुलूम करीत आहे—"

ह्या वेळेस वीणाच्या मनाची काय अवस्था झाली होती ? घृणा आणि तीवर सहानुभूतीचे प्राबल्य, आणि त्या सहानुभूतीत येऊन मिळाली दया ! वीणाचे मन पुन्हा स्नेहमय भावनेने उचंबळून आले. ती म्हणाली, " पण ह्याचा तुम्ही विचार केलात का ? ही गोष्ट अशक्य आहे; न तुमच्या हातात न माझ्या ! "

" तुझं लग्न ठरल आहे म्हणून तू असं म्हणतेस ? "

" हो ऽ ! "

" पण ते लोक तुझ्या आईचं म्हणणं ऐकतीलच अस कशावरून ? समज अजूनही त्यानी नकार दिला—? "

" तर—" पूर्ण विचार करून वीणा म्हणाली, " मग तुम्ही आईजवळ माझी मागणी करू शकता ! आणि समजा, त्यानी आईचं म्हणणं कबूल केल तर ? "

" त्यातूनही एक मार्ग आहे—! "

" मार्ग–कोणता ? " वीणा पुन्हा बुचकळ्यात पडली आणि तिने केदारकडे पाहिले. तो म्हणत होता,

" जे रुपये मी तुझ्या आईला द्यायचे कबूल केले होते, ते मी माझं घर विकून आणून देणार होतो. आता मी त्यांना सांगेन रुपयांची व्यवस्था झाली नाही. बस्स ! "

केदारच्या ह्या बोलण्याचा वीणाला मनापासून राग आला. ती म्हणाली, " ह्याचा अर्थ तुम्ही आईला धोका देणार–फसविणार ! "

" छे ! धोका नाही. ह्यात त्यांची उलट भलाईच आहे. तुझ्या लग्नात जे हजार दीड हजार रुपये खर्च होणार आहेत ते अनायासे वाचतील—"

" पण आमची अब्रू जाईल, आम्ही कोणाला तोंड दाखवू शकणार नाही, त्याचं काय ? "

' वीणा ! हे सर्व बोलाची कडी आणि बोलाचा भात आहे. समाज असा कोण लागून गेला आहे ? चार दिवस लोकांची तोंडं कुजबूज करतील आणि आपोआप बंद होतील. "

कोण जाणे, वीणाला ही गोष्ट पटली किंवा नाही ? पण तिच्या चेहऱ्यावरचा उडत चाललेला रंग पाहून केदार गोंधळला खरा !

दोघेही बराच वेळ शांत होते.

" वीणा ! " केदार दृढ स्वरात म्हणाला, " मी तुझ्यावर बळजबरी करतो आहे, असं तर नाही ना तुला म्हणायचं ? "

" नाही ! "

पण वीणाने त्याच्याकडे पाहिले नाही.

" म्हणजे मी तुला हवा आहे. माझी सोबत तुला हवी आहे–! "

वीणा एकदम थंडगार पडली !

तिचे मौन राहणे केदारला अर्ध्या कबुलीप्रमाणे वाटले. त्याने उठून तिच्या खांद्यावर हात ठेवले. " वीणा ! तू अशी का दिसतेस ? "

वीणाचे अंग शहारले आणि तिच्या डोळ्यांतून अश्रू ठिबकू लागले. केदारला वाटले, आपण एका निर्जीव वस्तूबरोबर–एका कचकडीच्या बाहुलीबरोबर तर खेळत नाही ? ज्यात न हालचाल आहे न रक्ताची उष्णता !

त्याच वेळेस कोणीतरी बाहेरून दरवाजा वाजविला. हाक मारली. " वीणा–दार उघड ! "

वीणाने डोळे पुसले. केदार सावरला होता. वीणाने दार उघडले, माया आत आली ! एवढ्या अपरात्री वीणा इथे सापडली कशी हा प्रश्न तिला पडला हे केदारने ओळखले. तो म्हणाला–" मला एकदम बरं नाहीसं झालं. शेवटी वीणाला बोलावलं; चहा करून घेतला ! "

मायाने विचारले–" तापबिप नाही ना ? "

केदार म्हणाला, " नाही; पण तुम्ही गेला होता त्या कामाचं काय झालं ? झालं ना काम ? "

" हो ! सोळा आणे......! " मायाने केदारचे मनोरथ पार ढासळून टाकले ! !

## : १० :

दूर कारखान्याचा भोंगा वाजला. केदारला आचर्य वाटले, ' अरे ! म्हणजे आपण सारी रात्र जागूनच काढली की काय ? आणि त्याबरोबरच काल सकाळपासून रात्री माया येईपर्यंतच्या सर्व दृश्याचा चलत्‌चित्रपट त्याच्या डोळ्यांसमोरून सरकून गेला.

तो वीणाची वाट पाहू लागला. हळूहळू प्रभातकिरणांची धुंदी अस्पष्ट झाली, आणि पिवळे जर्द किरण खिडकीतून दृष्टिपात करू लागले.

आता वीणाची वाट पाहणे त्याच्या आटोक्याबाहेर गेले. त्याला वाटले आपणच तिच्या घरी जावे. पण तिकडे जाण्यापूर्वी त्याला वीणाशी काही बोलावयाचे होते.

तो खोलीच्या बाहेर पडण्याच्या बेतात होता तोच समोरून येणारी विद्या त्याला दिसली. केदारजवळ येऊन तिने केदारचा हात पकडला. ती गडबडून गेली होती. " चला, आई बोलावते आहे तुम्हांला–"



केदार – पापातील पावित्र्य !

असे म्हणत ती त्याला ओढू लागली. हे ऐकताच केदारच्या हातापायांचा गळाठा झाला. रात्रीची घटना वीणाने आईला सांगितली तर नसेल ना ? पण तिच्या हालचालीवरून ती असे काही करील असे वाटत होते का ? छे ! तर मग इतक्या सकाळीच विद्याला आपल्याकडे पाठविण्याचे काय बरे कारण असावे ?

तो घरात आला. वीणा खाटेवर झोपलेली त्याला दिसली. माया पण तिच्या उशाशी बसली होती. ते दृश्य पाहून केदारचे मन चरकले. आणि मातीच्या ढेकळाप्रमाणे खचत गेले.

" वीणा ! " तिच्या शेजारी खाटेवर बसत केदारने तिला हाक मारली, " ताप का आला ? "

वीणाने उत्तर दिले नाही. माया केदारला म्हणत होती, " मलेरियाची साथ आहे–होईल बरी. चला, मला तुमच्याशी काही बोलायचं आहे. " आणि दोघेही पाठोपाठ व्हरांड्यात आले. झाडाला उभी केलेली खाट मायाने व्हरांड्यात टाकली आणि दोघे तीवर बसले.

" आता कशी आहे तब्येत ? " बसताच मायाने विचारले. 'ठीक आहे' असे म्हणत तोही बसला. पुढे म्हणाला, " तुम्ही एवढ्या घाईनं कशा आलात ? रात्री बराच त्रास झाला असेल गाडीत – ? "

ह्या वेळेस मायाच्या रोमरोमातून प्रसन्नता डोकावीत होती. ती हसून म्हणाली, " ज्या कामासाठी गेले होते त्याचे गेल्या गेल्या एक घाव तुकडे झाले. मग कशासाठी राहू ? आणि मुलंही इकडे एकटीच होती. गाडी जरा अपरात्री पोचते पण, म्हटलं आधी घर गाठावं..."

" काय बोलणं झालं ? " केदारने खिन्न स्वरात विचारले.

मायाने तितक्याच प्रसन्नतेने सांगण्यास सुरुवात केली. " गोष्टी त्या कसल्या होणार होत्या ? माझंच म्हणणं शेवटी खरं ठरलं ! त्यांना कोणी तरी सांगितलं होतं, की आपल्याजवळ खायलाही पैसे नाहीत. उघडी बोडकीच पोर आपण त्यांच्या स्वाधीन करणार होतो. एकीनं सांगितलं, दुसरीनं ऐकलं. वीणाची सासू ठाऊक नाही तुम्हांला, मेलेल्या माणसाच्या अंगावरचं कापड ओढून घेणारी बाई आहे. लागली घासाघीस करायला. मध्येच म्हणत होती, आमचा मुलगा आताच लग्न करू इच्छित नाही; तर मध्येच म्हणत होती, आम्हांला सध्या सवडच नाही. पण मी ओळखलं, काट्यानं काटा काढल्याशिवाय काम होणार नाही. मी तिला स्पष्ट सांगितलं,

आपल्या मुला-मुलीपेक्षा काही कोणती गोष्ट मोठी नसते. आणि मान-मरातब अब्रू त्यापेक्षा मोठी आहेत. तू अजिबात काळजी करू नकोस. मी कुठूनही पैसे आणीन आणि तुझं घर भरीन. जे काही होईल ते तियल्या तिथं होईल. "

" मग काय म्हणाली ती ? " केदारचे हातपाय गळत आले होते. पण चेहऱ्यावर कृत्रिम प्रसन्नतेचा साज चढवून मनात माजलेले वादळ लपविण्याचा तो प्रयत्न करू लागला.

"मग काय ? " इकडे मायाचा उत्साह शिगेला पोहोचला होता ! "प्रथम गप्प बसली. पण गप्प तरी किती वेळ बसणार ? म्हणाली, 'बरं बाई ! तुम्ही इतक्या दूर आलाच आहात तेव्हा कसही करून तडजोड करून टाकू. मुलालाही जस जमेल तस समजावून घेऊ. तस पाहुचल तर थोरामोठ्यांच्या मुली सागून येताहेत. पण तुमचा हिरमोड करण्याची आमची इच्छा नाही.' परमेश्वराला मी धन्यवाद दिले. इज्जत-अब्रूचा प्रश्न होता. त्यात ही पडली मुलीची बाब. मुलाचं लग्न शमर वेळा फिसकटल तरी बिघडत नाही. पण मुलीचं लग्न फिसकटण साधी बाब नाही. मी तर म्हणते, हे परमेश्वराचे उपकारच आहेत. चागलं होवो त्याचं. कबूल झाले. मानलच नसत तर काय काठीनं बडविणार होते मी त्यांना ? "

मायाला स्फुरण चढले होते तिचा उत्साह द्विगुणित झाला होता. केदारचे मात्र हुकार देण्यापलीकडे लक्ष नव्हते.

मायाने आपले बोलणे संपविले तेव्हा केदार एकदम भानावर आला. पण मायाने बोलणे नेमके कोठे थाबविले होते हे मात्र त्याला ठाऊक नव्हते. माया बराच वेळ गप्प होती. तिला वाटले, केदार आपल्याला नक्की काही तरी विचारणार. पण केदारचे ओठच काय, डोळेही हलले नाहीत. जणू काही तो झोपेतून जागा झाला होता. ज्या गोष्टीवर तो विचार करीत होता, ती अर्धवट मध्येच सोडून देऊन म्हणाला, "मग ही तर मोठ्या आनंदाची गोष्ट आहे—! "

मायाला केदारच्या तोडून असे काही तरी ऐकण्याची इच्छा होती, की सर्व काही जियल्या तिथे होईल. मी झट की पट रुपयाची व्यवस्था करतो, वगैरे वगैरे. पण तिची मनोकामना पूर्ण झाली नाही. तेव्हा तिनेच आपले बोलणे त्या बाजूला वळविले. " मला तर अस वाटत की वैशाखातच लग्न करावं. हवा पण चागली असते—फार थडी नाही फार ऊन नाही. आणि वीणाची सासू पण हेच म्हणत होती; वैशाखी मुहूर्त काढला तर बरं होईल. कारण कार्तिकात पुन्हा थडी सुरू होते. तेव्हा त्यानंतर करायचं म्हटलं तर पुढच्या वर्षावर जाईल. जेवढा लवकर डोक्यावरचा भार उतरेल तेवढ बर. नाही का ! कारण मध्येच कुणी तरी विघ्नसंतोषी उत्पन्न होईल. कुणी सागाव, जेवढे सज्जन तेवढेच दुर्जन ! "

"फार चांगली गोष्ट आहे. " एवढे बोलून केदार गप्प झाला. आणखी काही तरी ऐकण्याची मायाची खूप इच्छा होती. ती म्हणू लागली, " मला वाटतं जे काही गुंज-माशाचे सोन्या-चांदीचे दागिनं करावयाचे असतील त्यासाठी आतापासूनच तयारीला लागलं पाहिजे."

" होय—तेहि खरच. तस पाहिल तर दोनच महिने राहिले आहेत." केदारने कोरडाच होकार दिला.

मायाला काहीशी काळजी वाटत होती. तिने स्पष्ट केले, " पण इथे तर कर्तासवरता सर्व तूच आहेस. तू म्हणाला होतास ना, की...! "

आणि ती गप्प झाली. तिच्या मनात विचार आला, ह्याच्यावर काय माझा अधिकार आहे, की ह्याच्यावर मी एवढी बळजबरी करावी ? तिने लागलीच आपले बोलणे बदलले. " आज तू एक वीणाच्या वडिलाना पत्र लिही. तसच सरदारजीकडूनही निरोप पाठव. कसही करून त्यानी दोन महिन्यासाठी आलंच पाहिजे. कारण घरातली सर्वं कामं त्यानाच करावी लागतील. घरची परिस्थिती तर तुला ठाऊक आहेच. येऊन काही तरी तजवीज करावी लागेल तेव्हा कुठ सर्व कामं होतील; नाहीपेक्षा सरदारजीना सागून काही तरी व्यवस्था करावी लागेल. "

वाढणारे पाणी जेव्हा माणसाच्या गळ्यापर्यंत येऊन पोहोचते तेव्हा माणसाला हातपाय मारण्याची आपोआप बुद्धी सुचते. केदारला गप्प बसणे आता शक्य नव्हते. खाटेच्या लोबकळणाऱ्या दोरीशी चाळा करीत तो म्हणाला, " सरदारजीच्या मी काल कानावर घातल होत. पण...? " आणि ह्या वाक्याचा राहिलेला भाग पूर्ण करण्यासाठी त्याला पुन्हा थांबणे भाग पडले.

" बर मग — ? " माया काहीशी हताश होत म्हणाली. " काय उत्तर दिलं त्यांनी ? "

" ते तर म्हणत होते, की...! " पुन्हा केदारची जीभ अडली. परंतु मायाने जे ओळखायचे ते ओळखले. तिच्या चेहऱ्यावरची लाली पार कोमेजून गेली.

" मग तर मोठीच अडचण..." माया अमळ थाबून म्हणाली " बर, काही हरकत नाही. पण तू मात्र न विसरता वीणाच्या वडिलाना पत्र लिही. ते स्वत च येऊन काही ना काही बदोबस्त करतील. एवढ करूनही काही झाल नाही, तर घर गहाण ठेवू. परमेश्वरकृपेन जगलो वाचलो तर सोडवून घेऊ. पण तोडाशी आलेलं लग्न कसंही करून उरकलंच पाहिजे. "

केदारने वर पाहिले. त्याला वाटले, मायाची नजर आपला धिक्कार करीत आहे. ' केदार, तूच तर पैशाची हमी दिली होतीस ना ! ' आणि नेमके हेच शब्द मायाच्या कंठातून बाहेर निघू पहात होते.

आता मात्र बसून राहणे केदारला अशक्य झाले.

" बर, मी जातो तर — " असे म्हणून केदार उठला. उठता उठता त्याची नजर पुन्हा वीणाच्या खाटेकडे गेली. दोघाची चाललेली खलबते ऐकू येणार नाहीत इतकी काही वीणाची खाट दूर नव्हती. वीणा पूर्वीप्रमाणेच तोड फिरवून पडलेली होती.

केदार बाजारातून चालला होता. चालताना त्याला वाटत होते दुकानावर पोहोचताच आपल्या डोक्यावर शिंगे उगवतील किंवा चेहऱ्यात आणखी काही आश्चर्यकारक बदल घडून येईल, ज्यामुळे आपल्याला आपला मालक ओळखू शकणार नाही !

## : ११ :

एका रात्रीत आपले वय दहा-वीस वर्षांनी वाढल्याप्रमाणे वीणाला वाटू लागले.

सकाळी केदार आला आणि गेला. वीणाने त्याला पाहिले आणि तोड फिरविले. तो जेवढा वेळ बसला होता तेवढा वेळ ती विचारच करीत होती. ' हे का ? ' आणि तिचे मन उत्तर देत होते ' — की तो ' तो ' राहिला नाही, भाऊ राहिला नाही. भावाच्या जागी आणखी

कोणी बनला आहे, किंवा बनू पाहात आहे. केदार आणि मायामध्ये जी बोलणी झाली, ती वीणाने ऐकली. तिचे तोंड विरुद्ध दिशेला होते तरी तिचे कान त्याच्या बोलण्याकडे होते.

जेव्हा केदार उठून लागला तेव्हा वीणाने कूस बदलली आणि त्याच्याकडे पाहिले. पण बाहेर जाणाऱ्या केदारची दृष्टी तिच्यावर पडताच जणू काही दोन बाण तिच्या डोळ्यात आरपार घुसले. तिने लागलीच तोंड फिरविले. एकाही विचारावर ती स्थिर होऊ शकत नव्हती. अंगातला ताप वाढतच होता. ज्या गोष्टीचा ती विचार करीत होती, त्या तिला समोर दिसत होत्या. तिने स्वतःला प्रश्न केला, ' मी त्याच्याशी का बोलले नाही ? ...... त्याची आपल्याला एवढी भीती का वाटली ? तो कोणी परका का होता ? नाही – तो परका कसा ? ......

' मग भावाबरोबर अशा प्रकारचा का व्यवहार केला जातो ? '

' नाही. '

' मग मी असं का केलं ? '

' चूक झाली माझी – भयंकर चूक ! '

' मग त्या चुकीची काही क्षमा–याचना ? '

' हो – जेव्हा तो दुकानावरून येईल तेव्हा ...... ! '

' आणि त्याची रात्रीची वागणूक ? '

' वाईट, फार वाईट ! '

' मग ? '

' चुकतो एखादे वेळेस माणूस ......'

अशा प्रकारच्या प्रश्नोत्तराचा घणघणाट वीणाच्या मनात बराच वेळ चालला होता.

संध्याकाळपर्यंत वीणाचा ताप खाली आला.

केदार दुपारपर्यंत घरी आला नाही. आणि संध्याकाळी तर वीणाचा श्वास आत ओढ घेऊ लागला. ' काही अनर्थ तर करून घेतला नसेल ? ' मायाला भीती वाटत होती. वसंताने दुकानावरून इतकाच निरोप आणला, की केदार कसल्याशा जरूरीच्या कामासाठी गेला आहे.

रात्र सपली. केदार फिरकला नाही. दुसरा दिवस आणि तिसराही दिवस आला आणि निघून गेला. वीणाच्या हृदयाच्या चिंधड्या होऊ लागल्या – आणि मायाच्या शरीराचा थरकाप.

दुपारी स्वैंपाक-पाण्यातून मुक्त झाल्यावर माया वीणाजवळ येऊन बसली. " वीणा, तूच आता तुझ्या वडिलांना पत्र लिही. केदारचं येणं काही खरं नाही. काही केलं तरी हे मानलेलं नातं. रक्त ते रक्त आणि आणि पाणी ते पाणी."

" पण आई ! " उदास दृष्टी आईकडे वळवीत वीणाने म्हटले, " बाबांचा पत्ता मला माहीत नाही. "

माया चिडली. म्हणाली, " मूर्ख कुठली ! त्याचा पत्ताही असू नये तुझ्यापाशी ? "

" उद्या वसंताला दुकानावर पाठवून विचारू या. "

" पण खरं म्हणजे ते यायला हवेत ! "

माया चिडून म्हणाली. " घरी सांगून जाणं त्याचं काम नव्हतं का ? पण आपला तरी त्याच्यावर काय अधिकार आहे ? त्याची मर्जी. पण सकाळी न विसरता वसंताला दुकानावर पाठीव आणि पत्ता मागव. पत्रात सर्व गोष्टींचा खुलासा झाला पाहिजे."

कोणत्या गोष्टीचा आपल्याला खुलासा करावा लागेल, हे वीणाला ठाऊक असूनही तिने विचारले, " कोणत्या गोष्टी ? "

" तुझ्या लग्नाच्या, आणखी कोणत्या ? त्यात लिही, ते लग्न करायला तयार झाले आहेत. वैशाखात मुहूर्त धरण्याची त्यांची इच्छा आहे. पत्र पाहताच निघून या – काय ? "

वीणाने मान खाली घातली. तिच्या डोळ्यांत काय आहे, हे माया ओळखू शकली नाही.

" समजलं ना ? ...... नीट लक्षात ठेव. " माया इतकेच म्हणून थांबते न थांबते तोच बाहेरचा दरवाजा उघडला गेला आणि केदारने आत प्रवेश केला –

" केदार ! " माया आश्चर्याने म्हणाली – " कुठे गेला होतास इतके दिवस ? वाट पाहून डोळे थकून गेले बघ. "

" सरदारजींनी काही जरुरी कामासाठी पाठविलं होतं. "

असे म्हणत केदारने वीणाकडे पाहिले. पण लागलीच त्याची नजर जमिनीकडे झुकली.

" हे घ्या – " म्हणत केदारने मायाच्या हातावर शंभराच्या आठ नोटा ठेवल्या.

" हे काय – आणि कोठून आणलेस ? " मायाची जीभ मध्येच अडखळली.

" झाली व्यवस्था ! सरदारजींनी दिली ......"

" वास्तविक त्यांच्याकडून एवढी अपेक्षा नव्हती. "

" सरदारजी मोठे दयाळू आहेत ! "

" परमेश्वर त्याचं भलं करो ! " धन्यवाद मानीत माया म्हणाली.

" आता लग्नाच्या तयारीला लागलं पाहिजे. "

" हो. पण वीणाच्या वडिलांना पत्र लिहिलंस का ? " मायाने विचारले.

" हो. "

" काय लिहिलं होतंस ? "

" तेच, तुम्ही सांगितल्याप्रमाणे. "

" येण्याविषयी आर्जवून लिहिलंस ना ? "

" होय. "

" तुला काय वाटतं, केव्हापर्यंत येतील ते ? "

" पाहूया – "

" बरं. उद्या माझ्याबरोबर बाजारात चल. कापड आणि इतर सामान आणायला हवं. "

" ठीक आहे. आपली इच्छा. " असे म्हणून कपडे बदलण्यासाठी केदार आपल्या घरी गेला.

" वीणा ! " तो गेल्यावर मायाने वीणाला म्हटले, " जा, लिंबाचं सरबत करून केदारला देऊन ये. बिचारा उन्हाचा घरी आला आहे."

## : १२ :

वीणाच्या विवाहाची तयारी पूर्ण झाली होती. तिचे लग्न अगदीच तोंडाशी आले होते. *लग्नाचा दिवस जसजसा जवळ येत चालला* होता तसतसे वीणाचे मन आतल्या आत खचत चालले होते, काळ-जीत बुडत चालले होते,

केदार आता क्वचितच तिच्यापुढे येई. तिच्याशी बोलणेही बेताचेच

होई. ती त्याच्या नजरेस पडताच काही ना काही सबब काढून तो तेथून काढता पाय घेई. काम करून उरणारा वेळ तो खाटेवर एकांतात वसूनच काढी. वीणा समोर दिसताच स्वतःला लपविण्याचा प्रयत्न करी.

अशीच एक दिवस ती केदारच्या खोलीत आली तेव्हा तो अंगावर चादर ओढून घेऊन झोपलेला तिला दिसला. तिने त्याच्या अगावरची चादर जोराने ओढली. " दिवसेदिवस हे तुम्ही काय आरमिलं आहे? जेव्हा पहावं तेव्हा असं पडून राहता ... "

झट्दिशी केदार उठून वसला. त्याचा हात टेवलाकडे वळला. टेवलावर सिगरेट आणि काड्याची पेटी पडलेली होती. त्याचा हात टेवलावर पोहोचण्यापूर्वीच वीणाने तो पकडला. आणि ती चिडून म्हणाली, " ही घाणेरडी सवय कशाला लावून घेतली आहेत कोण जाणे ?"

केदार काहीच बोलला नाही.

" वरं, तुम्हाला होतंय् तरी काय ? "

" मला ? कुठं काय ?"

" खोटं वोलायला सांगा ! "

" खरच काहीसुद्धा होत नाही मला. "

" मग पूर्वीसारखे हसत बोलत नाही ते ? असं गप्पगप्प नाही राहायच काळजी पण कशाची करायची नाही. "

" वीणा ! " केदार म्हणाला, " माणूस आपल्या मर्जीप्रमाणे सर्व गोष्टी करू शकत नाही. "

केदारचे हे शब्द कसल्याशा असह्य यातनेने माखलेले होते. हा विषय आणखी वाढवणे वीणाला उचित वाटले नाही. ती म्हणाली, " वावाचं अजून कसं काहीच पत्र आल नाही ? "

केदारचे डोके आपोआप झुकले.

" पत्र लिहून किती दिवस झाले ? "

" आठ-दहा– "

" तुझे वावा खुशाल आहेत, काळजी करण्याचं काही एक कारण नाही. " केदारने हे वाक्य मोठ्या धीरगंभीर वृत्तीने म्हटलेले असले तरी वीणाने पाहिले, की केदारचे डोळे दुसरेच काहीतरी इगित सागत होते. '

" का ? कसला विचार चालला आहे एवढा ? "

" काही नाही ग. "

" सांगत का नाही ? " वीणाचे हृदय कापत होते. " मग तर नक्कीच वावाचं पत्र आल असलं पाहिजे. खरं सांगा, " वीणा त्याला खोदखोदून विचारू लागली.

" वीणा, तुझे वावा आता येऊ शकणार नाहीत– "

" म्हणजे, काय बोलता तुम्ही–? "

" त्याची तव्येत ठीक नाही– "

वीणा चपापली. " मग तुम्ही का सागितल नाहीत ? केव्हा आलं वावांच पत्र ? काय लिहिलं आहे त्यांनी त्यात ? "

" घावरण्यासारखं काही कारण नाही, वीणा. मामुली ताप आहे, एवढच. "

" ताप ! " वोट दाताखाली दावीत वीणा उद्गारली. " पाहू वर कुठं आहे पत्र ? "

" दुकानात. "

" केव्हा आलं आहे ? "

" परवा. "

" परवा ? आणि तुम्ही अजून गप्प ? "

" मी . . . मी विचार करीत होतो. आई विनाकारण काळजी करीत बसेल. "

वीणाच्या चेहऱ्यावरचा रंग बदलत होता. कसल्याशा अशुभ शकेने तिचे अग जड झाले.

आणि इकडे केदार पुन्हा पुन्हा विचार करीत होता, ' आपल्या तोडून हे काय निघून गेल ? पण एकदा तोंडातून सुटलेला शब्द परत घेता येत नाही.

" वीणा ! " केदार मनाची पक्कड घट्ट करीत होता.

" काय ? "

" एक गोष्ट सांगू ? "

" सांगा–" पुन्हा एकदा वीणाने शकित नजरेने केदारकडे पाहिले.

" पण वचन द्यावं लागेल. "

" देईन. "

" वावा आजारी असल्याचं आईला सागायचं नाही.

" का ? "

" तिच्यावर तुझ्या लग्नाची जवाबदारी आहे. आणि ही गोष्ट त्यांना समजली तर त्यांचे हातपाय चालणार नाहीत. "

" वर–नाही सांगणार ! " वीणाचा गळा सुकत चालला होता. त्यानंतर तिने वावाविषयी केदारला अनेक प्रश्न विचारले. आणि केदारने प्रत्येक प्रश्नाचे समाधानकारक उत्तर दिले.

वीणाने आपल्या मनावर एका नवीनच काळजीचे ओझे लादले आणि ती खोलीबाहेर पडली !

## : १३ :

शेवटी विवाहाचा दिवस उजाडला. पण वीणाचे वडील आले नाहीत. शेजारी–पाजारी आपापसात कुजबुजू लागले. ' काय माणूस आहे ? घरात मुलीचे लग्न काढले आहे. पण मुलीच्या वडिलाना त्याचे काही सुद्धा नाही. चार दिवसांसाठी येऊ शकत नाहीत म्हणजे काय ? मुबई लाव असली म्हणजे काही समुद्राच्या पलीकडे तर नाही ना ?'

केदारने सागितल्याप्रमाणे वीणाने आपले वडील आजारी असल्याचे तिने आईला सागितले नाही. केदारने तिच्याकडून जे काही वदवून घेतले होते, नेमके तेवढेच तिने आईला सागितले, ' त्याना फार काम आहे. प्रयत्न करून पाहतील. तेव्हा लग्नाला ते येतील किंवा नाही कोणास ठाऊक...?' वगैरे वगैरे. पण वडिलाचे आजारी पडणे आणि त्याचे न येणे वीणाला काही कमी दु:खदायक नव्हते.

वीणाचा विवाहसोहळा सुरू झाला. मातृपूजा सपली; निमंत्रणे पाठविली. पक्वान्ने बनविण्यासाठी घरात आचारी आला. कापड शिंप्याच्या दुकानात जाऊन पडले. गाणे गाण्यासाठी मुली एकत्र जमल्या ! केदारलाही काही दिवस सुट्टी घ्यावी लागली–कामाचा भार त्याच्याच डोक्यावर अधिक पडला होता.

अलीकडे कित्येक दिवसात वीणाने त्याचे तोड पाहिले नव्हते. मातृपूजेसाठी बसली असताना मध्येच उठून जाणे मुलीचा अपराध

मानला जाई. वीणाला वाटे की केदार निदान जाता–येताना तरी आपल्याला ओझरता दिसावा. पण तिची इच्छा पूर्ण होऊ शकली नाही. केदारने जसे काही त्या खोलीकडे फिरकणे देखील सोडून दिले होते.

आता विवाहाला दोनच दिवस उरले होते !

सकाळपासून वीणाचे मन व्याकुल दिसत होते. मुलींनी तिला समजाविण्याचा प्रयत्न केला. आईने समजूत घातली. पण वीणा जेवली नाही. सबंध दिवस तिने काळजीतच घालविला. ‘ उद्याचा दिवसच काय तो मध्ये आहे, परवाचा दिवस उजाडताच मी दुसऱ्याची होणार, आणि हे होण्यापूर्वी आपण केदारला भेटू शकणार नाही का…?’ या विचारात ती मग्न होती.

रात्र बरीच झाली होती. मुलींचा ढोलक त्याच आवाजात वाजत होता. गाऊन गाऊन मुलींचे आवाज बसले. ढोलक वाजवून त्यांचे हात लाल झाले. टिपऱ्या वाजविणाऱ्यांचे हात थकले, पण अद्याप थांबण्याचे नाव नव्हते. एका गाण्याचा शेवट जणू काही दुसऱ्या गाण्याचा आरंभ ठरत होता !

शेजाऱ्यांच्या आलेल्या दहा–पाच मुली आपापल्या घरी निघून गेल्या. आणि वऱ्हाडाबरोबर आलेल्या मुली जिथे जागा मिळेल तिथे झोपल्या.

मुलींच्या घोळक्यात सापडलेली वीणा स्वतःच्या भविष्यावर विचार करीत होती. हळूहळू सर्व मुलींना झोप लागली, पण वीणाला झोप लागणे शक्य नव्हते. तिच्यासमोरचा मिणमिणता कंदील मंदपणे जळत होता. तिची नजर त्या मंद ज्योतीवर लागली होती. सबंध खोलीत अंधार पसरला होता. फक्त त्या कंदिलाच्या सभोवती मंद प्रकाशाने कड निर्माण केलेले होते !

एकाएकी तिला कशाची तरी आठवण झाली. ती झटकन् उठून बसली आणि झोपलेल्या मुलींवर तिने एकदा चौफेर नजर फिरविली. आणि नंतर तिच्या उजव्या हाताला झोपलेल्या विद्याकडे तिने पाहिले. विद्याचा हात धरून तिने तिला हलविले. विद्याने डोळे उघडले. ती जागी झाली, आणि तिने वीणाकडे पाहिले. वीणा तिला उठण्यासाठी खुणावीत होती. तिने विद्याला इषारा करून आपल्या पाठोपाठ येण्यास सांगितले. हातात कंदील घेतला व खोलीबाहेर आली. विद्याही तिच्या पाठोपाठ चालत होती. जिन्याजवळ येताच वीणाने तिच्या कानात सांगितले, ‘मी वर जाऊन सज्जात बसते. तू जाऊन तुझ्या भय्याला बोलावून आण.’ विद्या निघाली. पुन्हा वीणाने तिला थांबविले, आणि म्हटले, “ माझं नाव सांगू नकोस. म्हणावं, आईनं बोलावलंय. ”

वीणा वरच्या सज्ज्यात आली. तिथे एक मोडकी खुर्ची पडलेली होती. तिच्यावर ती बसली. आणि थोड्याच वेळात कोणाचे तरी पाय वाजत असल्याचा आवाज झाला.

“ हे काय ?” वीणाला पाहताच केदार आश्चर्याने उद्गारला.

“ आईनं नाही, मीच बोलावलं होतं. बसा ना ?”

“ पण विद्या तर म्हणत होती–”

“ मीच सांगितलं होतं तिला तसं. मी बोलावलंय् म्हटलं असतं तर तुम्ही आला नसता, मला ठाऊक आहे. ”

केदार वीणापासून काही अंतरावर बसला. रात्रीच्या दोन वाजता आपल्यापाशी काय काम निघाले असे त्याला विचारावेसे वाटले. जे दृश्य



विद्या – वीणेचा वारसा !

त्याला समोर दिसत होते, त्या दृश्याने त्याची जीभ जखडून टाकली. लग्नातली लाल चुनरी वीणाच्या अंगावर होती. तिच्या गोऱ्या कोमल, हातांवर मेंदीचा लालभडक रंग कंदिलाच्या मंद प्रकाशात चम्चम् करीत होता. जेव्हा तिचा हात हले, तेव्हा लाल चुड्याने सुशोभित झालेल्या मनगटामधील नक्षीदार चुडा चम्चम् करीत थेट कोपरापर्यंत जाऊन भिडे, आणि त्यातून किण्किण् असा सुमधुर आवाज बाहेर पडे. तिच्या डोक्यावर ‘ फुल–चौक ’ बांधला होता, त्याने तिची उंची पहिल्यापेक्षा वाढलेली होती !

वीणाने दिवा बारीक केला.

“ मी तुम्हांला अवेळी बोलावून तुमची झोपमोड केली–” वीणाने त्याच्या उतरलेल्या चेहऱ्यावर आपल्या डोळ्याची बैठक जमवीत म्हटले.

“बोलायचं नाही का ?” ह्या वेळेस वीणाच्या शब्दात आणि डोळ्यात एक गोष्ट दिसत होती–व्याकुळता ! याची जात आणि केदारच्या व्याकुळतेची जात एकच होती ! तिच्या हातावर रंगलेल्या मेंदीहून अधिक लाल–अधिक भडक ! कित्येक दिवसांपासून स्त्री-सुलभ लज्जेने तिच्यासमोर जी एक संकोचात्मक भिंत उभी केली होती त्या भिंतीच्या आता ठिकऱ्या झाल्या होत्या. वीणा त्याला म्हणाली, “ आता तरी बोला. नाही तर अशानं मी निघून जाईन. ” पण तरीही केदारच्या तोंडातून शब्द फुटला नाही. तिचे डोळे भरून आले. कोणी तरी केदारच्या डोळ्यावर पाणी मारून त्याला झोपेतून जागा केल्याप्रमाणे त्याने डोळे उघडले. तो म्हणाला, “ वीणा ! काय म्हणतेस तू ?”

"तुम्ही माझ्यावर का रागावलात ?"

वीणाने विचारलेल्या ह्या छोटयाशा प्रश्नाला केदारजवळ उत्तर नव्हते. तो म्हणाला, "तुला कोणी सांगितलं, वीणा की मी..."

"पुरे, पुरे मी काही कुक्कुलं बाळ नाही !"

वीणाच्या बालिश चेहऱ्यावर आज गहनगंभीर भाव उमटले होते. "वीणा ! आता मला काहीच सांगता येत नाही. हात जोडतो मी तुला आता, पण विचारू नकोस." केदार कसेतरी येवढेच म्हणाला.

"विचारू नको ? तुमचं मन घुमसत असताना मी विचारू नको ? पण—का ? तुमची ही दशा पाहून मला भीती वाटते !"

"भीती ?" केदारच्या शब्दात दृढ विश्वास जाणवत होता, "कसली भीती ?"

वीणाजवळ या प्रश्नाचे उत्तर होते का ? असेलही किंवा नसेलही ! पण ती काहीच बोलली नाही. केदार चटकन् उठला आणि चालू लागला.

सज्ज्याच्या खांबाला डोके टेकून वीणा वीणा रडू लागली. काळचाकुट्ट अंधाराने भरलेल्या सज्ज्यातून तिने एकदा खोलवर नजर फिरवून पाहिले. पण त्या ठिकाणी केदार तिला दिसला नाही ! ती इतकी गलितगात्र झाली की तिला जिन्याच्या पायऱ्याही उतरणे असह्य झाले. भिंतीचा आधार घेत घेत ती कशी–बशी खाली आली आणि जेथून उठली होती त्या जागी जाऊन झोपली. गल्लीतल्या टोकाला कुत्री रडत होती. ह्या अशुभ आवाजाने तिच्या अंगावर भीतीचा काटा फुलला. तिचे मन गदगदले. हळू हळू तो अशुभ आवाज थांबला. परंतु तिचे मन त्याच आवाजाचा मागोवा घेत धावत सुटले !

## : १४ :

वीणाच्या लग्नानंतर तिसऱ्या दिवशी केदार दुकानावर गेला. नेहमी दुकानाच्या किल्लया त्याच्याजवळ असत. परंतु तो एक आठवड्याच्या रजेवर होता, तेव्हा त्याने स्वत:जवळच्या किल्लया मालकाच्या स्वाधीन केल्या होत्या.

किल्लया घेण्यासाठी तो वर गेला तेव्हा अतरसिंह काही वेळ त्याच्याकडे 'आ' वासून पहात राहिला. नंतर म्हणाला, "केदार, आजारी तर नव्हतास ना ?"

"हो." केदारने सुस्त स्वरात उत्तर दिले.

"मग आणखी एक दोन दिवस विश्रांती घ्यायची ! महिन्याच्या आजारातून उठल्यासारखा तुझा चेहरा दिसतो आहे."

"तसं काही नाही. आता बरं आहे. थोडासा अशक्तपणा आहे अजून. पण तो देखील दोन चार दिवसात कमी होईल."

चाव्यांचा जुडगा त्याच्या हवाली करीत अतरसिंह म्हणाला, "कचेरीतून घड्याळांचं एक पार्सल बँकेत येऊन पडलं आहे. आज वेळ काढून तेवढं सोडवून आण. माझ्या पोटात दुखतं आहे. थोडया उशीरानंच मी आज खाली येईन."

"किती पैसे भरावयाचे आहेत ?"

"पंधराशे रुपये. पेटीच्या खालच्या कप्प्यात लहानशी डबी आहे. तीत शंभराच्या पंधरा नोटा असतील. त्या घे."

दुकानात बरेचसे काम तुंबलेले होते. हिशेब–ठिशेब, शिवाय बरीच दुरुस्ती येऊन पडली होती. तो कामाला लागला. सध्याकाळपर्यंत बरेचसे काम संपविण्याचा त्याचा विचार होता, म्हणून तो दुपारी जेवलाही नाही. पण बँकेत जाणे जरूर होते. तेव्हा दोन वाजता त्याने पेटी उघडली. पेटीतून रुपये बाहेर काढले. आणि मालकाला दुकानावर बसण्यासाठी सांगण्यास वर गेला. पण त्याला आज दुकान बंद करावे लागले. कारण अतरसिंहाची तब्येत जास्त बिघडली होती.

त्याने दुकान बंद केले व तो बँकेकडे निघाला. तेवढयात विद्या आणि वसंता येताना त्याला दिसली.

"तुम्ही कुठे गेला होता ?" जवळ येताच विद्याने विचारले.

"कामात होतो मी विद्या !" केदारने तिच्या डोक्यावरून हात फिरविला.

"वीणा तुमची आठवण करीत होती." विद्या सांगत होती. पण ह्या गोष्टीकडे केदारचे लक्ष नव्हते. तो त्यांना विचारीत होता.

"तुम्ही कुठे निघालात ?"

"तुमच्याकडेच, तुम्हांला बोलवायला. आईला काही सुचत नाही."

"बरं—बरं. तुम्ही व्हा पुढं. मी बँकेत जाऊन येतो."

"नाही—नाही. आईनं तुम्हाला बरोबर घेऊन यायला सांगितलं आहे ?"

"पण विद्या, बँक बंद होईल !"

"होऊ द्या ! मी नाही सोडणार. आई रडते आहे !"

"का ?" या वाक्याने मात्र केदारच्या मनात कालवाकालव सुरू केली.

"घरी लालाजी आला आहे...पैसे मागायला...हलत नाही !"

"लालाजी ! कोण हा ? कसले पैसे द्यायचे आहेत त्याचे ? तुझी आई कधी बोलली नाही ?..."

केदारने प्रश्नामागे प्रश्न फेकले. उत्तरे मिळेनात तेव्हा तो मुकाटयाने बँकेचा नाद सोडून त्या दोघाबरोबर मायाच्या घरी आला. त्याचे पाऊल दरवाजात पडले. पडवीत उकिडवा बसलेला लाला उठून उभा राहिला. त्याच्याकडे दुर्लक्ष करीत केदार घरात गेला. माया घरात डोळे पुशीत होती.

केदारने विचारले,—"काय झालं ?"

मायाने सांगितले की तीन हजाराचे कर्ज असल्याचे पन्नालाल कधी बोलला नव्हता. आज हा लाला अचानक येऊन धरणे धरून बसला. म्हणाला—'लग्नसमारंभ धडाक्यानं करायला पैसे आहेत आणि आमचे पैसे का देत नाही ? ऋण ठेवून सण करता. शरमेची गोष्ट आहे...'

केदार हतबुद्ध झाला. तीन हजार रुपये ? त्याच्या डोळयापुढे काजवे चमकले. तो बाहेर आला. माया पाठोपाठ आली. त्याने लालाजीस म्हटले—

"लालाजी—देऊ पैसे तुमचे; सध्या अडचण आहे; शिवाय राहतं घर तर कुठं जात नाही... !"

लालाजी विथरलेला दिसत होता. परंतु केदारच्या आजवी बोलल्याने थोडा वरमून म्हणाला—

"बाबूजी, नदीत घागर भरून घेतली तर काही वाटत नाही. पण आज तुम्हीच पहात आहात की स्वत: पन्नालालजी छोटयाशा पगारात देश–परदेश फिरत असतात. पहा बुवा ! बरवाईट बोलल्याची क्षमा करा. पण समजा, उद्या या ताईसाहेब घराची विल्हेवाट लावून

कुठं निघून गेल्या म्हणजे आली का आमच्यावर पाळी आकाशाकडे पाहात बसायची ?"

केदारने ओळखले, लालाजी काही साधा-सुधा माणूस नाही म्हणूनच रक्कमवसुलीची मुदत संपत आली तेव्हा त्याने तोड दाखविले. कदाचित मायाचे राहते घर हाती लागेल, हा त्यामागील उद्देश स्पष्ट होता.

"मग आपल काय म्हणणं आहे ?" केदारने विचारले.

"भय्याजी !" लाला आणखी कठोर होत म्हणाला, "ह्या कानानं ऐका नाही तर त्या कानान—आता रोखीच्या जागी करारमदारानं काम होणार नाही. रागवा अगर न रागवा, रकमेची सरबराई तुम्हाला करावीच लागेल. नाही तर... !"

"नाही तर काय म्हणालात ?"

"मामला कोर्टात जाईल !"

"ह्याचा अर्थ असाच ना, ज्या माणसावरोबर आपले जुने व्यवहार-सबध आहेत, ज्याच्या मदतीन तुम्ही हजारो रुपये कमावून बसला आहात त्याच्याच घरातील माणसांना कोर्टात ओढून नेऊन त्याची लाज चव्हाटयावर आणणार ! " केदारच्या शब्दात त्वेष चढत होता.

"जोरात बोलण्याची जरूरी नाही भय्याजी !" लालाजी दुप्पट आवेगात म्हणाला, "अब्रू–बेअब्रूचा प्रश्न नाही. हा तर व्यवहार आहे. आणि आपण तर कर्तेसवर्ते आहात. आपणांला सर्व समजत आहे. नाराज होऊन कसं चालेल ? 'चलती का नाम आखिर गाडी है' ! आम्ही हजारो रुपये डोळे मिटून देतो. पण ह्याचा अर्थ असा नाही, की आपण एखाद्यावर उपकार करतो. वसुली करताना तर हा विचार अजिबात आमच्यासमोर नसतो. चालू व्यवहारात कुठे ना कुठे अवसर सापडून जातो. पण ज्याचे व्यवहार थांबले आहेत त्याना कुठली अवसर सापडायला ? कोण कोणाची कदर करतो आहे ? कदर होत असते ती चालू व्यवहाराची. ज्याचा कामधंदा बंद पडला तिथे कसली आशा ?"

लालाचे कठोर आणि चीड उत्पन्न करणारे शब्द ऐकून केदारचा पारा चढत चालला होता. स्वत च्या स्वाभिमानापुढे केदार लाचार बनला होता. त्याला समजून चुकले होते, की त्याच्याशी वाद घालण्यात काही राम नाही; तेव्हा त्याने रागाने बोलण्यास सुरुवात केली. "जर तुम्हाला इतकाही विश्वास नसेल तर असं करा, अर्धे पैसे आता घेऊन जा. आणि बाकीच्या रकमेची ह्या प्रॉमिसरी लिहून देतील."

हे ऐकताच लालाजीला वाटले आपण टाकलेला फास काही अगदीच वाया गेला नाही. मायाने केदारचे वरील शब्द ऐकले मात्र, भीतीने तिचा थरकाप झाला. वीणाच्या लग्नानतर त्याच्याजवळ पैसाही उरलेला नाही हे तिला ठाऊक होते. एवढेच नाही, तर त्याच्या डोक्यावर काही कर्जही झाले होते. लालाजीने केदारचे हे म्हणणे मान्य केले तर तो राहिलेली अर्धी रक्कम कोठून आणील ?

लालाजी म्हणत होता, "भय्याजी ! ह्याना काय कमी आहे ? अर्धी काय पूरी काय, जो अर्ध्याची व्यवस्था करू शकतो त्यान राहिलेल्या अर्ध्यासाठी आणखी थोडा जोर लावावा."

शेवटी बरीच आटापीट होऊन निर्णय घेण्यात आला, पधराशे रुपये रोख घ्यावेत, आणि राहिलेल्या हजाराचे राहत्या घराचे गहाणपत्र करावे. उरलेल्या वसुलीसाठी दोन वर्षांची मुदत मिळावी.

केदारने शभराच्या पधरा नोटा काढून लालाजीच्या हातावर ठेवल्या. त्याची पक्की पावती करून घेतली. राहिलेल्या हजार रुपयांवर घर गहाण ठेवायचे होते. त्यामुळे या कामात अधिक अडथळे उपस्थित झाले नाहीत. लालाजीला घाई झाली होती; तर केदार हातघाईवर आला होता. तो अशा तऱ्हेने मालकाच्या पंधराशे रुपयाची विल्हेवाट लावून मोकळा झाला होता. आता होता होईल तितक्या लवकर गावातून काढता पाय घ्यावा हे बरे, असे वाटून त्याने बसल्या बैठकीलाच बाजारात जाऊन गहाण–खत करावयास लागणारे कागद-पत्र आणले. तसेच अज्ञानपालनकर्त्याला बोलावून लिहिण्या-वाचण्याचेही काम सपविले. कागदावर साक्षीदाराची लागणारी एक सही केदारने आणि दुसरी त्याच गल्लीत राहणाऱ्या एका परिचित इसमाने केली.

आता फक्त ते कागदपत्र कचेरीत दाखल करण्याचे काम राहिले होती. त्यानंतर सर्व गोष्टी संपणार होत्या.

कागद-पत्रांवर सह्या झाल्यावर लालाजीने वही वखोटीला मारली आणि उद्या येण्याचा वायदा करून निघून गेला. इकडे केदारने त्याच हाताने आणखी एक काम पूर्ण केले. मालकाच्या नावाने एक चिठ्ठी लिहिली. आणि त्या चिठ्ठीबरोबर चाव्याचा जुडगा मायाला दिसणार नाही अशा बेताने वसंताच्या हातात दिला आणि त्याला म्हटले, "वसता, हा कागद आणि ह्या किल्ल्या सरदारजीच्या दुकानावर देऊन ये."

वसता गेला त्या दिशेकडे पहात केदारने दीर्घ निश्वास टाकला.

## : १५ :

वीणा सासरी गेली. लग्न-सोहळा उत्तम प्रकारे पार पडला. देण्यामध्ये मायाने अजिबात कुचराई केली नाही. सर्व काही जिथल्या तिथे झाले होते. माया वीणाच्या सासूच्या सर्व अपेक्षा जरी पूर्ण करू शकली नव्हती तरी तिने त्यात कशाची उणीव पडू दिली नव्हती. तिच्या छातीवरचा एक बोजा उतरला होता. सुखा-समाधानाचे श्वास घेण्यास सुरुवात झाली होती, तोच स्वप्नातही वाटले नव्हते, असे संकट, लालाजीचे कर्ज, तिच्या शिरावर येऊन पडले.

पण केदारच्या येण्यामुळे हे संकटही त्यावेळेस टळले. उद्या कचेरीत जाऊन घराचे गहाणपत्र दाखल करायचे– बस्स. आधीच तिच्या डोक्यावर उपकाराचा डोगर रचला गेला होता आणि त्यावर पुन्हा हे पधराशे रुपये !

ज्यावेळेस लालाजीच्या हातावर केदारने नोटा ठेवल्या आणि त्याविषयी काही न विचारण्याची मायाला शपथ घातली, तेव्हा मायाचे मन भीतीने काळेठिक्कर पडले. हे रुपये दुकानचे तर नसतील ? आणि त्याने ते दुसऱ्या कामासाठी आणले असतील तर तो मालकाला काय उत्तर देईल ? त्याच सध्याकाळी तिने त्याला विचारले, "बरं पण केदार, लग्नाच्या रात्री तू होतास तरी कुठे ?"

सुकलेल्या ओठांवरून जीभ फिरवीत केदार म्हणाला, "काय सांगू ? कामच तशा प्रकारचं येऊन पडलं होतं."

"काम गेलं चुलीत ! रडता रडता वीणाची पुरेवाट झाली. पण

[पृष्ठ ४८ वर चालू]

समीक्षा

# जुन्या वळणावरचा नवा प्रवास

## अरविंद गोखले यांचे तीन कथासंग्रह

: समीक्षक :
**चन्द्रशेखर मराठे**

रात्रीच्या शांत वातावरणात रेडियोवर 'अंदाज' किंवा 'बरसात' यांसारख्या जुन्या चित्रपटांतील एकादे गाणे लागले की तो चित्रपट ज्या काळात लोकप्रिय होता तो काळ डोळ्यासमोर उभा राहतो, हा बहुतेकांचा अनुभव आहे. त्या वेळेपुरते गाणे हे स्वरूप गाण्यास न राहता जुन्या काळाच्या आठवणी जागृत करणारी गोष्ट म्हणून त्याचा परिणाम होतो. एकादी जुनी कथा वाचूनही हाच अनुभव येतो. चित्रपटातील गाण्याइतकी कथेची लोकप्रियता अल्पजीवी नसते. परंतु जुनी कथा वाचताना त्या काळातील विविध घटना, स्थित्यंतरे, प्रतिक्रिया यांचे पुन्हा दर्शन घडते. एकाच लेखकाच्या वेगवेगळ्या कालखंडांतील कथा क्रमाने वाचल्या तर हा अनुभव अधिक येतो. श्री. अरविंद गोखले यांच्या १९४८ ते १९५२ व १९५२ ते १९५६ या दोन कालखंडांत लिहिलेल्या कथांचे संग्रह – 'मंजुळा' व 'रिक्ता' या दृष्टीने महत्त्वाचे आहेत.

### नवकथेचा अस्त

गोखले व गाडगीळ यांनी घडविलेल्या नवकथेचा जमाना आता बहुतांशी संपत आल्याचे दिसते. स्वतः गाडगीळ कथालेखन विशेष करीत नाहीत. गोखले यांच्या हल्लीच्या कथा नवकथेपेक्षा बऱ्याच निराळ्या वाटतात. हे पाहून असे वाटते की नवकथा ही एका विशिष्ट परिस्थितीत अस्तित्वात आली व वाढली. आता परिस्थिती बदलल्याने हा प्रकार लुप्त झाला असावा. गोखल्यांच्या वरील दोन संग्रहांत त्यांच्या कथेतील स्थित्यंतराचा मागोवा घेता काही मनोरंजक निष्कर्ष निघतात. प्रथम गोष्ट व लघुकथा हे प्रकार परिस्थितिप्रधान नसून घटनाप्रधान असत. सामाजिक परिस्थितीचा पार्श्वभूमीसारखा उपयोग करून व्यक्तिजीवनातील घटनांची आकर्षक मांडणी करणे हे पूर्वीच्या लघुकथेचे स्वरूप होते. पुढे अशी जाणीव वाढीस लागली की व्यक्तीच्या जीवनात घडणाऱ्या घटना बहुतांशी चाकोरीबद्ध व त्याच त्या छापाच्या असतात. महायुद्धानंतर शहरीकरणाचे वाढते प्रमाण, शहरातील चाकोरीबद्ध जीवन, मध्यम वर्गाच्या स्थितीत झालेले दूरगामी बदल यामुळे ही चाकोरीची व सामान्यत्वाची जाणीव व्यापक झाली. व्यक्तीच्या जीवनातील घटनांत सांगण्यासारखे काय आहे, अशा प्रतिक्रियावादी भूमिकेतून परिस्थितिप्रधान नवकथा जन्माला आली. घटनांना गौणत्व यावयाचे म्हणजे व्यक्तींच्या मानसिक प्रतिक्रिया व आवर्तने यांस साहजिकच जास्त प्राधान्य मिळाले. भोवतालच्या परिस्थितीबद्दल सामान्य माणसांच्या मनांत उठणारे तरंग असे स्वरूप नवकथेस प्राप्त झाले. गोखल्यांच्या 'मंजुळा' या कथासंग्रहातील गोष्टी या स्वरूपाच्या आहेत. 'मंजुळा' 'आरामखुर्ची' 'कारकुनाच्या बिऱ्हाडातून', 'लेकुरवाळा', या कथा म्हणजे मध्यमवर्गाच्या वाढत्या कुचंबणेचे यथार्थ चित्रणच होय.

एका अर्थाने मध्यमवर्गाच्या अनेकविध कुचंबणेच्या आधारे नवकथाकारांनी मानवी जीवनातील चाकोरी व सामान्यत्वाचेही दर्शन घडविण्याचा प्रयत्न केला. पूर्वी रूढार्थाने असामान्य वा अलौकिक व्यक्तीच्या चित्रणांत (अर्थात काल्पनिक) रमलेली कथा गाडगीळ-गोखल्यांनी सामान्याच्या चित्रणासाठी वापरली. कथानायक सुंदर, हुषार, वगैरे असला पाहिजे किंवा चांगल्याचा वाइटावर वरचष्मा राहिला पाहिजे ही इच्छावादी (नॉर्मेटिव्ह) भूमिका बदलून नवकथेने सामान्याच्या सुखदुःखाचे, चाकोरीचे दर्शन घडविले. नवकथेचे जीवनकार्य ते हेच होते असे वाटते.

### काही तरी वेगळे

पुढे असे होऊ लागले की घटनांच्या अभावाने नवकथा कंटाळवाणी होऊ लागली. निव्वळ चाकोरीच्या चित्रणाने या कंटाळवाणेपणात भरच पडली. त्याची अभावित प्रतिक्रिया म्हणून नवकथेत असामान्यत्व व वेगळेपणा असलेल्या व्यक्तींचे चित्रण सुरू झाले. गोखल्यांच्या 'मंजुळा' या संग्रहातील 'अधर्म', 'कवडसा' 'अविधवा', 'अनय' या कथा पहाव्या. गोखल्यांच्या अलीकडील बहुतेक कथा या स्वरूपाच्या आहेत. जुन्या लघुकथेत व नवकथेत या बाबतीत फरक करावयाचाच तर परंपरागत वा ढोबळ असामान्यत्व हे जुन्या कथेचे आराध्यदैवत होते तर सूक्ष्म, लोकविलक्षण असामान्यत्वाची पूजा नवकथा बांधीत आहे. मुलासाठी त्याग केलेली आई हे जुन्या कथेचे असामान्यत्व होते, तर आईच्या उपकाराच्या जाणीवेने तिच्याबद्दल द्वेष करणारा मुलगा हे सध्याचे असामान्यत्व आहे. 'कवडसा' या गोष्टीतील मुलीला गुंडाच्या तावडीतून सोडविणाऱ्या तरुणाचा अतिशय द्वेष वाटू लागतो. गोखल्यांच्या एका नव्या कथेत एक अल्लड मुलगी, पुरातून म्हाताऱ्या स्त्रीस वाचविणाऱ्या एका तरुणास शरीर अर्पण करण्यासाठी बेचैन होते. ही मानसशास्त्रीय प्रमेयांवर आधारलेली चित्रणे पाहून प्रथम प्रतिक्रिया होते ती ही की सामान्यांच्या वेदनातून (या वेदना चाकोरीच्या व सामान्यत्वाच्या) निर्माण झालेली नवकथा देखील सामान्यत्वाला विटली.

### वैफल्याची नवी चाकोरी

लघुकथांच्या अप्रातिनिधिक स्वरूपाची टर उडविली जात असे व त्या प्रमेयस्वरूप आहेत असे म्हणण्याची एका काळी फॅशन होती. आता नवकथेचा प्रवास पाहून ही कथाही प्रमेयस्वरूप आहे; फक्त ती अपवादांच्या स्वरूपाचे चिंतन व चित्रण करते असे दिसून येईल. सध्याच्या मराठी कथेत दिसणारी माणसे–

| मंजुळा | रिक्ता | विघ्नहर्ती |
|---|---|---|
| पॉप्युलर बुक डेपो | पॉप्युलर प्रकाशन | सुविचार प्रकाशन |
| सहा रुपये | आठ रुपये | पाच रुपये |

गोखल्याच्याही कथा यास अपवाद नाहीत– मानसशास्त्रीय प्रमेयांच्या आराखड्यात मांडण्यात आलेल्या बाहुल्या आहेत असे वाटते. घटनाऐवजी मानसिक विश्लेषणावर भर देण्याचा आणखी एक परिणाम म्हणजे विचार, भावना, वा आठवणी वा इच्छा व्यक्तीच्या मनात ज्या उत्कटतेने वा वेगाने येतात त्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक उत्कटता कथेतील व्यक्तीच्या मनोव्यापारात दिसते. प्रत्यक्षात माणसाच्या मनात इतके उत्कट विचार येत नाहीत. कोठेतरी वाचलेले, पाहिलेले, ऐकलेले अशा सर्वांचा प्रभाव व मर्यादा मनोव्यापारांवर पडतात व तेही कमीअधिक प्रमाणात बोजड व बोथट होतात. त्याचे चित्रण हेच नवकथेचे मुख्य कार्य असल्याने त्यास वाजवीपेक्षा जास्त धार दिली जाते, सांकेतिकता येते व कृत्रिम शब्दाची मेंडोळी यापेक्षा कथेस काही आकार शिल्लक राहत नाही. 'कमळण' ही गोष्ट किंवा खुद्द मजुळा ही गोष्ट पहावी. जी चाकोरी लेखकास त्रयस्थपणे पाहताना जीवघेणी, तिरस्करणीय वाटते, व कथेतील पात्राच्या मार्फत जी व्यक्त होते ती शहरात राहणाऱ्या लक्षावधी लोकांस कळूनही येत नाही. जी गोष्ट सहजासहजी जाणवत नाही तिलाच चाकोरी म्हणतात. यापुढे जाऊन असे म्हणता येईल की चाकोरीची जाणीवही चाकोरीबद्ध होते.

नवकथेने परंपरागत असामान्यत्वावर हल्ला चढविला–, तोही सामान्यत्वाचाच आविष्कार आहे असा पवित्रा घेतला. सामान्यत्वाचे चित्रण करता करता ते अखेरीस इतके अपवादभूत झाले की त्यात सामान्यत्वाचा मागमूस राहिला नाही. अपवादभूत सामान्यत्व हा हास्यास्पद प्रकार अस्तित्वात आला. 'अधर्म' ही गोष्ट अशीच आहे. महायुद्धानतरच्या यांत्रिक जीवनाबद्दल व चाकोरीबद्दलचे वैफल्य ज्या नाट्यमयतेने व प्रभावाने प्रकट झाले ती नाट्यमयता ओसरून आता वैफल्याचीही चाकोरी झाली. नवकथेची शोकातिका ही आहे. एका अर्थाने असे म्हणता येईल की ज्या काळाचे चित्रण म्हणून व ज्या गोष्टीची प्रतिक्रिया म्हणून नवकथा अस्तित्वात आली तो काळ इतिहासजमा झाला, अनेक स्थित्यतरे झाली आणि नव्या बदलाचे चित्रण करण्यास नवकथा असमर्थ ठरली.

गोखल्यांचे दोन्ही सग्रह वाचताना या गोष्टी प्रकर्षाने जाणवतात. 'मंजुळा,' 'कारकुनाच्या बिन्हाडांतून,' 'आरामखुर्ची,' अशा कथातून गोखल्यानी सामान्यत्व आणि चाकोरी याचे दर्शन घडविलेले सार्वत्रिक महत्त्वाचे व सार्वकालिक प्रभावाचे आहे. पण पुढे गोखल्याच्या कथांनी सामान्याची सोबत टाकली, नियमाची संगत मोडली आणि अपवादाचे चित्रण केले. 'विघ्नहर्ती' ही ताजी गोष्ट या प्रवासातील अखेरचा टप्पा म्हणावयास हरकत नाही. मनात आलेल्या काही विचित्र कल्पनाचे चित्रण करण्यासाठी मांडलेला बुद्धिबळाचा (वा कल्पनाबळाचा) डाव हे सध्या गोखल्याच्या कथेचे स्वरूप आहे. नाहीतर पुरातून माणसाला वाचविणाऱ्यास शरीर द्यावयास निघालेली तरुणी, बापाच्या यशामुळे वेडा झालेला मूलगा, मृत पतीस झाकून ठेवून लग्नात विघ्न न आणणारी स्त्री ही सर्व असामान्य माणसे प्रत्यक्षात कोठे भेटणार ?

येथे गोखल्याचे जे उत्तर अपेक्षित आहे ते असे–ही प्रातिनिधिक माणसे नाहीत–ही असामान्य, अपवादभूत माणसे आहेत. हेच उत्तर जुन्या लघुकथेच्या पुरस्कर्त्यांनी दिले होते ही गोष्ट मनोरंजक आहे. गोखल्याच्या कथातील माणसे भेटूही शकतील, कदाचित भेटणारही नाहीत. त्याबद्दल कोणाला तक्रार करण्याचे कारण नाही. पण मौज एवढीच की केवळ काल्पनिक म्हणून लिहिलेल्या परीकथा वा अद्‌भुतकथांपेक्षाही अद्‌भुत गोष्टीची कास आमच्या सध्याच्या कथेस धरावी लागत आहे.

नवकथेच्या या स्थित्यतरामागे साहित्याच्या स्वरूपावर व कार्यावर काही प्रकाश पडण्यास हरकत नाही. आयुष्यातील सामान्यत्व व चाकोरी सर्वांसच कधीकधी जाणवते. या गोष्टी आहेत. हे कोणी कोणास सागावे असे नाही. नवकथेने हे केले–काही काळ वाचक भांबावले. माणसे म्हणजे किडामुगी ही भूमिका त्यांस नवीन वाटली–थोड्याच काळात हे नावीन्य ओसरले. नवकथेची सामान्य वाचकावरील पकड ढिली झाली. पुन्हा भिरासदाराच्या अघळपघळ कथा वा शं. ना. नवरे यांच्या खुसखुशीत कथाचा जमाना सुरू झाला. हे साहजिकच आहे. कारण आयुष्यात सामान्यपणा आहे हे समजून घेण्यासाठी माणूस साहित्याकडे वळत नाही. उलट या चाकोरीचा, सामान्यपणाचा विसर पडावा ही त्याची इच्छा असते. असामान्यत्वाची यथायोग्य पूजा बांधणे व त्यायोगे सामान्यत्वाचा विसर पाडणे हे साहित्याचे सनातन जीवितकार्य आहे. गोखल्याची कथा आता या वळणाने प्रवास करीत आहे. त्याचे दोन संग्रह (मजुळा व रिक्ता) वाचून हे जाणवते की त्यांच्या पहिल्या कथा जास्त चांगल्या आहेत. त्याची वेगवती व नितळ भाषाशैली व सच्ची कथावस्तू याची लय त्याच्या पहिल्या कथात सुदर जमली आहे. पुढे त्याची कथा घटनाप्रधानता व व्यक्तिचित्रणप्रधानता, सामान्यत्वाचे चित्रण व अपवादाचे चित्रण, मध्यमवर्गीयाचे चित्रण व इतर गोष्टीचे चित्रण या परस्परविरोधी गोष्टीतील तडजोडीच्या स्वरूपाची आहे. पुढील काळातील त्यांच्या कथांपैकी काही चागल्या कथा आहेत–पण नवकथा एकही नाही. आणि त्याचा खेद बाळगण्याचेही प्रयोजन नाही. कारण कथा चांगली अगर वाईट हाच प्रश्न महत्त्वाचा आहे आणि अशा अनेक चागल्या कथा गोखल्यांच्या खात्यावर जमा आहेत. नवकथेचे विशिष्ट कार्य सपले याची खूण मात्र गोखल्याच्या कथेचा प्रवास पाहताना पटते. • • •


# पांढरे डाग

पाढऱ्या कोडाचे अनुभवसिद्ध प्रसिद्ध गुणकारी औषध. अनेक बक्षिसे व हजारो अभिप्राय मळाले आहेत व नित्य मिळतात. औषधाची किंमत ६ रुपये. पो. ख. १ रु. माहितीमागवा. मोफत पाठवू. नकली वैद्यांपासून सावध राहावे.

**वैद्य बी. आर. बोरकर, आयुर्वेद-भवन**

**मु. पो. मंगरूळपीर, जि. अकोला (महाराष्ट्र)**

न्यायालयीन जगत्

# साक्षीदार आणि शपथ

"म्हणा, देवाशपथ खरं सागेन, खोटं सांगणार नाही."

"हां."

"हां काय? तोडानं म्हणा."

"सागेनना खरं."

"तसं नाही. देवाची शपथ–"

"बरं देवाची शपथ."

कोर्टाचा कारकून एव्हाना जेरीला येतो व जवळजवळ चिडवून म्हणतो–" तोंडानं म्हणा देवाशपथ खर सागेन, खोटं सागणार नाही–"

तेव्हा कुठे साक्षीदार म्हणतो–

"देवाशपथ खरं सागेन."

आता मात्र शिरस्तेदार जवळजवळ ओरडतोच–

"खोटं सागणार नाही म्हणा ना!"

मग शपथ नीट घेतली जाते. साक्षीदाराला मात्र राहूनराहून या शपथेचे आश्चर्यच वाटत असते. देवाची शपथ घेतली आहे, हे तो थोडयाच वेळात विसरतो व ज्या पक्षाच्या बाजूने त्याची साक्ष काढली आहे, त्याच्या बाजूचे खरेखोटे मिसळत बोलू लागतो.

शपथेवर साक्ष द्यायला आलेली माणसे देवाची शपथ घेताना कोर्टाला अनेकदा जेरीला आणतात. काही जण तर उलटून विचारतात–" मग काय खोटं सागायला आलो आहे?" तर काही जण गळयाला हात लावतात व तोडाने शब्द न उच्चारता शपथ घेतल्यासारखे दाखवतात. काही जण तर मागाहून विचारतात–" खरं सांगेन असं कबूल केल्यावर खोटं सागणार नाही असंही का वदवून घेता?" नाना तऱ्हेची मंडळी नाना तऱ्हेच्या शंका काढतात आणि देवाची शपथ घेणे हा कोर्टात एक मोठा सोहळाच होऊन बसतो. निश्चित कोणत्या शब्दात शपथ घ्यावी याबद्दल नियम आहेत पण *त्या निश्चित शब्दांत* दहापैकी एकादाच साक्षीदार शपथ घेतो. काही साक्षीदार असे असतात की त्यांचा तर देवावर भरवसा नाही आणि शपथेवरही भरवसा नाही. अशा परिस्थितीसाठीही कायद्यात तरतूद आहे. ती अशी की ज्याला शपथ घ्यावयाची नसेल त्याने 'मी सत्य प्रतिज्ञेवर' अशा शब्दात कोर्टापुढे आधी प्रतिज्ञा करावी आणि नतर साक्ष द्यावी.

शपथेवर साक्ष द्यायला येणाऱ्या मंडळीनी खरे बोलावे, सत्याला स्मरावे, अशी न्यायालयाची अपेक्षा असते. पण असंख्य वेळा असे घडते की साक्षीदाराने जरी खरेखुरे बोलण्याची शपथ घेतलेली असली, तरी तो सोयीपुरतेच खरे बोलतो. काहीजण अर्धसत्य बोलतात, तर काहीजण अर्धसत्य दडवून ठेवतात. काही जण साफच खोटे बोलतात. प्रत्यक्ष साक्ष देताना आपण शपथ वाहिली आहे याची जाणीव ठेवून साक्ष देणारा क्वचितच सापडतो. थोडे फार का होईना, सत्य टाळायला जणू साक्षीदार प्रवृत्त असतो.

शपथ घेण्याच्या प्रकरणातही जातवारी शपथ आहे. ख्रिश्चन माणसाने म्हणायचे–बायबलशपथ खर सागेन; मुसलमान म्हणेल–कुराणाशपथ खरं सागेन. यासाठी प्रत्येक कोर्टात बायबल, कुराण वगैरे धर्मग्रंथ ठेवलेले असतात.

शपथ द्यायची तरी कोणाला? तर त्याचे सोपे आणि साधे उत्तर म्हणजे ज्याला शपथेचे महत्त्व व पावित्र्य समजते, त्याला शपथ देण्यात येते, इतराना नाही. वेडया माणसाला कधी साक्ष देण्यास कुणी बोलावीत नाही, कारण त्याला खरे खोटे फारसे समजतच नाही.

लहान मुलांच्या बाबतीत पद्धत वेगळी आहे. बारा वर्षांखालील मुलगा अगर मुलगी साक्ष देण्यास जर कोर्टात आली, त्याला अगर तिला एकदम शपथ दिली जात नाही. या कोवळया वयाच्या मुलाना न्यायाधीश स्वत काही प्रश्न विचारून त्याची साक्ष देण्याची पात्रता पाहतात. *त्या* मुलाला आपण कोर्टात साक्ष देण्यासाठी आलो आहोत, आपण खरे बोलले पाहिजे याची जाणीव देतात. खरे बोलायची आवश्यकता त्याला पटलेली असली तरी देखील त्याला शपथेचे गाभीर्य आणि पावित्र्य समजत नसते. तेव्हा अशा मुलांची साक्ष शपथ घेतल्याशिवायच नोंदली जाते. अशा तऱ्हेने साक्ष दिली असूनही, कायद्याने त्या साक्षीस काही बाध येत नाही. यामागे कल्पना अशी आहे की या लहान मुलांना खरे बोलण्याची गरज समजलेली असते, तथापि त्याच्यावर काही दडपण असते; काही वेळा उलटतपासणीत ती वाहावतही जातात. त्याचप्रमाणे शपथ ही एक गभीर व पवित्र बाब आहे हे त्या वयाच्या मुलांना नीट आकलनही होत नाही.

याशिवाय शपथेचा आणखीही एक प्रकार आहे. तो म्हणजे खास शपथेचा (Special oath). हा प्रकार दिवाणी कोर्टात अधिक प्रमाणांत चालतो. तो असा. समजा, एखाद्याकडून दुसऱ्याने काही हातउसनी रक्कम घेतली आहे, पण त्या बाबतीत लिखाण काही झालेले नाही. तेव्हा अखेरीस पैसे परत मिळाले नाहीत म्हणून पैशाचा वसुलीकरता कोर्टात दावा लावला. अशा वेळी दावा लावणाऱ्या वादीला वाटले की त्याचा विरुद्ध पक्ष प्रतिवादी हा पाडुरंगाचा मोठा भक्त आहे. तेव्हा तो पांडुरंगाची खोटी शपथ घेणार नाही. वस्तुत: वादीजवळ लिखाण काहीच नसल्याने त्याला स्वत च्या दाव्याची खात्री नसते. तेव्हा तो प्रतिवादीला अशी अट घालतो 'तू पाडुरंगाची शपथ घेऊन खर साग,' अशा वेळी प्रतिवादी तयार झाला तर तो पाडुरंगाच्या शपथेवर जे काही सागेल ते खरे मानले जाते. त्याची उलट तपासणीदेखील होत नाही. शेतकरी लोक आपल्या विरुद्ध बाजूच्याला सांगतात 'तू हातात तादूळ घे आणि बोल.' कोणी म्हणते–'देवीवरचं फूल उचल आणि सांग खरं काय ते.' अशा शपथेचे पावित्र्य फार मानले जाते, यामुळे अशी शपथ घेऊन कोणी साक्ष दिली तर विनातक्रार त्याचे सारे खरे मानले जाते!

शपथेवर साक्ष देणारे खोटे बोलतात, हाही कोर्टाचा अनुभव आहे. अशासाठी कायद्यात वेगळे कलम असून, शपथेवर खोटी साक्ष देणाऱ्या शिक्षेची तरतूद आहे.

• • •

# भव्य चित्रपटाची तयारी

चित्रपट भव्य असावा, त्यासाठी तुफान खर्च केला जावा अशी जणू एक नवी फॅशनच आहे. काही वर्षांपूर्वी 'टेन कमांडमेंट्स्', 'सॅम्सन अँड डिलायला' या चित्रपटांवर भरमसाट खर्च झाला. त्यानंतर 'क्लिओपात्रा' या अगदी अलीकडच्या चित्रपटावरही असाच वारेमाप खर्च झाला. आता या यादीत एक संगीतप्रधान चित्रपट 'माय फेअर लेडी' याची भर पडणार आहे. 'माय फेअर लेडी' हे नाटक यशस्वी झाले. त्यामुळे निर्मात्यांना यशाची जवळ जवळ खात्रीच आहे. वॉर्नर ब्रदर्स ही चित्रसंस्था हा चित्रपट काढीत असून त्यासाठी ऐंशी लक्ष पौंड (१ पौंड = सुमारे १५ रुपये; करा हिशेब !) खर्च होईल असा तूर्त अंदाज आहे. या चित्रपटावर ८० लक्ष पौंड खर्च झाला तर निदान १ कोट पौंडांच्या आसपास आवक गेल्यावरच नफा मिळायला सुरुवात होईल. या चित्रपटाच्या सुरवातीसच २० लक्ष रुपये केवळ चित्रपटाच्या हक्कासाठी या चित्रपटसंस्थेला लेखकाला, प्रकाशन-संस्थेला द्यावे लागले.

गेले अनेक महिने तयारी झाल्यानंतर नुकतीच या चित्रपटाच्या चित्रीकरणास सुरवात झाली आहे.

सेसिल ब्रिटन या डिझाईनरने चित्रीकरणासाठी एक खास बाग तयार केली आहे. या बागेसाठी जवळजवळ ४५ लक्ष रुपये खर्च झाला आहे. चित्रपटाची सुरवात व शेवट या बागेत आहे. आणि चित्रपटाचा दिग्दर्शक जॉर्ज क्युकर याने तर असे ठरवले आहे, की चित्रपटातील दृश्ये अधूनमधून सोयीप्रमाणे निवडून न घेता, जसे चित्रपटाचे कथानक घडते आहे, तसेच चित्रीकरणही करायचे. या कारणामुळे या बागेची निगा चित्रीकरणाच्या शेवटपर्यंत राखावी लागेल. याला नऊ महिन्यांचा अवधी लागणार आहे.

चित्रपटाची नायिका आहे रोमन-हॉलिडे-प्रसिद्ध तारका ऑड्रे हेपबर्न. तिचा मोबदला आहे ४५ लक्ष रुपये. ती संगीतप्रधान चित्रपटात प्रथमच भूमिका करते आहे. आणि म्हणूनच ती या भूमिकेशी एकजीव झाली आहे



All I want is a room somewhere.

(ही जाहिरात !) चित्रपटात तिचे नाव आहे एलिझाबेथ डुलीटल.

चित्रपट तयार करताना निर्माते किती बारकाईने सर्व गोष्टींकडे लक्ष देतात याचे एक उदाहरण. चित्रपटात असे एक दृश्य आहे, की नायिका बागेत नृत्य करीत आहे. ती नृत्य करीत आहे तेथे कोबीची पाने सर्वत्र विखुरलेली आहेत. खरोखरीची कोबीची पाने मिळतीलही, पण त्यांवर नृत्य करताना ऑड्रे हेपबर्न एखादवेळी पडेल, तिला अपघात होईल अशी आपली एक शंका. त्यासाठी निर्मात्यांनी मुद्दामच ओल्या कोबीच्या पानांऐवजी सरळ रबरी कोरडी हिरवी पाने करायचे ठरविले आहे. या पानांसाठी खर्च किती आला ? चार हजार रुपये ! वॉर्नरचे म्हणणे नृत्य फारच सुरेख होतेय...रबरी पानांकरिता खर्च केलेला पैसा योग्यच आहे.

'माय फेअर लेडी'ची कथा एडवर्डिअन काळातील आहे. त्यावेळी इंग्रजी बोलणाऱ्यांचे उच्चार वेगळ्या धर्तीचे होते. त्यावेळी आवाजाची चढउतार करायची पद्धत वेगळी होती. यासाठी कॅलिफोर्निआ विद्यापीठातील प्रोफेसर लेडफोग्ड या भाषाउच्चार-तज्ञाची नेमणूक झाली आहे. ऑड्रे हेपबर्नला त्या काळातील उच्चारपद्धती अभ्यासून, त्याप्रमाणे बोलावे लागेल.

चित्रपटातील नायिका ही गरीब आहे, फुले विकणारी आहे. ती जशीच्या तशी रंगविली गेली पाहिजे. यासाठी ऑड्रेच्या भुरभुरीत सुरेख केसांना रोज ग्रीस लावले जाते त्यावर धूळ टाकली जाते. एवढ्याने भागत नाही. तिच्या नखांतदेखील रोज मुद्दाम धूळ भरली जाते. पायावरही धुळीचे डाग असतात. चित्रपटात ती 'ऑल आय वॉंट इज् ए रूम समव्हेअर' हे गाणे म्हणतानाचे जे दृश्य आहे, ते प्रेक्षकांच्या दीर्घकाळ स्मरणात राहील.

चित्रपटात नायक आहे प्रोफेसर हिगिन्स. त्याची भूमिका रेक्स हॅरिसनने केली आहे. सुमारे २५ वर्षांपूर्वी 'फ्रेंच विदाउट टिअर्स' मध्ये त्याने फारच सुरेख भूमिका केली होती. त्याच्याकरिता स्टुडिओत एक वेगळीच खोली बांधण्यात आली आहे.

बहुतेक सर्व कलावंतांसाठी एकएक खोली बांधली आहे. त्यात एक नट आहे विल्फ्रीड हाइड व्हाइट. तो स्वतःबद्दल फारच मजेदार हकिगत सांगतो. तो म्हणतो—'कलावंत म्हणून मला दीर्घकाळ यश मिळाले नाही. या व्यवसायात माझ्या पहिल्या २० वर्षांत पहिली १८ वर्षे मला कोणीच विचारले नाही. परंतु पुढे माझ्या सुदैवाने युद्ध झाले. अनेक तरुण कलावंतांना युद्धावर जावे लागले, काही त्यांत खपले. पण याचा परिणाम असा झाला की चांगल्या कलावंतांचा तुटवडा पडला. तेव्हा साहजिकच मला संधी मिळाली. पण मला संधी मिळाल्यानंतर काही दिवसांतच मी युद्धावर गेलो. पण युद्ध संपताच एकदम मला भाव आला. मला पूर्वी आठवड्याला २७५ रुपय पगार मिळत असे. आता आठवड्याला १२०० रुपये मिळतात.'

चित्रपट असा तयार होत आहे. खर्चाचा अंदाज ८२ लक्ष पौंडांचा असला, तरी त्याच्याहून अधिक खर्च होण्याचा संभव आहे. पण त्याला निर्माते तयार आहेत. संगीतप्रधान चित्रपट असूनही दीर्घकाळ तो लक्षात राहील असा चित्रपट तयार करण्यासाठी सारी धडपड चालू आहे.

* * *

# 'आकर्षणा' मागील रहस्य

हॉलिवूडच्या चित्रपटसृष्टीत प्रवेश मिळविणे हे मोठे जिकीरीचे काम आहे. नुसते सौंदर्य असून किंवा त्यासोबत अभिनय असून भागणार नाही, तर तेथे 'आणखी काहीतरी' हवे असते. आणि हे 'आणखी काहीतरी' काय हवे ते जाणून घेण्यासाठी असंख्य जीवांची रात्रंदिन धडपड चाललेली असते.

हॉलिवूडच्या चित्रपटसृष्टीत प्रवेश मिळाला आणि एकदोन चित्रपटांत काम मिळाले म्हणजे झाले असेही काही मंडळींना वाटते. परंतु खरी कसोटी तेथेच सुरू होते. चित्रपटसृष्टीत प्रवेश मिळवून अभिनयकौशल्यावर नाव कमावणे एक वेळ सोपे वाटावे इतकी पुढची नाव टिकवण्याची कला अवघड आहे. कारण एकाद्या चित्रपटात तुमच्या कामावर मोहित झालेले प्रेक्षक तुमच्याकडून काही विशिष्ट अपेक्षा बाळगून असतात. आणि त्या जर प्रत्यक्षात पुऱ्या झाल्या नाहीत, तर ताबडतोब ओहोटी सुरू होते.

सौंदर्यसम्राज्ञी म्हणून एकादीची जाहिरात होते, पहिल्या चित्रपटात मेक-अपमुळे व अंगी असलेल्या थोडयाफार अभिनयगुणांमुळें व साधारण सौंदर्यामुळे प्रेक्षकांनाही क्षणभर नवा चेहरा आवडतो. परंतु हे 'सौंदर्यसाम्राज्ञी' पद टिकवणे फार अवघड असते. हॉलिवूडमध्ये असा एकादा चेहरा गाजू लागला, की मग त्या नटीला पत्रे येऊ लागतात. समारंभाची आमंत्रणे येऊ लागतात, फोटोच्या मागण्या येऊ लागतात, आणि ती कोठेही गेली तरी तिला पाहण्यासाठी गर्दी होऊ लागते. तिला स्टुडिओत जाताना आणि संध्याकाळी स्टुडिओतून परत जाताना पाहण्यासाठी गर्दी उसळते. त्याच वेळी खरी कसोटी सुरू होते.

चित्रपटव्यवसायात सातत्याने आपले नाव टिकवून असलेल्या जोन क्रॉफर्ड या नटीने या संबंधात केलेले विवेचन मनोरंजक आहे. सध्या ती कोलंबिया पिक्चर्सच्या 'स्ट्रेट जॅकेट' चित्रपटात काम करीत आहे. हल्ली तिचे वय पन्नास वर्षांचे आहे, पण वयाच्या २३ व्या वर्षी चित्रपटात तिने प्रवेश केल्यापासून, तिने स्वत:बद्दलचे प्रेक्षकांचे आकर्षण कायम ठेवले आहे.

हे आकर्षण कायम टिकविण्यासाठी तिला खरोखरच फार श्रम करावे लागतात. स्टुडिओंतील काम आटोपल्यावर जेव्हा सारे कलावंत घरी परततात, त्यावेळी त्यांना पहाण्यासाठी स्टुडिओबाहेर नेहमी गर्दी असते. त्यावेळी अनेक कलावंत साध्या कपडयांत, विस्कटलेले केस आणि कशातरीच अवतारात बाहेर पडतात. पण जोन क्रॉफर्ड कधीही तशी बाहेर पडणार नाही. कारण तिच्या मते असे करण्यामुळे प्रेक्षकांच्या नजरेसमोर ज आपले चित्र असते त्यात त्याला कमीपणा वाटू लागतो. सामान्य प्रेक्षक एकाद्या नटीकडे जेव्हा पाहतो, तेव्हा त्याला तिच्यात काही वेगळेपणा, विशिष्ट आकर्षण, काही खास पाहायचे असते. त्याची आवडती नटी बावळटासारखी, केस पिंजारलेल्या अवस्थेत, साध्या कपडयांत दिसली तर त्याला शंका व टू लागते की आपण जिला स्वप्नात पहात होतो, जिच्या सौंदर्याने आपण मोहित झालो होतो, ती तर अगदीच सामान्य दिसते आहे! प्रेक्षकाला जर सामान्य बाई पहायची असेल, तर तो शेजारणीकडे पाहील. स्टुडिओच्या दारात येऊन उभा राहणार नाही. जोन क्रॉफर्ड यामुळेच केव्हाही व्यवस्थित आणि टापटीप असल्याशिवाय बाहेर पडतच नाही.


पुष्कळ कलावंतांना असे वाटते की आपण जेव्हा बाहेर पडतो, तेव्हा आपल्याकडे थोडेच लोक पहात राहाणार आहेत? पण तसे नसते. कलावंतांकडे पाहण्याचा प्रेक्षकांचा वेगळाच दृष्टिकोण असतो. नटी ही आकर्षक दिसलीच पाहिजे, मग ती पडद्यावर असो की रस्त्यावर असो.

नेहमी व्यवस्थित व टापटीप राहण्यामुळेच काही कलावंतांना चित्रसृष्टीत प्रवेश मिळाला. लाना टर्नरसारखी असामान्य नटी सोडा फौंटनवर काम करीत असताना 'सापडली.' पण ती नटी झाली व प्रसिद्धीस पावली तरी तिने आपले आकर्षण लोकांसमोर सतत कायम ठेवले. ऑड्रे हेपबर्नही या बाबतीत फारच काळजी घेते. एरव्हीदेखील वागता-बोलताना आपण एक प्रसिद्ध कलावंत आहोत तेव्हा आपण प्रेक्षकांसमोर ते चित्र कायम ठेवले पाहिजे अशा उद्देशानेच वागते.

प्रेक्षकांना तुमच्याविषयी वाटणारे आकर्षण जर अशाप्रकारे कमी झाले, तर साहजिकच तुमच्या व्यवसायावरही त्याचा परिणाम होतो व निर्मात्यांचेही तुमच्याविषयींचे आकर्षण कमी होते.

एलिझाबेथ टेलर ही आज जगांतील अत्यंत आकर्षक स्त्री समजली जाते. ही जबाबदारी फार मोठी आहे. तिला गबाळ्या वेषात आणि 'अवतारा'त कधीच कोणाला पाहायला मिळणार नाही. दोन वर्षापूर्वी ती इस्पितळात आजारी होती. जवळजवळ मृत्युशय्येवरच होती तेव्हा तिला हॉस्पिटलच्या एका वॉर्डमधून दुसऱ्या वॉर्डमध्ये कॉटवरून नेण्यात यावयाचे होते. तिला हे ठाऊक होते की त्या वेळेला आपल्याला पाहायला आणि फोटो काढायला बरेच लोक येणार. तिने ताबडतोब आपल्या हेअरड्रेसरला बोलावणे पाठविले. केस नीट विंचरल्यावर, चेहरा शक्य तेवढा टवटवीत दाखवीतच ती कॉटवरून एका वॉर्डमधून दुसऱ्या वॉर्डमध्ये गेली. या तिच्या केस विंचरण्यात आणि पावडर लावण्यात जो वेळ गेला त्यावेळी डॉक्टर तिच्या प्रकृतीची चिंता करीत होते! पण तिच्या मनात चिंता होती ती वेगळीच! स्वत:च्या प्रकृतीविषयी नव्हे, तर आपण नेहमीप्रमाणेच प्रेक्षकांना आकर्षक वाटतोय की नाही ही तिला चिंता होती. या सवयीमुळेच जगातील अत्याकर्षक सुंदरी म्हणून ती मानली जाते.

• • •



# क्लिओपात्रा ...

[ पृष्ठ ८ वरून चालू ]

आहे ? उद्या तो रोमचे प्रजासत्ताक नष्ट करण्यासाठी परतणार नाही कशावरून ? "

एक दिवस वारा अनुकूल असताना सीझरने इजिप्तचा किनारा सोडला व तो रोमकडे रवाना झाला त्याला निरोप देण्यासाठी क्लिओपात्रा मुलासह किनाऱ्यावर आली होती. त्याने आपल्या गळ्यातील साखळी काढली व तीत असलेली असलेली पॉम्पेच्या बोटातील अत्य सस्कारापूर्वी काढून घेतलेली आगठी आपल्या मुलाच्या इवल्याशा मुठीत ठेवली.

" आम्हाला कधी नेणार ? " क्लिओपात्राने विचारले.

" ते कठिण आहे परंतु तू रोममध्ये लौकरच यावेस अशी माझी इच्छा आहे. थोड्याच दिवसात मी व्यवस्था करतो. " झपाट्याने एवढेच सागून सीझरने पत्नीचा निरोप घेतला.

आपल्या मुलाच्या संरक्षणार्थ रुफियोला मागे ठेवून सीझर रोमकडे रवाना झाला.

' थोड्याच दिवसात तुम्हाला रोमला नेईन ' असे आश्वासन सीझरने राणीला दिले खरे, परतु सीझरने इजिप्त सोडले व तो युद्धातच गुतला. त्याला रोमला परत यायला दोन वर्षे लागली. त्याने युद्धात मिळविलेल्या विजयाबद्दल त्याला ' रोमचा सर्वाधिकारी ' हा किताब देऊन प्रतिनिधि-गृहाने त्याचा सन्मान केला, या बातम्या इजिप्तमध्ये क्लिओपात्राच्या कानावर गेल्या आणि ती सुखावली.

रोम व इजिप्त याचे एकीकरण घडवावयाचे जे स्वप्न तिने उराशी बाळगले होते ते बरेचसे आवाक्यात आले असे तिला वाटले. तिला आनद लपवता येईना. अखेर रुफिओने सागितले—

" महाराणी, हुकुमशहा आणि राजा यात रोमन फरक करतात. राजा म्हणजे तो मालकच ! कोणत्याही रोमन माणसाला हे पसत पडणार नाही. सीझर राजा झालेला नाही. तो फक्त सर्वाधिकारी झालेला आहे. "

या खुलाशामुळे ती विचारात पडली. म्हणजे सीझर रोमचा राजा नव्हताच !

तिने आपला सल्लागार सोसिजेन्सला बोलावले. त्याने प्रत्येक रोमन लोकप्रतिनिधीच्या खाजगी कर्जाची यादी केली. प्रत्येकाचे कर्ज फिटेल इतके सोनें सोसिजेन्सकडे दिले. तिने सोसिजेन्सला सागितले,

" किमान निम्मे लोकप्रतिनिधी माझे ऋणको राहतील अशी व्यवस्था तुम्हाला या सोन्याने करता येईल. मला व माझ्या मुलाला निमत्रण देण्याचा प्रश्न रोमच्या लोकप्रतिनिधीपुढे चर्चेला येईल. त्याच्या आधी हे झाले पाहिजे. "

इजिप्तच्या राणीला निमंत्रण देण्याचा निर्णय घेण्यात आला तेव्हा शहरात कुजबुज सुरू झाली. परंतु प्रत्यक्ष लाचलुचपत झाल्याचा पुरावा मात्र पुढे आला नाही. क्लिओपात्राच्या या सुवर्णप्रयोगाची हकिगत जेव्हा सीझरला समजली तेव्हा त्याला क्लिओपात्राचे कौतुक वाटले. फक्त काहीना ही गोष्ट आवडली नाही.

क्लिओपात्राच्या शाही स्वागताची जंगी तयारी झाली. कल्पुर्नियासुद्धा स्वागतासाठी हजर होती. लोकप्रतिनिधी सपत्निक आपापल्या मानाप्रमाणे बसले होते. शिंग फुकले गेले आणि इजिप्तची राणी इतमामाने लवाजम्यासह रोममध्ये आली.

हजारो गुलाम प्रचड शिसवी रथ ओढू लागले. त्यात सुवर्णवस्त्रालंकार घालून दोन व्यक्ती बसलेल्या होत्या. राणी क्लिओपात्रा आणि राजपुत्र सीझॅरीऑन.

रथ जवळ आला. आपल्या मुलाकडे पाहात सीझर हळू आवाजात अँटनीला म्हणाला, " किती मोठा झाला हा ! "

रथ थाबला. सीझरने उत्थापन दिले. सर्व प्रतिनिधीना उठावेच लागले. सर्व जनसमर्द आनंदातिशयाने राणीचा जयजयकार करू लागला.

त्या जयजयकारात अँटनी सीझरला हळूच म्हणाला,

" तुमच्या राणीने रोम जिंकले आहे—"

## : ३ :

सीझरने रोम शहराबाहेरील एक सुदर महालात क्लिओपात्राची व्यवस्था केली. तिला व आपल्या मुलाला भेटण्यासाठी तो रोज तेथे जाई. या भेटीच्या रात्री सीझरच्या आयुष्यातील आत्यंतिक सुखाच्या अशा जात होत्या. परतु क्लिओपात्राची महत्त्वाकाक्षा तिला अस्वस्थ करीतच होती. केवळ सीझरवर तिचे प्रेम नव्हते. तिचे प्रेम होते तिच्या स्वप्नावर. रोम व इजिप्त याच्या कायम मीलनावर ! यासाठी सीझरने स्वत:ला रोमचा राजा म्हणून राज्याभिषेक करून घ्यावा असा तिने त्याच्यामागे लकडा लावला. तरीही सीझरच्या आनंदात कोणताच व्यत्यय येऊ नये एवढी सुखाची अपूर्वाई त्याला वाटत होती. सीझर तिला म्हणे —

" इतके दिवस तू दूर होतीस. परंतु तुझे चेटुक बद झाले नव्हते. आता तुझ्या जादूचा प्रभाव पुरा झाला आहे. मला तुझी गरज आहे. फार फार गरज आहे — " हाच सीझर एकदा म्हणाला होता की या सीझरला कुणाचीच फार काळ गरज राहात नाही !

आर्केसिलॉस या शिल्पकाराने ईजिप्तच्या राणीचा पुतळा तयार केला. सीझर कल्पुर्नियापासून घटस्फोट घेणार असून क्लिओपात्राबरोबर आपल्या विवाहाला मान्यता मिळावी म्हणून आग्रह धरणार असल्याची बातमी पसरली. हे खरे नसल्याचे क्लिओपात्राला माहीत होते. परतु रोमचा मात्र या बातमीवर विश्वास बसला व विरोध प्रकट होऊ लागला. सीझरचा आजार वाढला असल्याचीही बातमी पसरली. क्लिओपात्राला वाटे, त्याच्या आजारावरील उपाय एकच. अन् तो म्हणजे रोमचे राज्यपद. सीझर ते मिळवू शकेल याची पण तिला खात्री होती; कारण तो अनभिषिक्त राजा होताच ना ! क्लिओपात्रा एकदा सोसिजेन्सला म्हणाली देखील,

" सीझरच्या स्वत:च्या पलटणी आहेत. त्याच्या साहाय्याने तो रोम जिंकू शकतो "

" तो असे करील असे वाटते आपल्याला ? आणि आपण येथे राहणे तरी आवश्यक आहे का ? " सोसिजेन्सने सूचक इशारा दिला.

सीझरची महत्त्वाकाक्षा जागृत ठेवायची असेल तर आपण रोममध्ये राहणेच आवश्यक आहे हे क्लिओपात्रा जाणून होती. अलीकडे सीझरच्या मागे तिने राज्यपदाचे टुमणे चालूच ठेवले तर दुसरीकडे सीनेटर्सना मेजवान्या देण्यास सुरुवात केली. आश्चर्य म्हणजे कोणाही सीनेटरला आमत्रण नाकारणे शक्य झाले नाही. मार्च महिन्यातील एका रात्री अमाच समारभ चालू असताना तर सीझर त्या सीनेटर्सच्या अगावर ओरडलाच.

" माझा शब्द हाच कायदा झाला पाहिजे.



**पॉम्पेच्या पुतळ्याच्या पायाशी...... "ब्रूटस् ! अरे तू सुद्धा " सीझर !**

कारण माझ्या शब्दानेच रोमचे भले होणार आहे. तसे नसेल तर मला दिलेली सर्वाधिकाराची सनद निरर्थक आहे; ती परत घ्या !"

"सीझरचा सर्वोच्च सन्मान करण्यासाठीच केवळ हा किताब दिला होता.." ब्रूटसने आठवण दिली.

"मला असले निरर्थक अधिकार नकोत. मी जन्मभर रोमची सेवा केली आहे. आता मला त्याची पावती पाहिजे. तुम्ही मला रोमचा सम्राट नेमले पाहिजे." सीझरने ठामपणे आपली मागणी मांडली.

सीझरच्या या मागणीने सर्वांना आश्चर्याचा मोठा धक्का बसला. क्लिओपात्राच्या हे लक्षात आले. सीझरचा निष्ठावंत सहकारी मार्क अँटनी देखील या मागणीमुळे हादरला. शहरात चर्चा सुरू झाली.

क्लिओपात्राच्या महालाच्या खासगी बागेत सीझर आपल्या मुलाला राजपदाला योग्य असे शिक्षण देऊ लागला.

" सीझॅरिऑन, तू राजासारखं चाललं पाहिजे." तो अभिमानाने मुलाला सांगत असे, " मान ताठ ठेवावी ! हा बघ तुझा जयजयकार सुरु झाला ! तू सिंहासनावर बसलेला आहेस ! सर्वजण तुझ्यापुढे गुडघे टेकताहेत. कैद्यांना तुझ्यापुढे आणण्यात येते. हा पहा तुझा विश्वासू मित्र--आता उलटला आहे ! सांग ह्याला काय शिक्षा देशील ?" सीझॅरिऑनने देहांताच्या सजेची खूण केली आणि हे पाहून सीझरला मनस्वी आनंद झाला.

सीझरला कल्पनाही नव्हती की त्याला स्वतःलाच देहान्त शासन व्हावे अशी सूचना त्याच्या विरोधकांनी केली होती ! एक दिवस सकाळी सीझर सीनेटच्या इमारतीकडे जात असता सुमारे बारा लोकांनी त्याच्यावर सुरे चालवले. ही खूण कुणाची होती ? सीझर या जगातून नाहीसा झाला ! खुनी कोण होते ? या प्रश्नाचे निश्चित उत्तर क्लिओपात्राला कधीच सापडले नाही. भर दिवसा खून झाला होता. यामागे कुणाचे हात आहेत याची स्पष्ट कल्पना अनेकांना होती. सिंबर, कॅशिअस, कास्का, डेसिमस आणि बहुधा ब्रूटस् या कल्पनेचे सूत्रधार असावेत.

सीझरवर प्रेम असणाऱ्या जमावाने "सीझर !" सीऽऽझर असा केलेला आक्रोश क्लिओपात्राच्या कानावर गेला. त्याच्यामागोमाग भयभीत झालेले नोकर धावत आले. पॉम्पेच्या पुतळ्याच्या पायाशी सीझरचा देह पडला आहे अशी बातमी त्यांनी आणली. मार्क अँटनी लोकांना हल्लेखोरांचा सूड घेण्यासाठी आवाहन करीत करीत होता असे क्लिओपात्राला समजले.

भडकलेला जमाव कोणावर प्रहार करील हे काय सांगता येते ? सायंकाळपर्यंत क्लिओपात्राच्या प्रयाणाची तयारी झाली. तिचे सामान जहाजावर चढविण्यात आले. जहाजे हाकारण्याची सिद्धता झाली. थकलेला, धुळीने माखलेला अँटनी क्लिओपात्राला निरोप देण्यासाठी आला.

" मी आपल्याबरोबर थोडे सैनिक देतो म्हणजे आपल्याला घाबरण्याचे कारण नाही." अँटनीने सुचवले.

" घाबरण्याचे कारण नाही ? सीझरने आपल्या मृत्युपत्रात ऑक्टेव्हियनला आपला वारस नेमले आहे ना ? " क्लिओपात्राने त्याला सरळच छेडले.

" सीझरचे मृत्युपत्र मला माहित आहे. तुमच्या दोघांच्या संरक्षणासाठीच असे करण्यात आले आहे. सीझर जर खरेच राजा झाला असता तर त्याने ऑक्टेव्हियनला वारस नेमले असते असे आपल्याला वाटते का ? " अँटनीने विचारले.

" ते काही असो. आता तर संपले आहे. सीझरबरोबर त्याच्या स्वप्नांचाही खून झाला. मागे अलेक्झांडर मेला, आता सीझर ! संपले ! सगळे सगळे संपले ! ! ! "

क्लिओपात्राचे दुःख फार मोठे होते

" इतक्यात धीर सोडून कसे चालेल ? " अँटनीने तिचा हात हातात घेतला, " प्रथम रोममध्ये सुव्यवस्था प्रस्थापित केली पाहिजे, फरारींना शोधून आणून शासन केले पाहिजे. नंतर सीझरचा पुत्र म्हणून सीझॅरिऑन आपला हक्क सांगू शकेल. त्याचे हक्क मी स्वतः सीनेटला सादर करीन. "

" हे सर्व आपण कराल. परंतु सीनेटने हक्क फेटाळला तर ? मी व माझा मुलगा रोमवर चढाई का करणार आहोत ? "

क्लिओपात्राचा विषाद अँटनीला समजत होता. ती वळण्यापूर्वी तिने एक रेशमी रुमाल अँटनीच्या हातात ठेवला. संथपणे ती बोटीत आपल्या मुलाजवळ गेली. बोटीचे नांगर ओढले गेले. जहाजे सुटली. अँटनी मात्र काळोखात त्या दिशेकडे पहात कितीतरी वेळ उभा होता !

वर्ष दोन वर्षात अँटनीने सीझरच्या खुनींचा सारखा पाठलाग करून त्यांना जेरीस आणले. मॅसेडोनियामध्ये फिलिपी येथे लढाईला तोंड लागले आणि त्यात त्यांचा संपूर्ण बीमोड झाला. या बाबतच्या बातम्या वारंवार इजिप्तमध्ये येऊन थडकत होत्या. ऑक्टेव्हियन, लेपिड्स व अँटनी या त्रिमूर्तीने



दोघेहि जिंकले; दोघेहि हरले

रोमचे साम्राज्य राखले.

ऑक्टेव्हियनने सर्व सत्ता आपल्या हातात ठेवल्याची कुरबूर जाणकारांत सुरू झाली. रोम ऑक्टेव्हियनच्या ताब्यांत, स्पेन व आफ्रिकेवर लेपिडसची सत्ता आणि अँटनीकडे पूर्वेचे गबर साम्राज्य अशी वाटणी झाली होती. परंतु अँटनी क्लिओपात्राची स्वप्ने पाहत होता!

अँटनीला वाटे सीझरचा सर्वच वारसा आपल्याकडे यावा– क्लिओपात्रेसह! रुफिओ आता त्याचा उजवा हात होता. त्याचा सल्ला त्याने विचारला —

"मी तिला बोलावले तर ती माझ्याकडे येईल का? ... सीझरने बोलावले, ती आली होती ... तुला काय वाटते?"

"ती का आली हे कधीच कोणाला सांगता येणार नाही!" रुफिओ पुटपुटला. दारूच्या पेल्याकडे एकटक पहात बसलेल्या अँटनीच्या कानापर्यंत ते वाक्य पोहोचले की नाही कोण जाणे!

क्लिओपात्रा परतल्यापासून अलेक्झांड्रियात एक प्रचंड दगडी इमारत बांधण्याचे काम सुरू होते. येथेच राणीचे मृत्यूनंतर दफन व्हावे अशी योजना होती. सीझरचा एक सुवर्णपुतळा तयार करण्यात आला आणि समुद्राकडे तोंड करून तो या इमारतीत उभारण्यात आला. आता सीझरचे अस्तित्व केवळ नाण्यावरील मुद्रेच्या रूपानेच उरले आहे याची जाणीव झाली की क्लिओपात्रेला भडभडून येई.

तिची निष्ठा पाहून सॉसिजेन्स काळजीत पडला.

"आपण मृत्यूविषयी इतक्या आत्मीयतेने आणि प्रेमाने बोलता आहा, की जणू काही तो एक प्रियकरच आपल्या भेटीला येणार आहे!"

"तुम्हांला हे समजावयास हवे की हे स्मारक म्हणजे शेवट नव्हे! सुरुवात आहे! माझ्या मुलाच्या आधिपत्याखाली एक जग, एक जनता आणि अलेक्झांड्रिया त्याची राजधानी!"

"आपले आणि सीझरचे हे स्वप्न होते! आता आपले एकटीचेच म्हणायला हवे!" म्हाताऱ्याने निःश्वास सोडला.

"आणि अँटनीचे पण...! जग जिंकण्याचे सामर्थ्य त्याच्यापाशीही आहे. तो आल्याशिवाय राहणार नाही!"

तिची कल्पना खरी ठरली होती. जगातील सर्वोत्तम मद्य अँटनीच्या जिभेचे लाड भागवीत होते! चंद्रमुखी प्रमदा त्याला रिझवीत होत्या. तो सुखात लोळत होता. असे असताना एकाएकी त्याला जाणीव झाली–सैन्याला पुरेसे अन्न नव्हते, पगार द्यायला सोने नव्हते. रोममध्ये ऑक्टेव्हियनने लेपिडसला पदभ्रष्ट केले होते आणि त्याची पावले अँटनीविरुद्ध जाणार, हे दिसत होते. त्याने नाखुषीने क्लिओपात्रेला आणण्यासाठी रुफियोला पाठविले.

अँटनी डोळ्यात प्राण आणून चातकाप्रमाणे तिची वाट पाहू लागला! त्याने फार वाट पाहिली. दिवस गेले, आठवडे गेले, महिने गेले, ती आली नाही. निराशा, निराशा आणि निराशा! किती वाट पाहायची! अखेर एकदाचा रुफियो आला, फक्त तिचा निरोप घेऊन. ती इजिप्तची राणी होती, अँटनीला तिला भेटावयाचे असेल तर त्यानेच तिच्याकडे गेले पाहिजे, ही गोष्ट राणीने स्पष्टपणे कळविली होती.

क्लिओपात्रेची इच्छा होती, की अँटनीने प्रथम हालचाल करावी. तिचा मान राखून करावी. आपले स्वप्न पुरे करण्यासाठी तिला जितकी अँटनीची गरज होती तितकी त्याला क्लिओपात्राची होती.

तिने विचार केला, फार ताणून धरण्याची ही वेळ नव्हे, निमंत्रण आले आहे त्याला किंचित् प्रतिसाद द्यावा. तेव्हा तिने लवाजम्यासह जहाजे हाकारली. टारस बंदरात तिचे भव्य स्वागत करण्यात आले. अँटनी गोंधळला; परंतु तिच्या आगमनाने त्याला खूप आनंद झाला. त्याने जिंकली होती! ती आपण होऊन त्याच्याकडे अखेर आली होती.



**"अॅन्टनी कोण आहे ?"... मदिरा आणि मदिराक्षीच्या सहवासात बुडून गेलेला एक वीर**

" रुफियो, तिच्या सन्मानार्थ राजवाड्यात आज शाही मेजवानी होईल, माझ्यातर्फे तिला निमंत्रण दे. " अँटनीने हुकुम दिला.

ती ज्या जहाजात होती ते जहाज बंदराजवळ होते. पण ते धक्क्याला लावण्यात आले नव्हते. जहाजाच्या डेकवरून ओरडून सोसिजेन्सने सांगितले,

" राणी क्लिओपात्रा समुद्रात, परंतु इजिप्त-च्या हद्दीत आहे आणि तेथेच ती राहू इच्छते. अँटनीमहाराज जर राणीसाहेबांना भेटू इच्छित असतील तर त्यांनी इजिप्तमध्ये आले पाहिजे. तिचे जहाज इजिप्तच्या हद्दीतच उभे आहे. "

" आणि त्यांनी नकार दिला तर ? बहुधा ही गोष्ट अँटनी मानणार नाही. " रुफियोने विचारले.

" तसे झाले तर तावडतोब अलेक्झांड्रियात परतण्याचा राणीसाहेबांचा हुकुम आहे. " धक्क्यावरील सर्व लोकांना ऐकू जाईल एवढ्या मोठ्या आवाजात तो सांगू लागला—

" आमच्यामागून आणखी जहाजे येत आहेत. त्यांतून टारसच्या नागरिकांसाठी खास नजराणे आणलेले आहेत. ती जहाजे काय परत पाठविणार ? आम्हांला खेद वाटेल. तेव्हा आपणच सर्वांनी आज रात्री या जहाजावर क्लिओपात्राचा पाहुणचार स्वीकारावा. "

रणांगणावरील सेनापती अँटनीवर क्लिओ-पात्राने अखेर मात केली होती. विचारांती काहीशा घुश्श्यातच तो तिच्या जहाजावर रात्री आला. त्याच्याबरोबर त्याचा अधि-कारी वर्ग आणि नजराण्यांची वाट पाहणारे नागरिक होते. अँटनी आला याची खात्री पटताच क्लिओपात्रा आपल्या खोलीतून त्याला भेटण्यासाठी बाहेर आली. अँटनीने पहिला दृष्टिक्षेप टाकला आणि त्याचे अभि-मानाचे कवच गळून पडले !

मेजवानीचा थाट इतका नेत्रदीपक होता की तो पाहून रोमन अधिकारी थक्क झाले ! उत्तम प्रतीची दारू व अन्न, सर्वोत्तम नर्तक-पथक, सोने आणि पाचूंचा चमचमाट आणि मनाला वेड लावणारे संगीत ! अँटनी बेहोष झाला. क्लिओपात्राच्या नजीक जाऊन वाकून तो पुटपुटला, " मी जाण्याचा बहाणा केला की सर्व मंडळी जातील. मग मी थोड्या वेळाने परत येतो. "

" आता फार उशीर झाला आहे ! सूर्यो-दयाला तर आम्ही अलेक्झांड्रियाकडे कूच करणार ! " ती म्हणाली.

" म्हणजे माझे लोकात हसू व्हावे एव-ढ्याचसाठी का तू एकच रात्र येथे आली आहेस ?" अँटनी नाराजीने म्हणाला.

" कोण लोक ? ही आसपास लोळणारी डुकरे म्हणजे का तुझे जग आहे ? आणि माझ्याबरोबर एक रात्र घालवूनही आपण मूर्खपणा केला असे तुला वाटणार नाही हे कशावरून ?" क्लिओपात्राने स्पष्टच विचारले.

" तुझ्याबरोबर मला बोलताच येत नाही. अजून थोडे दिवस तरी राहा ना ! " अँटनीने आशेने विनवले.

" अँटनी, अँटनी ! तुला कसे सांगू ? ऑक्टेव्हियन तिकडे रोमन साम्राज्याचा मालक बनला असताना मी येथे कशी राहू ?" अनि-च्छेने तिने त्याची विनवणी नाकारली.

जहाजावरील वातावरण क्षणाक्षणाला जास्त बेहोष होत होते. सर्वजण नृत्य पाहा-ण्यात दंग झाले होते. क्लिओपात्रा उठून आपल्या खोलीकडे निघाली. अँटनीने एका नर्तिकेला जवळ ओढले आणि तिलाच तो मिठी मारून बसला. राणी निघून गेल्याचे बऱ्याच वेळाने त्याच्या लक्षात आले. झोकांड्या खात तो तिच्या शाही अन्तःपुरात गेला.

तो आला तेव्हा आपण त्याच्या आगमना-मुळेच जागे झालो असा तिने बहाणा केला. तिच्या अंगावर वस्त्र होते असे म्हणायचे इतकेच.

" नृत्य संपले वाटते ? बराय, पुन्हा केव्हा तरी भेटू..." जांभई देत राणी म्हणाली.

" केव्हातरी कशाला ? ...... आत्ता, यावेळी——!" भरलेल्या आवाजात अँटनी म्हणाला. त्याच्या मनातली कोंडलेली सगळी भीती आणि महत्त्वाकांक्षा बांध फुटून बाहेर पडू लागली.

" सीझर, सीझर ! जगज्जेता ! त्याच्या-इतका शूर व शक्तिशाली व विद्वान दुसरा होणार नाही. त्याने जग सर्वप्रथम जिंकून दाखवले. त्याचीच छाया सदैव माझ्यावर राहील !"

ती हळूहळू उठून बसली. त्याच्याकडे निर-खून पाहू लागली. प्रसंगाला अशी कलाटणी मिळेल असे तिला वाटले नव्हते. आता सीझ-रच्या नामोल्लेखाने अँटनीला डिवचण्याचे कारणच उरणार नव्हते. जे जे सीझरला हवे होते त्याच्यासाठी भुकेलेला—पेटलेला अँटनीच तिच्यापुढे उभा होता. भिंतीकडे तोंड करून अँटनी तेवढ्यात गरजला,

" अँटनी कोण आहे ?" जणू काही भिंती-नेच उत्तर द्यावे असा तो पुनः ओरडला, " सीझरची, छाया ! सीझरचा वारस !"

" माझा नाश करून सीझरला जिंकण्याचा

वेत आहे तर !" तिने शंका विचारली.

" माझ्या जीवनात आता केवळ तू आहेस." आता तो तिच्याजवळ बिछान्यावर आडवा झाला. " मला तुझ्या मिठीतून मुक्त व्हायचे आहे. पण ते आता शक्य नाही." त्याने तिला जवळ ओढले व तिचे दीर्घ चुंबन घेतले. तो शांत झाला.

सूर्योदयापर्यंत तो तिच्या सान्निध्यात होता. " मी प्रथम तुला पाहिले तेव्हापासून तू मला हवी होतीस." पहाटेच्या धूसर प्रकाशात त्याने कबुली दिली !

तिची नाजुक बोटे त्याच्या राकट चेहऱ्यावर फिरत होती. उभयताच्या आयुष्यात प्रथमच खरेखुरे प्रेम अवतरले होते.

## : ४ :

रोमची जनता अद्याप अँटनीला मान देत होती. मात्र तो क्लिओपात्राकडे जाताच त्याच्या दृष्टीआड एक नवीनच सृष्टी निर्माण होत होती. रोमच्या सीनेटमध्ये ऑक्टेव्हियन त्याच्याविरुद्ध वातावरण तयार करू लागला. रोमचा टारसमधील अनागोंदी कारभार आणि पामिरामधील बंड या गोष्टीकडे अँटनीचे दुर्लक्ष होत आहे आणि आपला शूर वीर अँटनी सीझरच्या रखेलीबरोबर प्रेम करीत बसला आहे असा ऑक्टेव्हियनने प्रचार सुरू केला. अँटनीचा अलेक्झांड्रियातील प्रत्येक दिवस त्याच्या प्रतिस्पर्ध्याच्या पथ्यावर पडत होता.

मात्र क्लिओपात्रा फार सुखात होती. आयुष्यात प्रथमच 'स्त्री' म्हणून ती सुख उपभोगीत होती. या विलासात ती आपली महत्त्वाकांक्षाही काहीकाळ विसरल्यासारखी झाली. अँटनीचा रोममधील प्रिय मित्र जरमॅनिकस तातडीने अँटनीकडे आला. रोममधील घडामोडी त्याने निवेदन केल्या व अँटनीने ताबडतोब रोमला परतावे अशी विनती केली. जरमॅनिकसने सांगितलेल्या बातम्या ऐकून क्लिओपात्राने अँन्टनीच्या प्रयाणाची तयारी केली. कारण आपल्या मुलाचे, सीझेरियॉनचे भवितव्य, अँटनीवरच अवलंबून असल्याचे ती पक्के ओळखून होती.

"तुम्ही आता जाता आहात, पण फार काळ तिकडे राहणार नाही ना ?" राणीने व्याकुळ होऊन विचारले. ताटातुटीचे दुःख तिला भेडसावू लागले. "अँटनी, माझ्या थडग्याचा पाया खोदीत असताना कामगारांना एक भिंत सापडली. तीवर खोदले होते, 'तू काल रात्री येथे नव्हतास, मला झोप लागली नाही; तू आज रात्री तरी येशील ना ?' अँटनी, ते दोघे पुन्हा भेटले का रे ?" तिने आर्ततेने विचारले.

त्याने तिला जवळ घेतली. " राणी, मला वाटतं तुझा सहवास कधी संपूच नये—"

"ऑक्टेव्हियनशी जपून वाग अँटनी ! तुझा हिस्सा सोडू नको, सीनेटने तुझे किताब व अधिकार निश्चित ठरवले पाहिजेत. तुझ्या अधिकारावर कोणी आक्रमण करता कामा नये. अँटनी, तुझ्याशिवाय मी कशी रे जगू ?"

"जसा मी राहीन तशीच तू राहा ! विरहाचा प्रत्येक क्षण आपल्याला जास्त जवळ आणील." अँटनी तिला धीर देत म्हणाला.

अशा आठवणींची सोबत घरून क्लिओपात्राने एक वर्ष काढले. रोममधून बातम्या येत होत्या. ऑक्टेव्हियन अँटनीशी उघड संघर्ष टाळीत होता. ब्रुंडिझियम येथे तो मोठ्या लवाजम्यानिशी त्याला सामोरा गेला व अँटनीचे त्याने सन्मानाने स्वागत केले.

परंतु वर्ष संपते न संपते तोच एक जासूद बातमी घेऊन राणीकडे पोहोचला—

'लॉर्ड अँटनी आणि ऑक्टेव्हियन यांच्यांत एक महत्त्वपूर्ण करार झाला आहे. अँटनीने आणखी दहा पलटणी घेतल्या व पूर्वेकडील सबंध साम्राज्याचा तो स्वामी झाला आहे. इजिप्त हे रोमचे मित्रराष्ट्र राहील. आणि अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे, ऑक्टेव्हियनची बहीण ऑक्टेव्हिया व लॉर्ड अँटनी याचा शाही इतमामाने विवाह उरकण्यात आला आहे......!'

"एवढेच ?" तिने मनावर ताबा ठेवीत विचारले.

"दोन्ही राष्ट्रांतील संबंध दृढ करण्यासाठीं लॉर्ड अँटनी अलेक्झांड्रियाला येत आहेत." पुढची बातमी जासुदाने सांगून टाकली.

"ठीक आहे." तिने जासुदाला रजा दिली. जेव्हा ती खोलीत एकटीच राहिली तेव्हा तिचे कोंडलेले दु.ख उमाळून वर आले. याच खोलीत तिने अँटनीबरोबर रात्री घालवल्या होत्या. त्याच्याबरोबर अत्युच्च सुखाचा अनुभव घेतला होता. त्या क्षणाला तिला त्या सर्व आठवणी असह्य झाल्या. ती संतापाने बेभान झाली. तिने एक जंबिया घेतला. आणि ज्या बिछान्यावर अँटनीबरोबर सुखाचे क्षण घालवले होते त्या बिछान्यावर जंबियाचे वार केले, अँटनीच्या प्रत्यक आठवणीवर तिने जंबिया चालविला. लाकडी घोड्यावरच्या अँटनीच्या कपड्याच्या तिने चिंध्या केल्या.

"अँटनी—" प्रतारणेच्या दुःखाच्या भरात ती ओरडली. जणू तो तिचा आवाज सातासमुद्रापलीकडे जाणार होता.

अँटनी पुन्हा अलेक्झांड्रियाला परतला. परंतु राणीने परत आलेल्या प्रियकर याचा अशा उत्सुकतेने स्वागत केले नाही. क्लिओपात्राला पुरुषांना खेळवण्याची, कबजा मिळविण्याची सगळी तंत्रे अवगत होती. त्याला तब्बल तीन दिवस तिने साधे दरबारी दर्शनही घेऊ दिले नाही. ती थंड राहिली. जेव्हा भेट झाली तेव्हा तिने ही गोष्ट स्पष्ट केली, की इजिप्तच्या मैत्रीशिवाय त्याच्या अधिकाराखाली दिले गेलेले प्रदेश सुरक्षित राहणे कठीण आहे. तिने बजावले—

"मैत्रीचा करार इजिप्त करील. परंतु जर इजिप्त मागेल ते भूभाग तुम्ही आम्हांला दिलेत तरच !" तिने जवळ जवळ एक-तृतीयांश साम्राज्याचा लचका मागितला.

अँन्टनी चिडला. रागाने लाल झाला. क्लिओपात्रेला हेच हवे होते. पुरुष काय आणि लोखंड काय, लाल असतानाच वाकवावे लागते. तिने त्याच्याकडे रोखून पाहात सांगितले,—

"तुम्ही तुमच्या रोममधील मालकाचा सल्ला घेऊन काय ते ठरवा ! ऑक्टेव्हिअन तुमचा मालक ..... !"

अँटनी उमगला. त्याने राग गिळला. पुन्हा तो तिला भेटायला आला त्या वेळी राणी आपले सुंदर थडगे न्याहाळीत होती. बांधकाम आता संपत होते. अँटनी जवळ जाऊन तिला म्हणाला—

"क्लिओ, रोममध्ये ऑक्टेव्हिअन आज माझ्यापेक्षा बलाढ्य आहे. मला याची नीटशी कल्पना नव्हती. त्यामुळे मला दुसरा पर्यायच उरला नाही. रोमन लोकांना यादवी नको होती. मी ऑक्टेव्हियाशी लग्न केले ते केवळ ऑक्टेव्हिअनच्या समाधानासाठी. लोकात आमच्या संबंधाविषयी विश्वास पसरावा म्हणून केवळ ! मी इथे आलो तरी लोक तिकडे आमच्या लग्नाचा उत्सव साजरा करीत

आहेत. अशा लोकांना दुखवणे मला कसे शक्य होते ? ”

“ तुम्हाला मला नकार देता येतो–मग त्या वेळी तोंड का बाघले होते ? ” राणीने उलट जवाब मागितला.

“ मी त्याचे ऐकले नसते तर रोम व माझ्यात वितुष्ट माजले असते. ”

“ ते माजू नये म्हणून तुम्ही रोम आणि सगळे जग–ऑक्टेव्हिअनच्या हवाली करून मोकळे झालात ! आता मालकाच्या पायावर लोळण घ्या म्हणजे झाले ! ”

“ माझ्यावर तुझ्याशिवाय कुणाचीही मालकी नाही–” अँटनी समजूत घालीत पुढे म्हणाला, “ तुझे प्रेम याशिवाय अन्य स्वामी मला नाही ! ”

“ प्रेमाला मी कधीच स्वामित्व देऊ शकणार नाही ! ऑक्टेव्हिअनला कुणी स्वामी असेलच......! ” क्लिओपात्रा.

“ आहे ! रोमचे सम्राट व्हावे–देवासारखी सत्ता गाजवावी या महत्त्वाकांक्षेचा तो दास आहे......! ” अँटनी.

“ मग त्याच्या मार्गात आता आहेत कोण? तुम्ही, मी आणि माझा मुलगा सीझरचा स्वतःचा वारस ! आपल्या बहिणीशी तुमचे लग्न लावून पर्यायाने ऑक्टेव्हिअनने मला तुमची रखेली ठरवले आहे ! ” राणी संतापाने वाक्ताडन करीत होती.

“ माझा उद्देश चांगला होता. तू म्हणतेस तसे काही व्हावे अशी माझी इच्छा नव्हती. मला फक्त तुझ्या सहवासात सुखाने राहायचे आहे. तुझ्या ज्या अटी असतील त्या साग, मी त्याप्रमाणे वागेन ”

अँटनीची ही सपूर्ण शरणागती पदरात पडताच क्लिओपात्राचे समाधान झाले. तिने आपली इच्छा सागितली.

“ प्रथम सीझरप्रमाणेच इजिप्शियन पद्धतीने तू माझ्याशी विवाह केला पाहिजेस. नतर तू सीझॅरियॉनला इजिप्तचा राजा जाहीर केले पाहिजेस. त्याच्या नावाने आपण दोघे राज्य चालवू. आणि मी मागितलेला प्रदेश तू इजिप्तला जोडला पाहिजेस. तुझा अधिकार सिद्ध करण्यासाठी तू हे केलेच पाहिजेस अँटनी ! तुला ही साधी गोष्ट कशी दिसत नाही ! ”

“ मला तुझ्याखेरीज आता काहीच दिसत नाही. ” असे म्हणत त्याने तिच्याकडे झेप घेतली.

अँटनी आणि क्लिओपात्रा याच्या विवाहाची बातमी रोममध्ये पोहोचताच सीनेटमध्ये संतापाची लाट उसळली. हा विवाह म्हणजे रोमचा उघड उघड अपमान होता. प्रदेश इजिप्तला जोडणे म्हणजे तर देशद्रोह होता. ऑक्टेव्हिअनने तर हे प्रकरण चागले पेटवले.

विवाह रद्द करून इजिप्तला जोडलेला मुलुख परत करावा अशी रोमने मागणी केली. अँटनीने अर्थात ही मागणी फेटाळली ! ऑक्टेव्हिअनला नेमकी हीच परिस्थिती हवी होती.

इजिप्तला जोडलेल्या मुलुखात इजिप्तविरुद्ध बंड उभारण्यासाठी ऑक्टेव्हिअनने गुप्त हेर पाठविले. अँटनीच्या पलटणीतील अधिकाऱ्यात लाचलुचपत सुरू केली. त्याने राज्यात करवाढ करून त्याची जबाबदारी मात्र अँटनीवर टाकली. अँटनीच्या पत्नीच्या–ऑक्टेव्हियनच्या परित्यक्ता स्थितीचा पद्धतशीर प्रचार सुरू केला.

युद्ध अटळ झाले. क्लिओपात्राने नौदल-उभारणीचा आदेश दिला. अँटनीने आपल्या पलटणी सज्ज करून ग्रीसमध्ये ऑक्टेव्हियनला गाठावे व त्याचा फडशा पाडावा म्हणून प्रयत्न सुरू केले. परतु अँटनी रोमविरुद्ध शस्त्र उचलण्यास तयार नव्हता.

सॉसिजेन्सने ऑक्टेव्हियनचा डाव ओळखला होता. राणीची परवानगी घेऊन तो रोमला शातिसदेश घेऊन गेला.

रोममध्ये अँटनीविरुद्ध इतके जहाल वातावरण तयार झाले होते, की लोक सीनेटच्या दाराशी धरणे धरून बसले होते. ऑक्टेव्हियनला हे सगळे पाहिजेच होते. त्याने आपला सोनेरी युद्धमाला उचलून इजिप्तच्या शातिदूताला मारला व त्याला कंठस्नान घातले तेव्हा जनता आनदाने बेहोश होऊन युद्धाच्या गर्जना करू लागली.

पुन्हा एकदा रोमन विरुद्ध रोमन असे युद्ध सुरू झाले. अँटनीने आपल्या सेनापतीशी युद्धाच्या विविध योजनावर चर्चा केली. शत्रू काय करील याचे आडाखे बांधले. त्याने रणवेश चढविला. युद्धाशिवाय आता दुसरा विषय नव्हता.

अॅन्टनीने ठरविले की ग्रीसमध्ये ससैन्य उतरावे व ऑक्टेव्हियनच्या सैन्याशी तेथेच मुकाबला करावा. इजिप्तची बलाढ्य लढाऊ जहाजे बंदरात सज्ज उभी होती. क्लिओपात्राची मनोमन अशी खात्री होती की तिच्या आरमारापुढे कोणताही शत्रू क्षणभरही टिकणार नाही. तिने अँटनीला गळ घातली की ऑक्टेव्हियनशी मुकाबला समुद्रावर करावा. ग्रीसमध्ये जमिनीवर युद्ध हे इजिप्तला फायद्याचे नाही.

नौदलप्रमुख युफ्रॅनोर याने इशारा दिला की आपली जहाजे अवाढव्य आहेत. लढाईला ती फारशी सोयीस्कर नाहीत. परंतु क्लिओपात्राने त्यालाच अधिकारावरून खाली ओढले. अँटनीने पहिला बेत बदलला व समुद्रात ऑक्टेव्हियनचे निशाण ज्या जहाजावर असेल त्याच जहाजावर धडक मारण्याचा बेत नक्की केला. समोरासमोर युद्धात ऑक्टेव्हियनचा बळी घ्यावा असा त्याचा मानस होता.

कॅनिडिअस, रुफिओ आदि अनुभवी मुत्सद्द्यांनी अन्टनीला पुन्हा पुन्हा सागितले, की समुद्रावरील युद्धाच्या भानगडीत त्याने पडू नये. परतु पुढला अनर्थ अटळ होता.

अँटनीने त्याच्या सल्ल्याकडे दुर्लक्ष केले व आपलाच हेका कायम ठेवला. कारण या हेक्याची भागीदारीण त्याची प्रेयसीही होती.

अँटनी युद्धवेष चढवत असता क्लिओपात्रा त्याला मदत करीत होती. चिलखत अंगावर चढवताच क्लिओपात्रा काहीशी चरकली. सीझर शरीराने जर्जर होता, परंतु त्याचे मन कणखर होते. या उलट अँटनीची स्थिती होती. त्याचे शरीर सीझरहून मजबूत असले तरी मनाने तो खचलेला होता. आदल्या दिवशी रात्री तो मदिरापान करून तर्र होऊन घरी आला तेव्हा झालेला सवाद तिला आठवला.

“ ऑक्टेव्हियनला आपल्या हल्ल्याची कल्पना तरी असेल का ? ” तिने क्षीणपणे विचारले.

अँटनी गंभीरपणे हसला, म्हणाला,

“ बहुधा नसेल. झोपेतच आम्ही त्याला गाठू. ”

“ मला भीती वाटते ! सारे ठीक झाले म्हणजे मिळवली... ” तिला त्याच्याकडून आत्मविश्वासपूर्ण साद हवी होती. परतु अँटनी म्हणाला, “ सगळे ठीक होईल. लढाई म्हटली की सर्व आलेच ! माणसे मारली जाणारच. फक्त आपल्यापेक्षा त्यांची जास्त मारली जातील येवढेच पहावयाचे ... ”

वेष पुरा झाला. क्लिओपात्रेच्या डोळ्यात

अश्रू जमा झाले होते. अँटनी म्हणाला,

" हे काय ? तुझ्या डोळ्यात पाणी ? "

" आतापर्यंत तुमच्यावाचून जीवन कसे राहील याचा मी विचार केला नव्हता ! समजा, तुम्ही आला नाही ! वीरमरण तुम्हाला आलेच तर मी देखील जगू शकणार नाही. ! "

" वेडी कुठली ! मग मला लढाईवरून परत यायलाच हवे. " अँन्टनीने तिला जवळ घेतले व तिच्या ओठावर त्याने आपले ओठ ठेवले.

युफ़ॅनोर आणि रुफिओ याना राणीजवळ ठेवून अँटनी लढाईवर गेला. एका जहाजावरून राणी नकाशावरून युद्धाच्या हालचाली समजावून घेऊ लागली.

दूर क्षितिजावर दोन्ही आरमाराची समोरासमोर लढाई जुपली हे तिला दिसत होते. तिने जासूद पाठविलेले होते. त्यानी बातमी आणली—

ऑक्टेव्हियनचे निशाण फडकवणारे जहाज पळ काढू लागले आहे व अँटनी त्याच्या मागावर निघालेला आहे.

आता राणीची उत्सुकता शिगेला पोचली होती. अँटनीने ऑक्टेव्हियनचा निकाल कसा लावला हे ऐकण्यासाठी ती अधीर झालेली होती.

परंतु घडले ते अघटितच ! ज्या जहाजावर ऑक्टेव्हियनचे निशाण होते त्या जहाजावर ऑक्टेव्हियन नव्हताच. अँटनीला खेळवत खेळवत त्या जहाजाने माऱ्याच्या ठिकाणी आणले. अँटननीने सभोवती पाहिले. चारही बाजूनी तो वेढला गेला होता. कमळाच्या पाकळ्या मिटाव्या तशा तऱ्हेने चारही अंगानी रेटा वाढू लागला. जळते गोळे अँन्टनीच्या काफिल्यावर पडू लागले. जहाजे पेटली. अँटनीची अवाढव्य गलबते धूमधडाड पेटू लागली.

राणीकडे वृत्त आले—

" अँन्टनीचे जहाज गेले—बुडाले—! "

रुफिओकडे वळून राणी म्हणाली,

" रुफिओ, याचा अर्थ अँन्टनी मृत्युमुखी पडला असाच करायचा ना ? "

रुफिओ बोलला नाही. जे होणार असे त्याच्या अनुभवी नजरेने ताडले होते ते प्रत्यक्ष झाले होते. तो भकास नजरेने तिच्याकडे पाहात राहिला. त्या नजरेने राणी काय समजावयाचे ते समजली. तिने हुकूम दिला,

" इजिप्तकडे एकदम जहाज हाकारा...! "

## : ५ :

राणी इजिप्तकडे परत निघालेली पाहताच अँन्टनीने आपल्या सैन्याला शत्रूच्या तडाख्यात सोडून युद्धातून पळ काढला. नौकेत बसून वेगाने तो अलेक्झाड्रियाच्या दिशेने निघाला. मार्क अँन्टनीने युद्धातून पळ काढला. अलेक्झाड्रियाच्या किनाऱ्यावर अँन्टनी शतपावली करताना लोकानी पाहिला. त्याचा चेहरा ओढगस्त झालेला होता. सर्वस्व गमावलेल्या आणि हताश झालेल्या अँन्टनीचे हे दर्शन मोठे करुणास्पद होते. तो चकार शब्द बोलत नव्हता.

त्याची पाठ फिरताच अँन्टनीच्याच पलटणी ऑक्टेव्हियनच्या बाजूला वळल्या. पूर्वेकडील मित्रानी विश्वासघात केला. रुफियोने या वार्ता राणीला निवेदन केल्या.

" ऑक्टेव्हियन इजिप्तमध्ये कधी येईल ? " तिने विचारले.

" तो आलेला आहेच. " रुफियोने खुलासा केला.

" रुफियो, आहे त्या स्थितीत माझ्या सैन्याचे नेतृत्व तू करशील ? " राणीची आशा अजून थाबत नव्हती.

" मी रोमन सेनापती आहे. रोमविरुद्ध लढण्याचा हुकूम मला एकच व्यक्ती करू शकते. अँन्टनीमहाराज काही बोलले का ? " रुफियोने विचारले.

रुफियोचा जवळजवळ हा नकारच ऐकून राणीचा उरलासुरला उपायही खुटल्यासारखा झाला. शेवटी तिने एक कठा काढून रुफियोच्या हातात दिला व ती भेट ऑक्टेव्हियनला नेऊन देण्यास सागितले. तसेच अँन्टनीला मोकळा सोडण्यासाठी इजिप्तशी कोणत्या अटीवर तो तह करावयास तयार आहे हे विचारावयास सागितले.

रुफियो गेल्यावर राणीला अँन्टनीचा शोध लागला. ती अँन्टनीला म्हणाली, " ऑक्टेव्हियन इजिप्तमध्ये येऊन पोहोचला आहे. अद्याप तुझ्या दोन पलटणी तुझ्याशी एकनिष्ठ आहेत. त्याच्या मदतीला लागतील तेवढे इजिप्शियन सैनिक घे. अँन्टनी, बोल ना ! माझ्याकडे असा कुत्सितपणे पाहतोस काय ? मी पळाले म्हणून ? मला कळले की तूच माघारी फिरलास ! "

" तुला कळले तेच बरोबर आहे. लढाईत शत्रूला पाठ दाखवणे म्हणजे असून नसल्यासारखेच आहे. " निर्जीव आवाजात अँन्टनीने उत्तर दिले.

इकडे ऑक्टेव्हियनने राणीची विनंती झिडकारली. त्याने सागितले, " तुझ्या राणीला साग, इजिप्त व इजिप्तचा सारा खजिना ठेव. परंतु सीझर अलेक्झाड्रियात आला तेव्हा त्याला दिलेली देणगी तुझ्या चागल्या वर्तणुकीसाठी ओलीस ठेव. "

रुफियोची पाठ फिरल्यावर ऑक्टेव्हियनचा एक नौदल अधिकारी ऑक्टेव्हियनला म्हणाला " अँन्टनीने राणीचा अपेक्षाभंग केला आहे. तो आता तिच्या मर्जीतून उतरला आहे. ती निश्चित् अँन्टनीला तुमच्या हवाली करील ! "

ऑक्टेव्हियन म्हणाला, " सिझॅरियॉन मोठा होईपर्यंतचा काळ पदरात पडावा यासाठी ती अँन्टनीला विकील. "

रुफियो परतला. सीझॅरियॉनला ओलीस ठेवण्याची कल्पना राणीला सहन झाली नाही. तिने एक सुवर्णाचे नाणे परत पाठवले. त्याच्या एका बाजूला तिच्या चेहऱ्याचा ठसा होता आणि दुसऱ्या बाजूला अँन्टनीचा. तिने ऑक्टेव्हियनला कळवले, "पाहिजे तर ही दोन्ही शिरे मिळतील." ऑक्टेव्हियनचा अदाज चुकला. अँन्टनीला सोडायला राणी राजी नव्हती.

राणी अँन्टनीला शोधत निघाली. तो नव्याने बाधण्यात येत असलेल्या राणीच्या थडग्याच्या इमारतीत एका फरशीवर झोपलेला तिला आढळला.

" जर तुझ्या जागी सीझर असता तर अशा गलितधैर्य स्थितीत तो कधीच आढळला नसता—" राणीने त्याला डिवचले.

" रोमबरोबर नव्या तहाची सुरुवात म्हणून तू माझे शिर का पाठवले नाहीस ? " अँन्टनी अखेर अँन्टनीच होता, सीझर नाही.

" मला तह नको. मला अँन्टनीच पाहिजे." राणी म्हणाली,

" पण त्या नावाचा कोणीच आता जिवंत स्थितीत नाही. तुला दिसते आहे ते केवळ अँन्टनीचे शव आहे. " अँन्टनी निराशेने म्हणाला.

हे ऐकताच तिने रागाच्या भरात त्याच्या थोबाडावर हाताने प्रहार केला. एक, दोन, तीन–प्रहार होतच राहिले.

अँटनी जागा झाला. राग अनावर होऊन त्यानेही तिच्यावर प्रहार केला. ती जमिनीवर पडली.

"अँन्टनी पळता पळता असा मेला! माझ्यावर प्रेम करणारे विचारतील, 'युद्धात जखमी होऊन, सागराच्या तळाशी जाऊन अँन्टनीने वीराचे मरण का पत्करले नाही?' त्याना मी हे सांगू का, की माझी प्रेयसी अदृश्य झाली तेव्हा मी मित्र, शत्रु, अभिमान, लाज सर्व सर्व विसरलो व तिच्यामागे धावलो म्हणून?" अँन्टनी रागाने, परामवाच्या लज्जेने व्यथित होऊन बोलत होता.

"अँन्टनी, तू ज्या प्रेमामागे धावलास, ते प्रेम तुझेच आहे रे! तुझ्याजवळच आहे!" राणी त्याच्याजवळ गेली.

परंतु निराशेने अर्धमेला झालेला अँन्टनी म्हणाला, "हे प्रेम फार महाग पडते आहे तुला. तुझ्या साम्राज्याचा त्यात बळी जातो आहे."

"जाऊ दे! ज्या जगात तू नाहीस ते जग जिंकण्याची मलाही आता इच्छा उरली नाही. ज्या जगात तू नाहीस त्या जगात मी पण जिवंत राहू शकणार नाही. मी तुझ्याबरोबर मरायला तयार आहे. पण तुला सोडून रहाणे आता मला शक्य नाही."

राणीचा हा निर्धार ऐकून अँन्टनीला समाधान वाटले. परंतु दोघांनी एकत्र जगायची वेळ निघून गेली होती. त्याच्या मनात आले, आता एकच शक्य आहे — दोघाचे एकत्र मरण!

उरल्यासुरल्या सामर्थ्यानिशी ऑक्टेव्हियनशी मुकाबला करण्यासाठी अँन्टनी सिद्ध झाला. ऑक्टेव्हियनचे सैन्य पुढे पुढे सरकत होते. परंतु प्रत्यक्ष रणभूमीवर अँन्टनीच्या सैन्याने त्याचा विश्वासघात केला. ते सारे ऑक्टेव्हियनला जाऊन मिळाले. लढणाऱ्या इजिप्शियन सेनेची मात्र पार दाणादाण उडाली.

फक्त रुफियो त्याच्या बाजूला उभा राहिला. त्यानेही अखेर स्वतःच पोटात तलवार खुपसून घेतली. आता अँन्टनीला कोणीच मित्र उरला नाही. अखड घोडदौडीमुळे धुळीने माखलेला व थकलेला अँन्टनी अलेक्झांड्रियात परतला. धापा टाकत तसाच तो क्लिओपात्राच्या महालात गेला. तिथे अप्पोलोडरस एकटाच होता.

अँन्टनीने विचारले, "राणी कुठे आहे?'

अप्पोलोडरसने उत्तर दिले, "तिच्या कबरीत."

अँन्टनी या उत्तराचा अर्थ वेगळाच समजला. राणी एकटीच मातीआड झाली या कल्पनेने रुफियोप्रमाणेच त्यानेही तलवारीचे पाते आपल्या उदरात खुपसले.

"तिने माझी वाट पाहिली असेल. मी तिच्याबरोबर येणार हे तिला माहित आहे." जमिनीवर कोसळता कोसळता अँन्टनीचे उद्गार अप्पोलोडरसला ऐकू आले. अँन्टनीला आपण वाचवू शकलो नाही या विचाराने तो भावावला.

"लॉर्ड अँन्टनी, क्लिओपात्रा जिवंत आहे! तिच्या थडग्याच्या इमारतीत ती तुमची वाट पाहते आहे!" त्याने घाईघाईने सांगितले.

"क्लिओपात्रा अजून जिवत आहे? अप्पोलोडरस, मला एवढी मदत कर. अजून आमची भेट होऊ शकेल."

अँन्टनीची शुद्ध हरपू लागली. दृष्टीसमोर सर्व अंधुक धूसर दिसू लागले होते. त्याच्या यातनाही असह्य होऊ लागल्या, तोच इकडे ऑक्टेव्हियनच्या सैन्याची रणशिंगे ऐकू येऊ लागली. अप्पोलोडरसने मोठ्या प्रयासाने शेवटचे क्षण मोजीत असलेल्या अँन्टनीला त्याच्या राणीकडे नेले. आणि त्या प्रेमी युगलाला तेथेच सोडून अप्पोलोडरस पळाला तेव्हा त्याच्याही हातात विषारी कुपी होती.

क्लिओपात्राने अँन्टनीचे मस्तक आपल्या मांडीवर घेतले, दोघाची दृष्टी एकमेकात मिसळली. त्याने अस्फुट स्वरात विचारले, "राणी, आज रात्री तू येशील ना? तरच मला समाधानाची झोप येईल. तुझ्या त्या प्रेमी युगलाची शेवटची भेट झाली का ग? तू आली नाहीस तर मला चैन नाही पडणार; राणी मी तुझी वाट पाहू ना?"

"मी वचन देते, अँन्टनी, मी फार वेळ लावणार नाही." तिने अखेरच्या घटका मोजणाऱ्या प्रियकराला वचन दिले.

"मला वीराचे मरण येईल असे वाटले होते–' अँन्टनीचा उद्वेग अजूनही शमला नव्हता.

"अखेर मरतो तो माणूस म्हणून, सैनिक म्हणून नव्हे आणि अखेर मरते ती फक्त स्त्री, राणी नव्हे!" अँन्टनीच्या ओठावर आपल्या ओठानी स्पर्श करीत राणी त्याचा उद्वेग कमी करण्यासाठी पुटपुटली.

आणि हे ऐकता ऐकताच अँन्टनीची प्राणज्योत मालवली. सारी अस्वस्थता संपली. निर्धाराने राणीने त्याचे मस्तक मांडीवरून जमिनीवर ठेवले. एकही अश्रू नसलेल्या आपल्या डोळ्यांनी ती एकटक त्या चेहऱ्याकडे पाहात होती. तिच्या मनात आले–अशी शातता यापूर्वी कधीच याच्या चेहऱ्यावर दिसली नव्हती!

तिला दुःख करायला वेळ नव्हता. थोड्याच वेळात रोमन सैन्य दारात येऊन थडकले. कबरीच्या दारावर धडका देत त्यांनी सीझेरियॉनला राजा करण्याचे आमिष तिला दिले. त्याच्या बोलण्यावरून राणीने ताडले, की तिचा मुलगा आणि त्याचे रक्षक ऑक्टेव्हियनच्या ताब्यात सापडले होते. कदाचित आपला पुत्र जिवतही नसेल. तिने आपल्या मौल्यवान शालीत अँन्टनीचे शव झाकले व ती त्या शवाजवळ बसली. कबरीचा दरवाजा थोड्याच वेळात धडकीमुळे आतल्या बाजूस कोसळला.

ऑक्टेव्हियन पुढे आला. राणीला म्हणाला "क्लिओपात्रा, युद्ध संपले आहे! मी तुझा देश जिंकला. परतु रोमचा एक प्रांत म्हणून इजिप्तवर राज्य करण्यास मी तुला एका अटीवर परवानगी देईन आणि ती अट म्हणजे तू माझ्याबरोबर रोमला आले पाहिजे."

तिने पापण्या उचलून वर पाहत म्हटले, "ज्या शहरात मला पाहण्याकरता हजारो लोक उन्हातान्हात तासन् तास उभे होते त्याच शहरात तुझ्या रथाला बांधून रस्त्यारस्त्यावरून मला फरफटत न्यायचे आहे का?" राणीचा तोल दुःखाने सुटायला लागला होता.

"मी रोमन आहे. माझ्या आश्वासनावर विश्वास ठेव. तुला येथे सुखरूप परत पाठवण्यात येईल." ऑक्टेव्हियन म्हणाला.

तो बोलत असताना एकेकाळची पॉम्पेच्या बोटातली अंगठी त्याच्या बोटावर चमकत होती हे तिच्या लक्षात आले. तिचे मन शकेने चरकले. ती अंगठी सिझेरिऑनच्या गळ्यातल्या ताईतात होती. तिच्या लक्षात आले, की आपला मघाचा तर्क खरा असावा! सिझेरिऑन निसटू शकला नाहीसे दिसतेय.

ऑक्टेव्हियनकडे पाहून तिने चमत्कारिक हास्य केले. तो चमकला. तिची चमत्कारिक रोखलेली नजर पाहून तो तेथून निघून गेला.

ऑक्टेव्हियन निघून जाताच तिने दासीला खूण करून मागे अंधारात ठेवलेली करंडी आणायला सांगितले. दासीने करडी आणून देताच राणी म्हणाली, "मी रोमला गेले तेव्हाचा प्रवासातला माझा सुवर्णाचा पोषाख माझ्या अंगावर चढव. अॅन्टनीने मला दुरून पण ओळखले पाहिजे. हे अजीर तरी टिकले आहेत की नाही ते तर पाहू दे मला ! " असे एकीकडे म्हणत म्हणत निर्धारपूर्वक आपला लुसलुशीत हात राणीने करडीत सरकावला.

आणि—

आणि त्या अजिरांमध्ये ठेवलेल्या विषारी सर्पाने तिच्या बोटाला चावा घेतला.

विषाने आपले काम केले. आता तरी अॅन्टनीला निवात भेटता येईल या विचाराने तिच्या ओठावर हसू उमलले.

" अॅन्टनी, माझ्या प्रियकरा ! ही बघ आलेच मी— " अॅन्टनीच्या छातीवर मान ठेवता ठेवता राणी पुटपुटली.

* * *

क्लिओपात्राने अँटनीच्या भोवती जो फास फेकला त्याच फासाच्या सरकगाठीने अखेर तिचाही बळी घेतला. क्लिओपात्राने वयातीत सीझरला जवळ केले ते केवळ जगाचे एक राज्य करण्याच्या तिच्या स्वप्नाची पूर्ती करणारा तो एक समर्थ पुरुष होता म्हणून. दुर्दैवाने सीझरचा खून झाला. सीझरच्या सामर्थ्याचा वारसा अँटनीकडे आला आहे अशा कल्पनेने तिने आपल्या स्वप्नपूर्तीचा एक पवित्रा म्हणून अँटनीवर आपली मोहिनी टाकली. परिणाम उलटा झाला ! अँटनी सीझर नव्हताच. आणि राणीच्या बाहुपाशात तो अँटनीही उरला नाही. तो झाला प्रणयपंढरीचा सामान्य वारकरी ! प्रियेसाठी सगळे सोडणारा ! राणीलाही प्रथमच स्त्रीसुलभ प्रीतीने साक्षात्कार घडविला. नाहीतर रणांगण सोडून पळालेल्या अँटनीचा तिने धिःकारच केला असता. पण प्रणयाच्या आवर्तात अखेर ती स्वतःलाही वाचवू शकली नाही. अभिलाषेची अशी शोकांतिका इतिहासाला नवीन नाही.

• • •

# मी जिंकलो, मी हरलो

' माझे नाव पाण्यावर लिहिलेले आहे. ' कॅमेऱ्यांचा चमचमाट आणि प्रसिद्धीचा झगमगाट यांपासून दूर जाऊन कधीकधी अंतर्मुख होणाऱ्या रिचर्ड बर्टनला आंग्लकवी कीट्स याच्या वरील ओळींची तीव्रतेने आठवण होते. आपण आपल्याजवळील मोलाचा ठेवा या झगमगाटात हरवून बसतो की काय, या जाणीवेने बर्टनचा जीव कासावीस होतो, बेचैन होतो. ' आपल्याला हवे आहे तरी काय ? प्रसिद्धी ? वैभव ? कीर्ती ? यश की गुणवत्ता ? ' हेच त्याला कळेनासे झाले आहे.

बर्टन हा एकेकाळचा रंगभूमीवरचा प्रख्यात नट. अनेक टीकाकारांनी ह्याच्या असामान्य अभिनयगुणाची मुक्तकंठाने प्रशंसा केली आहे. रंगभूमीवर हा नट काहीतरी नवेच निर्माण करणार याची कालपरवापर्यंत त्याच्या चाहत्यांना व समकालीन नटांना जवळ जवळ खात्रीच होती. हॅम्लेटच्या भूमिकेत तर बर्टन अभिनयाचा कळस गाठीत असे.

असाच एकदा तो ओल्डव्हिक कंपनीतर्फे होणाऱ्या ' हॅम्लेट ' नाटकात हॅम्लेटची भूमिका करीत असताना प्रेक्षागारात खुद्द सर विन्स्टन चर्चिल हजर होते ! संपूर्ण प्रयोग त्यांनी अत्यंत तन्मयतेने पाहिला आणि, "माझ्या आठवणीत हॅम्लेटच्या भूमिकेत असा प्रभावी अभिनय पाहिला नव्हता !" अशी कबुली त्यांनी दिली. काही वर्षांनंतर चर्चिलच्या जीवनावर टेलिव्हिजनसाठी एका कार्यक्रमाची योजना चालू असताना त्या संयोजकांनी चर्चिलना विचारले, " आपल्या आवाजासाठी कुणाची निवड करावी ? " चर्चिलने तात्काळ उत्तर दिले, " अहो, त्या ओल्डव्हिक कंपनीतल्या मुलाला बोलवा ना ! " रिचर्ड बर्टनच्या अभिनयाची ही सर्वोत्तम पावतीच समजावी लागेल. असा हा गुणी नट रंगभूमीकडून चित्रपटाकडे वळला. चित्रपटामधील भूमिका त्याचे मन मुळीच रमवू शकत नाहीत. बर्टन म्हणतो, ' चित्रपटात काम करताना तुम्हांला बाहुले बनावे लागते. आणि रंगभूमीवर मात्र तुम्ही राजे असता ! "

तरी तो चित्रपटांकडे वळला आहे. अलोट संपत्ती कॅमेऱ्यांपुढील ' बाहुले ' म्हणून का होईना, त्याच्या पायाशी लोळण घेते आहे. ' क्लिओपात्रा ' या चित्रपटापूर्वी त्याला प्रत्येक चित्रपटाचे सव्वा लाख डॉलर्स मिळत असत. आणि या चित्रपटात मात्र त्याचा भाव पाच लाख डॉलर्स एवढा वाढला आहे ! ' क्लिओपात्रा 'त अँटनीची भूमिका त्याला द्यायची ठरली तेव्हा बर्टन ' कॅमेलॉट ' या नाटकात काम करीत होता. ' क्लिओपात्रा 'च्या चित्रीकरणात व्यत्यय येऊ नये म्हणून ' कॅमेलॉट 'चे या कालावधीतील सर्व प्रयोग ट्वेंटिएथ सेंचरी कंपनीने खरेदी करून टाकले. भरीस भर म्हणून की काय, विसाव्या शतकातली ' क्लिओपात्रा ' एलिझाबेथ टेलर हिनेही आपल्या आकर्षणात त्याला गुंगवून ठेवले आहे.

अशा या चलबिचल मनःस्थितीत असलेल्या बर्टनचे काय होणार ? तो ' पॉप्युलर ' होणार की ' थोर ' ठरणार ? बर्टनचे रंगभूमीवरील असंख्य चाहते आज अस्वस्थ आहेत एवढे खरे ! [ ' टाइम ' साप्ताहिकावरून ]

# आहुती

[पृष्ठ ३३ वरून चालू]

तुला मात्र त्याच काहीच वाटलं नाही ! विचार विद्याला नाही तर वसंताला, दोन दिवस तिनं कशा अवस्थेत काढले ते ? बिचाऱ्या पोराचे पाय चालून चालून थकले असतील. पण तू मात्र कुठल्या गुहेत दडून बसला होतास—?"

केदारने विषयाला बगल मारीत म्हटले, "दिवसेदिवस माझी तब्येत बिघडत चालली आहे."

"ते तर दिसतच आहे. किती वेळा सांगितलं असेल मी तुला, की एखाद्या डॉक्टरला, वैद्याला दाखव म्हणून. पण तू किनई केदार, कशाची दखल घेशील तर शपथ."

"मी एका डॉक्टरकडेच आलोय जाऊन—"

"मग काय म्हणाला तो ?"

"तो म्हणत होता, मला आजार वगैरे काही नाही. पण इथलं हवापाणी मला मानवत नाही.

"हवापाणी मानवत नाही ?"

"हं—"

"मग ?"

"त्याचं म्हणणं आहे की हवा—पाणी बदलण्यासाठी कुठ तरी थंड हवेच्या ठिकाणी जाव लागेल."

मायापुढे पुन्हा प्रश्नचिन्ह उभे ठाकले. केदारचे ह्या घराशी अशा प्रकारचे स्नेहसंबंध जडले होते की केदारला एक दिवसही सोडून राहणे मायाला सहन होणे शक्य नव्हते. तिला कोड्यात पडलेली पाहून तो म्हणाला, "आईसाहेब, काळजी करायचं कारण नाही. मी तुमच्याजवळ आहे असच समजा. अगदी लवकर परत येईन."

मायाने दीर्घ श्वास आत ओढून घेत होकार दिला.

"उद्याच निघावं असं वाटतंय—"

"इतक्या लवकर ? अरे, वीणाला तरी येऊ दे. परवा नाहीतर तेरवा—बुधवारी येईलच ती."

"इतके दिवस थांबून नाही चालणार, डॉक्टर तर आजच जायला सागत होते. आयुष्याचा प्रश्न आहे म्हणे !"

आयुष्याचा प्रश्न म्हणताच मायाने आग्रह सोडला. घाबरून जाऊन त्याच्याकडे पहात ती म्हणाली, "मग तू जरूर जा. मी नाही तुला अडविणार." तिच्या हृदयात ममता उफाळून आली होती. ती म्हणाली, "मग कुठ जायचा विचार आहे तुझा ?"

"जवळच जाईन म्हणतो—कदाचित कोमहरिला !"

"आणि पैसे ?"

"त्याची होईल व्यवस्था." बोटातल्या आगठीकडे पाहात केदार म्हणाला.

"पण वीणाला न भेटताच का जाणार ? ती तर जीव काढील माझा."

"गुजरखान रस्त्यातच लागत. तिला भेटून तसाच पुढे जाईन."

तोच बाहेरून कोणीतरी दरवाजा वाजविला. आणि हाक मारली,

"कोणी आहे का आत ?" केदारने आपल्या मालकाचा आवाज लागलीच ओळखला. तो भीतीने अर्धमेला झाला. झटदिशी उठून मागील जिन्याकडे धावत जात मायाच्या कानात म्हणाला, "माझ्याविषयी काही बोलू नका. विचारल तर एवढच सांगा—कालपासून तो इथे आला नाही. अजिबात सागू नका—शपथ आहे माझी तुम्हाला—" आणि तो आतल्या खोलीत जाऊन बसला.

मायाने दरवाजा उघडला. आणि गलेलठ्ठ शरीराचा आतरसिंह ढकलल्यासारखा आत शिरला.

"आपणच पन्नालालच्या पत्नी का ?" आतरसिंहाने विचारले.

डोक्यावरचा दुपट्टा थोडा पुढे ओढीत माया म्हणाली, "हो. पण आपण खुशाल आहात ना ? आणि— सरदारजीनी जी—" मायाचे हृदय धडधडत होते. तिला स्वत ची लाजही वाटत होती. त्यानी आपल्यावर उपकार करूनही आपण त्यांना धन्यवाद देण्यास गेलो नाही. तसेच आपल्या नवऱ्याविषयी अनेक गोष्टी त्याना विचारण्यासाठी ती आतुर झाली होती. पण सरदारजीने आपलेच भारूड सुरू केले. खाटेवर बसत तो म्हणाला—

"सर्व आनंदीआनद मगल आहे ! केदारनायला हुडकण्यासाठी आलो होतो. गल्लीत समजल की तो तुमच्या शेजारच्या घरात राहतो. त्याच्या घराला कुलूप दिसलं. तुम्हाला माहीत असेल, म्हणून म्हटलं विचारून पाहावं."

'तो तर परवापासून इकडे आलाच नाही !" मायाने धाडस केले. ह्या खोट्या बोलण्याने तिच्या गळ्याला फास बसला. ती विचार करू लागली, 'न जाणो, केदार आत लपला आहे, पण त्याला येणारी खोकल्याची उबळ नेमकी याच वेळी आली तर, किंवा आणखी काही कारणाने केदार आत लपला असल्याचा सुगावा त्याला लागला तर—?'

"बरं," घाबरलेला आतरसिंह विचारू लागला. "त्याच्या आणखी दुसऱ्या ठिकाणाचा पत्ता आहे का, जिथे त्याचं जाणं-येणं असेल ? माझं महत्त्वाचं काम आहे त्याच्याजवळ."

"नाही. दुसऱ्या ठिकाणाची मला काहीच माहिती नाही."

आतरसिंहाचा रग फिका पडत चालला. तो उठणार तोच माया त्याला विनयाने म्हणाली, "मी एक दोन गोष्टी विचारणार आहे तुम्हाला—विचारू ?"

"बोला" म्हणत तो उठत उठत पुन्हा खाली बसला. माया काही बोलण्यापूर्वीच तो म्हणाला, "आज काल पन्नालाल कुठे कामाला असतात—इथेच की कुठे बाहेरगावी ?"

हा प्रश्न ऐकताच मायाचे धाबे दणाणले. ती त्याच्याकडे पाहातच राहिली. "हीच गोष्ट तर मी तुम्हाला विचारणार होते !"

"मला ?" आश्चर्याने तिच्याकडे पाहात आतरसिंह म्हणाला.

"तुम्हीच त्याना मुंबईला पाठविलत ना ? माया म्हणाली, "मी तुमच्या घरी येण्याचा विचार करीत होते. पण मुलीच्या लग्नामुळं कुठं जाताच आलं नाही मला. होय, खरं ते सांगते. तोंडावर मोठ्या गोष्टी

करणं चांगलं नाही. पण आपण आठशे रुपये दिलेत, ते खरोखरीच मोठे उपकार झाले. परमेश्वर आपल्याला सुखी ठेवील !"

आतरसिंह मायाचे बोलणे माबावून ऐकत राहिला. माया बोलण्याचे थाबल्यानंतरही त्याच्या तोंडातून शब्द बाहेर पडला नाही. शेवटी त्याने विचारले, " ताई ! तुम्ही कसल्या गोष्टी करताय ? तुम्ही मला ओळखलं नाही ? "

गळ्याभोवती दुपट्ट्याचा पदर नीटनेटका गुंडाळीत माया म्हणाली, " आपल्याला ओळखणार नाही – ज्याचं आम्ही गेली सात वर्षं मीठ खात आहोत ? काही लोक असतात तसे, काही न करता ते उपकाराची भाषा बोलतात आणि आपण इतके उपकार करूनही लपवीत आहात – "

" पण ताई, मी तर तुम्हाला काहीच दिलं नाही ? पन्नालालना माझ्याकडची नोकरी सोडून जवळ जवळ आठ दहा महिने झाले आहेत ! "

माया आणखीनच बुचकळ्यात पडली. अद्यापही तिचा विश्वास बसत नव्हता की आतरसिंह आपल्या स्वाभाविक औदार्याने आणि नम्रतेने अशा प्रकारच्या गोष्टी करीत आहेत. ती म्हणू लागली, " ते केव्हा परत येणार आहेत ? मुलीच्या लग्नालाही येऊ शकले नाहीत. लिहिलं होतं ' जेव्हा सरदारजींची आज्ञा होईल तेव्हाच येईन, अजून खूप काम पडलं आहे ! ' असेनात का ते तिकडेच ! माझी काहीच हरकत नाही. आपण असताना आम्हाला कसली काळजी ? पगाराचे पैसे दर महिन्याला येतच आहेत. आम्हाला आणखी काय पाहिजे ? पण लहान लहान मुलं आहेत. एक दिवस कधी सोडून राहण्याची त्याना सवय नाही. त्यांची आठवण करीत करीत अर्धं वर्ष गेलं. माझ्यासाठी त्यांना एकाद्या आठवड्याची सुटी देऊन बोलावून घ्या. वाटल्यास मुलाना भेटून पुन्हा जातील. "

आतरसिंह जसजसे हे गणित सोडविण्याचा प्रयत्न करीत होता तसतशी ती त्याला अधिकच गुरफटून टाकीत होती. तो आश्चर्यचकित होऊन म्हणाला, " ताई, मला तुमचं काहीच समजलं नाही ! त्यांना कोणी मुंबईला पाठविलं आहे ? मुलीच्या लग्नात तुम्हाला कोणी आठशे रुपये दिले ? आणि मुंबईला माझं ना दुकान आहे ना एजन्सी! म्हणून मी म्हणत होतो, की तुमचा काहीतरी गैरसमज झाला आहे. पन्नालाल आजकाल दुसऱ्या कोणाच्या तरी दुकानावर काम करीत असतील, माझ्याकडून जाऊन तब्बल काळ लोटला आहे." असे म्हणून तो जाण्यासाठी उठून उभा राहिला.

हे ऐकताच तिचे डोळे पाढरे फटफटीत पडले. ती काय ऐकत होती हेच तिला समजत नव्हते. सरदारजींचे म्हणणे खोडून काढण्यासाठी तिचे पुन्हा पुन्हा प्रयत्न चालू होते. आणि आतरसिंहाचे आश्चर्य आणि चीड पाहून तो खरेच खोटे बोलत आहे, हे तिला पटत नव्हते. शेवटी हताशपणे तिने विचारले, " केदार तरी आपल्याकडे काम करीत असतो ना ? "

" होय. माझ्याकडेच कामाला आहे. "

" आणि जोपर्यंत ' हे ' येणार नाहीत तोपर्यंत केदारच त्याचे जागी काम करणार आहे, हो ना ? "

" केदारला मी पन्नालालच्या जागी घेतलं होतं खरं, पण ज्या दिवशी मी केदारला कामावर घेतलं त्याच दिवशी मी पन्नालालना नोकरीवरून कमी केलं होतं. ते स्वतःच केदारला आपला चार्ज देऊन आणि आपला पगार घेऊन गेले. त्यानंतर त्यांची मला काहीच माहिती नाही ते कुठे आहेत आणि कुठे नाहीत ? मला माहीत असतं तर मी येताच पन्नालालविषयी का विचारलं असतं ? "

" म्हणजे आपल्याला त्यांची काहीच माहिती नाही ? " नजर स्थिर करीत त्याच्याकडे पाहून हे वाक्य असे काही मायाच्या तोंडून निघाले होते की जणू काही ती बेशुद्धावस्थेतच बोलत होती. तिला वाटले, की केदारला हाक मारावी आणि आताच ह्या गोष्टीची शहानिशा करावी. पण केदारने घातलेल्या शपथेने तिला तसे करू दिले नाही.

" ताई ! पण–" माया आश्चर्याने निपचित झालेली पाहून आतरसिंह विचारू लागला, " तुम्हांला कोणी सांगितलं की मी पन्नालालना मुंबईला पाठविलं आहे ?

" केदारनं ! "

" केदारनं ? " लगेच विचार करून आतरसिंहाने पुढे विचारले, " आणि आपण म्हणता, की पगाराचे पैसे दरमहा येतात. ते मनीऑर्डरनं की— ?"

" नाही; ते तर केदारच आणून देतो. तो म्हणतो सरदारजींनी स्वतःच्या हातानी उचलून दिले आहेत ! "

" आश्चर्य आहे ! पन्नालालच्या नावावर तर मी त्याला कधी एक पैसाही दिला नाही. देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. कारण पन्नालाल माझ्याकडे नोकरीलाच नाहीत. " अतरसिंह काही वेळ विचारात पडला. नतर म्हणाला, " ताई ! आताच आपण म्हणालात, की आपल्या मुलीच्या लग्नात मी तुम्हाला काही पैसे दिले होते – ? "

" होय, केदारनं आठशे रुपये आपल्याकडूनच आणून मला दिले होते. ते रुपये आपण दिले नव्हते ? "

" नाही ! तुमच्या मुलीचं लग्न केव्हा होणार आहे हे देखील मला ठाऊक नाही ! "

" लग्न तर झालं. परवाच वरात माघारी गेली. "

" बरं, पन्नालालचं कधी काही पत्र आलं होतं ? "

" कित्येक पत्रं आली आहेत पण ती सर्व केदारजवळच आहेत. "

आतरसिंह पुन्हा एकदा गंभीर चिंतेत पडला. त्याला झट्दिशी त्या पधराशे रुपयाची आठवण झाली. त्याने एकदम डोके वर केले, आणि विचारले, " बरं, ताई ! केदारनं आजही तुम्हाला काही पैसे आणून दिले का ? "

माया पुन्हा विचारात पडली. तिच्या तोंडातून ' होय ' निघणार होते पण सुदैवाने ' नाही ' निघून गेले. तिने ओळखले की हे पैसे त्याने दुकानावरूनच आणले आहेत. पण याचा स्फोट झाला तर, न जाणो केदारवर काय आपत्ती कोसळणार होती ?

आतरसिंहाला त्या ठिकाणी एक मिनिटही थांबणे आता अशक्य झाले. मायाला अद्याप कित्येक गोष्टींचा उलगडा करून घ्यायचा होता. पण तो उठून लगेच चालू लागला. आतरसिंह गेल्यानंतर माया आतल्या खोलीत धावली पण केदार त्या ठिकाणी नव्हता ! खिडकी मात्र सताड उघडी होती आणि खिडकीच्या कट्ट्यावर पावलाच्या खुणा उमटलेल्या होत्या ! !

## : १६ :

बँकेत गेलेला केदार परत आला नाही. जसजसा वेळ जाऊ लागला तसतसा आतरसिंह अधिकच अस्वस्थ होऊ लागला. आणि तरीही केदारसारख्या प्रामाणिक माणसावर आळ घेण्यास आतरसिंहाचे मन धजत नव्हते.

शेवटी जेव्हा पाच वाजून गेले आणि तरीही केदारने तोंड दाखविले नाही तेव्हा मात्र त्याचा जीव खालीवर होऊ लागला. टांगा करून तो बँकेकडे धावला. तेथे गेल्यावर त्याला समजले की कोणीही रक्कम जमा केलेली नाही. तेव्हा त्याच्या पायाखालची जमीन सरकू लागली. 'केदार पंधराशे रुपये घेऊन पळाला!' त्याला वाटले, पोलीस गेटावर जाऊन फिर्याद गुदरावी. पण केदार दुकानावर तर गेला नसेल? असा विचार येताच त्याने टांगा दुकानाकडे वळविला.

दुकान पहिल्याप्रमाणेच बंद होते. ते पाहून त्याच्या हृदयात धडकी भरली. तो विचार करीत होता तेवढ्यात त्याच्या मुलीने त्याला हाक मारली.

वर गेल्यावर त्याला समजले की कोणी एक मुलगा एक पत्र व किल्ल्यांचा जुडगा देऊन गेला आहे.

आंतरसिंहाने ते पत्र उघडले. आणि तो वाचू लागला. पत्रात लिहिले होते :—

"माझ्या अन्नदात्यास,

शि. सा. न.

मी परत आलो नाही म्हणून आपण काळजीत पडला असाल. पण काळजी करण्याचे कारण नाही. परिस्थितीच अशी काही चमत्कारिक उत्पन्न झाली होती की मी परत येऊ शकलो नाही. आपल्या उपकाराचा विसर पडेल इतका काही मी उलटचा काळजाचा नाही. आपण माझ्यासारख्या भटकणाऱ्याला कामावर घेतलेत, विश्वास टाकलात आणि दुकानाचा सर्व कारभार माझ्यावर सोपवलात—हे सर्व मी कसे विसरू?

पण मी कोणते तोंड घेऊन आता आपल्यासमोर येऊ? कोणत्या तोडाने सांगू की मी आपले पधराशे रुपये बँकेत जमा न करता अन्य कामासाठी खर्च करून बसलो आहे? कशासाठी खर्च केले आणि का, ह्याचे उत्तर मी आत्ताच देऊ शकत नाही. पण एवढे मात्र निक्षून सागतो की मी हे काम करून पाप किंवा चोरी याचा भागीदार झालो नाही. ती रक्कम मी अशा एका कामाला खर्च केली आहे की ती मिळाली नसती तर एका अभागिनीची अब्रू सकटातून सोडवू शकलो नसतो. एका अभागी विधवेला कोर्टाची पायरी चढावी लागू नये आणि तिच्या लहान लहान मुलांना देशोधडीला लागण्याची पाळी येऊ नये म्हणून मी हे करून बसलो. हे करण्याशिवाय माझ्याजवळ दुसरा मार्ग नव्हता—

ह्या अपराधाकरता आपण माझ्यावर फिर्याद करणार असाल तर मी विनासायास कोर्टात हजर राहीन, आणि आपला अपराध मान्य करीन. त्यासाठी जी शिक्षा माझ्या वाट्याला येईल, ती माझे कर्तव्य मानून, तिचा स्वीकार करीन. पण आपण थोडे उदार बनून माझ्याविरुद्ध फिर्याद वगैरे करणार नसाल तर ह्या परिस्थितीतही मी आपल्याला वचन देतो, की मी आपली पैन् पै चुकती करीन. माझा माझ्यावर विश्वास आहे. मी एक कारागीर आहे. आणि एवढीशी रक्कम जमविणे हा फक्त योग्य काळाचा प्रश्न आहे...

"मला वाईट वाटते ते एकाच गोष्टीचे, जोपर्यंत मी आपली रक्कम पोहोचती करू शकत नाही तोपर्यंत मी आपल्याला तोंड दाखवू शकत नाही. माझ्या जागी आपण दुसऱ्या माणसाची नेमणूक कराल अशी आशा आहे. आपले पैसे परत केल्यानंतर—जगलो वाचलोच—तुम्ही माझे अपराध पोटात घेतलेत तर मी तुमच्या छत्रछायेत परत येईन. पण आज कोणत्याही परिस्थितीत इथे राहणे मला शक्य नाही.

"मी केवळ आपल्या रुपयामुळेच घर सोडून चाललो आहे, असे मुळीच नाही. त्याचे आणखीही कारण आहे, जे मी आज उघड करू शकत नाही.

"मी माझ्या भावना आपल्यासमोर उघड केल्या आहेत. आपण त्याना समजावून घ्याल अशी आशा आहे. आणि असे असेल तर या अभागी अवस्थेतही मी स्वतःला भाग्यवान मानू शकेन!"

चिरकाल आपलाच—

नम्र सेवक

केदार"

पत्र वाचल्यानंतर आतरसिंह बराच विचार करीत होता. नतर रस्त्यावर वाट पाहत उभ्या असलेल्या टांगेवाल्याला त्याचे भाडे देऊन मोकळा केला.

नंतर त्याने दुकान उघडले. पेटीत केदारने नेलेल्या पैशाशिवाय आणखी बरीच रक्कम व सोन्याचे दागिने पडले होते. पण सर्व जागच्या जागी व्यवस्थित होते. एक पैसाही इकडचा तिकडे हलला नव्हता.

## : १७ :

सारी रात्र मायाला झोप आली नाही. पुढे आलेले विचित्र कोडे सोडविण्यात तिने सबंध रात्र घालविली. रात्री बऱ्याच वेळा ती केदारच्या खोलीकडे जाऊन दर वेळी हताश होऊन परत आली. ती जेव्हा पन्नालालविषयी विचार करू लागे तेव्हा वेदनानी तिचे हृदय पोळून निघे. तिच्या मनात येई, सरदारजींनी आपल्यापुढे सर्व उलगडा केला आहे, तेव्हा हे स्पष्ट आहे की ज्या दिवशी वीणाच्या लग्नासाठी मदतीची याचना करण्याकरता म्हणून हे गेले ते अचानकपणे नोकरी सुटल्याच्या आघाताने घाबरून जाऊन कोठे तरी निघून गेले असावेत. पण गेले कुठे? आणि जिवाचे जर काही बरेवाईट करून बसले असतील तर......?? अनेकदा तोंडावाटे नाही नाही ते काढीत असत; पण कोणास ठाऊक काय......? आणि या विचारासरशी मायाचे धैर्य समाप्त होई. ती उशीत तोंड खुपसून रडू लागे.

दिवस उगवला. आज मायाला उठावेसे वाटत नव्हते. तिचे शरीर लुळे पडले होते. त्यातले चैतन्य नाहीसे झाले होते. तिला वाटत होते, ह्या अथांग ससारात आता आपले कोणीच राहिलेले नाही!

घरातली रोजची कामे—लहान मोठी—विद्याने आवरली. वसताला खाऊ घातले आणि शाळेत धाडले.

नऊ वाजायला आले होते, तोच लाला पुन्हा दारात येऊन धडकला

आता मायाला उठण्याशिवाय गत्यंतर नव्हते. ती कशीबशी तयार झाली आणि कचेरीची वाट चालू लागली.

नदीत लाटा उठतात आणि उठून नाहीशा होतात, त्याचे अस्तित्वहि मागे राहात नाही. पण त्यात अशाही काही लाटा असतात की ज्यामध्ये गगनचुंबी पर्वत जमीनदोस्त करून टाकण्याचे सामर्थ्य असते!

अशाच एका लाटेने केदार ठोकारला होता !

तो जसजसा रावळपिंडीपासून दूर चालला होता, तो तो ती लाट दुप्पट–चौपट वेगाने त्याच्या मनावर आदळत होती. आणि त्या आघाताने त्याच्या मनाचा किनारा ढासळून पडत होता !

रावळपिंडीहून तो अमृतसरला पोहोचला, तेव्हा त्याने विचार केला, आपण असेच बेकार अवस्थेत फिरत राहिलो तर आपली मानसिक अवस्था आणखी खराब होईल. लवकरात लवकर आपण कामाला जुंपून घेतले पाहिजे. त्यामुळे एखाद्याची आठवण जरी आपण विसरू शकलो नाही तरी आपण स्वतःला विसरून जाऊ यात शंका नाही.

स्वतःवर ओढवून घेतलेल्या जबाबदारीची त्याला पूर्ण जाणीव होती. त्यापेक्षा त्या जबाबदारीची चिंता त्याला अधिक होती. जेवढी कमाई करता येणे शक्य होते तेवढी कमाई त्याला करणे अवश्य होते.

त्याने लागलीच एका दुकानात नोकरी पत्करली. आणि स्वतःला कामात गोवून घेतले. त्याचा मालक मनाई करीत असतानाही तो निमूटपणे मान खाली घालून कामात लागलेला असे.

पण नोकरीच्या आमदनीतून मिळणाऱ्या मिळकतीवर अवलंबून राहणे अशक्य होते. कारण त्याला वाटत असलेल्या चिंतेपुढे ही आमदनी काहीच नव्हती. नोकरी करून पैसा जमविणे हे अशक्य आहे असे त्याच्या ध्यानी आले. त्याची जगण्याची इच्छा संपुष्टात आली होतीच. जगणे होते ते केवळ आतरसिंहाचे उपकार फेडण्यासाठीच. काही दिवस नोकरी करून तीवर अखेर त्याने उदक सोडले. नोकरीच्या काळात बऱ्याच लहानमोठ्या माणसांची त्याची ओळख झाली होती. त्याच्या मदतीने त्याने एक छोटेसे दुकान थाटले. थोड्याच दिवसात त्याने बाजारांत आपले चांगल्यापैकी बस्तान बसविले. म्हणतात ना ? साहसे श्रीः प्रतिवसति ! त्यावेळी गोव्यातील घड्याळे कराचीमार्गे बाजारात येत होती. त्या धंद्यातील माणसाशी त्याने सधान जमविले. त्या घड्याळामागील जकात चुकवून प्रचंड नफ्याने तो ती घड्याळे विकू लागला. या ठिकाणीही त्याला वाटणारे पाप आणि पुण्य त्याच्या आड आले. पण आता त्याला जुमानावयाचे नाही असे त्याने ठरविले होते. कर्तव्यापुढे पाप आणि पुण्य याचा विचार चालण्यासारखे नव्हते.

—पैशाचे चक्र आता त्याच्या तंत्राने फिरू लागले होते !

केदारने आता पूर्वीचा पेहराव, खाणे-पिणे सर्व काही सोडून दिले होते. त्यामुळे त्याचे शरीर इतके कृश बनले की एखाद्या क्षयाच्या रोग्यासारखी अवस्था बनली होती. तो जो चहा पीत असे तो बिनदुधाचा असे आणि ज्या सिगरेट्स् तो ओढी त्या अगदीच हलक्या प्रतीच्या असत. पण मेहनतीला काही कमतरता नव्हती. त्याने लोकांच्या बोलण्याची कधीच पर्वा केली नाही. चहाची किटली आणि सिगरेटस् त्याचे सर्वस्व बनले होते ! काम करताना तो गाणे गुणगुणत असे–एवढेच !

त्याच्या दुकानामागे एक लहानशी कोठडी होती. तेच त्याचे निवासस्थान. खोलीत एका बाजूला मोडकी खाट होती आणि दुसऱ्या बाजूला कोळशाचा लहानसा ढीग. दिवसाकाठी तो किती चहा पिई आणि किती सिगरेटस् ओढी याला गणतीच नव्हती.

थंडीचे दिवस होते. सकाळपासून पाऊस पडत होता. पावसाची सर आत येऊ नये म्हणून त्यान दुकानच्या दोन्ही फळ्या बंद केल्या. पाऊस थांबला आणि कडकडीत ऊन पडले. पण या एकाही गोष्टीकडे त्याचे लक्ष नव्हते. चहा-सिगरेट आणि आपले काम या पलीकडे त्याला काही दिसत नव्हते. एक घड्याळ संपवून त्याने पुन्हा चांगला प्यालाभर चहा घेतला. नंतर डबीतून सिगरेट काढली, झुरके मारण्यास सुरुवात केली. दरवाज्याच्या फटीतून किरण आत येत होते. सिगरेटचा धूर त्या किरणाच्या प्रकाशात मिसळला आणि लाटासारखी धूम्रवलये निर्माण होण्यास सुरुवात झाली होती. पण यापैकी एकाही गोष्टीकडे केदारचे लक्ष लक्ष नव्हते. तो एक गाणे गुणगुणत होता आणि त्याचे हात समोरच्या घड्याळात गुतले होते.

" अलविदा ऐ काफलेवालो मुझे अब छोड दो !
मेरे किस्मतमें लिखी थी दश्तकी वीरानिआँ ! !"

गाणे संपण्यापूर्वीच दरवाजाची एक फळी हळू हळू उघडण्यास सुरुवात झाली. दारात एक अपरिचित व्यक्ती उभी असलेली पाहून गाण्याचे बोल ओठातल्या ओठात विरून गेले.

" केदार आपणच का ? "

" हो मीच. काय आज्ञा ? " आपल नाव या शहरात कोणालाच ठाऊक नसताना ही व्यक्ती आपल्याला आपल्या नावाने हाक मारते. मग कोण असेल हा ? तो काही वेळ गोंधळला. तो ती व्यक्ती आत आली आणि तिने केदारच्या पायावर डोके टेकले !

" माफ करा मला, मी आपणाला ओळखलं नाही !" केदार अधिकच गोंधळला आणि त्या कृश, उंच आणि मध्यम वयाच्या माणसाकडे टक लावून पहात होता !

" मी पन्नालाल ! ... " त्या व्यक्तीच्या डोळ्यांत कृतज्ञता, स्नेह, आणि सन्मानाची भावना झळकत झाली होती !

केदारच्या हातातला सिगरेटचा तुकडा गळून खाली पडला आणि काय करावे अन् काय करू नये या द्विधा परिस्थितीतच तो एकाएकी पन्नालालच्या पायावर पडला !

दोघांची मिठी पडली. तोंडे बंद होती. जिभेचे काम चारी डोळ्यांवाटे वाहणारे अश्रूंचे पाट करीत असावेत !

* * *

दोघाची जेवणे झाली होती केदार पन्नालालला विचारीत होता, " आपण रावळपिंडीला केव्हा आलात ? "

" एक आठवडा झाला "

" आणि इतके दिवस कुठे राहून काढलेत ? "

" फार मोठी कहाणी आहे ती केदार. सवड मिळेल तेव्हा सांगेन. आता एवढेच सांगतो की त्यावेळेस निघालो तो मरण्याचा विचार करून निघालो होतो. पण काहीशा प्राणाच्या मोहानं आणि काहीशा मुलाच्या मायेनं मला मरणापासून वाचविलं. तरीही घराकडे जाण्यास पाय तयार होत नव्हते. घरची परिस्थिती तर मृत्यूहून भयकर झाली होती. शेवटी हृदयातली आग शांत करण्यासाठी हरिद्वारला गेलो.

जगातल्या दु:खाचा त्याग करून साधुसंताची सेवा करण्यातच जीवन जगण्याचा निश्चय केला.

" साधुसंताच्या सत्संगतीत हृदयाची आग काहीशी कमी झाली ह्यात शंका नाही. पण घरची काळजी हात धुऊन पाठलाग करीत होती. साधू बनलो. जप-तप केलं. एकाहून एक अशा कठीण साधना केल्या, पण हृदयातल्या तारेतून घरचेच सूर बाहेर पडत राहिले. दोन वर्षांची ही घोर तपश्चर्या मला मोहमायेतून सोडवू शकली नाही. केदार, जीवनात मी भेकड ठरलो. जीवनातल्या आपत्तींना भिऊन मी पळालो होतो. माझी तर खात्री होती की घरदार जमीनदोस्त झालं असेल आणि मुलं अन्नाला मोताद झाली असतील. पण भस्म झालेल्या घराला एकदाच का होईना पाहाण्यास माझं मन तिळतिळ तुटत होतं. घरी येऊन जे पाहिल, जे ऐकल, ते पाहून आणि ऐकून आश्चर्यानं थक्क झालो. माझी पाठ फिरताच माझ्या घरात परमेश्वरानं एक देवदूत पाठविला होता, ज्याच्या त्यागानं, बलिदानानं..... !"

त्याचे बोलणे मध्येच खुडून काढीत केदार म्हणाला, " बाबा ! ह्या सर्व गोष्टी आता विसरा. स्वत:चा मुलगा आपल्या आई-वडिलासाठी जे काही करील त्याला त्याग – बलिदान म्हणणार का ? "

" खरं आहे केदार; पण चांगल्यातला चांगला सुपुत्रदेखील इथपर्यंत मजल मारू शकला नसता ! "

" तुम्ही मला लाजवीत आहात !... घरी सर्व क्षेम आहे ना ?"

" हो, सर्व क्षेम आहे. तुझ्या आईचा निरोप आहे की उद्या पहिल्या गाडीनं माझ्याबरोबर रावळपिंडीला चल. त्या बिचारीला तू आपला पत्ताही कळविला नाहीस. पाकिटातून नुसत्या नोटा पाठवीत राहिलास. नुसत्या अमृतसरच्या शिक्क्यावरून तिन काय समजाव ? "

" मी मुद्दामच स्वत:ला लपवून ठेवलं ! मी आताच नाही येऊ शकणार. " त्याच्या उच्चारातला निग्रह पन्नालालला जाणवला.

" का ? "

" अद्याप माझ कर्तव्य सपलेल नाही. "

" आठशेंच्या जागी तेराशे रुपये पाठविलेस आणिं गहाण ठेवलेलं घर सोडविलस तरी अजून कर्तव्य सपलं नाही म्हणतोस ? ते काही नाही. तुला माझ्याबरोबर आलच पाहिजे. "

" पण सरदारजीच्या पधराशे रुपयातले अजून चार पाचशे रुपये बाकी आहेत. "

" ते सरदारजींनी माफ केले आहेत. आणि त्यांनी पुन्हा मला कामाला लावून घेतल आहे. "

" पण ह्या कर्जाशिवाय आणखीही मला चुकवायच आहे."

" कोणत ? " पन्नालालला आश्चर्य वाटले.

केदार काही बोलला नाही.

पन्नालाल पुढे म्हणाला, " तुला कामावर घेण्याची सरदारजीची फार इच्छा आहे. "

" पूर्वीप्रमाणे आपल्याला काढून ? "

" नव्हे केदार ! आपण दोघे आता त्यांच्याकडेच राहणार आहोत. ते पेशावरला आणखी एक शाखा काढणार आहेत. "

केदार कात्रीत सापडला.

पन्नालाल पुढे म्हणतच होता, "केदार, मी तुझ्या मनाची झालेली दुर्दशा ओळतो तू अपूर्व साहस केलं आहेस. पण निदान एकदा तरी ही गोष्ट तू वीणाच्या आईच्या कानावर घातली असतीस, की वीणाशी...! " तो थोडा अडखळला. आणि पुन्हा म्हणाला, " पण वीणाच जर हे आईला सागती, तर...पण...पण...? "

केदार निर्वाक् बनून पन्नालालकडे पाहात होता. पण त्याचे ओठ हलले नाहीत. पापण्या फडफडल्या नाहीत. जणू तो पुतळा बनला होता !

" – आणि ठाऊक आहे ? " पन्नालाल सागतच होता, " वीणाची आई तुला बोलावण्यास इतकी का अधीर झाली आहे ? विद्याचा विवाह तुझ्याबरोबर लावून तुला स्वत:चा जावई करून घेण्याची तिची इच्छा आहे ! आणि ते खरही आहे. कारण विद्या वीणाहून फक्त दोन वर्षांनीच तर धाकटी आहे ! "

" आता शक्य नाही ! जुना केदार केव्हाच संपला आहे !"

केदारच्या म्हणण्यातील आशय आता पन्नालालला बोचू लागला.

" तुला याव लागेल, केदार ! तिच्यासाठी म्हण, विद्यासाठी म्हण, माझ्यासाठी म्हण, पण तुला यावं लागेल ! "

" नाही. तेवढं सोडून काहीही मागा – "

केदारच्या बोलण्यातून आणि उच्चारातून पन्नालालला वस्तुस्थितीची स्पष्ट जाणीव होत होती. त्यानंतर एक अक्षरही त्याच्या तोंडातून बाहेर पडले नाही. शेवटी त्याला केदारचे म्हणणे मानावेच लागले. त्याच्याकडून रावळपिंडीला लवकर येण्याचे फक्त वचन घेऊन पन्नालाल दुसऱ्या दिवशी रावळपिंडीला यायला निघाला.

## : १८ :

वीणा माहेरी यायला निघाली होती. वडील घरी परतल्याचे तिला पत्र आले. खरे पाहता ती त्यानाच भेटण्यासाठी घरी निघाली होती. जसजसे माहेर जवळ येत चालले तसतसे तिच्या हृदयातले ठोके अधिक जलद पडत होते. विवाहापूर्वी केदारशी एकातात झालेल्या अखेरच्या भेटीचे दृश्य पुन्हा पुन्हा तिच्यासमोर साकार होत होते. आणि एकच विचार पण दोन विरोधी स्वरूपांत, तिच्या हृदयात उत्पन्न होत होता. पहिला, घरी जाताच केदारचा चेहरा दृष्टीस पडावा ! पण ते शक्य नव्हते. केदार नाहीसा झाल्याचे तिला कळले होते. वस्तुतः वडिलांची भेट किती तरी वर्षांनी होणार होती. परंतु वडिलानी पित्याचे नाते जणू तोडून टाकले होते. ते पुन्हा जुळले तर जुळणार होते.

अशा प्रकारच्या विचारातच मनाला हेलकावे देत तिने गाडीची सफर सपविली. रावळपिंडी स्टेशन आले. आता टागा बाजारातून चकरा मारीत मारीत घराकडे धावत निघाला होता.

ती सासरी असताना तिला वाटत होते, की आपण माहेरी जाताच आपल्या मनाची उदासीनता पार नाहीशी होईल. पण आता ती जे काही अनुभवीत होती ते तिच्या मनाविरुद्ध घडत होते. जितकी पावले ती घराजवळ येऊन पोहोचत होती तितक्याच पटीनी तिचे औदासीन्य अधिक वाढत होते.

टांगा गल्लीच्या तोंडाशी थांबला ! वीणाला एकच व्यक्ती दिसत होती आणि ती म्हणजे केदार ! सर्वांचे आधी आपणाला केदारचेच दर्शन व्हावे अशी तिची आतरिक इच्छा होती ! पण...?

माया पुढे आली. आईच्या ती गळ्यात पडली. बहीण-भावंडाना जवळ घेऊन तिने कुरवाळले. नंतर तिने घरात येता येता विचारले— "आई, बाबा कुठे आहेत ?"

माया अद्याप डोळे पुशीत होती. ते पाहून विद्या म्हणाली, "केदारला हुडकायला गेले आहेत !"

"म्हणजे ?" वीणा एवढेच शब्द उच्चारून थांबली. केदार घरातून निघून गेला होता, हे तिला पूर्वी कळले होते. तो भेटण्याची पुन्हा शक्यता निर्माण झालेली ऐकताच तिचे मन पुन्हा आनंदाने बहरून गेले...

केदारला हुडकण्यासाठी गेलेल्या पन्नालालला आठ दिवस होऊन गेले होते. केदारचा तपास लागला किंवा नाही—आपण कोठे आहोत—कोठे कोठे केदारचा तपास केला ? वगैरे कुठल्याच गोष्टीचा कोणाला पत्ता नव्हता. केदार सापडला की नाही हे देखील कोणाला समजले नव्हते. कारण बाहेर पडल्यापासून पन्नालालचे एकही पत्र घरी आलेले नव्हते !

वीणा घरी येणार होती, येवढेच त्याला ठाऊक होते. मग ती आली नाही की नाही, याचा त्याला पत्ता नव्हता. वडिलाना पहाण्यास, त्यांना भेटण्यास ती आतुर झाली होती !

बाबा केदारला आणायला गेले आहेत, हे ऐकून वीणाला थोडे हायसे वाटले. आणि आणखी एक गोष्ट अशी होती की ज्यामुळे तिला आनंद झाला होता, आणि त्यामुळेच ती त्याला भेटू इच्छित होती. आणि ती गोष्ट म्हणजे विद्याचा केदारशी होणारा विवाह ! तिला त्याच्याशी खूप बोलायचे होते. एकातात गाठून—एका बाजूला नेऊन...!

पण केदारला इथून जाण्याचे काय कारण घडले असेल, याचा मात्र तिला उलगडा झाला नाही. मायाने तिला एवढेच सांगितले की तो हवा बदलण्यासाठी जातो म्हणून इथून गेला. यावर वीणाचा विश्वास बसला नाही—बसणे शक्य नव्हते. ती केदारला ओळखत होती.

विद्याचा केदारशी होणारा विवाह हा विषय वीणाच्या विचारशक्तीला नवीनच खाद्य मिळाले होते. ते तिला पोषक होते ह्यात मुळीच शका नाही. त्यामुळे तिचे दु:ख हलके होणार होते. आधीच केदारपासून दूर गेलेले तिचे मन आणखी जवळ येणार होते. या गोष्टीमुळे तिला कधी झाला नव्हता येवढा आनंद झाला होता. तिच्या मनात प्रश्न उठत होता—कधी परत येईल तो ? आज येईल का ? अजून येण्याची वेळ टळली नाही. संध्याकाळची गाडी अजून गेली नसेल. सध्याकाळी नाही तर रात्री तरी ? आल्यानंतर आपण लागलीच त्याला समोर जाऊन त्याला ओळख द्यायची का ? नाही ! मग ? आपण आता पहिल्याप्रमाणे राहिलो नाहीत. आपण दुसऱ्याच्या, परक्याच्या झालो आहोत. या घराशी आपला संबंध नाही...बरं मग ?...विद्या जाईल का ? छे ! तिचे तर आता त्याच्याशी लग्न होणार आहे. ती कशी जाईल ? नुसते नाव काढले तर लाजते ! मग ?...

आणि पन्नालालविषयी ती विचार करीत होती.

...आल्यानंतर ते आपल्याशी पहिल्याप्रमाणे बोलतील का ? 'वीणा' म्हणून हाक मारतील का ? 'ह्यांच्या' विषयी काही विचारतील का ? त्यांचा स्वभाव कसा आहे ? ते तुला कोणत्या नात्यानं हाक मारतात ? तुझ्यावर त्याचं प्रेम आहे का ? असेल तर किती ? या प्रश्नाना आपण काय उत्तर द्यायच ?

विद्या समोर असलेली पाहून ती आईला विचारी, "आई, विद्याचा विवाह यंदाच करायचा का ग ?"

अशा प्रश्नावर मायापण काही वेळेस विद्याकडे पाहून मिस्किलपणे हसत सुटे. मग त्या गोष्टीला अधिक भरते चढे. माया हसताना पाहून विद्याला खूप राग येई. चिडे. 'मी नाही बोलणार अशानं ! ' अशासारखे शब्दही तिच्या तोंडावाटे बाहेर पडत.

एखादे दिवशी वीणा म्हणे, "आई, आज नक्की बाबा भैयाला घेऊन घरी येतील."

"येणारच नाहीत !" विद्या चिडून म्हणे.

"विद्या, असलं अभद्र बोलायचं नाही." माया तिला धमकावी.

"मी लग्नच करणार नाही मुळी !" विद्याच्या त्या लटक्या रागात वीणाला स्वत चे रूप अनेक वेळा दिसे !

त्या दिवशी पण अशाच तऱ्हेच्या गप्पागोष्टी चालू होत्या. रात्रीचे दहा वाजले असावेत. सर्वांची जेवणे झाली होती. तोच दारावर थाप पडली !

"कोण आहे ?" मायाने विचारले.

विद्या सहज म्हणून गेली. "बाबा असतील !"

"पहा बरं—"

विद्या उठली, तिने दार उघडले—दारात खरेच पन्नालाल उभा होता !

पन्नालालला पाहताच विद्या—माया—वीणा तिघेहि क्षणभर गोंधळून गेले. पण तिघाच्या गोंधळून जाण्याचे कारण एकमेकीपासून किती भिन्न होते !

खोलीत शुकशुकाट पसरलेला पाहून प्रथम विद्या बाहेर आली. आणि दोघाकडे पहात उभी राहिली. एकही शब्द उच्चारण्याचे त्राण तिच्या ठिकाणी राहिलेले नव्हते. नंतर हलके हलके पावले टाकीत वीणा बाहेर आली. पन्नालाल दृष्टीस पडताच तिने वाकून त्यांना नमस्कार केला. पन्नालालचा हात पाठीवरून फिरला. दोघांच्याही डोळ्यातून अश्रू वाहू लागले. वीणाला वडिलांबरोबर खूप बोलायचे होते. खूप विचारायचे होते. पण ते एका प्रश्नात सामावलेले नव्हते म्हणून ती गप्प राहिली. पन्नालालने ममतेने तिच्या मस्तकावरून हात फिरविला, आणि कुशल विचारले.

"लागला का तपास ?" थोड्या वेळाने वीणाने विचारले.

"हो ! "

"मग कुठे आहे तो ?" मायाने अधीरपणे प्रश्न केला.

"अमृतसरला !"

"त्याला का नाही आणलत बरोबर ? काय म्हणाला तो ?"

"काही नाही."

"काही नाही ?" हा प्रश्न मात्र तिला खटकला.

मायाने तांब्या व फुलपात्र भरून पाणी आणले. पन्नालालने तोड धुतले, चूळ भरली.

"मुलीनो, तुम्ही झोपा." असे म्हणत माया पन्नालालला म्हणाली, "चला जेवायला."

वीणाने आपल्या इच्छा-आकांक्षाचे मनोरे जे विचारांनी सजविले होते, ते ढासळून पडले होते.

समोरच्या भिंतीला टेकून उभ्या असलेल्या वीणाला पाहून तिला चिडवीत विद्या म्हणाली, " झालं की नाही माझंच खरं-कुठं कोण आल ?"

विद्याला वाटले, बाबाच्या मागे आणखी कोणी तरी असेल-ज्यांच्याशी आपला विवाह होणार आहे असे म्हणतात; असे वाटून तिने घरात धूम ठोकली !

वीणाला वाटले, आपल्याला पाहून न जाणो केदारला काय वाटेल ? ते वाटू नये म्हणून ती झट्कन् उठली आणि आतल्या दाराच्या आड जाऊन उभी राहिली !

माया उठली. पण ती आत न जाता पन्नालालला सामोरी गेली. पण पन्नालाल एकटाच आत येतो आहे असे पाहून काही वेळ ती दारातच उभी राहिली आणि बाहेर कोणाची तरी चाहूल लागते का ते पाहूं लागली. पण तो एकटाच होता. तिने विचारले -" हे काय ? एकटेच आलात ? "

## : १९ :

जाण्यापूर्वी जेवढे म्हणून सांगण्यासारखे होते ते सर्व पन्नालालने केदारला सांगितले. तसेच ते सांगत असताना स्वत.ची काळजी घेण्याविषयी त्याने त्यास पुन्हा पुन्हा आवर्जून सांगितले. गाडी सुटे-पर्यंत त्यांच्या याच गोष्टी चालल्या होत्या. दर वेळेस पन्नालालजवळ विश्वास प्रगट करीत केदार म्हणत होता, " इथून पुढे नाही स्वतःची आबाळ होऊ देणार ! "

गाडी चालू झाली. तशी केदारने खिशातून एक पुरचुडी बाहेर काढली. आणि पन्नालालच्या हातात कोंबीत म्हटले, " हे एवढं वीणाला द्या !"

पन्नालालने पुरचुडी उघडून पाहिली. तीत काही नोटा व चिल्लर होती. ती पुरचुडी तशीच्या तशी बांधून केदारला परत करीत पन्ना लालने म्हटले, " केदार, हे कशाला ? "

"माझी इच्छा; तिला सांगा तुला मुलगा होईल तेव्हा उपयोग कर ... "

केदारच्या आग्रहापुढे पन्नालालचा इलाज चालू शकला नाही.

पन्नालालला पोहोचवून आल्यानंतर केदार दुकान बंद करून खाटे-वर पडून राहिला. सबंध दिवस त्याने दुकान उघडले नाही. एवढेच नव्हे तर तो खाटेवरून उठला देखील नाही. दुकानाच्या मागे अस लेल्या कोठडीत तो मळक्या अंथरुणावर पडलेला होता. खाटेजवळ आगोटी धुमसत होती. तीवर त्याची किटली उकळत होती. त्या किटलीमधून दर तासा-अर्ध्या तासाने तो ते उकळते पाणी पिऊन वर सिगारेटचे झुरके मारीत मारीत गाण्याचे तेच ते चरण गुणगुणत होता —

" अलविदा ऐ काफलेवालो मुझे अब छोड दो ।
मेरे किस्मतमें लिखी थी दश्तकी विरानियाँ ॥ "

दिवस निघून गेला. संध्याकाळ झाली. आपल्या जीवनाची ही संध्याकाळ अखेरची म्हणून केदारने निश्चित केली होती ! मृत्यू आणणारे रसायन त्याच्या शरिरावर अंमल करू लागले होते.

शेजारी राहात असलेल्या शीख गृहस्थाची त्याला आठवण झाली. तो नेहमी त्याच्याजवळ येऊन बसे व मोठ्या आस्थेने त्याच्या रहस्य-मय जीवनाची चौकशी करी. आदल्याच दिवशी त्याच्या मुलीने कल-कत्त्याहून पाठविलेले रसगुल्ले त्याने एका वाटीत आणून दिले होते. ती वाटी खोलीत तशीच पडून होती !

केदारने होते नव्हते तेवढे सर्व प्राण एकवटले आणि खाटेवरून खाली उतरण्याचा प्रयत्न केला. पण त्या प्रयत्नाने त्याचे पाय लटपटू लागले. आणि त्यामुळे त्याने स्वत.ला पुन्हा खाटेवर झोकून दिले.

बाहेर दरवाजा वाजला आणि केदारला हाक मारली. त्याने शेजाऱ्याचा आवाज ओळखला.

दरवाजा उघडला आणि शेजारी आत आला.

" मी तुमचीच आठवण करीत होतो - " त्याच्याकडे पहात केदार म्हणाला. त्याने वाटीकडे बोट दाखवले ...

शेजाऱ्याच्या मनात आता कसलाच संशय राहिला नव्हता. केदा-रची तब्येत ठीक नाही असे पाहून वाटी घेऊन तो घरी परत गेला.

केदारचा श्वास क्रमश: क्षीण होत चालला होता. पण त्याच्या छातीचा भाग मात्र काहीसा वेगानेच खाली-वर होत होता. अशा अवस्थेतच रक्ताची एक मोठी गुळणी त्याच्या तोंडातून बाहेर आली आणि त्याची मान जी एका बाजूला कलंडली ती कलडलीच ! संपले ! सर्व शांत झाले - ! !

* * *

दिवस उजाडला !

केदारचे दुकान माणसांनी फुलून गेले होते ! पण शेजाऱ्याने त्याचा देह उचलू दिला नाही. त्याने केदारच्या तोंडून अनेक वेळा पन्नालालचे नाव ऐकले होते. घड्याळाच्या दुकानाचा उल्लेख ऐकला होता. त्या दुकानाच्या पत्त्यावर त्याने तार केली.

" केदार सीरिअस् ! "

एकचा सुमार होता. सर्व जण त्याच्या नातेवाईकाची वाट पहात होते. त्या शीख शेजाऱ्याने सर्वांना थोपवून धरले होते.


तोच एक टांगा घराजवळ आला. थांबला. पन्नालाल खाली मान घालून खाली उतरला. त्याच्या पाठोपाठ माया आणि नंतर वीणा उतरली. मायाने केदारच्या देहाला मिठी मारली. तो हंबरडा फत्त-राचे काळीज फोडणारा होता -

वीणा एखाद्या मढवलेल्या पुतळ्याप्रमाणे निश्चल उभी होती. केदारची एकच भेट तिला हवी होती. भेटीची ती मुकेली होती— आणि आता मुकेलीच राहणार होती; ती एकुलती एक भेट नियतीने अखेर घडू दिली नाही ... !

• • •

# कसोटी न घेणारे कसोटी सामने

**प्रभाकर गुजराथी**



इंग्लिश संघ भारतीय भूमीवर उतरला तेव्हा आकर्षक क्रिकेटचे नयनमनोहर सौंदर्य आम्ही भारतीय क्रिकेटप्रेमिकांना घडवू असा दिलासा कप्तान माइक स्मिथ यांनी दिला होता. या घोषणेमुळे क्रिकेटरसिक आनंदून जावा ह्यात नवल ते काय ? फलंदाजांचे पराक्रम, गोलंदाजांची अपूर्वता, व क्षेत्ररक्षकांची चपळता, ही क्रिकेटची खास आकर्षणे पाहावयास मिळणार ह्याचा आनंद प्रत्येकास होत होता. परंतु अपेक्षाभंगाचा जबरदस्त फटका रसिकांना बसला. आकर्षक क्रिकेट भारतीयांच्या दृष्टीने मृगजळ ठरले. सतत पाच पाच दिवस कडक उन्हात आक्रमक खेळ पाहावयास मिळणार म्हणून हजारो प्रेक्षक आतुरतेने मैदानाकडे धाव घेत. परंतु आकर्षकतेऐवजी निर्जीव फलंदाजी, निस्तेज गोलंदाजी व दुबळे क्षेत्ररक्षण पाहण्याचे दुर्भाग्य प्रेक्षकांवर ओढवले.

### कप्तानांचे अयोग्य धोरण

हा अपेक्षा-भंग होण्याची कारणे कोणती ? ह्यास जबाबदार कोण? हे दोन प्रश्न साहजिकच विचार करण्यासारखे आहेत. माझ्या मते क्रिकेटला कंटाळवाणेपणा आणून देण्याचा प्रयत्न उभय संघांतील कप्तानांनी केला. ' काय वाटेल ते होवो, सामना गमवायचा नाही असा एकच पवित्रा पतौडी–स्मिथ या कप्तानजोडीने स्वीकारला. साहजिकच ह्या धोरणामुळे लढतीतील स्वयंवरात क्रिकेटदेवतेने कोणाच्याच गळचात विजयमाला घातली नाही. अंतिम यश कोणालाच मिळू शकले नाही. प्रतिपक्षाला कोंडीत पकडून त्यावर मात करण्याचा प्रयत्न केला गेला नाही. दुबळ्या स्थितीत सापडला असताही मुंबई येथील दुसऱ्या सामन्यात आपण पाहुणेसंघाचा पाडाव करू शकलो नाही हे दुर्दैव होय ! शत्रुपक्षाला नामोहरम करण्याची वेळोवेळी चालून आलेली सुसंधी आपण गमावली. प्रत्येक सामन्यात नाणेफेकीत पतौडी विजयी झाला. परंतु ह्या शुभ गोष्टीचा फायदा तो घेऊ शकला नाही. प्रथम चेंडूपासून ते अंतिम चेंडूपर्यंत फाजील बचावाचा अवलंब करून सामने अनिर्णीत ठेवण्याचा महान पराक्रम दोन्ही संघांनी गाजविला. वास्तविक पाहता दोन्ही संघांत अनेक पराक्रमी वीर आहेत. असे असताना त्यांच्या पराक्रमाला खग्रास ग्रहण का लागावे ? ह्याचे उत्तर एकच, व ते म्हणजे कप्तानांनी खेळाडूंना दिलेल्या गैरसूचना हे होय. प्रतिपक्षातील फलंदाजांच्या धावसंख्येवर नियंत्रण घालणे हे एकच उद्दिष्ट संघांनी स्वीकारले. स्मिथ, पार्कस्, कौड्री, पारफिट, बोल्स, कुंदरम, जयसिंहा, बोर्डे आदि वीरांनी धावांची बरसात करू नये म्हणून कप्तानांनी आपल्या गोलंदाजांना योग्य त्या सूचना दिल्या होत्या. " डाव्या यष्टीवर सतत मारा करून धावगतीला लगाम घालण्याचा प्रयत्न केला गेल्यामुळेच आकर्षक खेळास तिलांजली मिळाली " असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

पहिल्या तीन सामन्यांतील आकडेवारीवरून हे अधिक स्पष्ट होते. ६ डावांत ५१ गड्यांच्या मोबदल्यात भारतीय संघाने १६९९ धावा केल्या. म्हणजे प्रत्येक गड्यामागे सरासरी धावा ३३.३८ पडल्या. इंग्लिश संघाने ४० गड्यांच्या मोबदल्यांत १४०९ धावा केल्या. ह्याचाच अर्थ त्यांच्या प्रत्येक फलंदाजाने सरासरी ३७.२५ धावा केल्या. फलंदाजांनी वेळकाढू मार्गाचा अवलंब केला. इंग्लिश संघाने ७२६.३ पैकी २७८ व भारत संघाने ६५४.४ पैकी १८५ षट्के निर्धाव घालविली. याचाच अर्थ इंग्लिश फलंदाजांनी ४३५९ चेंडूंपैकी १६६८ चेंडूंवर व भारतीय वीरांनी ३९२८ पैकी १११० चेंडूंवर धाव घेतली नाही. एकूण २७७८ चेंडूंवर तीन सामन्यांत एकही धाव घेतली गेली नाही. सुमारे ४७०० मिनिटांच्या खेळात दोन्ही संघांतर्फे ३१०८ धावा केल्या गेल्या. म्हणजे सरासरी प्रत्येक दिवशी २०७.२ धावा व प्रत्येक तासाला धावगती ३७.६८ पडली. प्रत्येक १०० चेंडूंमागे ३७.५१ धावा करण्यात आल्या.

### कमजोर गोलंदाजी

दोन्ही संघांतील काही दोषस्थळांचा विचार करू.

भारतीय संघाच्या सामर्थ्याचे वर्णन करावयाचे झाल्यास "फलंदाजीत बलवान परंतु आघाडीच्या व ' ऑफ–स्पिन ' गोलंदाजीत दुबळा " असे वर्णन करावे लागेल. मांजरेकर, सरदेसाई, कुंदरम्, जयसिंहा, बोर्डे, दुराणी, नाडकर्णी आदि अनेक चांगल्या प्रतीचे फलंदाज आपल्या संघात आहेत. आतापर्यंत पार पडलेल्या चार सामन्यांत आपले फलंदाज कधीच अपयशी ठरले नाहीत. गोलंदाजीची बाजू मात्र अजूनही लंगडी आहे. आघाडीचे वेगवान गोलंदाज अजनही आपणांस लाभू शकले नाहीत. आणि जोपर्यंत हा प्रश्न समाधानकारकपणे सोडविला जाणार नाही, तोपर्यंत भारतीय संघाने उज्ज्वल यशाची फारशी आशा बाळगण्यात अर्थ नाही, वेगवान गोलंदाजांच्या पराक्रमावरच संघाचे भवितव्य अवलंबून असते. डेव्हिडसन, मॅकेंझी, हॉल, ग्रिफिथ, ट्रूमन, स्टॅथॅम ह्या अलीकडील आघाडीच्या गोलंदाजांच्या यशामुळेच ऑस्ट्रेलिया, वेस्ट इंडीज क्रिकेट संघ सामर्थ्यवान बनले आहेत.

सध्या भारतीय संघात ' लेग–स्पिन ' गोलंदाजांचा फारच सुळसुळाट झाला आहे. बोर्डे, चंद्रशेखर, नाडकर्णी, दुराणी, बाळू गुप्ते आदि सर्व लेग-स्पिन गोलंदाजी करतात. परंतु सुभाष गुप्तेप्रमाणे विविध प्रकारचे चेंडू टाकून फलंदाजांना फसविण्याचे कसब मात्र वरील एकाही गोलंदाजाच्या अंगी नाही. दुराणी–नाडकर्णी जोडी धावगतीवर आळा घालण्यापलीकडे फारशी भरीव कामगिरी करू शकली

नाही. सध्या आपल्या सघात ' ऑफ–ब्रेक ' गोलंदाजाची उणीव आहे. १९५९ मध्ये भारताने कानपूर कसोटी सामन्यात जेसू पटेल व उम्रिगर ह्यांच्या यशस्वी ' ऑफ–स्पिन ' गोलंदाजीमुळे रिची बेनोच्या कांगारू सघाचा पाडाव केला होता. ह्या घटनेवरून 'ऑफ–ब्रेक' गोलंदाजाचे महत्त्व लक्षात येते. इंग्लंडच्या जिम लेकरने १९५६ मध्ये एका कसोटी सामन्यात कांगारू सघाच्या दोन्ही डावात मिळून एकूण १९ गडी बाद करून ' न भूतो न भविष्यती ' पराक्रम गाजविला. फिरक्या गोलदाजांना अनुकूल असलेल्या हिरवळीवर ' ऑफ–ब्रेक ' गोलंदाज हमखास यशस्वी ठरतो. जेसू पटेल, गुलाम अहमद, पॉली उम्रिगर, ह्या गोलंदाजाची जागा भरून काढणारा गोलंदाज सध्या भारतीय सघात नाही. ' ऑफ–ब्रेक ' व ' लेग–ब्रेक ' गोलदाजाचा योग्य मिलाफ झाल्यास कोणताही संघ खात्रीने भरीव कामगिरी केल्याशिवाय राहणार नाही. ' लॉक–लेकर ', ' सोबर्स–गिब्ज ', ' रामधीन–व्हॅलेंटाइन ', ' मनकड–गुलाम अहमद ' ह्या विजयी जोड्यांप्रमाणे एकही जोडी सध्या भारतात नाही.

भारताप्रमाणे पाहुण्यांचा संघ फलदाजीत चागलाच ताकदवान ठरला आहे. बोल्स, स्मिथ, कौड्री, पारफीट, पार्क्स, टिटमस आदि अनेक प्रबळ फलदाज संघात आहेत. टिटमस–मार्टीमोर हे ऑफ–ब्रेक गोलदाज कुशल असून त्यांची आतापर्यंतची कामगिरी समाधानकारक आहे. ' लेग–स्पिन ' गोलदाजीत मात्र सघाची स्थिती फारच कमकुवत आहे. ' लेग–स्पिन ' गोलदाजीचा प्रश्न इग्लिश निवड समितीस चागलाच भेडसावीत आहे. वॉर्डल, लॉक ह्यांच्या निवृत्तीनतर एकही नाव घेण्याजोगा ' लेग–स्पिन ' गोलंदाज इग्लिश संघास मिळालेला नाही. रिची बेनो व सोबर्स ह्याच्या प्रभावी ' लेग–स्पिन ' गोलंदाजीमुळे कागारू व वेस्ट इंडीज संघ अनेक विजय मिळवीत आहेत. इंग्लिश संघातील वरील दोषामुळे आज या संघाची आतरराष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेत पीछेहाट होत आहे.

### उल्लेखनीय पराक्रम

उभय सघातील दोषाबरोबरच त्यानी गाजविलेल्या पराक्रमाचाही उल्लेख अगत्यपूर्वक केला पाहिजे. दोन्ही संघातील काही फलदाजानी केलेले वैयक्तिक पराक्रम भावी काळात रसिकांच्या स्मरणात राहिल्याशिवाय राहाणार नाहीत. मद्रास येथे कुदरमने केलेल्या सर्वांगसुदर १९२ धांवा व दिल्ली सामन्यातील शतक, विजय माजरेकरचे शास्त्रशुद्ध शतक, मुबई येथील सामन्यात बोर्डे–दुराणी जोडीने सकटसमयी दाखविलेली अपूर्व चिकाटी, कलकत्ता सामन्यातील जयसिंहाचे आतषबाज शतक व दिल्ली येथे प्रथमदर्शनीच कसोटी सामन्यात शतक करण्याचा हनुमतसिंगचा भीम पराक्रम, हे भारतीय वीराचे पराक्रम गौरवास्पद म्हणावे लागतील.

पाहुणे सघातर्फे बॅरिंग्टन–बोल्स जोडीची प्रथम सामन्यातील सयमपूर्ण फलंदाजी, पराभवाच्या सागरात सापडलेली संघाची नौका पैलतीरी सुखरूप पोहोचविण्याचा टिटमसने दुसऱ्या सामन्यात केलेला पराक्रम, अनेक खेळाडू आजारी पडल्याने संघाच्या रक्षणार्थ धावून आलेल्या जगद्विख्यात कॉलीन कौड्रीची कलकत्ता, दिल्ली सामन्यातील बहारदार शतके ह्या इंग्लिश वीराच्या पराक्रमाच्या स्मृती भारतीय


Statement about ownership and other particulars about **MANOOS Monthly** as required under Rule 8 of the Registration & Newspapers ( central ) Rules, 1956

**FORM IV**
( See Rule 8 )

1. Place of Publication................ POONA
2. Periodicity of its publication. ... Monthly
3. Printer's Name........................S. G. Mazgaonkar
   Nationality...................... Indian
   Address....... ..................419 Narayan Peth, Poona 2
4. Publisher's Name / Nationality / Address ... as above
5. Editor's Name / Nationality / Address ... as above
6. Names and addresses of individuals who own the newspaper and partners or shareholders holding more than one per cent of the total capital. — Rajhans Prakashan, 419 Narayan Peth, Poona 2; ( 1 ) S. G. Mazgaonkar; ( 2 ) B. M. Purandare

I, S. G. Mazgaonkar, hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

Date 1-3-1964

Signature of Publisher
S. G. Mazgaonkar



## " हनुमंतसिंगचे प्रथमदर्शनी शतक "

दिल्ली येथील ४ थ्या कसोटी सामन्यात, प्रथमदर्शनीच शतक फडकविण्याचा अपूर्व मान राजस्थानच्या तरण्याबांड हनुमंतसिंगने मिळविला. पहिल्याच सामन्यात शतक काढण्याचा मान जागतिक क्रिकेटमध्ये फारच थोड्या खेळाडूंनी मिळविला आहे. हा मान मिळविणाऱ्या भारतीय वीरांची नांवे खालीलप्रमाणे –

★ लाला अमरनाथ : –१९३३–३४ लढतीत इंग्लंड विरुद्ध मुंबई येथील कसोटी सामन्यात ११८ धावा.

★ अब्बासअली बेग : –१९५९ मध्ये मँचेस्टर येथे ११२ धावा.

★ कृपालसिंग :– १९५५-५६ मध्ये न्यूझीलंड विरुद्ध हैदराबाद कसोटी सामन्यात नाबाद १०० धावा.

★ दीपक शोधन :– १९५२–५३ मध्ये पाकिस्तान विरुद्ध कलकत्ता सामन्यात ११० धावा.

रसिकांच्या स्मरणात राहतील.

फलंदाजांच्या पराक्रमावर सुवर्णकळस चढविला कप्तान पतौडीने. दिल्ली येथील कसोटी सामन्यात त्याने द्विशतक करून इंग्लिश संघाविरुद्ध प्रथम दोनशे धावा करणारा वीर म्हणून अपूर्व मान मिळविला. १९६१ साली मांजरेकरने ह्याच मैदानावर नाबाद १८९ धावा करून विनू मनकडचा विक्रम मोडला. तो विक्रम यंदा प्रथम सामन्यात कुंदरमने १९२ धावा करून मोडला होता. परंतु अल्पावधीतच पतौडीने कुंदरमच्या विक्रमावर मात केली. भारतातर्फे द्विशतक काढण्याचा मान उम्रीगर–मनकड ह्यांनी न्यूझीलंड संघाविरुद्ध मिळविला होता. १९५५–५६ लढतीत न्यूझीलंडच्या डावखोऱ्या बर्ट सटक्लिफने ह्याच फिरोजशहा कोटला मैदानावर नाबाद द्विशतक केले होते. त्याच हिरवळीवर बरोबर ९ वर्षांनी पतौडीने २०० धावांचा विक्रम केला. ड्राइव्हज, लेगकडील ग्लान्स, हुक्स, स्वीप, स्क्वेअर कट्स वगैरे अनेक प्रकारच्या फटक्यांचे दर्शन दिल्लीकरांना पतौडीने घडविले.

फलंदाजांप्रमाणे काही गोलंदाजांनीही आपले कसब दाखविले आहे. चंदू बोर्डेने प्रथम सामन्यात पाच फलंदाजांना चकविले, तर दुसऱ्या सामन्यात प्रथमच आलेल्या चंद्रशेखरने चार गडी बाद करून आपल्या क्रीडाजीवनास सुरेख प्रारंभ केला. तिसऱ्या सामन्यात वामनमूर्ती रमाकांत देसाईने ४ बळी घेऊन अजूनही आपल्या लहानशा देहात जोम असल्याचे सिद्ध केले. नाडकर्णीने षट्कामागून षट्के निर्धाव टाकून नवीनच विक्रम घडविला, तर दुराणीने कुशल चेंडूफेक करून प्रत्येक सामन्यात एक–दोन गडी बाद करण्याचे सातत्य टिकवून धरले.

स्मिथ संघातर्फे गोलंदाजीत खरे यश मिळविले टिटमसने. एकूण २० गडी बाद करून त्याने दोन्ही संघांत सर्वात जास्त गडी बाद करण्यात प्रथमक्रमांक मिळविला. आघाडीच्या प्राईसने आपल्या गोलंदाजीबद्दल चांगल्या अपेक्षा निर्माण केल्या आहेत. ६॥ फूट उंचीच्या लार्टरचे स्तोम इंग्लिश संघात चांगलेच माजविण्यात आले होते. सर्वश्रेष्ठ वेगवान गोलंदाज म्हणून त्याची जाहिरातबाजी सर्वत्र करण्यात आली होती. परंतु प्रत्यक्षात त्याची गोलंदाजी पाहता त्याला लाभलेल्या यशाचा विचार करता लार्टर हा कमी दर्जाचा व एक सामान्य प्रतीचा गोलंदाज आहे, असेच मी म्हणेन.

### भारतीय संघातील नवे आशादीप

प्रत्येक कसोटी लढतीत क्रिकेटक्षितिजावर नवे तारे उदयास येत असतात. यंदाही भारतीय संघात काही नवे आशादीप उजळले गेले आहेत. हनुमंतसिंग–चंद्रशेखर ह्या जोडीचा मी प्रामुख्याने उल्लेख करीन. सातत्यपूर्वक धावा करणारा म्हणून हनुमंतसिंग प्रसिद्ध आहे. नुकत्याच पुण्यात झालेल्या अल्पबचत मोहिमेतील महोत्सवी सामन्याच्या प्रसंगी त्याचा खेळ पाहण्याची संधी मिळाली. धडाडी, आत्मविश्वास व एकाग्रता हे क्रिकेट खेळावयास अत्यावश्यक असलेले तीन प्रमुख गुण त्याच्या फलंदाजीत आढळले. हनुमंतसिंगचे क्षेत्ररक्षण व गोलंदाजीही समाधानकारक आहे. त्याचा खेळ पाहताना मला जी. रामचंदच्या फलंदाजीची आठवण झाली. रामचंदची धडाडी व अष्टपैलुत्व हनुमंतसिंगकडे आहे ह्यात मुळीच संशय नाही. मांजरेकर-उम्रीगर ह्यांची जागा कोण भरून काढणार, ह्या प्रश्नाला उत्तर मिळाले आहे. दिलीप सरदेसाईने विजय मांजरेकरची जागा भरून काढली आहे. विजय मांजरेकर यापुढे फार तर एक दोन लढती खेळू शकेल. विजय मांजरेकरचा वारसा भावी काळात दिलीप सरदेसाईकडे आल्याशिवाय राहणार नाही. विजय मांजरेकरप्रमाणे शास्त्रोक्त खेळाचा संपूर्ण आविष्कार सरदेसाईच्या फलंदाजीत दिसून येतो. सरदेसाई-हनुमंतसिंग ही जोडी भावी काळात भारत-संघाचे प्रमुख आधारस्तंभ म्हणून गणली जाईल.

मुंबई येथील दुसऱ्या सामन्यात 'लेग-स्पिन' गोलंदाज म्हणून म्हैसूरचा चंद्रशेखर उदयास आला. पहिल्याच सामन्यात चार गडी बाद करून त्याने आपल्या कसोटी जीवनास शुभारंभ केला. पूर्वी प्रथम दर्जाच्या सामन्यांचा फारसा अनुभव नसताना अनपेक्षितपणे कसोटी सामन्यात प्रवेश करून, चंद्रशेखरने दाखविलेले गोलंदाजीतील कसब हा एक चमत्कारच म्हटला पाहिजे.

सुधाकर अधिकारी, अजित वाडेकर, अशोक मनकड, विजय मोसले, संग्रामसिंग गायकवाड, पोतदार याही खेळाडूंना संधी मिळाली तर ते आपले तेज दाखविल्याशिवाय राहणार नाहीत.

• • •

### महाराष्ट्र फिल्म इंडस्ट्रियल को-ऑपरेटिव्ह सोसायटीकृत

# पाहू रे किती वाट !

## प्रेक्षक चाट !



'झ' चा 'भ' होणे ठीक नाही

'महाराष्ट्र फिल्म इंडस्ट्रियल को-ऑपरेटिव्ह सोसायटी' या लांबलचक इंग्रजी नावाखाली चार माणसांनी 'रंगल्या रात्री अशा' हा चित्रपट काढून चित्रपटक्षेत्रात एक नवे पाऊल उचलले. या प्रयत्नातून बाहेर पडलेला हा चित्रपट पूर्ण यशस्वी नसला तरी बराच आशादायी होता. परंतु हे उचललेले पाऊल आता हा नवा चित्रपट काढून या सोसायटीने असे काही झाडले आहे की प्रेक्षकांना भोवळच यावी !

मराठी मासिकांना ज्याप्रमाणे कथा-लेखकांपेक्षा जाहिरातदार महत्त्वाचे वाटतात त्याप्रमाणे या सिनेमावाल्यांना नटी चांगली लागते, नायक बाळसेदार लागतो. पार्श्वगायिका चांगल्या लागतात. गुटगुटीत मुले (ही फुकट मिळतात !) बालभूमिका करायला लागतात. फक्त कथा नसली तरी चालते—असलीच तर भिकार असली तरी चालते. अशीच एक भिकार कथा या सोसायटीला मिळाली. ती अशी—

**कथानक**

वडिलांच्या संसाराला मदत नि भावाच्या शिक्षणाला हातभार लावणारी एक असते सुलभा देशपांडे (सीमा); शाळेतील शिक्षिका. तिची गाठ पडते एका तडक डोक्याच्या डॉक्टरशी (अरुण सरनाईक). नेहमीप्रमाणे पहिल्याच भेटीत एकमेकांच्या प्रेमात न पडता त्यांचे थोडेसे भांडणच होते. पुढे एकदा शाळेची ट्रिप जाते महाबळेश्वराला. तिथे मुलांना घेऊन सुलभाबाई एका बंगल्यात उतरतात. तो बंगला असतो त्याच डॉक्टरचा ! पण तिथले कारभारी मालकाच्या गैर-हजेरीत बंगला या ट्रिपला खुशाल भाड्याने देतात. ('कम् सप्टेंबर'ची आठवण नाही ना झाली ?) अचानक डॉक्टर 'रॉक हडसन' च्या रुबाबात येतात नि घराचे झालेले लॉजिंग-बोर्डिंग पाहून संतापतात. तो बंगला डॉक्टरांचा आहे हे कळल्यावर ती ट्रिप रद्द करून बाई परत जायची तयारी करू लागते. तेवढ्यात एक मुलगी झाडावरून पडते नि बेशुद्ध होते. डॉक्टर तिला औषधोपचार करून शुद्धीवर आणतात. या शुश्रुषेच्या काळात डॉक्टर आणि बाई प्रेमात पडतात मग पोरांना तिथेच महाबळेश्वराला टाकून बाई आणि डॉक्टर पाच-गणीला जातात. डॉक्टरांच्या आजीला भेटतात !

इकडे सुलभाच्या घरी तिच्या लग्नाचे टुमणे तिची आई (सरोज बोरकर) नानांच्या मागे (चंद्रकांत गोखले) लावीत असते. पण आर्थिकदृष्ट्या पंगू असल्याने सुलभा लग्न करून गेल्यास आपल्या संसाराचे नि भाऊच्या शिक्षणाचे कसे होणार म्हणून ते अळंटळं करीत असतात. या संबंधात हे नानासाहेब एक गहिवरलेले भाषण करतात ! सुलभाला हे भाषण ऐकून उपरती होते. ती भाऊचे शिक्षण होईपर्यंत लग्न न करण्याचा आपला बेत जाहीर करते. डॉक्टर तिला लग्नाविषयी विचारतो. ती त्याला नकार देते.

पण तिच्या घरात तिचे लग्न करण्याचा घाट पुन्हा घातला जातो. नागपूरचे एक स्थळ असते. ती लग्नाला पुन्हा नकार देते, तेव्हा घरातले सगळेजण एकदम गांधीवादी होतात. भाऊ 'ताईचे लग्न व्हावे म्हणून मी कॉलेज सोडतो !' असे म्हणतो. आई 'तू लग्न केलं नाहीस तर मी अन्न घेणार नाही--' असे म्हणते. (नशीब,-वडील शीर्षा-सनाचा धाक घालत नाहीत !) सुलभा लग्नाला नाइलाजाने तयार होते. हे नागपूरचे स्थळ म्हणजे डॉक्टरच असतात. आनंदीआनंद गडे ! नागपूर-पुणे चोहिकडे !!

लग्न ठरते नि सुलभा आजारी पडते. (आजार काय सांगून येतो का हो ?) आजारापणात तिचा पाय पांगळा होऊन ती लंगडी होते. (हे तरी काय सांगून होते ?) आता तिचे वडील थोडावेळ व्हिलनचे काम करतात. सुलभाला डॉक्टरांना सगळी परिस्थिती सांगावी असे वाटते. पण नाना तिला असे करून देत नाहीत. ती एक पत्र लिहिते, पण ते अडगळीत पडून राहते. आता घरात गडी असून दिवाणखान्यात एवढी अडगळ पडून राहावी ! अशा गड्यांना हाकलून दिले पाहिजे. ती लंगडी असल्याचे सप्तपदीच्या वेळी डॉक्टरांच्या लक्षात येते नि तो मुंडावळ्या तोडून एक भाषण ठोकून निघून जातो.

सुरवातीला वाटते ही नोकरी करणाऱ्या मुलीची गोष्ट आहे. पुढे वाटते ही अपंग मुलीच्या जीवनावर आधारलेली गोष्ट आहे. पण तसे काहीच न होता पुढे चित्रपटभर वाटेल ते होत राहते! भाऊचे शिक्षण संपते. लग्न होते हे ठीक आहे पण त्याचा हनीमून देखील साग्र संगीत पाहायला मिळतो. पहिल्या रात्री कर्कश आवाजात भाऊची बायको गाणे म्हणते! सुलभाला आपला हनीमून झाला नाही हे तीव्रतेने जाणवते. डॉक्टरला मधेच कटवतात. तो कांगोत जातो. ( ही फिल्म सोसायटीच कांगोत का नाही जात! ) कांगोतून तो येतो, तोपर्यंत तो विश्वासघातकी, दुष्ट, पाशवी, हल्लेखोर वगैरे वगैरे चीन तयार असतोच. मग डॉक्टर जातात नेफात. तो नेफात जातो हे सुलभाला कळते. आता ती शाळेतून रजा घेऊन जवानांना रिझवायला नेफात जाते. चला नेफात! थेट नेफातून डॉक्टर व सुलभा पाचगणीला आजारी आजीला भेटायला परत येतात. डॉक्टरला सुलभाच्या पत्राची हकीगत कळते. पुनः आनंदीआनंद गडे! नागपूर-पुणें चोहिकडे!

ही भोंगळ कथा ज्यांनी लिहीली त्यांच्याबद्दल आम्हांला काही म्हणायचे नाही. कागद आहे. शाई आहे; कुणी काय वाट्टेल ते लिहावे पण ही कथा चित्रपटासाठी घेणाऱ्या राजा ठाकुरांचे काय? अरविंद गोखल्यांच्या ' अविधवा ' कथेनंतर मराठीत दुसरी हीच कथा त्यांना सापडली काय? सोसायटी हा प्राणी नेहमीच असा मूर्खपणे वागतो. कारण त्याला सगळ्याच मेंबरांना संतुष्ट ठेवावे लागते ना!

**गीते, अभिनय इ.**

अशा किंवा याहून भिकार कथांना कविराज माडगूळकर गाणी का देतात तेही समजत नाही. माडगुळकरांनी जर असा नियम केला ना की यापुढे भिकार कथांना गाणी देणार नाही, तर त्यांच्या गाण्यांसाठी चित्रपट पाहणारा प्रेक्षक त्यांना धन्यवाद देईल. या चित्रपटातील ' सैनिक हो ' हे गीत माडगुळकरांच्या चांगल्या रणगीतातील एक आहे आणि ते आशा भोसले यांनी अत्यंत सुरेल आवाजात गायिले असून डावजेकरांनी संगीतही चांगले दिले आहे.

राजा ठाकुरांचा बाकी प्रयत्न चांगला आहे. आजच्या मराठी दिग्दर्शकांच्या नामावळीत त्यांचा नंबर कलात्मक दृष्टीने वरचा आहे हे काही प्रसंगांच्या ' टेकिंग'वरून जाणवते. पण कुठल्याच बाबतीत ते ' एक पाऊल पुढे ' गेल्यासारखे दिसत नाहीत.

आणि अभिनय?...हं... सीमाबाई प्रथम बऱ्या दिसतात. पण पुढे निष्कारण डोळ्यांवर चष्मा चढवल्यामुळे त्यांच्या अभिनयातली सगळी गंमत पार घालवून टाकली आहे. छायाचित्रकारांनीही त्यांच्यावर थोडा अन्यायच केला आहे. अरुण सरनाईक अशा कामापेक्षा, घटोत्कच, भीम, बकासुर वगैरेच चांगले वठवतील. मेहनत जास्त अभिनय कमी! काशिनाथ घाणेकर काम समजून करतात. फक्त त्यांची सिनेमातली बायको पहिल्या रात्री गाणे म्हणू लागल्यावर नेमके काय करायचे हे दिग्दर्शकांनी त्यांना सांगितलेले दिसत नाही. गायीपुढे चारा धरून फिरावे तसे या बाईभोवती ते फिरतात! उमाला फारसे कामच नाही. त्यावर काय लिहिणार! चंद्रकांत गोखले दिवसेदिवस भकास काम करू लागले आहेत. हा ' ज्ञ ' चा ' भ ' होणे ठीक नाही. सरोज बोरकर, लीला चिटणीस या आई-आजी ठीक आहेत!

दत्ता डावजेकरांचे संगीत चित्रपटाला फारसे उचलून धरीलसे वाटत नाही. मधुकर खारकरांचे छायाचित्रण अगदी चांगले नसले (नि सीमाबाईच्या बाबतीतली त्यांची चूक सोडली तर) तरी बरे आहे. इतर तांत्रिक बाजूही नेहमीच्या मराठीपेक्षा थोड्या उजव्या वाटण्याइतपत आहेत.

या चित्रपटात वाईट तरी कुणाला म्हणायचे नि दोष तरी कुणाला द्यायचा? एकावर बोट ठेवले तर लगेच तो 'हा दोष माझ्यात ह्याच्यामुळे आला' असे म्हणून दुसऱ्याकडे बोट दाखवणार! सोसायटी ना! आणि कधी कधी खरे असते ते. कारण चित्रपट हे एक टीमवर्क असते. आमच्या मते हा चित्रपट सर्वांनी मिळून अयशस्वी केला आहे. सोसायटीचा पहिला चित्रपट साफ पडला नाही ह्याचे कारण रणजित देसायांची कथा तरी भरवशाची होती. ह्याचेच असे का झाले याचा विचार सोसायटीनेच या संदर्भात करावा. दुसरे काय?

—महेश






# गंगाजळी

## रॉय-गांधी-वल्लभभाई

डॉ. मानवेंद्र रॉय हे एक थोर विचारवंत म्हणून सगळ्यांनाच माहित आहेत. सुरवातीला ते दहशतवादी क्रांतिकारकांच्या गटांत सामील झाले होते. आणि त्यांच्या या क्रान्तिकार्याने ते कानपूर खटल्यातील आरोपी क्र. १ ठरून २१ जुलै १९३१ रोजीं त्यांना अटक करण्यांत आली. त्यांच्यावर खटला भरण्यात आला व त्यांना १२ वर्षांची शिक्षा ठोठावण्यांत आली. पुढे अपिलांत ही शिक्षा १२ वर्षांवरून ६ वर्षांवर आली. तुरुंगांतील ही खडतर ६ वर्षे संपवून ते तुरुंगाच्या बाहेर पडले आणि लगेच ते कॉंग्रेसमध्ये समाविष्ट झाले. त्यांच्या या कॉंग्रेसप्रवेशाचा कॉंग्रेसश्रेष्ठींनादेखील विस्मय वाटला. एक थोर नेता त्यांना लाभलेला होता. पण हे थोर नेतृत्व कॉंग्रेसला काही पचवता आले नाही.

मानवेंद्र रॉय फैजपूर कॉंग्रेसला हजर राहिले होते. फैजपूर कॉंग्रेसचे सारे कार्यक्रम गांधीजींच्या इच्छेनुसार चालत असत. कॉंग्रेसचे अधिवेशन सुरू झाले. गांधीजींची अधिवेशनांतली पहिलीच प्रार्थना सुरू झाली. झाडून सारे हजर होते. पण, गांधीजींच्या शोधक नजरेला चटकन दिसून आले की नव्यानेच कॉंग्रेसप्रवेश केलेले मानवेंद्र रॉय इथे नाहीत. त्यांनी जासूद पाठवला. जासूद गेला. आणि एकटाच परत आला. रॉयनी उत्तर पाठवले होते, "प्रार्थनेवर माझा विश्वास नाही. म्हणून मी येऊ शकत नाही. कारण तसे करणे हे ढोंग ठरेल. आणि सत्यप्रिय गांधीजींना ढोंग केलेले तर मुळीच आवडणार नाही."

पण, गांधींना त्यांचा हा सत्यवक्तेपणा मानवला नाही. रॉय-गांधी यांचे यावेळी जे बिनसले ते पुन्हा कधीच जुळून आले नाही. त्यांचे जुळून यावे म्हणून भुलाभाई व वल्लभभाई यांनी खूप प्रयत्न केले.

वल्लभभाई म्हणाले होते "तुमच्या ज्ञानाचा व कर्तृत्वाचा तुम्ही आम्हांला फायदा करून द्या. आमची सारी मदत आहेच...पण एकदा वर्ध्याला जाऊन महात्माजींशी जुळवून घ्या. नाही तर तुम्हांला अगदी एकटे स्वतंत्र मार्गाने जावे लागेल."

"काही काळपर्यंत तरी आपले जुळायला हरकत नाही," रॉय उत्तरले, "सत्याचा मार्ग खूप विस्तृत असतो. मोठाच मतभेद झाला तर धरू वेगवेगळे मार्ग."

पण रॉय यांचे म्हणणे त्यांना पटले नाही. गांधीजींनी नेहमीप्रमाणे मौन धारण केले. आणि रॉय कॉंग्रेस सोडून आपल्या वाटेने चालू लागले.

* * *

"टॅक्सी जरा हळू चालव हं ! मी पहिल्यांदाच मोटारीत बसत आहे."

"काळजी करू नका साहेब ! मी सुद्धा पहिल्यांदाच मोटार चालवतो आहे."

**शं. के. सहस्रबुद्धे**

● ● ●

## न जळणारा कागद

न जळणारा कागद लेनिनग्राडच्या कागद-तंत्रसंस्थेच्या शास्त्रज्ञांनी तयार केला आहे. हा कागद जळत नाही. त्याचप्रमाणे प्रकाशामुळे, जीवजंतूमुळे, वापरामुळे त्यावर दीर्घकालपर्यंत परिणाम होत नाही. हे सर्व गुण कागदामध्ये यावयाला रसायनशास्त्राची किमया कारणीभूत आहे. सदर संस्थेचे प्रा. पेरिकाल्स्की यांनी या कागदाबद्दल असे म्हटले आहे की, न जळण्याच्या त्याच्या गुणामुळे तो थिएटरमध्ये पडद्यासाठी आगविझव्या लोकांसाठी वस्त्रे बनविण्याकरता आणि भिंतींना लावण्यासाठी चांगलाच उपयुक्त ठरेल. त्यांतील जीवजंतुनाशक गुणधर्मामुळे त्यात अन्न-धान्य गुंडाळून ठेवता येईल आणि जंतुघ्न साहित्य त्याच्यापासून बनविता येईल. भारतात एकदा आगगाडीचे डबे उघड्यावर एक रात्रभर राहिले तेव्हा दुसऱ्या दिवशी वाळवीने त्यांचा साफ फडशा पाडला आणि त्यांचा फक्त धातूचा सांगाडा तेवढा उरला. जर ते डबे या कागदाचे बनविलेले असते तर त्याला वाळवीने स्पर्श केला नसता.

उष्ण आणि आर्द्र हवेच्या प्रदेशांत या कागदाच्या घरांची छपरे बनविणे वगैरे अनेक प्रकारचे उपयोग होतील. पॉलिमरचे कागद आणि कापड झपाट्याने सर्वसाधारण कागदाची आणि कापडाची जागा घेत आहेत. या कृत्रिम अगदी कागदी कापडाचे कपडे सहजगत्या धुता येतात. घरांची छप्परे वगैरे बनविता येतात. हा कृत्रिम कागद सर्वसाधारण कागदाप्रमाणेच बनविला जातो.

**एम्. एम्. सुरतकर**

* * *

## कोर्टाच्या अज्ञानावर भरंवसा

एका आरोपीचा खटला कोर्टात सुरू झाला.

न्यायाधीशांनी आरोपीस विचारले, "तुम्ही वकील नेमलेले दिसत नाहीत. कोर्टाने तुमच्यासाठी वकिलाची नेमणूक करावी, अशी तुमची अपेक्षा आहे काय ?"

"नाही," आरोपी शांतपणे म्हणाला, "मागील तीनही खटल्यांत मी वकील नेमलेले होते. त्यावेळी मला तुरुंगवासाची शिक्षा झाली. या खेपेला मी कोर्टाच्या अज्ञानावरच विसंबून राहण्याचे ठरविले आहे."

**वसंत माजगावकर**

* * *

विख्यात नाटककार जेम्स बॅरी याने पीटरपॅन या नावाच्या बालकाची व्यक्तिरेखा अमर करून ठेवली आहे. त्याच्या संवादांतील सूचक विनोद आणि मृदुता हे गुण त्याला मोठेपणा प्राप्त करून देण्यास कारणीभूत ठरले आहेत. या जेम्स बॅरीच्या एका नाटकातील हा प्रसंग आहे.

एक पिटुकले मूल आईला उत्सुकतेने विचारते, "आई ! मी या घरात पहिल्यांदा केव्हा नि कसा आलो ग ?"

"रात्री आलास !" आई म्हणते.

त्यावर चटकन् ते मूल निष्पापपणे म्हणते, "पण मग मी तुला रात्रीं झोपेतनं उठवलं नव्हतं ना ?"

* * *

MANOOS MAGAZINE March 1964 : ONE RUPEE R. N. B 9304


न्या. रानडे, विष्णुशास्त्री चिपळूणकर, लो. टिळक, आगरकर, नामदार गोखले—

केवढ्या उंचीची आणि पराक्रमी माणसे ही !

सह्याद्रीच्या कुशीत हिमालयाशी स्पर्धा करणारी !

या सर्वांशी स्पर्धा करू इच्छिणारे एक महत्त्वाकांक्षी व्यक्तिमत्त्व शेवटी त्यांच्या क्षेत्रामध्ये शिपाईगिरी पत्करून कादंबरीलेखनात अमर, अक्षय ठरले.

या व्यक्तिमत्त्वाच्या भावजीवनातील काही उत्कट व करुणोदात्त प्रसंगांतून घडविलेली हृदयस्पर्शी, लालित्यपूर्ण व वास्तव कादंबरी

# हरी नारायण

लेखक

प्रा. भीमराव कुलकर्णी

## एप्रिल ६४ च्या अंकात


राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे मासिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रायव्हेट लि., ३८३ नारायण पेठ, पुणे, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे, येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **संपादक : श्री. ग. माजगावकर**